म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक [redacted]

पुस्तकाचें नांव

३७२

सन

टि

# WACHAN PATHAWALI:

BEING

SELECTIONS OF ARTICLES FROM THE "DNYANODAYA"

# वाचनपाठावलि.

BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.
MARATHI 8VO. SERIES. 1,000 COPIES.

Bombay:

PRINTED AT THE ANGLO-VERNACULAR PRESS.

1884.

*Price 6 Annas.* किंमत ६ आणे.

# प्रस्तावना.

ह्या पुस्तकांत एकंदर ९० वेंचे आहेत, ते अमेरिकन मराठी मिशनाचें लोकप्रसिद्ध, लोकप्रिय, व बहुत वर्षांपासून उत्तम प्रकारें चालत असलेलें ज्ञानोदय नामक पत्राच्या जुन्या पुस्तकांतून घेतले आहेत. बहुतेक वेंच्यांची निवड त्राकट् सोसैटीच्या विनंतीवरून अहमदनगर एथील दाकतर बिसल साहेब व रेव० रामकृष्णपंत यांनीं केली, वरकड विषय त्रा० सो० च्या एडिटरानें निवडलेले आहेत. त्यानें कित्येक विषयांस नवीन सदरें घातलीं, कित्येकांस वर्त्तमानपत्रांतील निबंधांचें रूप बदलून पुस्तकांतील लेखांचें रूप दिलें. कित्येक विषयांची भाषा सुधरावी लागली, परंतु बहुतेकांची भाषासरणी जुन्या चालीचा नमुना दाखविण्याकरितां तशीच ठेविली आहे. कित्येक विषयांचा काल दाखविण्याकरितां त्यांत सन घातला आहे, व कित्येकांचें विशेष स्पष्टिकरण करण्यास्तव अथवा प्रस्तुत कालीं त्यांच्या संबंधानें लोक स्थिति कशी आहे हें दाखविण्याकरितां कुंडलींत [ ] अल्प टीपा दिल्या आहेत.

ह्या वेंच्यांचा विषयानुसार क्रम लाविला नाहीं, तथापि वाचकांच्या ध्यानांत तो सहज येईल, आणि हिंदुस्थानांत व विशेषेंकरून महाराष्ट्र देशांत सुमारें ९० वर्षांपासून धर्म, नीति, रीतिभाती, लोकसुधारणा इ० गोष्टींत कसकसा फेरफार व वृद्धि होत चालला आहे; त्या काळचे ख्रिस्ती मिशनेरी व इतर ख्रिस्ती लोक आणि सुधारलेले हिंदु यांचे विचार कसे होते, हें समजेल. ह्या वेंच्यांत कित्येक विद्वान व सुधारलेले हिंदु आणि एतद्देशीय ख्रिस्ती यांचा संक्षिप्त वृत्तांत आहे, एक हा ग्रंथ वाचणारांस बहुत बोध व ज्ञान होईल अशी आशा आहे.

हें पुस्तक कुटुंबांत व शाळेंत उपयोगी पडण्याजोगें आहे, लोकांनीं ह्याला उदार आश्रय दिल्यास अशा प्रकारचें वेंच्याचें दुसरें पुस्तक छापण्याची त्राकट् सोसैटीस उमेद येईल.

पि १३१

# अनुक्रमणिका.


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | ब्राह्मण धर्माची अर्वाचीन उत्पत्ति.... .... .... | १ |
| २ | यात्रा व जरीमरी.... .... .... .... .... | ४ |
| ३ | जगन्नाथाची यात्रा व जरीमरी. .... .... .... | ७ |
| ४ | ख्रिस्ती लोक यहूदी धर्माचे विधि कां पाळीत नाहींत? | ११ |
| ५ | गुरु कृपेची किंमत. .... .... .... .... .... | १५ |
| ६ | कोल्हापूरची देवी आणि कोल्हापूरचें राज्य. .... .... | १७ |
| ७ | गुजराथी लोकांचे महाराज. .... .... .... .... | १८ |
| ८ | रोमन क्याथोलिक पाद्रींचें बंड आणि ब्राह्मणांचें बंड. | १९ |
| ९ | कृष्णाचे व येशू ख्रीस्ताचे चमत्कार. .... .... .... | २३ |
| १० | माहीमची गंगा. .... .... .... .... .... | २६ |
| ११ | ब्राह्मणांची ग्रामण्यसभा. .... .... .... .... | २७ |
| १२ | धर्मसंबंधी वाद कसा चालवावा. .... .... .... | २८ |
| १३ | इंग्लंड देशांत ख्रिस्ती धर्माचा प्रवेश कसा झाला. .... | ३० |
| १४ | सतीविषयीं. .... .... .... .... .... | ३१ |
| १५ | मिशनेरी शाळेंत हिंदूचीं मुलें पाठवूं नयेत याविषयीं ब्राह्मणांची सभा. .... .... .... .... .... | ३५ |
| १६ | सैतानाच्या उत्पत्तिविषयीं संभाषण.... .... .... | ३६ |
| १७ | नारायण शेषाद्री यांचा बाप्तिस्मा. .... .... .... | ४० |
| १८ | हिंदु लोकांचे नवे नवे देव. .... .... .... | ” |
| १९ | सुरत एथील “ मानवधर्मसभा ” आणि जादू व मंत्र. | ४२ |
| २० | जरीमरीविषयीं संवाद. .... .... .... .... | ४६ |
| २१ | मेलेल्यांचे पुनः उठणें. .... .... .... .... | ५५ |
| २२ | हिंदु लोकांच्या जातींची उत्पत्ति. .... .... .... | ५६ |
| २३ | खंडोबाची जत्रा आणि गाडेबगाड. .... .... | ५८ |
| २४ | मुंबईतील खंडोबाचें गाडेबगाड. .... .... .... | ६० |
| २५ | खोंडदेश व त्यांतील लोक यांचा वृत्तांत. ... .... | ६२ |
| २६ | भविष्य कसोटी. .... .... .... .... .... | ७२ |

२७ सांप्रत काळचे हिंदु. .... .... .... .... ७७
२८ हिंदु धर्माविषयीं एका सुज्ञ हिंदूचे विचार. .... .... ७८
२९ अम्मलकारक पदार्थ वर्ज करण्याविषयीं एतद्देशीय ख्रिस्ती लोकांस बोध. .... .... .... .... .... ८१
३० हरएक प्रकारची दारू पिऊं नये ह्मणून मोठमोठ्या चिकित्सक वैद्यांचें मत. .... .... .... .... ८७
३१ कलकत्ता एथें उमाचरण भोस व त्याची बायको यांचा बाप्तिस्मा. .... .... .... .... .... .... ८९
३२ तामस पेण याचें वर्णन. .... .... .... .... ९१
३३ ख्रिस्ती शास्त्राविषयीं व येशू ख्रीस्ताविषयीं कित्येक नास्तिकांचीं मतें..... .... .... .... .... .... ९३
३४ रेवाळेश्वर..... .... .... .... .... .... ९७
३५ फ्रांकलिनचा गरीब रिचार्ड याचीं वाक्यें—काळाचासद्व्यय. १००
३६ बाळगंगाधर शास्त्री. .... .... .... .... १०२
३७ वजीर बेग. .... .... .... .... .... १०४
३८ राग शमविण्याचा उपाय. .... .... .... .... १०५
३९ रानटी लोक ग्रहणाविषयीं कसे फसतात याविषयीं गोष्ट. १०६
४० मोर. ... .... .... .... .... .... १०८
४१ राजा कृष्णनाथराव याची आत्महत्या. .... .... ११०
४२ चोर धरण्याची युक्ति. .... .... .... .... ११२
४३ गरीबांस दानधर्म करण्याची उत्तम रीत. .... .... ११४
४४ राममोहनराव. .... .... .... .... .... ११८
४५ वेदव्यासाचा विस्मय. .... .... .... .... १२७
४६ जलशुद्धि करण्याची विचित्र रीत..... .... .... १३६
४७ कष्टाविषयीं धैर्य करावें. .... .... .... .... १३७
४८ हिंदुस्थानामध्यें प्रभुदीन नामक एक ब्राह्मण ख्रिस्ती झाला त्याची गोष्ट. .... .... .... .... .... १४०
४९ हिंदु लोकांचे नवे देव कसे उत्पन्न होतात..... .... १४९
५० सौम्यता. .... .... .... .... .... .... १५२

# वाचनपाठावलि.

## १ ब्राह्मण धर्माची अर्वाचीन उत्पत्ति.

बहुतकरून ब्राह्मण लोकांला असें वाटतें कीं, आपला हिंदु धर्म या देशांत पहिल्यापासून चालत आला आहे, परंतु इतिहासावरून असें कळूं येतें कीं, जो हिंदु धर्म आतां चालत आहे तो अर्वाचीन आहे. तो मुळचा परदेशी लोकांचा धर्म असतां, मुसलमानी धर्माप्रमाणें चतुराईनें व लढाईनें या देशांत स्थापित झाला. इतिहासावरून असे कळूं येतें कीं, ख्रिस्ती शकाच्या आरंभीं चिनई लोकांची या देशांतील लोकांशीं व्यवहार आणि धर्म यांसंबंधी फार वहिवाट चालत होती. सुमारें इसवी सन ४०० यांत फाह्याण नांवें एक चीन देशांतला बौद्ध धर्माचा उपाध्या, हा बौद्ध धर्माच्या मूळच्या गोष्टी विचारावयास या देशांत आला. त्यानें आपली रोजकीर्द चिनी भाषेंत लिहिली, तिचा कोणी फ्रेंच देशांतील ज्ञानी लोकांनीं तरजुमा अलीकडे केला आहे. ती इमानानें लिहिली याविषयीं कांहीं संशय धरण्याची जागा नाहीं. यावरून असें स्पष्ट समजतें कीं, निपालाचे डोंगर आणि यमुना नदी यांमध्यें जो प्रदेश आहे त्यांत बौद्ध धर्म उत्पन्न झाला. शाक्यमुनी जो त्या धर्माचा उत्पादक तो अयोध्येजवळ कपिल ह्मणून एक गांव आहे त्यांत जन्मला. त्याचा बाप त्या देशाचा राजा होता आणि मागध देशाचा राजा जो पातलीपुत्र ह्मणजे पाटना एथें राज्य करीत होता ह्याच्या अमलांत होता. तो फाह्याण असें ह्मणतो कीं, आपण या देशांत येण्याच्या पूर्वीं एथें बौद्ध धर्म हजार वर्षांपासून चालत आला आहे. दुसऱ्या इतिहासावरूनही असें कळूं येतें कीं, शाक्यमुनी हा येशू ख्रीस्ताच्या अगोदर सुमारें साहाशें वर्षें जन्मला होता. फाह्याण अणखी असें

ह्मणतो कीं, जेसलमीर ह्मणून जें एक रजपूतांचें संस्थान आहे त्याच्या पूर्वेकडील आणि दक्षिणेकडील भरतखंडाचे राजे बौद्ध धर्माला मानितात. आणि बौद्ध धर्माच्या उपाध्यांला नमस्कार करितेवेळेस त्यांचा सन्मान करण्यासाठीं ते आपले मुगुट काढितात. काशी, अलाहाबाद, प्रयाग, मथुरा, अयोध्या, आणि यमुना व भागिरथी नदीजवळचीं जीं सर्वांपेक्षां मोठीं क्षेत्रें असें ब्राह्मण लोक मानितात, त्यांत हजार वर्षांपासून बौद्ध धर्म चालला होता असें फाह्याण याच्या साक्षीवरून स्पष्ट समजून येतें. तेथें शिवाचें एकहि देऊळ त्याला आढळलें नाहीं. त्यावेळेस बंगाल देशांतहि बौद्ध धर्म होता. कलकत्ता शहराजवळ तामलूक ह्मणून एक राजाची राजधानी होती तेथें बौद्ध धर्मांतील उपाध्यांचे २४ मठ त्यानें पाहिले. हियूणचांग ह्मणून दुसरा बौद्ध धर्माचा उपाध्या जो चीन देशांत राहणारा तो सुमारें सन ६३५ यांत हिंदुस्थानांत आला, आणि चहुंकडे फिरून त्यानेंहि आपल्या पर्यटणाचें वर्णन लिहिलें. त्याच्या साक्षीवरून असें समजतें कीं, त्याच्या येण्याच्या वेळेस बौद्ध धर्माचे ३० मठ आणि ३००० बौद्ध धर्माचे गुरू आणि शिष्य काशीमध्यें होते. त्यावेळेस बौद्ध धर्म कांहींसा मोडूं लागला होता, परंतु त्यावेळेसहि महादेवाचें कांहीं एक देऊळ काशीमध्यें नव्हतें, कारण कीं, तो विधर्मी लोकांचीं सर्व क्षेत्रें आणि देवळाविषयीं कांहींच ह्मणत नाहीं. आणखी आंब्रोज नांवें युरोप देशांतला एक पुस्तककर्त्ता जो सुमारें सन ४०० यांत मरण पावला; त्यानें असें लिहून ठेविलें होतें कीं, आपला एक मित्र भरतखंड आणि चिन देश यांमध्यें बहुत फिरला होता, परंतु त्याला एकाहि ब्राह्मण मिळाला नाहीं. त्याच्या साक्षीशीं दुसऱ्याहि गोष्टी मिळतात. अशोक हा सर्व हिंदुस्थानाचा बादशहा येशू ख्रिस्ताच्या पूर्वीं सुमारें ३०० वर्षें उज्जनी येथें राज्य करीत होता. तो बौद्ध धर्माचा होता, आणि कांहीं एक जीवाला मारूं नये आणि विशेषेंकरून गाईला वधूं नये, असा त्यानें सर्व भरतखंडांतील लोकांस हुकूम केला आणि ठिकाणोठिकाणीं त्यानें मोठे खांब उभारून त्यावर हा हुकूम कोरून ठेविला. असे दोन तीन खांब आजपर्यंत

२१.८६
१३१



राहिले आहेत आणि त्यांवरलें लिहिणें कोणी मोठ्या ज्ञान्यांनीं बारीक चौकशी करून वाचिलें आहे. असा एक खांब गुजराथेमध्यें आणि एक उरीया देशांत आहे. असा एक खांब फाह्याण याला बंगाल देशांत कलकत्ता शहराजवळ सांपडला. त्यावरून ह्या गोष्टीविषयीं आणखी प्रमाण होतें.

अशोक राजा तर फाह्याण याच्या पूर्वीं ६०० वर्षें होता आणि अशोकाच्या वेळेस बौद्ध धर्म चहूंकडे पसरला होता, असें त्या खांबावरून स्पष्ट समजतें. अणखी वेरूळ आणि कारलें आणि साष्टी बेटामध्यें जीं मोठीं भुयारें आणि बौद्ध धर्माचीं खोदलेलीं देवळें आहेत त्यांवरून असें समजतें कीं, बौद्ध धर्म या दक्षिण देशांत बहुत दिवस चालला होता आणि त्यावेळेस त्याला सरकाराहि अनुकूळ होतें, कारण कीं, सरकारानें बहुत वर्षेंपर्यंत आश्रय दिल्यावांचून अशीं मोठ्या खर्चाचीं कामें कधींहि झालीं नसतीं. हीं बौद्ध धर्मांतील लोकांनीं केलीं याविषयीं कांहीं संशय नाहीं. कारण कीं, चीन देशांत आणि तिबेट देशांत बौद्ध धर्मांतील लोक अशा ठिकाणीं जाऊन फार राहत असतात. परंतु ब्राह्मण लोक असें करीत नसतात. या गोष्टीविषयीं दुसरें एक चांगलें प्रमाण आहे. आलीकडे रूप्याचीं आणि सोन्याचीं फार प्राचीन काळचीं नाणीं ठिकाणोठिकाणीं सांपडलीं आहेत. जीं येशू ख्रिस्ताच्या अगोदर केलीं अशीं बहुत उज्जनी, कानूज, सिंधदेश आणि पंजाब एथलीं आहेत. आणि त्या सर्वांवर बौद्ध धर्माच्या खुणा आहेत. आणि बाद्ध धर्माच्या राजांनीं शिक्का मारून तीं चालविलीं असें त्यांवरून प्रमाण होतें. एवढीं प्राचीन नाणीं हिंदु धर्माचीं कोठेंहि सांपडलीं नाहींत. तशींच जीं सर्वांपेक्षां प्राचीन कोरींव लेणीं ब्राह्मणांच्या धर्माचीं सांपडलीं आहेत तीं इसवी सन ९०० याच्या अगोदरचीं कांहीं सांपडलीं नाहींत. टामल आणि द्रविड देशांत तर सर्व कोरींव लेणीं जीं संस्कृत भाषेंतलीं सांपडलीं आहेत तीं सन १३०० याच्या आलीकडचीं आहेत. यावरून स्पष्ट प्रमाण होतें कीं, ब्राह्मणाचा धर्म हा या भरतखंडामध्यें नवा स्थापित झालेला आहे. तो धर्म या भरतखंडाचा मूळचा धर्म नव्हे. ब्राह्मण लोक जे आहेत ते मु-

ळीं पंजाब देशामध्यें राहत असत. आणि उत्तरोत्तर ते हिंदुस्थानामध्यें येऊन आपल्या चतुराईनें पराक्रमी झाले. जेव्हां ते प्रथम आले तेव्हां सूर्य, अग्नि इ० कांची भक्ति करीत असत, परंतु जशी त्यांस सवड मिळाली तसे ते नवा धर्म स्थापूं लागले. प्रथम उरीया देशांत ब्राह्मण धर्म सरकारचा धर्म होऊं लागला, हें सुमारें इसवी सन ६०० याच्या अलिकडे झालें. पुढें ब्राह्मण धर्माचे जे राजे झाले त्यांनीं बौद्ध धर्माच्या राजांशीं मोठी लढाई करून आपला धर्म चहूंकडे चालविला, शंकराचार्य हा इसवी सन ८०० याच्या सुमारें होऊन ब्राह्मण धर्म स्थापित करावा आणि बौद्ध धर्म मोडावा ह्मणून महत् प्रयत्न करूं लागला. त्यानेंच लिंगाचे पूजेचा आरंभ केला, याविषयीं बहुत हिंदु लोक देखील मान्य आहेत. वेदामध्यें तर लिंगाची पूजा आणि अवतारांची गोष्ट कांहींच नाहीं. त्यांत नुसतें वारा आणि अग्नि, चंद्र, सूर्य आणि तारे यांचें भजन सांगितले आहे आणि गाईचा यज्ञ करावा असे देखील विधि आहेत. या सर्व गोष्टींवरून समजावें कीं, हल्लीं जो हिंदु धर्म चालतो आहे तो केवळ अलीकडे उत्पन्न झाला. आणि ब्राह्मण लोक तर मुळचे या देशांतले राहणारे नव्हते परंतु परदेशी होते.

---

## २ यात्रा व जरीमरी.

सन १८४४ सालच्या जुलै महिन्याचे शेवटीं अहमदनगर येथें लष्करांत आणि लष्करचा बाजार आहे तेथें आणि त्याजवळ भिंगार या नांवे एक गांव आहे तेथें मरीचा वारा फार झाला होता. त्यावेळेस हिंदु लोकांशिवाय बहुत सोज्यर लोक आणि कितीएक साहेब लोकहि मरण पावले, आणि येथील सर्व रहाणाऱ्यांस मोठी धास्ती पडली. याप्रमाणें दुसरे कोठें कोठें या पटकीनें बहुत लोक मरण पावले. या गोष्टीविषयीं विवेक्यांनीं विचार करावा. या पटकीमुळें सर्वांस बोध होतो, तो असा कीं आयुष्याचा भरंवसा नाहीं. ही

गोष्ट तर सर्व लोकांस ठाऊक आहे. परंतु जेव्हां पटकी चालली आहे तेव्हां ते ही गोष्ट जाणतात असें केवळ नाहीं, परंतु ही गोष्ट सर्वदां त्यांच्या मनांत वागती. ते त्याजविषयीं विचार करितात, मरणानंतर काय प्राप्त होईल याविषयीं कितीएक लोक काळजी धरितात, आणि आपण पाप सोडावें आणि सुमार्गावर यावें असें त्यांना वाटतें. परंतु पटकी गेली ह्मणजे बहुतकरून सर्वांची काळजी जाती. आमच्या वाचकांस आमची विनंती आहे कीं तुह्मी असें न करावें. परंतु चहुंकडे आरोग्य आहे तेव्हांहि आपण संकटाच्या वेळेस कसे निश्चय केले हें ध्यानांत ठेवावें या पटकीमुळें वेगळ्या वेगळ्या लोकांस कांहीं विशेष बोध होतो. ख्रिस्ती लोकांस असा बोध होतो कीं, तुमचा धनी तुमच्या कामावरून तुह्मांस केव्हां बोलावील हें तुम्हांस ठाऊक नाहीं. तर जोंपर्यंत तुम्हांस मुदत आहे तोंपर्यंत आपला धनी जो येशू ख्रीस्त त्याच्या कामावर तत्पर असा. आणि अणखी असा एक विचार आहे कीं, जेव्हां पटकी लोकांमध्यें चालत आहे तेव्हां कितीएकाचें मन नरम होतें आणि जरी अगोदर अभिमानानें तुमच्या उपदेशाला तुच्छ मानिलें तरी आतां ते नम्र बुद्धीनें तुमचा उपदेश ऐकावयास मान्य होतील. मूर्तिपूजकांसहि या पटकीमुळें बोध होतो. या देशामध्यें ईश्वर या पटकीच्या द्वारें वारंवार लोकांचें अतिशय पारपत्य कां करितो याविषयीं त्यांनीं विचार करावा. त्यांमध्यें कितीएक असें म्हणतात कीं, इंग्लिश लोक या देशीं आल्यापासून ही पटकी चालली आहे. कितीएक म्हणतात कीं, इंग्लिश लोक गोवध करितात म्हणून ही पटकी चालली आहे. परंतु पहिल्यानें इतके लांब कां पहावें. त्यापेक्षां आपल्याजवळच आपल्या मनांत पाहावें आणि ईश्वराचा क्षोभ होण्याजोगें तुह्मांमध्यें कांहीं कारण आहे किंवा नाहीं, असा विचार करावा. ज्या ईश्वराच्या हातीं सर्व रोग व दुःख आहे त्याला तुह्मीं सोडिलें आहे किंवा नाहीं आणि बहुत कल्पित देवांचें भजन करितां किंवा नाहीं? जे सर्व दुष्ट आहेत ते ईश्वराचे शत्रु आहेत. तुह्मी दुष्टांचें भजन म्हणजे ईश्वराच्या शत्रूचें भजन करितां किंवा नाहीं! आणि असें जर खरें आहे तर ईश्वराचा राग तुम्हांवर

व्हावा म्हणून तुमचे ठायीं योग्य कारण आहे किंवा नाहीं याचा विचार करा.

ज्या देशांत सर्व लोक गोवध करितात तेथें या देशासारिखी पटकी नाहीं, आणि या देशामध्यें जे गोवध करितात त्यांसच हा उपद्रव लागतो असें नाहीं. दुसरी एक गोष्ट विशेषेंकरून लोक कोठें फार मरतात? यात्रास्थळीं जेथें तुह्मी मूर्तिपूजा करण्याच्या निमित्तानें जातां तेथें विशेषेकरून हा उपद्रव उत्पन्न होतो कीं नाहीं? या विषयीं तुह्मी विचार करून पाहावें, आणि सर्व रोग व हा रोग ज्याच्या हातीं आहेत त्याला शरण जावें. जे चांगले लोक ईश्वराचे भक्त आणि जे तुह्मांला सुमार्गांत आणण्यासाठीं या देशांत आले तेहि कधीं कधीं या वाख्यानें मरतात. परंतु तेणेंकरून ईश्वर तुह्मास विशेष शिक्षा लावितो किंवा नाहीं याविषयीं तुह्मी विचार करा. जे तुमचें कल्याण व्हावें ह्मणून आपला देश सोडून तारणाचा मार्ग तुह्माला कळवितात ते जर मरतात तर ते आपल्या कष्टापासून सुटून अनंत सुखांत जातात, आणि तुह्मी अंधारांत राहतां, हें तुमचेंच नुकसान. मरण त्यांस मोठा लाभ आहे. या पटकीपासून लोकांचें रक्षण व्हावें ह्मणून जे सर्व उपाय सरकाराच्या हातीं आहेत ते सर्व उपाय सरकारानें चालू केले आहेत कीं काय? लोकांला औषध देण्याविषयीं त्यांनीं चांगला बंदोबस्त केला खरें आणि लोक जर तें औषध घेत नाहींत तर दोष त्यांसच लागतो. परंतु गांवकऱ्यांनीं आपापले गांव निर्मळ ठेवण्याविषयीं जशी ताकीद असावी तशी ताकीद झाली कीं काय? आणि त्याहून एक मोठी गोष्ट आहे आणि याजकडे सरकारानें लक्ष द्यावें अशी आमची विनंति आहे. ती हीच आहे कीं, ही पटकी कोठून उत्पन्न होती याविषयीं सरकारानें चौकशी केली असतां तिचा आरंभ बहुत करून यात्रास्थळीं आहे असें त्याच्या लक्षांत येईल. सरकारानें याविषयीं बारीक चौकशी करण्याचें अगत्य मानावें. आठ दहा वर्षांपासून अहमदनगरच्या जिल्ह्याची अवस्था पाहून हें आमच्या नजरेस स्पष्ट आलें आहे कीं, पंढरपुरास यात्रा जमली असतां तेथें जरीमरी बहुत करून सुटती,

१५ ९२१



तेव्हां ते लोक घाबरे होऊन आपल्या गांवास पळून जातात आणि थोडक्याच दिवसांनीं ह्या गावांत आणि त्या गांवांत अशा सर्व जिल्ह्यावर हा उपद्रव सुटत चालतो. आणि ते गांव कोणते तर विशेषेंकरून जे मुकामाचे गांव तेच. यात्रेकरी यात्रेहून परत आले असतां वाटेनें बहुत मरतात. आणि जेथें ते मुकामाला उतरतात त्याच गांवामध्यें हा उपद्रव त्या दिवसापासून सुटतो. याविषयीं सरकारानें चौकशी करावी आणि जर ही गोष्ट प्रचीतीस आली तर त्याविषयीं कांहीं बंदोबस्त करावा. असा बंदोबस्त करण्याची काय अडचण? सरकारानें लोकांचे धर्मास आड येऊं नये असें या प्रसंगीं म्हणावें हें योग्य नाहीं. थोडक्या बिचाऱ्या विधवांसाठीं सरकारानें हिंदुधर्मास आड येऊन त्यांचें रक्षण केले, यावरून हिंदु लोक देखील आतां सरकाराचे उपकार मानितात. तर लाखों माणसांच्या रक्षणासाठीं सरकारानें किती विशेषेंकरून त्याच लोकांच्या दुराचरणास आड येऊन लोकांचें कल्याण करावें. यात्रेस जाणें हें त्यांचा धर्म आहे असें सांगण्यास योग्य नाहीं. हा त्यांचा व्यापार आहे असें ह्मटल्यास चिंता नाहीं. यात्रेच्या निमित्तानें चोरी शिंदळकी, व नाच तमाशे पाहायास जाणारांची संख्या थोडी असते असें नाहीं. त्यांस कशाचा धर्म कशाचा देव भक्तिभावानें जाणारे असे फारच थोडे लोक असतात. तर या गोष्टीचा बंदोबस्त करण्याविषयीं सरकारानें कांहीं संशय मनामध्यें धरूं नये. कित्येक सुज्ञ हिंदुलोकांसही आतां असें वाटूं लागलें आहे कीं, यात्रा बंद होतील तर बरें.

---

## ३ जगन्नाथाची यात्रा व जरीमरी.

जरीमरीचा उगम बहुतकरून यात्रा व तीर्थस्थळीं होतो आणि यात्रेकरांच्या आपापल्या गांवांत जाण्यानें ती सर्व मुलखांत पसरती. कलकत्ता ख्रिस्तियन अबजर्वर नामक मासिक पुस्तकाच्या (१८४४) सप्तेंबर महिन्याच्या नंबरामध्यें या गोष्टीविषयीं एक पत्र छापिलें आहे

त्या पत्रांतून आह्मी कांहीं उतारे घेतों. तो लिहिणारा या देशांत बहुत दिवस राहिलेला आहे आणि तो पुरी जें जगन्नाथाचें मुख्य स्थान आहे तेथील यात्रेमध्यें जाऊन जें त्याच्या दृष्टीस पडलें तें त्यानें लिहिलें. तो असें ह्मणतो कीं, " पुरीच्या यात्रेच्या योगानें जे अनर्थ या लोकांला होतात त्यांतून एक विशेष आहे, ह्मणजे त्यांकडून दरवर्षीं बहुत लोक मरतात, बहुत कुटुंबांचा नाश होतो, बहुत लोकांचीं मनें खराब होतात, आणि दारिद्रावस्थेंत बहुत लोक पडतात. जे रोग आणि दुःखें यात्रांकडून होतात ते असंख्य आहेत. यात्रेकरी त्या देवळाकडे पोहंचू लागले ह्मणजे तेव्हांपासून जरीमरी सुटूं लागती, आणि तेथून यात्रेकरांचें आपल्या घरीं जाण्याच्या वाटेवर जे गांव व खेडीं आहेत त्यांजवरहि ही पटकी समुद्रांतील लहरीसारखी लोटत लोटत सर्व मुलुखावर पसरती. यावरून जे अनर्थ होतात ते कांहीं हिशोबांत येत नाहींत, परंतु पटकी झाल्यावर जर कोणी त्या वाटेनें चालेल तर एक एक गांवामध्यें जरीमरीचें निशाण दृष्टीस पडेल, कधीं कधीं सर्व गांव ओसाड पडले असे सांपडतील. आह्मी पुरीस होतों तेव्हां हें एक मृत्युक्षेत्र आहे असें आह्मांस वाटलें, आणि एथें पाप आणि पापाचा अधिकारी जो सैतान यांच्या राज्याला कोणी अडथळा करीत नाहीं, परंतु येथें त्याचा व्यापार यथेष्ट चालतो. एथें ईश्वर नाहीं. त्याजविषयीं जें ज्ञान तेंहि येथें मिळत नाहीं, एथें लोक देवाविरहित आणि आशाविरहित आहेत असें दिसण्यांत येतें. एथें सैतानाच्या भुलथापीनें लोकांची बुद्धि अगदीं गेली आहे असें दिसतें, तेथें कोणी एक गेल्यावर त्याला जरी त्याच्या सर्व मित्रांनीं सोडिलें आणि तो मोठ्या कठीण अवस्थेंत मरण पावला तरी हें परम सुखाचें द्वार असें ते समजतात. तेथें रोगी होऊन डुकरासारिखे चिखलांत आपल्या मलमूत्रांत लोळणें हें जगन्नाथाच्या उराशीं निजून मरण पावणें असें त्यांस वाटतें. तेथें ह्मातारे, मध्यम अवस्थेंतले, आणि तरूण कोमल स्त्रिया आणि बळवान पुरूष हे सर्व सारिखे त्या पटकीनें मरण पावतात. ज्यावेळेस त्यांला हा रोग लागतो त्यावेळेस त्यांचे सोबती मित्र व नातलग हे त्यांला सोडून देतात आणि त्यांचा समाचार घेण्यासाठीं क्षणभरही उभे

राहत नाहींत. बहुतेक लोक रस्त्यांत रात्रीं निजून हा रोग त्यांस लागतो आणि त्या ठिकाणांतून न हालून ते तेथेंच मरतात, सकाळीं त्यांचे शेजारीं निजणारे उठून यात्रेच्या धामधुमीमध्यें चालते होतात, परंतु मेलेले व जे मरत आहेत ते तसेच राहतात. जे रोगी होतात ते चिखलामध्यें उघडे नागवे, आणि तान्हेनें व्याकुल होऊन पडतात. हजारों लोक त्यांच्या जवळून चालतात, पण त्यांतून कोणी एकहि त्यांजवर दया करीत नाहींत. त्यांस मरण येईतोंपर्यंत ते तसेच राहतात. मेल्यावर कुत्रीं त्यांचीं प्रेतें शेतांत ओढून नेऊन ते व कोल्हे आणि घारी त्यांस खाऊन टाकितात, असें बहुत आमच्या दृष्टीस पडलें. जे रोगी पडतात त्यांतून जर कोणा एकाजवळ पैसा असला तर ते डोलीमध्यें बसून जातात आणि जेव्हां रोगानें त्यांची शक्ति जाऊन त्यांस बोलतां येत नाहीं तेव्हां भोईलोक डोली खालीं ठेवून संतोषानें त्याच्या दुःखाचा परिणाम पाहतात आणि ज्यावेळेस तें रोगी माणूस बेसावध होतें तेव्हां डोली उलटून त्याला बाहेर टाकितात मग त्याचा पैसा व कपडे व डागिणे लुटून पुनः माघारे जाऊन दुसऱ्याचीहि तीच अवस्था करितात, अशी बहुत स्त्रियांची अवस्था झाली. तेथें स्वर्गवाडा या नांवाची एक जागा आहे, त्या ठिकाणीं आह्मांस असंख्य प्रेतें दृष्टीस पडलीं, कांहीं नुकतींच मेलेलीं, कांहीं थोडीं सडलेलीं आणि कांहीं अगदीं सडलेलीं आणि कांहीं प्रेतांचीं हाडकें पावसानें आणि उन्हानें सफेत झालेलीं अशीं होतीं. जिकडे तिकडे चिता चेतल्या होत्या. आणि त्यांचा धूर त्या सर्व जाग्यावर दाट बसला होता आणि भाजलेल्या मानवी मांसाचा वास सुटला होता. हें सर्व आणि त्यासुद्धां जंगली कुत्र्यांचें रडणें आणि घारींचें ओरडणें या सर्वांकडून मला अतिशय खंत आली, आणि जरी त्या जाग्याचें नांव स्वर्गवाडा ह्मटलें आहे आणि देव लोक रोज रोज त्यांतून देवळाकडे चालतात ह्मणून सांगितलें आहे, तरी तो आह्माला केवळ प्रेतवाडा भासला, तेथून देवळाजवळ गेलों असतां तेव्हां जगन्नाथाचे पुजारी त्याला देवळांतून काढीत होते त्यावेळेस त्या देवाला एक मोठा अनर्थ झाला. त्याला दारांतून काढिते वेळेस एका

पुजाऱ्यास हग ओक लागली, तेव्हां त्या सभोंवती अशी दाटी होती कीं, तेथून त्याला अगदीं हलतां येत नव्हतें तेव्हां उपाय नाहीं असें असतां त्याच्या दोन द्वारांकडून त्या पवित्र जमिनीवर आणि पवित्र पुजाऱ्यांवर आणि जगन्नाच्या पवित्र अंगावर देखील प्रसाद झाला, आणि असें तें प्रसिद्धपणानें विटाळलें गेलें. त्यावरून लोकांमध्यें मोठी धास्ती पडली आणि पुरुष व बायका सर्व तेथून पळत चालल्या; हें पाहून देवळांतील गायीही आपलीं पुच्छें वर करून त्या अभाग्य देवाची थट्टा करण्यासारिखें हरएक तऱ्हेचें नर्त्तन करून रस्त्यांत पळून गेल्या. त्या अनर्थावरून या जगाचा नाथ दस्तुराप्रमाणें त्या दिवशीं रथावर गेला नाहीं आणि अडचणीची गोष्ट होती ह्मणून हरएक प्रकारें शुद्ध करण्यासाठीं बहुत पैसे लागले नाहींत. दुसऱ्या प्रसंगीं त्याला शुद्ध करण्यासाठीं हजारों रुपये लागले असते. तेथून मी आपल्या घराकडे गेलों तेव्हां कितीएक कोसपर्यंत रस्त्याच्या बाजूवर बहुत प्रेतें पडलीं होतीं आणि रोगी व मरण्यास पडलेले लोक बहुत होते. पुढें रात्र झाली ह्मणून ते आमच्या दृष्टीस पडले नाहींत. अशी सर्व रात्र चालून सकाळीं जेव्हां उजेड पडूं लागला तेव्हां तीच अवस्था दृष्टीस पडली. आणि जे चालत होते त्यांतून बहुतेक असे अशक्त होते कीं, ते आपल्या घरीं पोंचल्यापूर्वीं शेंकडों रस्त्यावर पडत पडत जातील असें लक्षांत आलें. या वर्षीं तेथें सुमारें दीड लाख माणसें होतीं." याप्रमाणें या लिहिणाऱ्यानें वर्त्तमान कळविलें आहे, आणि आमच्या वाचणाऱ्यांस ही विनंती आहे कीं, या गोष्टीकडे लक्ष लावून पूर्ण विचार करावा कीं, यात्रा करणें हें योग्य आहे कीं काय? ज्या ठिकाणीं सर्व पाप उघडें, घडतें ज्या ठिकाणीं सर्व दया नाहींशी होती आणि हजारों माणसें मरण पावतात, अशा ठिकाणीं जाणें हें पवित्र आणि दयाळू ईश्वराच्या दृष्टीस चांगलें आहे कीं काय? आह्मांस वाटतें कीं, जो कोणी याजविषयीं विचार करील त्याची खात्री होईल कीं, हा सैतानाचा यथास्थित कारखाना आहे. [ हें हिंदुधर्माचें स्वरूप नव्हे काय? ]

११

# ४ ख्रिस्ती लोक यहूदी धर्माचे विधि कां पाळीत नाहींत?

मे महिन्याची ( १८४२ ) उपदेशचंद्रिका ही ज्युलई महिन्याच्या अखेरीस छापून आली तींत यहूदी लोकांच्या रीती आणि शुद्धाशुद्ध संबंधी नेम याविषयीं एक बात आहे. त्यांत असा एक प्रश्न केला आहे कीं, ख्रिस्ती लोक आतां त्या नेमांप्रमाणें कां चालत नाहींत? आणखी ख्रिस्ती लोक ते नेम पाळीत नाहींत यावरून असें दिसून येतें कीं, ते नेम अयोग्य आहेत, आणि पवित्र व ज्ञानी ईश्वरानें दिल्हेले नाहींत असें ख्रिस्ती समजत असतील, असें तेथें ह्मटलें आहे. परंतु याविषयीं ख्रिस्ती लोकांचें मत आणि चाल कशी आहे, हें आह्मी आतां दाखवितों.

१ मोशाच्या नेम शास्त्रामध्यें जे नेम आणि रीति यहूदी लोकांस लावून दिल्ह्या त्या सर्व योग्य कारणांसाठीं अन्यकाळीं लाविल्या होत्या; त्यांतील बहुतेकांचें हें मुख्य कारण होतें कीं, सर्व जगाचें पाप हरण करणारा असा जो ख्रीस्त येणार होता त्याजकडे इस्राएल लोकांचें लक्ष लागावें, विशेषें करून जे पशुयज्ञ त्यांनीं करावे ह्मणून आज्ञा दिल्ही होती त्यांचें हेंच कारण होतें. जो मोठा यज्ञ पुढें सर्व मनुष्यांच्या पापांच्या प्रायश्चित्तासाठीं होणार होता त्याचा दाखला हे सर्व यज्ञ होते. इस्राएल लोकांनीं ईश्वराजवळ आपल्या पापांची क्षमा मागतेवेळेस पशुयज्ञ अर्पिल्यावरून त्यांच्या समजण्यांत असें आलें कीं, "रक्त पडल्या वांचून पापाचा क्षमा होत नाहीं." (इब्री अ० ९ आ० २२.) आणि पापी लोकांचा एकच तारणोपाय केवळ निष्पापी तारणाऱ्याचें दुःख आणि मरण यांकडून आहे, असेंहि ते समजले. मोशाच्या नेमशास्त्रांत शुद्धाशुद्धसंबंधी जे नेम लाविले होते तेहि चांगल्या कारणांसाठीं लाविले. त्यांच एक मुख्य कारण हें होतें कीं, यहूदी लोक येशू ख्रीस्ताच्या येण्यापर्यंत त्यांच्या आसपासच्या लोकांपासून निराळे राखिले जावे, कारण कीं, सावळस

सर्व दुसरे लोक मूर्त्तिपूजा आणि काल्पित देवांचें भजन करीत असत, आणि येशू ख्रीस्ताविषयीं भविष्य गोष्टींवरून पूणच प्रमाण व्हावें ह्मणून तो येईपर्यंत त्या लोकांनीं ईश्वराचें भजन चालवून त्याचें शास्त्र आणि वचनें हीं मान्य करून तीं रक्षण करून ठेवावीं याचें अगत्य होतें. या कारणासाठीं ईश्वरानें त्या लोकांला कांहीं प्रकारचे भक्ष्य-पदार्थ मना केले आणि शुद्धाशुद्धासंबंधी बहुत नेम लाविले, असे कीं, त्यांनीं दुसऱ्या लोकांशीं फार वहिवाट न करावी आणि जी मूर्त्तिपूजा व दुसऱ्या ओंगळ रीति करण्याची त्यांचा फार ओढ होती, त्या त्यांनीं त्या लोकांपासून न शिकाव्या. त्या शुद्धाशुद्धसंबंधी नेमांचें दुसरें एक मोठें कारण होतें ह्मणजे त्यांनीं स्वच्छ असावें आणि आपल्या सर्व गृहकृत्यांत मळीणपणाचा कंटाळा धरावा. ज्या कोणाला अज्ञानी मूर्त्तिपूजक लोकांची ओळख असेल त्याला असें समजेल कीं, हें मोठें चांगलें कारण आहे. जे पदार्थ इस्राएल लोकांला मना केले ते खाण्यास अगदीं अयोग्य असें सर्व लोक जे मोश्याचें नेमशास्त्र मानीत नाहींत ते देखील समजतात आणि ते स्वतः खात नाहींत; आणि जर आह्माला त्या देशाची आणि त्यांतील जनावरें वगैरेंची बरोबर माहितगारी असती आणि ज्यावेळेस मोश्याचें नेम-शास्त्र दिल्हें त्यावेळेस जे लोक त्या देशांत आणि त्याराभोंवते राहत होते त्यांच्या चाली बरोबर माहित असत्या, तर जे नेम मोश्यानें लाविले त्यांतील प्रत्येकाचें योग्य कारण होतें असें लक्षांत आलें अ-सतें. या सर्व गोष्टींवरून आह्मी असें समजतों कीं, ईश्वरानें आपल्या इस्राएल लोकांची स्वच्छ रीति आणि सुखावस्था व्हावा या हेतूनें, आणि विशेषेंकरून त्यांनीं सर्व मूर्त्तिपूजक लोकांपासून वेगळें राहावें ह्मणून हे नेम लाविले. त्यानें ते उगीच लाविले नाहींत, परंतु सर्व चांगल्या कारणांसाठीं लावून दिल्हे.

२ हे नेम सर्वकाळ राहावयाचे नव्हते, ते सर्व कर्मनेमांसुद्धां पुढें रद्द व्हावयाचे होते. ( इर्मया अ० ३१ ओ० ३१–३४.) वर सां-गितलें आहे कीं, येशू ख्रीस्ताच्या येण्यापर्यंत यहूदी लोकांनीं मूर्त्ति-पूजक लोकांपासून निराळें राहावें असें त्या नेमांचें एक मुख्य का-

रण होतें. जेव्हां येशू ख्रीस्त या जगांत आला तेव्हां हें कारण नाहींसें झालें, आणि तेव्हांपासून ख्रिस्ती लोकांनीं सगळ्या जगांत जाऊन सर्व लोकांस तारणाची गोष्ट कळवावी याचें अगत्य पडलें. ह्मणून हे सर्व शुद्धाशुद्धसंबंधी नेम रद्द झाले. याविषयीं ईश्वरानें आकाशापासून दृष्टांत देऊन स्पष्ट हुकूम दिला. (प्रेषितांचीं कृत्यें अ० १०.) ईश्वराचे लोक मूर्त्तिपूजक लोकांच्या रीतिप्रमाणें चालतील असें पहिल्यासारिखें पुढें भय नव्हतें, परंतु उलट प्रकारें ख्रिस्ती लोक मूर्त्तिपूजकांकडे जाऊन तारणाची गोष्ट कळविल्यानें बहुतेक मूर्त्तिपूजक अंधारापासून उजेडाकडे आणि सैतानाच्या अधिकारापासून ईश्वराकडे फिरविले जातील अशी आशा होती. असें असतां वहिवाटीचा प्रतिबंध करावा याचें कांहीं प्रयोजन राहिलेंच नाहीं; परंतु वहिवाट करण्याच्या ज्या अडचणी अगोदर होत्या त्या दूर कराव्या असें मोठें कारण होतें. आणखी यहूदी लोकांला जवळच्या लोकांच्या ओंगळ रीतींप्रमाणें चालण्याची फार ओढ होती, त्या रीतींपासून त्यांस राखण्यासाठीं ते नेम अगत्याचे होते, परंतु ख्रिस्ती लोकांस त्या नेमांची अशी कांहीं गरज नाहीं. आपण काय खावें आणि काय न खावें हें त्यांनीं आपल्या बुद्धीनें समजावें ह्मणून त्यांला मोकळीक दिल्ही आहे. जे कोणी ख्रीस्ताचा पवित्र धर्म मानितात त्यांला असा समज आणि बुद्धि आहे कीं, खाण्याच्या प्रकाराविषयीं आणि तशाच दुसऱ्या बहुत गोष्टींविषयीं ते आपणच बरोबर चालतील. यहूदी लोकांस जे नेम लाविले होते ते त्यांस त्या प्रसंगांत अगत्याचे होते, तरी ते त्यांला देखील एवढे भारी वाटले कीं ख्रिस्ती लोक त्यांपासून मोकळे होऊन मोठा आनंद पावले. (प्रेषितांचीं कृत्यें १५. १०.) आतां तर त्या भारापासून आह्मी मोकळे झालों असतां आमची अशी इच्छा आहे कीं, दुसऱ्यांनींहि अशा सर्व ओझ्यापासून मोकळें व्हावें. हिंदुशास्त्रांत जे शुद्धाशुद्धसंबंधी नेम लावले आहेत, त्यांतून कांहीं ह्या लोकांत स्वच्छपणांच्या उपयोगी पडतात असें आह्मास वाटतें, ह्मणून ते लोक येशू ख्रिस्ताचा धर्म अंगिकारितील तोंपर्यंत त्यांनीं सर्व नेम टाकावे अशी आमची इच्छा

नाहीं. जर ते येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवितील आणि त्याच्या आज्ञे-प्रमाणें चालतील तर आपल्या सर्व आचरणांत स्वच्छ रीति धराव्या आणि ज्या ओंगळ रीति आतां त्यांमध्यें चालतात त्या सर्व टाकाव्या ह्मणून त्यांला अगत्य वाटेल, परंतु जोंपर्यंत येशू ख्रीस्ताचा धर्म अंगिकारीत नाहींत तोंपर्यंत त्यांच्या शास्त्रांतल्या कांहीं रीति स्वच्छ-पणाविषयीं उपयोगी पडतात. यहूदी लोकांस असे नेम लावण्याचें मुख्य कारण हें होतें कीं, त्यांस दुसऱ्या लोकांपासून निराळे ठेवून मुर्त्तिपूजा करण्यापासून राखावें, परंतु हिंदु लोकांस हे नेम लावण्याचें आणि त्यांच्या दुसऱ्या लोकांशीं वहिवाटीचा प्रतिबंध करण्याचें असें कांहीं प्रयोजन नाहीं, कारण कीं सर्व जगांत हिंदुलोकांपेक्षां दुसरे कोणीहि लोक निस्सीम मूर्तिपूजक नाहींत. आणि जरी हिंदु शास्त्रांतील नेम कांहींसे स्वच्छपणाच्या उपयोगी पडतात खरे, तरी येशू ख्रीस्ताचा धर्म अंगिकारिल्यानें आणि त्याकडून अंतःकरणाची शुद्धता पावल्यानें आतांच्यापेक्षां स्वच्छपण चांगलें चालेल.

३ जे नेम आणि रीति यहुदी लोकांस लाविल्या त्यांतील एकही पापाच्या प्रायश्चित्ताकरितां लाविली नाहीं, आणि ते तारणाचा उपाय असे मानिले नव्हते, आणि ते नेम पाळण्याकडून कोणी कधीं तारण पावला, असाहि अर्थ नाहीं. (मिखा ६. १६–७ आणि इब्री १०. ४.) "कारण कीं, गोऱ्ह्यांचें आणि बोकडांचें रक्त पापें काढून टाकावयास शक्तिमान नाहीं." त्या कर्मनेमांकडून तारणाऱ्याची गरज दिसून आली. (गल ३. २४.) "नेमशास्त्र आह्मास ख्रीस्ताकडे पोंहचविण्यास बालशिक्षक होतें." ते नेम आणि रीति जेव्हां मनुष्यें पाळण्यास झटत असत तेव्हां आपण ईश्वराच्या आज्ञा कितां चुकतों आणि त्या आज्ञा मोडल्यामुळें आह्मास जो दंड लागावा तो दंड सोसून त्यापासून आह्मांस सोडवावयासाठीं तारणाऱ्याची किती गरज आहे, हें त्यांच्या लक्षांत आलें. ह्यावरून हिंदु शास्त्रांतील कर्मनेम आणि मोश्याचे शास्त्रांतील नेम यांमध्यें किती अंतर आहे हें समजा. हिंदुशास्त्रांत जे कर्मनेम सांगितले आहेत, ते तारणाचा उपाय असे दाखविले आहेत, आणि हजारोंहजार हिंदुलोक

ते कर्मनेम पाळण्याकडूनच तारण पावण्याची आशा धरितात. परंतु मोश्याचे शास्त्रांतील कर्मनेम लावण्याचे अगदीं निराळेंच कारण होतें. ते तारणाऱ्याची गरज लोकांस दाखविण्याच्या उपयोगीं पडले, कारण कीं, आपण किती पापी आहों आणि त्यामुळें आपणाला केवढा दंड लागतो हें त्या नेमांवरून त्यांच्या लक्ष्यांत आलें. हिंदु लोकांस आमची अशी विनंती आहे कीं, तुमच्या शास्त्रांत जी नीति आणि जे कर्मनेम सांगितले आहेत ते पाळण्यांत तुह्मी किती चुकतां आणि असें असतां आपण आपल्या कर्मनेमानें कसे तरूं असा विचार तुह्मी करावा. तुमच्या सर्व पापांविषयीं प्रायश्चित्त करण्याकारितां आणि ईश्वराच्या आज्ञा वेळोवेळ मोडल्यामुळें जो दंड लागावा त्यापासून सोडविण्याकारितां तुह्मास तारणारा पाहिजे कीं नाहीं?

## ५ गुरु कृपेची किंमत.

मद्रासच्या एका वर्तमानपत्रावरून असें समजतें कीं, तेथें हिंदु-लोकांचा एक महा स्वामी मोठ्या समारंभानें येऊन लोकांपासून पुष्कळ पैका घेऊन खात आहे. त्याच्या स्वारीला १० हत्ती, ५० ऊंट, १०० घोडे, ५०० बैल इत्यादिक बहुत परिवार आहे. तो ह्मैसूरचा राजा याचा गुरु आहे आणि तो राजा त्याला रोजच्या खर्चासाठीं ८० रुपये देतो असें ह्मणतात. नेल्लोर एथें जाऊन त्यानें तेथल्या लोकांपासून ३०,००० रुपये उगवले. तो मद्रासेजवळ आला तेव्हां त्या स्वामीनें आपल्या एका शिष्यास पुढें पाठवून शहरांत येण्याची परवानगी मागितली. त्याचे इतके परिवार होते ह्मणून सरकारानें पहिल्यानें परवानगी दिल्ही नाहीं. पुढें त्याला आणि त्याच्या कांहींएक परिवाराला परवानगी दिल्ही. तो मद्रासेस पोहचला तेव्हां त्यानें आपल्या शिष्यांकडून सरकारचे तीन मुख्य कामदार ह्मणजे नरसिंव्हराव अनंताचारी आणि भीमसेनाचारी यांस आणि मयत राजा रंगरराव व याच्या विधवेस असा निरोप

पाठविला कीं, तुह्मीं प्रत्येक एक हजार रुपये मला दिल्हे पाहिजेत, आणि जे तुमच्यापेक्षां हलक्या कामावर आहेत त्यांनीं चार महिन्यांचा पगार दिल्हा तर पुरे; परंतु वर सांगितलेल्या बडे लोकांनीं नाहीं ह्मटलें ; आणि दुसऱ्यानीं सांगितलें कीं, " आह्मी एक महिन्याचा पगार देऊं. " हें त्यांचें घटाईचें बोलणें ऐकून तो महा स्वामी रुसून आपल्या हत्तीवर आरूढ होऊन निघाला. कदाचित् कोणी ह्मणेल कीं, त्यानें इतके रुपये कशासाठीं मागितले आणि देणारांना काय लाभ मिळणार होता. स्वामीने त्याला आपला आशिर्वाद द्यावा, आणि स्वर्गास जाण्याची खूण ह्मणजे त्यानें आपली पवित्र मुद्रा तापवून तेणेंकरून कातडीवर डाग द्यावा. ही खूण देण्यासाठीं अणखी एक एक रुपया एक एकापासून मागत असतो. तो स्वामी गेल्यावर मद्रासेंतील लोकांस मोठी धास्ती पडली आणि ते असा विचार करूं लागले कीं, एवढा आशीर्वाद आपण इतक्या रुपयांसाठीं सोडावा काय ? रुपयांची गोष्ट तर हलकी आहे परंतु हा आशिर्वाद दुर्मिळ आहे, असें समजून त्यांनीं त्या स्वामीच्या पाठीमागें माणसें पाठवून बहुत विनंती करून नजराणे देऊन आपण सगळे चार महिन्यांचा पगार देऊं असें कबूल होऊन त्यांनीं त्याला माघारें आणिलें. आतां असा विचार करावा कीं, सरकारच्या कामावर जे सर्वांपेक्षां मोठे कामदार आहेत ते दुसऱ्यांपेक्षां ज्ञानी आणि बहुश्रुत असतात. तर असे लोक अशा पाशांत पडतात, हें मोठें आश्चर्य आहे. आणखी त्या मनुष्यांनीं जेव्हां त्या गुरूच्या पायां पडून त्याला रुपये दिल्हे तेव्हां त्यांच्या मनांत असें वाटलें असेल कीं हा मोठा धुतारा आहे आणि आपण मोठे मूर्ख आहों, यावरून समजा कीं हिंदु लोक स्वतंत्र नाहींत. ते मोठ्या दासपणांत आहेत. आपल्या बुद्धीप्रमाणें चालण्यास ते मुखत्यार नाहींत. याच कारणावरून हिंदु लोकांला दुसऱ्या लोकांसारिखा विद्याभ्यास करून सुज्ञान मिळविण्याविषयीं इतका उशीर लागतो. जोंपर्यंत ते आपल्या खोट्या धर्माच्या बंधनापासून मुक्त होत नाहींत तोंपर्यंत स्वतंत्र मनुष्यासारिखें त्यांच्यानें चालवत नाहीं. मनुष्य मन स्वभावाप्रमाणें होतें

आणि जेव्हां कोणी एकाचें मन दासपणांत आहे तेव्हां कांहीं सांगण्याजोगी स्वतंत्रता राहत नाहीं.

[ ही गोष्ट सुमारें ४० वर्षांची आहे. तेव्हांपासून हिंदु लोकांत विद्येच्या योगानें बरीच सुधारणूक झाली आहे व ह्या मानानें आतां असल्या गुरूचें महात्म्यही कमी होत चाललें आहे; तरी अद्याप पुष्कळ लोक त्यांच्या पाशांत आहेत यांत संशय नाहीं ]

---

## ६ कोल्हापूरची देवी आणि कोल्हापूरचें राज्य.

कोल्हापूर हें श्रीमहालक्ष्मीचें स्थान ह्मणून आम्ही असें जाणत होतों कीं, एथें परशत्रु येऊन विजय पावेल असें घडणार नाहीं. देवीनें आजपर्यंत जे जे शत्रु व संकटें राजास आलीं तीं तीं घालविलीं; व राजाहि देवीच्या आज्ञेविरहित चालला नाहीं. हा प्रसंग तरी येण्याच्या पूर्वीं तिला विचारिलें कीं, " ही इंग्रेजी लोकांशीं लढाई करावी कीं न करावी? " तिनें सांगितलें, " कांहीं चिंता करूं नका, हें काम मी पार करीन, " त्यावरून ते लहान राजे असतांहि केवळ देवीच्या बोलण्यावर विश्वास ठेवून लढाई व बंडें यांस प्रारंभ झाला. तेव्हां आम्हीं जाणिलें होतें कीं, कोल्हापूरकर याच्या पाठीवर देवी आहे ह्मणून याचा विजय होईल. परंतु तो आमचा सुमार एकीकडेच राहिला आणि कित्येक बिचारे गरीब लोक मरून गेले आणि इंग्रेज सरकाराचा जय झाला. तेव्हां मला असें आश्चर्य झालें, ज्या देवीच्या हातून कल्याण व्हावयाचें तें न होऊन उलटें वाईट झालें. तें असें कीं, तेथचे सर्व लोक कैद केले गेले आणि पन्हाळा म्हणून जो एक किल्ला तो अगदीं पाडून टाकिला, व सर्व राज्याची खराबी होऊन इंग्रेज सरकाराशीं विरुद्ध असें झालें. ह्या सर्व गोष्टी एक देवीच्या प्रसादाच्या सांगण्यावर विश्वास ठेविल्यामुळें झाल्या. मला असें वाटतें आमचीं दैवतेंहि गतवीर्य झालीं आहेत. कित्येक म्हणत असत, " जर देवी एकदां जरीमरी सोडील तर इंग्रेजी फौज

क्षणांत मरेल, देवीपुढें या माकडांची कथा काय आहे?" कित्येक ह्मणत, "या स्थानीं राजाशिवाय दुसरा कोण विजयी होणार आहे?'' कित्येक ह्मणत, याचें राज्य पंचवीस वर्षे चाललें आणि आतां बुडण्याची वेळ आली. आणि या हिंदुस्थानाचा मुख्य शिवाजी राजा ह्मणून त्याचें राज्य त्याच्या वंशास द्यावें असें देवीच्या मनांत आलें म्हणून या बारा वर्षांच्या मुलास लढाई करण्याची इच्छा झाली." अशा नानाप्रकारच्या कल्पना मनांत करीत होते, परंतु त्या सर्व स्वप्नांत जें पहाणें त्यासारिख्या झाल्या.

[ हा वरील मजकूर सन १८४४ सालांत कोल्हापूरास जें बंड झालें त्यासंबंधी एका कोल्हापूरवासी गृहस्थानें लिहिलेला आहे. ]

---

## ७ गुजराथी लोकांचे महाराज.

( कोणी हिंदूनें ज्ञानोदयास लिहिलेलें पत्र. )

या आम्हां हिंदु लोकांत एक मोठा चमत्कार म्यां पाहिला तो असा कीं, गुजराथी लोकांचे गुरु एथें आहेत त्यांच्या दर्शनास ते सर्व तच्छिष्य प्रातःकाळीं व सायंकाळीं जात असतात, तेथें त्या गर्दीत मीहि गेलों, तों माझा तेथें प्रवेशच होणें कठीण पडला. कारण लोक दर्शनास येणारे फार आणि तेथें निर्बंध केला आहे तितक्यांस दर्शन होत नाहीं. तर भलते वेळेस गेलें असतां गुरुदर्शन होत नाहीं. असो, ते गुजराथी लोक फार भक्तिमान् आहेत ते इतके कीं, गुरुचे कोणी पाय धरितो, कोणी हातानें शरीरास स्पर्श करितो, आणि महाराज ( ह्मणजे गुरु ) स्नान करूं लागले ह्मणजे त्याच्या धोतराचें व आंगावरील खालीं वाहिलेलें असें जें मळकट पाणी तें तीर्थ या बुद्धीनें पितात. जेव्हां तो स्नान करून येतो तेव्हां त्यास झोंपाळ्यावर बसवून झोंके कादितात. असें त्याचेंच सेवन करितां करितां सगळा दिवस निघून जातो. बरें तो गुरु तरी कोणी सिद्ध किंवा संत आहे असें नाहीं, तर केवळ जसे आह्मी

सर्व लोक आहो तसाच तोहि आहे, हें स्पष्ट दिसत असतां जो जन्ममरणातीत परमेश्वर त्याचें स्मरण देखील करावयास त्या लोकांस अवकाश नाहीं.

गुजराथी बायकांची तर गुरूच्या ठायीं फारच भक्ति असती. गुरु करावा आणि त्यास तन, मन, धन, असे तीन पदार्थ अर्पावे असा शास्त्रमार्ग आहे, ह्मणून त्याहि तन ( ह्मणजे शरीर ) गुरूला अर्पितात. त्या गुजराथी लोकांचें मुख्य दैवत गुरूच आहे. इत्यादि चाली त्यांच्या ऐकून मी फार दुःखित झालों आणि मनांत विचार केला कीं, हा हिंदुधर्म व हिंदुरीति केवढी विपरीत आहे ?

## ८ रोमन क्याथोलिक पाद्रींचें बंड आणि ब्राह्मणांचें बंड.

जसें ब्राह्मणांनीं बंड माजविलें आहे त्याचप्रमाणें किंबहुना अधिक रोमन क्याथोलिक पाद्री लोकांनीं बंड माजविलें होतें. बैबल ह्मणून जें ख्रिस्ती धर्म पुस्तक तें पाद्रींवांचून कोणी वाचूं नये, मुख्य पाद्री ( पोप ) केवळ ख्रीस्ताचा अवतार, त्यास जो द्रव्य देईल त्याचें पाप जाऊन त्यास पुण्य मिळतें, राजांनीं त्याची पावडी धरावी आणि त्यानें घोड्यावर बसावें, त्याच्या मतास कोणी प्रतिकूळ झाला असेल त्यास पाखंडी ठरवून जाळून टाकावें, असे हजारों जण मारून टाकिले. पुण्यभूमि ( म्हणजे खनानदेश ) तेथें उपवास इत्यादि, हजारों खटलीं त्या पाद्रींनीं उभविलीं होतीं. तीं मात्र ख्रिस्ती धर्माचा मोड न करितां ज्या देशांतील लोकांनीं मोडून टाकिलीं ते लोक हल्लीं सुखानें आहेत. याविषयीं इंग्लंडाच्या वृत्तांताच्या पुस्तकांत पाहावें. परंतु असें हें केवळ ज्ञानानें झालें, सर्व लोक शिकूं लागले, विचार करूं लागले, तेणेंकरून त्याच शास्त्राचा वास्तविक रीतीनें पाद्रींच्या उलटे अर्थ सांगूं लागले. त्याप्रमाणें एथें सर्वांस कळा, विद्या ज्ञान, झालें म्हणजे एथेंहि तसेंच होईल.

हिंदु लोकांत वेद शास्त्र पुराणें ह्मणून जे ग्रंथ आहेत ते केवळ ईश्वरवाणी असें समजतात, त्यांखेरीज जे दुसरे ग्रंथ ते मनुष्यांनीं केले असें मानितात. ईश्वरवाणी ती बहुधा ब्राह्मणांनींच ह्मणावी, ती सत्य मानून त्यांत जें सांगितलें आहे, मग तें साधारण कर्म अंगधुणें कां असेना तरी तें शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें केलें पाहिजे, त्याप्रमाणें न केलें तर त्यास प्रायश्चित्त, ज्ञातिबहिष्कार व मरणानंतर दुर्गति होईल. वेदशास्त्र पुराणांतील एकाहि वाक्य असत्य मानितां कामास नये, याप्रमाणें समजूत झाली आहे, तेणेंकरून लोकांचें फार अनहित झालें; सांप्रतकाळची दैन्यअवस्था प्राप्त होण्यास हीच समजुत कारण झाली. ह्याच समजुतीनें अनेक ज्ञातिभेद उत्पन्न झाले, अन्य उत्तम देशीं जाणें वर्ज झालें, चांगल्या उत्तम कळा विद्या शिकणें बुडालें, इत्यादि अनेक अपाय प्राप्त झाले. हे वेद शास्त्र पुराणें ईश्वरवाणी होय असें ह्मणणें यास कांहीं प्रमाण पाहूं लागलें असतां तसें तर कोठें आढळत नाहीं कीं, ईश्वरानें वेद शास्त्र पुराण यांचा एक मोठा ग्रंथ लिहून आकाशांतून या पृथ्वीवर जंबू द्वीपांत टाकून दिल्हा. जसें महमद जो मुसलमानाचा पैगंबर याजला खुदानें कोरान किताब सोनेरी शाईच्या अक्षरांनीं लिहून दिल्हा तसें अथवा ख्रिस्ती धर्मांत जसें मोश्याला ईश्वरानें दर्शन देऊन आकाशवाणीनें दाहा आज्ञा सांगितल्या, तशीं हिंदूंचीं वेद शास्त्र पुराणें दिल्हीं असें कांहीं कोठें लिहिलें नसेल. त्या त्या ग्रंथांत ब्रह्मदेव व्यास ऋषी इत्यादिकांचीं नांवें आहेत आणि त्यांजला ईश्वरानें तें सांगितलें आहे असेंहि लिहिलें आहे, परंतु ही बहुत दिवसांची जुनी गोष्ट, त्यांस कोणी त्या काळींची साक्ष असें सांगावयास नाहींत कीं, ईश्वरानें प्रत्यक्ष वाणीनें जें सांगितलें तेंच त्या ऋषीनें लिहिलें, किंवा आपल्या अंगचें लिहिलें असें सांगावयास किंवा शाबुदी करावयास आतां कांहीं प्रमाण नाहीं. याजकारितां असें करावें कीं, या वेदशास्त्र पुराणांत जीं जीं वाक्यें परमार्थसंबंधी तीं तीं वेगळीं काढून त्यांचें एक धर्मपुस्तक बांधावें, त्यांत जो उपयोगी वेदशास्त्र पुराणांचा भाग तो अर्थात् येईल. याखेरीज बाकीचा जो भाग राहिला तो व्यवहार सं-

बंधी ठरवून वेगळा काढावा, त्यांतील गोष्टी देशरिवाज चाली रीती अशा ठरवाव्या, केवळ ईश्वर वाक्य असें समजूं नये कीं, ज्याप्रमाणें न चाललें ह्मणजे ज्ञातिबाहेर क्षौर प्रायश्चित् असें जाणूं नये. इहलोकीं राजाज्ञा मोडिल्या असतां त्याचा दंड राजापासून होतच आहे, खेरीज ईश्वरी आज्ञा मोडिल्या असतां त्यांजविषयीं दंड करायास एक ईश्वर मात्र समर्थ, तो दंड ईश्वरानें आपल्या हातीं कां घेऊं नये, जसा ब्राम्हणांनीं हल्लीं घेतला आहे व जसा पूर्वीं रोमनक्याथोलिक पाद्री लोकांनीं आपल्या हातीं घेतला होता तसें. या प्रकारें शास्त्राची व्यवस्था झाली असतां फार चांगलें होईल. याप्रमाणें झालें असतां या देशाचा लवकर उदय होईल. असें झालें नाहीं म्हणून हा उत्तम देश ज्यांत सर्व गोष्टी अनुकूल आहेत, हवा पाणी चांगलें, व्यवहार व्यवस्था जातिभेद अज्ञान इत्यादिकांनीं मात्र देश गरीब झाला. असा हा देश पूर्वींच उदयास येऊन समृद्ध होऊन राहता. यांत अन्य देशींच्या लोकांचा प्रवेश झाला नसता आणि जरी दैवयोगानें इतर अम्मल झाला असता तरी यांतील लोकांच्या करण्यास शद्ब लागला नसता, दैवानें झालें असें होतें. परंतु काय जी दुर्दशा झाली ती हिंदूंनीं आपल्या हातीं केली, कां तर कोणाच्याहि मनांत येतें कीं हिंदूंत जाति पुष्कळ, एकचित्त नाहीं, विद्या एकाच लोकांकडे राहिल्यामुळें अज्ञान फार, ह्मणून हिंदुलोकांच्या अंगीं दुर्बळता आली, आणि दुसऱ्यांच्या ओंजळींत पाणी प्यावें लागलें. याजकरितां ब्राह्मण आदिकरून सर्व हिंदु लोकांस मी अंतःकरणपूर्वक विनंती करितों कीं, मी तुमचा शत्रू नाहीं, मी तुमचा मित्र आहें, व तुमचें वास्तविक कल्याण इच्छितों. मी सूचनार्थ थोडकेंसें लिहिलें आहे, त्याचा तुम्ही जर पक्षपात सोडून विचार कराल तर तुम्हास खचीत कळेल कीं तुम्ही सर्व भ्रमांत आहां. तुमच्या धर्माची आणि संसाराची खराबी झाली आहे. तुम्हामधील विद्वान थोर लोक मिळून सभा करितील आणि जितकीं ईश्वरपर वाक्यें आहेत तितकीं वेगळीं काढून पाहतील तर बाकीचीं सर्व व्यवहारी वाक्यें मनुष्यांनीं आपआपल्या मतानें लिहिलेलीं आहेत,

तीं सर्वत्र व्यापक अशीं मानूं नयेत. तुह्माला जसा आपल्या हिंदु धर्माचा अभिमान तसाच किंबहुना अधिक खरा अभिमान मला आहे. तुमच्या वास्तविक धर्मास धक्का न लागतां तुमचा संसार व देश उत्तम अवस्थेप्रत पावेल. तुह्मास जीं अज्ञात सुखें तीं निःसंशय प्राप्त होतील. हालीं जो तुह्मास स्वदेशाभिमानाचा अंशहि नाहीं, (कोरडा जाति अभिमान वागवितां) तो अभिमान तुमच्या ठायीं वागूं लागेल. सर्व हिंदूंवर भाऊबंदांसारिखी प्रीति करूं लागाल, धर्म कांहीं न बुडतां सर्व उत्तम देशांत तुह्मी जाऊं येऊं लागाल, त्यांसीं भलाईनें व अति प्रीतीनें वागूं लागाल, लग्नप्रयोजनांत हजारों रुपये खर्चीत असतां सुखाचा लेश प्राप्त न होतां त्यापासून जीं जीं दुःखें आतां होतात तीं सर्व जाऊन उत्तम प्रपंचसुखाचा तुह्मास अनुभव होईल, आपल्या आप्तांवर प्रीति करूं लागाल. ह्मणून मी तुह्मांस कळवळ्यानें प्रार्थना करितों कीं, या एका गोष्टीचा विचार करा कीं, वेदशास्त्र पुराणें यांत सर्व जें कांहीं, सांगितलें तें सर्व ईश्वरानें सांगितलें किंवा त्यांत कांहीं मनुष्यानें सांगितलें आहे. अणखी मनुष्यांनीं तें सर्व आचरलें तरच ईश्वराची कृपा होईल किंवा ईश्वरकृपा होण्यास एक ईश्वराची भक्ति पुरे. जर कर्मकांडाचा ईश्वरप्राप्तीविषयीं उपयोग नाहीं तर मग प्रपंचास त्याचा किती उपयोग तो पाहा? आजपर्यंत या कर्मकांडानें काय दिवा लावला? याचा प्रकार वर लिहिला आहे. या गोष्टीचा अवश्य तुह्मी विचार करा, ह्मणजे वर लिहिलेल्या धर्मांत फेरफार करणें तुह्मास योग्य व जरूर दिसेल.

[ हें पत्र कोणी सुधारलेल्या हिंदुचें आहे, त्याच्या विचाराप्रमाणें हिंदुशास्त्राची आवड निवड केली असतां हिंदुलोक कांहीं प्रकारें सुधरतील खरे, पण ती सुधारणूक पुरती व काईमची होणार नाहीं. शास्त्र सुधरून सुधारणूक होत नाहीं, तर शास्त्रानुरोधानें सुधारणूक झाली पाहिजे. रो० क्याथोलिक पाद्रींचे बंड मोडण्याकरितां ख्रिस्ती शास्त्राची कोणी सुधारणूक केली नाहीं, तर तें शास्त्र पाहून त्यांतील सिद्धांतांची नीट समजूत करून घेऊन लोक चालूं लागले. त्याप्रमाणें

हिंदुशास्त्रविषयीं करितां येणार नाहीं. तर सर्वांस ईश्वरी शास्त्र पाहिजे. तें केवळ ख्रिस्ती शास्त्रच होय. त्याप्रमाणें जे चालतील ते खचीत सुधारतील. त्यांचें अंतःकरण व वर्त्तन हीं दोन्ही शुद्ध होतील. ]

---

## ९ कृष्णाचे व येशू ख्रीस्ताचे चमत्कार.

नोवेंबरच्या ( सन १८४४ ) ज्ञानोदयामध्यें कृष्णशास्त्री साठे यांनीं मुंबईतील कांहीं लोकांस जीं व्याख्यानें दिलीं त्यांविषयीं लिहिलें आहे. त्या व्याख्यानांत त्या शास्त्री बावाने येशू ख्रिस्ताचे चमत्कार कृष्णाच्या चरित्रांसीं तोलून पाहून कृष्णाचा चरित्रे मोठीं आहेत असें म्हटलें, आणि त्यांत येशू ख्रीस्ताच्या चमत्कारांपेक्षां अधिक शक्ति आणि परोपकारीकपण दिसून येतें असें सिद्ध करण्यासाठीं त्यानें प्रयत्न केला. येशू ख्रीस्ताचे चमत्कार कृष्णाच्या चरित्रांशीं तोलून पाहावे याविषयीं आमची कांहीं गैरखुषी नाहीं, त्यापेक्षां हिंदु लोकांनीं दोन्ही गोष्टींकडे निःपक्षपातानें लक्ष देऊन एक एकाचें लक्षण समजून घ्यावें अशी आमची मोठी इच्छा आहे. दिसेंबर महिन्याच्या १९ व्या तारिखेच्या प्रभाकरांत एक पत्र छापून आलें त्यांत कृष्णाच्या चरित्रांचीं मुख्य लक्षणें चांगलीं दाखविलीं आहेत. तो पत्र लिहिणारा असें दाखवितो कीं, कृष्णाच्या सर्व चरित्रांच्या इतिहासामध्यें कांहीं अशुद्ध गोष्टी आहेत. त्याचा चरित्रें ( चमत्कार ) करण्याचा हेतु जर ह्मटला तर परोपकारीकपण नाहीं, परंतु दुसऱ्यास पीडा देऊन आपला कामातुरपणा तृप्त करावा यासाटीं त्यानें तीं केलीं असें त्याच्या चरित्राच्या पुस्तकांवरून समजण्यांत येतें. तो पत्र लिहिणारा ही गोष्ट प्रतिपादन करण्यासाठां कृष्णाच्या चरित्रांतून कांहीं उदाहरणें दाखवितो. तीं उदाहरणें एथें लिहावीं याचें अगत्य नाहीं, तीं कृष्णाच्या दुसऱ्या सर्व कथ्यांसारिखींच आहेत. तो पत्र लिहिणारा शेवटीं असें ह्मणतो कीं या सर्वांवरून दिसून येईल कीं, या कृष्णासारिखा उपद्रवी आणि पापमार्गी लावणारा अजून दुसरा कोणी आढळण्यांत आला नाहीं.

आमचेंहि मत या लिहिणाऱ्यासारिखेंच आहे असें कीं, कृष्णाच्या सर्व चरित्रांत अशुद्धपण आणि दुसऱ्यास उपद्रव देण्याची बुद्धि अशीं लक्षणें आहेत. याविषयीं आह्मांस असेंहि बोलावयाचें आहे कीं जो कोणी आपणाला देव ह्मणवितो त्याच्या देवपणाविषयीं केवळ त्याच्या शक्तीवरून प्रमाण येईल असें नाहीं, परंतु जे दुसरे गुण त्याच्या ठायीं दिसतात त्यांजकडेहि लक्ष दिल्हें पाहिजे, त्यानें जसें शक्तिमान तसें परम दयाळू व परम पवित्र आणि शुद्धहि असावें, नाहीं तर तो विश्वास ठेवण्याजोगा होत नाहीं. जर या नेमानें कृष्णाचीं चरित्रें पाहिलीं तर तीं कशीं दिसतील बरें? त्यानें आंग धुणाऱ्या बायकांचीं वस्त्रें चोरून नेऊन त्या इकडे तिकडे नग्न धांवल्या याची मौज पाहिली, आणि प्रवासास गेलेल्या नवऱ्यांच्या बायकांचें पातिव्रत्य मोडिलें. यांत जी अशुद्ध आणि पीडा करण्याची बुद्धि दाखविली ती परम पवित्र व परम दयाळू देवाला अगदीं शोभत नाहीं, ती केवळ दुष्ट भूतांलाच शोभती. कृष्णाच्या गोष्टीहून येशू ख्रिस्ताचें वर्त्तन आणि त्याचे सर्व चमत्कार किती निराळे आहेत. शुद्ध प्रीति आणि दीन लोकांवर परम दया हीं त्याच्या सर्व करण्यांत आणि विशेषेंकरून त्याच्या सर्व चमत्कारांत दिसून येतात. ज्या दुबळ्या आणि दुःखित स्त्रिया निरोगी होण्यासाठीं त्याकडे आल्या त्यांला तो असें बोलत असे कीं, "कन्ये, तुझीं पापें क्षमा झालीं आहेत, तुझ्या विश्वासानें तुला तारिलें आहे, सुखरूप जा." ( लूका० अ० ७– ओ० ४८, ५० ). जो कोडी त्याजकडे येऊन दीनवाणानें असें बोलला कीं, "हे प्रभू, जर तुझी इच्छा असेल तर मला शुद्ध करण्याविषयीं तूं शक्तिमान आहेस," त्याला तो ह्मणाला कीं, "माझी इच्छा आहे, तूं शुद्ध हो." ( मात्थी० अ० ८. ओवी २, ३ ) अशी प्रीति त्याच्या सर्व चमत्कारांतही दिसून येती त्याच्या सर्व बोलण्यांत व चालण्यांत शुद्ध ईश्वरी प्रीति प्रत्यक्ष आहे ही प्रीति केवढी मोठी, पापी लोकांवर त्याची किती दया! या गोष्टींकडे हिंदु लोकांनीं आपलें लक्ष द्यावें अशी आमची मोठी इच्छा आहे. त्यांला आमची विनंती अशी आहे कीं, येशू ख्रिस्ताची आपल्या सर्व वर्त्तणुकींत कोणती बुद्धि दिसून

येती हें समजण्यासाठीं त्यांनीं त्याचें कथानक वाचावें. जर अशा हेतुनें वाचतील तर आह्मांस असें वाटतें कीं, तो खचीत ईश्वर आहे अशी त्यांची खातरी होईल, कारण कीं जशी जगांत दुसऱ्या कोणी मनुष्यानें कधींहि दाखविली नाहीं तशी त्याच्या ठायीं बुद्धी होती, परम प्रीति आणि नम्रता आणि ज्यांनीं त्याचा द्वेष केला व त्याला मारिलें त्यांजवर देखील दया आणि क्षमा, ज्यासारिखें उदाहरण पृथ्वीवर कधींहि झालें नाहीं असें त्याच्या सर्व चालण्यांत व बोलण्यांत दिसून येतें.

आणखी येशू ख्रीस्ताच्या एका मोठ्या चमत्काराकडे हिंदु लोकांनीं लक्ष द्यावें अशी आमची विनंती आहे. त्या चमत्कारासारिखा येशू ख्रीस्ताच्या अगोदर किंवा येशू ख्रीस्ताच्या नंतरहि दुसऱ्या कोणीच असा चमत्कार केला नाहीं. तो मेल्यावर फिरून जिवंत झाला, याविषयीं ह्मणतों. त्यानें आंधळ्यांस दृष्टि दिल्ही, रोग्यांस बरें केलें, बहिऱ्यांस कान दिल्हे, पांगळ्यांस पाय दिल्हे, मुक्यांस वाचा दिल्ही आणि मेलेल्यांस जिवंत केलें, यांवरूनच लोकांनीं आपणाला देव मानावें असें त्यानें ह्मटलें नाहीं. येशू ख्रीस्त लोकांमध्यें पहिल्यानेंच उपदेश करूं लागला त्या वेळेस यहूद्यांनीं त्याला पुसलें कीं, “ तूं जीं कामें करितोस त्यांविषयीं तुला अधिकार आहे याचें तूं काय प्रमाण दाखवितोस? ” तेव्हां त्यानें ह्मटलें कीं, “ हें देऊळ मोडा आणि तीन दिवसांत मी फिरून उभारीन. ” अशा बोलण्यांत तो आपल्या शरीराविषयीं बोलला आणि त्याचा अर्थ असा होता कीं, मला मारिल्यावर मी तिसऱ्या दिवशीं पुन्हा जिवंत होईन. ( योहान्न अ० २. ओ० १८, २१. ) दुसऱ्या वेळेस त्यानें लोकांस असें सांगितलें कीं, “ योना जो भविष्यवादी त्याच्या चिन्हावांचून मी लोकांस दुसरें कांहीं चिन्ह देत नाहीं, कारण कीं जसा योना माशाच्या पोटांत तीन दिवस होता तसा मी तीन दिवस कबरेंत राहीन. ” ( मात्थी. अ० १२. ओ० ३९.) आणि तो आपल्या शिष्यांस वेळोवेळ असें बोलत असे कीं, “ मरण पावल्यावर फिरून मी तिसऱ्या दिवशीं जिवंत होईन.” (मात्थी अ० १६. ओ० २१ आणि अ० १७. ओ० २३.)

त्यानें ह्मटलें, "मला आपला जीव देण्याचा आणि फिरून घेण्याचाहि अधिकार आहे." (योहान्न अ १०. ओ० १८.) जसें त्यानें सांगितलें होतें तसें पूर्ण झालें. लोकांच्या पापासाठीं आपला प्राण दिल्यावर तो मेलेल्यांमधून तिसऱ्या दिवशीं फिरून उठला आणि शेकडों शिष्यांला प्रगट होऊन त्यानें त्यांस आज्ञा दिल्ही कीं, सर्व जगांत जाऊन माझें मरण आणि पुन्हा उठणें यांविषयीं साक्ष देऊन माझ्याकडून जो तारणोपाय तो सर्व लोकांस कळवा. बहुत भविष्यवाद्यांनीं आणि साधूंनीं ईश्वराच्या साह्यानें चमत्कार केले आहेत, ह्मणजे रोग्यांस निरोगी केलें, आंधळ्यास दृष्टि दिल्ही, मेलेल्यांस जिवंत केलें; परंतु येशू ख्रीस्ताच्या पूर्वीं किंवा येशू ख्रीस्तानंतर आपला जीव देऊन फिरून घेण्यास कोणी येशू ख्रीस्तासारखा शक्तिमान होता, असें कधींहि ऐकण्यांत आलें नाहीं. यावरून असें दिसतें कीं, येशू ख्रीस्ताला ईश्वरी शक्ति आहे आणि मरणाचा व जीवनाचा अधिकारी तोच आहे. कृष्णानें यासारिखा आपला जीव देऊन पुन्हा घेतला याचें जेव्हां प्रमाण दाखवितां येईल तेव्हां आम्ही कबूल होऊं कीं, शक्तीविषयीं त्याचीं चरित्रें येशू ख्रीस्ताच्या चमत्कारां एवढीं मोठीं आहेत.

---

## १० माहीमची गंगा.

कित्येक हिंदुलोक भोळसरपणा व अज्ञान यांमुळें अतिशय फसले जातात, परंतु मी हिंदु यामुळें मला असें वाटत नसे, तरीही आतां वाटूं लागलें. कारण कीं, या मुंबईहून दोन कोसांवर माहीम ह्मणून एक गांव आहे तेथें अतिशय लोक जाऊं लागले तेव्हां मी त्यांस विचारिलें कीं, तुह्मी कोठें जातां? त्यांनीं मला सांगितलें कीं, अहो जी गंगा काशींतली ती तेथें विहिरींत प्रगट होऊन त्या विहिरींतून बाहेर वाहत चालली आहे. हें वर्तमान ऐकून मी विचार केला कीं, आपणहि गेलें पाहिजे, ह्मणजे माझें सर्व पाप जाऊन मी

निर्मळ होईन. अशा विचाराने गेलों आणि जाऊन त्या विहिरींत पाहूं लागलों तेव्हां तें पाणी पांढरें केवळ गंगेसारिखें असें पाहून प्यालों आणि स्नान केलें. इतक्यांत मला उलटी झाली आणि माझ्या आंगावर मळ दिसला. तेव्हां म्यां शोध केला तों कोणी एका लुच्चानें पाण्यांत राख टाकिली होती, कारण कीं, गंगेचें पाणी श्वेतवर्ण आहे तर तसें दिसल्याशिवाय लोकांस खरें वाटणार नाहीं व आपणास पैसे मिळणार नाहींत. अशी युक्ति करून तेथें जे कित्येक यात्रेकरू लोक जातात त्यांजपाशीं भीक मागतात, परंतु मनांत विचार करितात कीं, आपल्या लबाड युक्तीनें बरेच लोक फसले जाऊन आपलें पोट बरेंच चाललें आहे. तर अशा ठक लोकांच्या फसविण्यांतच आमचें तारण असें समजणारे आह्मी लोक किती अज्ञानी !

## ११ ब्राह्मणांची ग्रामण्यसभा.

मी एका दिवशीं या शहरांत फिरत असतां एक मोठा वाडा होता तेथें बहुत लोक जात आहेत, असें पाहून मींहि तो चमत्कार पाहावयास गेलों. तों आंत एक मोठी सभा पाहिली. त्यांत साहाजण मुख्य व दुसरे त्यांचे भाऊबंद आप्तवर्ग शेंकडों जण बसले आहेत. त्या मुख्यांचीं नांवें, कामाचार्य, क्रोधशास्त्री, लोभपंडित, मत्सरभट्टजी, दंभजोशी, व अहंकार पुराणिक बावा. कामाचार्यानें आसक्तीचें पागोटें डोकीस घातलें आहे, क्रोधशास्त्री महाराजांच्या हातीं ताडण, शिव्या, यांच्या मुद्रा चकाकतात, लोभ पंडिताच्या जवळ द्रव्येच्छेची शालजोडी भूमीवर ठेविली आहे, मत्सरभट्टजीनें निंदेचे उपनेत्र लाविले आहेत, दंभजोशी हातांत स्वस्तवनाची स्मरणी फिरवीत आहेत, आणि अहंकार पुराणिकबावानें अज्ञानतपकिरीची डबी उघडली आहे, व यांचे जे दुसरे शेंकडोंजण सभेंत बसले होते त्यांचाहि वेष याचसारिखा चित्रविचित्र पाहिला. मग असा शोध लागला कीं,

कोणी एका ब्राह्मणानें इंग्रेजांस वेद शिकविला, त्याच्या करितां ही सभा भरली आहे. तोहि ब्राह्मण दीनवाणा एकीकडेस बसला आहे, कां तर ज्या मिशा नित्य वागवीत होता त्या त्याच्या निघणार ह्मणून फार चिंताग्रस्त झाला आहे. इतक्यांत ते साहाजण शिष्ट जे मुख्य सभानायक त्यांनीं बोलणें आरंभिलें. कामाचार्य ह्मणूं लागले, "आपल्या धर्माविरुद्ध करणारा तो ब्राह्मणाच्या बीजाचा नव्हे, त्याची आई इंग्रेजापाशीं किंवा मुसलमानापाशीं गेली असावी." क्रोधशास्त्री बोलतात, "काय करावें? श्रीमंताचें राज्य बुडालें, भय ह्मणून राहिलेंच नाहीं, शेणमार, जेरबंदाचा मार बसता ह्मणजे चूप ज्याचा तो धर्मानें वागता." लोभ पंडित पुढें झाले, "अहो पैसे मिळूं लागले मग इंग्रेजांला काय, महारांला वेद शिकविणार नाहींत कीं काय!" मत्सर भट्टजी ह्मणतात, "अहो इंग्रेजांला वेद शिकविला हा दोष आणि शूद्राकडे धडकून वेदघोष वेदोक्त कर्मै करितात त्याचा दोष नाहीं काय? त्याचाहि विचार केला पाहिजे. कोणाचा अधिकार कसा काय याचा विचार होतच नाहीं." दंभजोशी मान हालवून बोलतात, "आतां काळच विपरीत आला, सर्वांच्याच बुद्धि फिरल्या, एकवर्ण व्हावयाचा समयच आला आहे, शुद्ध आचार कोठें असायाचा तेथें असेल." अहंकार पुराणिकबावानें तपकिरीची डबी काढून तपकीर हुंगून बोलते झाले, "अलिकडेस संताडें माजलें, प्राचीन धर्म कोणास समजत नाहीं; मागें जैनमत नास्तिकमत झालें होतें, तसेंच आतां होणार." अशीं प्रथम बोलणीं होऊन, त्या गरीब ब्राह्मणावर वेदविक्रयाचा जो आरोप, त्याची चौकशी आरंभिली. त्या समयीं संध्याकाळ फार झाला ह्मणून तेथून निघून घरीं आलों.

---

## १२ धर्मसंबंधी वाद कसा चालवावा.

खैरखवाही हिंद या नांवें करून एक हिंदुस्थानी वर्त्तमानपत्र मिर्जापूर ह्मणून काशीजवळ एक मोठें शहर आहे तेथें दरमहा एक वेळ

निघत असतें, तें लंडन मिशनेरी यांकडून छापिलें जातें. त्यावरून आह्मास असें समजलें आहे कीं, आग्रा शहर एथें फांदर साहेब नांवें एक मिशनेरी आणि मुसलमान मौलवी आलीहासेन यांचा आपापल्या धर्माच्या खरे खोटेपणाविषयीं वादाविवाद होऊं लागला आहे. फांदर साहेब या पुढल्या गोष्टींचें प्रतिपादन करील.

१ खिस्ती शास्त्रांतील जुना करार आणि नवा करार हे देवानें दिल्हे खरे असें मुसलमान लोक कबूल होतात, परंतु ते आतां रद्द झाले किंवा त्यांत खिस्ती लोकांनीं बहुत खोट्या गोष्टी घालून गोंधळ केला आहे असें मुसलमान लोक ह्मणतात, तर तसें कांहींच नाहीं, ते रद्द झाले नाहींत आणि त्यांतील कांहींच मजकूर फिरविला नाहीं परंतु ते अस्सल आहेत, असें फांदर साहेब प्रमाण देऊन प्रतिपादन करील.

२ सर्व मनुष्य पापी आहेत, नबी ह्मणजे भविष्यवादी तेहि तसेच. आणि असें असतां पापामुळें दंड लाविल्यावांचून किंवा प्रायश्चित घेतल्यावांचून ईश्वराच्यानें आपला न्याय राखून कोणाच्या पापाची क्षमा करवत नाहीं आणि योग्य प्रायश्चित करून लोकांचा तारणोपाय सिद्ध करावा अशी शक्ति कोणी मनुष्याला नाहीं, भविष्यवाद्याला किंवा साधूला देखील नाहीं; परंतु येशू ख्रीस्तानें योग्य प्रायश्चित करून तारणोपाय सिद्ध केला, ह्मणून तो मनुष्यांपेक्षां आणि भविष्यवादी किंवा संत यांच्यापेक्षांही थोर आहे. आणि तो देवच आहे आणि देवामध्यें बाप, पुत्र, व पवित्र आत्मा अशा तीन व्यक्ति आहेत, होंहि तो प्रतिपादन करून दाखविणार आहे.

३ पुढें महमद हा ईश्वरापासून पैगंबर नाहीं याविषयीं तो प्रमाण देईल. हा विवाद करण्याच्या रीति सर्व ठरविल्या आहेत. विवाद करणारे असा आपला निश्चय दाखवितात कीं, आपण एकमेकांच्या मताची कांहींच निंदा करणार नाहीं आणि एकमेकांचें बोलणें जर अप्रमाणिक वाटतें तर तें अपशब्द लाविल्यावांचून सुजनतेनें सांगूं. हा विवाद कसा चालतो हें आह्मी अगत्यें करून पाहत जाऊं आणि प्रसंगानुरूप आपल्या वाचणाऱ्यांस कळवूं. जर मुंबईंतील धर्म-

संबंधी विवाद करणारे यासारिखे विवादाचे नेम पाळीत असते तर किती बरें असतें. असे नेम पाळिल्यानें धर्मसंबंधी विवाद हे त्रासदायक न होतां सुखदायक आणि लाभदायकहि होतील. कारण कीं, त्याप्रकारें विवाद केल्यानें फारकरून खरेपणाचा शोध लागेल. परंतु जर विवाद करण्यांत केवळ खोटेपण बरें वाटतें आणि उपदेशचंद्रिकेसारिखे जर बहुत दुष्ट कल्पना आणि दुर्भाषणयुक्त दोषारोप उगेच लाविले तर मग खरेपणाचा काय शोध लागेल? असें जो करणारा तो केवळ आपलें मन किती अशुद्ध हें स्पष्ट दाखवितो.

## १३ इंग्लंद देशांत ख्रिस्ती धर्माचा प्रवेश कसा झाला.

'इंग्लंद देशाचें वर्णन' नामक पुस्तकामध्यें एक गोष्ट येणेंप्रमाणें आहे कीं, जेव्हां त्या देशांत ख्रिस्ती धर्म प्रसिद्ध नव्हता तेव्हां आगुस्तिन नामें एक मिशनेरी आणि त्याचे दुसरे कित्येक सोबती त्या देशांत उपदेश करावयास गेले. त्यावेळेस कोणास असें वाटलें कीं, या मिशनेरी लोकांस आपल्या देशांत राहूं देऊं नये, कोणाला वाटलें कीं हा धर्म तरी काय आहे हें पाहूं, कोणाला वाटलें कीं या धर्माविषयीं काय पाहायाचें आहे, आमच्या वाडवडिलांचा जो धर्म तोच आह्माला खरा. त्यावेळेस राजाहि त्याविषयीं विचार करूं लागला आणि एके दिवशीं त्यानें मोठी सभा करून आपल्या देशांतील जे मोठे मोठे लोक यांच्या संमती यांविषयीं घेतल्या, त्यांत बहुतांनीं संमती दिली कीं, मिशनेरी लोकांस येथें येऊं देऊं नये. त्यावेळेस त्या सभेंत एक फार ह्मातारा होता तो गुपचिप बसला. तो लहानपणीं महाशूर आणि मोठा बुद्धिमान होता आणि आतां जरी त्याचे केस पिकले तरी त्याची बुद्धि मंद झाली नाहीं, जेव्हां तो उठून राजासमोर उभा राहिला तेव्हां सभेंतील सर्व लोक, राजासुद्धां स्तब्ध

झाले. मग तो ह्मातारा राजाकडे पाहून बोलला कीं "महाराज आ-
म्ही कित्येक दिवस असें पाहतों कीं, अंधार झाला असतां आह्मी
तुमच्या मंदिरांत जेवावयास बसतों त्यासमयीं एक पाखरूं बाहेरून
येऊन मंदिराचा आश्रय करितें आणि पहांटेस उजेडलें नाहीं तों
निघून जातें; तें अंधारांत येतें अंधारांतच जातें. आणि माझ्या
विचारांत असें येतें कीं आह्मी सर्व ह्या पाखरासारिखें आहों.
आह्मी ह्या जगाच्या उजेडांत येऊन मरतों, पुढें सर्व अंधार आहे.
यास्तव मरणानंतर कशी काय गति होईल हें जर ख्रिस्ती धर्मांत
सांगितलें असेल तर ह्या लोकांस येऊं द्यावें आणि आपण तो धर्म
समजून घेऊं. या गोष्टीस राजा मान्य झाला. मग त्या मिशनेरी लो-
कांनीं ख्रिस्ती धर्म सर्वांस शिकविला. आतां यावरून काय फळ झालें
तें पहा. सर्व लोकांनीं ख्रिस्ती धर्म खरा असें मानून आपल्या मूर्त्तीं-
ची पूजा सोडिली. आतां इंग्लंड-देशाची स्थिति कशी हें सर्वांस
ठाऊक आहे. ही गोष्ट वाचून माझ्या मनांत असें आलें कीं, जर
हिंदु लोक त्या ह्मातान्या माणसाचा विचार बरोबर समजून घेतील
तर ख्रिस्ती धर्म आह्मांसहि अगत्य आहे असें त्यांच्या मनांत येईल.

---

## १४ सतीविषयीं.

महाराष्ट्र देशाचा जो एक भाग मोंगलाई सरकारच्या ताबेत आ-
हे, त्या भागांत अवरंगाबाद सुभ्यांत जालनापूर एथें १८४२ जुलई म-
हिन्याच्या तेविसाव्या तारखेस एक जमेदार देशपांड्या मरण पाव-
ला, त्यावेळेस त्याच्या बायकोनें सती जाण्याचा निश्चय करून लोकां-
स सांगितलें कीं मी सती जाणार तुह्मी माझी तयारी करा, त्याजवरून
त्या देशपांड्याचें गोत्र व गावांतील दुसरे लोक हे हिंदु लोकांच्या
रीतीप्रमाणें तयारी करूं लागले. इतक्यांत जवळच नदीच्या पूर्वेस
कांहीं अंतरावर इंग्लिश सरकारची छावणी आहे त्या छावणींतील
कोतवालास हें वर्त्तमान समजल्यावर तो त्या ठिकाणीं त्वरेनें घोड्यावर

बसून आला. आणि जेथें हे लोक मिळाले होते तेथें येऊन त्यांस कळविलें कीं तुह्मी इंग्लिश सरकारच्या हुकुमाशिवाय सती जाऊं देऊं नये, मी साहेबांस विचारून तुह्मास सांगेन. असें बोलून त्यानें मोंगलाई सरकारांतून जी अदालत स्थापली आहे त्या अदालतवाल्यांस कळवून लष्करांत मेहेरवान कर्नेल साहेब व कमिसरी इत्यादि दुसरे साहेब लोकांसहि हें वर्तमान कळलें गेलें, कळल्यावर कमिसरी साहेब व रसल साहेब जे जाहागीरदार फकीर याच्या कादराबाद पेठेवर मुखत्यार आहेत ते व दुसरे कित्येक चार पांच सरदार असे जेथें लोक प्रेतांस जाळतात तेथें आले तों गांवकरी यांनीं सतीची सिद्धता करून स्मशान भूमींत त्या सतीसहित समारंभानें वाजत गाजत त्या स्थळीं येऊन पोहोंचले. इतक्यांत त्या साहेबांनीं गांवांतील लोक जे आपणांस शहाणे असें ह्मणवितात त्यांपाशीं संवाद करूं लागले. त्यावेळेस त्यांतलि गृहस्थ त्यांस हिंदु धर्मांतील गोष्टींप्रमाणें उत्तरें देऊं लागले. परंतु तीं साहेब लोकानीं अगदीं नाकारून टाकिलीं. नंतर त्या गांवकऱ्यांतील एका माणसानें साहेब लोकांस उत्तर दिलें कीं, तुमचा हुकूम तुह्मी लष्करांत चालवावा, आमच्या मोंगलाईंत बोलूं नये. असें बोलल्यावर साहेब लोकांनीं त्या मनुष्याचा निषेध बराच केला. नंतर जी बाई अग्नींत प्रवेश करण्यास तयार झाली होती, तिला साहेब लोकांनीं पुष्कळ उपदेश करून सांगितलें कीं, या प्रेताबरोबर आपणास जाळून घ्यावें हें अगदीं वाईट व भयंकर व दुष्ट कर्म आहे, जर तुला खाण्यास नसलें तर आह्मी तुला खाण्यासाठीं पैका देतों. परंतु ती बाई तें न पत्करतां मीं अग्नींत प्रवेश करणार असें बोलली, कांकीं असें बोलण्यास एक दोन कारणें होतीं. जर ती आतां मी सती जात नाहीं असें ह्मणेल तर लोक तिची फार निर्भर्त्सना करितें, आणि तिला वाटलें या लोकांस मीच पूर्वीं सांगितलें आणि आतां नाकबूल कसें जावें. असें तिला वाटलें असेल असें दिसतें. कारण कीं ती बाई फार भली व नम्र सुमारें पंन्नास वर्षांच्या वयाची होती. असो, नंतर साहेब लोकांनीं त्या गांवांतील अदालतवाल्यांस ताकीद करून सांगितलें कीं, तुह्मी ह्या बाईला

सती न जाण्याविषयीं बंदोबस्त करावा. असें सांगून साहेब लोक पुन्हा लष्करांत गेले. आणि साहेब लोकांनीं सांगितल्याप्रमाणें अदालतवाला त्या ठिकाणीं राहुटी देऊन दहा पांच शिपायांसुद्धां रखवालीस राहिला. मग त्या स्मशानभुमींत सुमारें दोन तीन हजार माणूस मिळाले होते आणि ठिकाणोठिकाणीं मसलती करीत होते. आणि आपणांत विचार करून ठरविलें कीं, जर अदालतवाला सती जावयास हुकूम देत नाहीं तर आह्मी त्यास धरून मुसक्या बांधून सती जाऊं देऊं. असा बेत करून कित्येक कुणबी व साळी कोष्टी व कित्येक हिंदु रयत यांनीं काठ्या व सोटे घेऊन आसपास फिरत होते असें त्या अदालतवाल्यानें पाहून कांहीं एक करारनाम्याचें मीष लोकांस सांगून साहेब लोकांकडे सुचना पाठविली असें ह्मणतात. साहेब लोकांस वर्त्तमान समजल्यावर आठ दहा साहेब लोक सुमारें बारांवर पांच वाजतां घोड्यावर बसून धांवत त्याठिकाणीं आले आणि ते गांवकरी लोक ह्या लोकांस पाहून भयाभीत होऊन इकडे तिकडे दूर दूर गेले. नंतर साहेब लोकांनीं त्या प्रेताच्या गोत्रजांस व दुसरे जे मुख्य होते त्यांस सांगितलें कीं, जर तुह्मी तिला जाळाल तर आह्मी तुह्मास फाशीं देऊं. असें ऐकल्यावर त्यांतील एकानें ह्मटलें कीं, साहेब मी कबूल आहें परंतु एथून सतीनें माघारें उलटून जाऊं नये. सबब हिला मात्र हुकूम. पुढें तुमच्या हुकमाशिवाय आह्मीं हें काम करणार नाहीं, आणि पूर्वींपासून आमच्या मोंगलाई राज्यांत सती जात होत्या यास्तव आह्मी सिद्धता करून येथें आणविली आहे. इतके ब्राह्मण लोक सती जाऊं देण्याविषयीं आग्रह करूं लागले ह्याचें कारण असें आहे कीं, हिंदु लोकांत जर सती स्मशानभूमीपर्यंत आली असतां प्रेत झाली ह्मणून तिचें मुख पाहूं नये, आणि जर ती नाकबूल झाली तर तिला तरवारीनें तोडून अग्नींत टाकावें अशी रीत आहे, ह्मणून ते असें बोलावयास झटले. नंतर साहेब लोकांनीं त्या बाईस ह्मटलें तुझ्याकरितां चाळीस माणसांनीं फांशीं जावें हें तुला योग्य आहे कीं काय? तर ती ह्मणाली अगदींच योग्य नाहीं. त्यावर ते ह्मणाले तर तूं सती जाऊं नको.

मग ती ह्मणाली बरें तर माझा उपाय नाहीं. इतक्यांत एक मनुष्य बोलला तुह्मी जर तिला हुकूम देत नाहीं तर ती मरेल, ती ओकली व ती मरेलच. असें ऐकल्यावर डाक्तर साहेब तेथें होते त्यांनीं तिची नाडी व जीभ पाहून सांगितलें कीं ती लवकर मरणार नाहीं, कारण कीं तिच्या नाडी शाबूत आहेत. हा तुमचाच दोष आहे. असें बोलून तत्क्षणींच सुमारें घटका रात्रीस लष्करांत त्या बाईस घेऊन जाऊन हिंदु लोकांच्या देवळांत ठेवून बंदोबस्ताकरितां शिपाई ठेवून पाणी, दूध, मिठाई अशी आणून देवविली. परंतु त्यादिवशीं तिनें ती मिठाई वगैरे कांहीं खाल्लें नाहीं असें ह्मणतात. आणि तिच्या नवऱ्याचें प्रेत तेथें मसणवटींतच टाकून ब्राह्मण लोक मोठी विपरीत गोष्ट झाली असें ह्मणून आपआपल्या घरीं गेले. नंतर दुसऱ्या दिवशीं साहेब लोकांनीं त्या बाईस विचारिलें कीं तूं खांत कां नाहींस? तिणें उत्तर केले कीं माझ्या नवऱ्याचें प्रेत तसेंच सडत पडलें आहे तें दहन झाल्यावांचून मी खाणार नाहीं. ती गोष्ट त्या साहेबांस खरी वाटून त्या दिवशीं ब्राह्मणांनीं त्या प्रेतास जाळावें ह्मणून पुष्कळ प्रयत्न केला. परंतु त्या प्रेतास दहन करावयास कोणी आला नाहीं. नंतर तिसऱ्या दिवशीं ती बाई प्रेतास दहन करावें ह्मणून स्वतांच तयार झाली, ती गोष्ट साहेब लोकांस फार चांगली वाटून तिजबरोबर हमाल व पट्टेवाले देववून ती आपल्या नवऱ्याच्या प्रेतास दहन करून माघारी लष्करांत येऊन राहिली, आणि आतां अन्नवस्त्र घेऊन सुरक्षित आहे. आहाहा मला मोठा हर्ष झाला कीं त्या बाईला त्या साहेब लोकांनीं जीवदान दिल्हें व तिजवर जो एवढा अग्नीचा प्रळय झाला होता तो शांतविला. आहा ईश्वर करो कीं असलीं दुष्ट कामें बहुत करून बंद होत चाललीं आहेत त्याप्रमाणें अगदींच सर्व पृथ्वीवर बंद होवोत अशी मी ईश्वरापाशीं विनंती करितों.

## १५ मिशनेरी शाळेंत हिंदूंचीं मुलें पाठवूं नयेत याविषयीं ब्राह्मणांची सभा.

शके १७६९ शोभन नाम संवत्सरे भाद्रपद वद्य ९ ( सन १८४३ सप्टेंबर ) या दिवशीं समस्त ब्राह्मण वास्तव्य मुंबई यांनीं श्रीच्या देवालयांत मिळून संमतीपत्र केलें असें जे ख्रिस्ती मताचे मिशनेरी उर्फ पाद्री हे आपला धर्मोपदेश करण्याकरीतां या देशांत येऊन धर्माचीं बुकें वांटितात व आपल्या धर्मांत लोकांनीं यावें ह्मणून अनेक प्रकारें उपदेश करितात, व यांकरितां त्यांनीं बहुत शाळाहि घातल्या आहेत त्या शाळांत शिकावयास हिंदु लोकांची मुलें जातात, त्यांस आपल्या धर्माची माहितगारी नसती व सर्वकाळ हिंदु धर्माचीं निंदा व ख्रिस्ती धर्माची स्तुति याप्रमाणें जे पाद्री लोक उपदेश करितात त्यामुळें कितीएकांच्या बुद्धीस भ्रंश होऊन आपला वेदप्रणीत जो चांगला धर्म तो सोडून किती एक बाटले व असा क्रम चालला असतां कितीएक पुढेंहि बाटतील. या कारणानें हिंदु धर्माची हानि होत जाईल, ह्मणून स्वधर्म रक्षणार्थ नियम करणें प्राप्त होऊन ठराव केला, तो येणेंप्रमाणें. १ ख्रिस्तीयन पाद्री यांच्या शाळेंत धर्म शिकावयास अगर त्यांचा उपदेश ऐकण्यास कधींहि कोणी ब्राह्मणांनीं जाऊं नये, व आपल्या मुलांस अगर आपल्या खालच्यांस त्यांच्या शाळेंत जाऊं देऊं नये व जे हिंदु असून आपल्या स्वधर्माची निंदा व त्यांच्या धर्माचा उपदेश करितात त्यांस असें न करण्याविषयीं इलाज करावा. २ सदर्हुप्रमाणें सर्व ब्राह्मणांनीं चालावें. याप्रमाणें जो ब्राह्मण न चालेल तो ज्ञातीचा अपराधी होईल. या ठरावाच्या बंदोबस्ताविषयीं व कांहीं कारण पडल्यास पुन्हा सर्व मंडळीची सभा करण्याविषयीं प्रमुख नेमिले आहेत. " असे नेम करण्याचा वेडेपणा १७ व्या तारिखेचा प्रभाकर यांत चांगला दाखविला आहे. त्यांत असें ह्मटलें, " या प्रसंगीं ब्राह्मण लोकांस आह्मी एक गोष्ट सांगतों. आपलीं मुलें कोठें पाहिजे तेथें पाठविण्यास किंवा त्यांच्या मनास येईल तेथें न पाठविण्यास आणि जे

हिंदु धर्माविरुद्ध आचरण करीत असतील त्यांस बोध वगैरे करून त्यांकडून तें सोडविण्यास ते मुखत्यार आहेत. याच्यापेक्षां अधिक ते करूं लागतील व पोटासाठीं पगार घेऊन पाद्रीची चाकरी करणारे ने लोक त्यांस बहिष्काराचें वगैरे भय घालतील तर त्यापासून दुफळी, विरोध, व प्रतिबंध होऊन त्यांच्या इच्छिल्या कार्यास नड येईल आणि त्यांचें वेडेपणाचें हंसें होईल."

---

## १६ सैतानाच्या उत्पत्तिविषयीं संभाषण.

**सगुणी** बोलती.—बापा काल जी गोष्ट त्वां मला सांगितली ती सर्व माझ्या ध्यानांत आहे. परंतु आज एका गोष्टीविषयीं फार संशय मनांत आला आहे, तो संशय तुह्मास दूर करितां येईल असें मला वाटत नाहीं: पण कोण जाणे.

**बाप०**— तुझ्या मनांत काय संशय आला?

**स०**— सर्व जे आहेत त्यांस देवानें उत्पन्न केलें कीं काय?

**बा०**— यांत काय संशय!

**स०**— बरें बापा, तर देवानें सैतानाला उत्पन्न केलें? त्यानें त्याला कशाला उत्पन्न केलें? त्यानें सैतानाला उत्पन्न करूं नये असें वाटतें

**बा०**— सगुणीबाई, देव काय करितो आणि तें कशाला करितो हें माणसाला कसें कळूं येईल? पण जेव्हां कळेल तेव्हां सर्व योग्य आहे असें दिसेल. काल तुला वाटलें होतें कीं, माणसांला पाप करतां येणार नाहीं असें देवानें त्यांस उत्पन्न करावें. पण आतां तुला कसें वाटतें?

**स०**— जसें देवानें केलें तसें बरें, असें मला वाटतें.

**बा०**— तसेंच देवानें सैतानाला कां उत्पन्न केलें हें जेव्हां तूं

समजशील तेव्हां त्यानें योग्य केलें असें तुला वाटेल. आतां मी तुला एक प्रश्न करितों, देवानें माणसांस कां उत्पन्न केलें ?

स०— माणसांनीं देवाची सेवा करावी आणि सुखी व्हावें ह्मणून देवानें त्यांस उत्पन्न केलें.

बा०— त्यासाठींच देवानें सैतानाला उत्पन्न केलें. सर्व जें उत्पन्न झालें तें देवाच्या गौरवासाठीं झालें.

स०— पण सैतान दुष्ट आहे.

बा०— माणसेंहीं दुष्टच आहेत.

स०— बरें बापा जेव्हां देवानें माणसांस उत्पन्न केलें तेव्हां तीं पवित्र होतीं आणि तीं भ्रष्ट झालीं.

बा०— सैतानाचीहि गोष्ट तशीच आहे. पहिल्यानें देवानें असंख्य पवित्र दूत उत्पन्न केले. आणि मग त्यांतून कित्येक भ्रष्ट झाले.

स०— खरें बापा, आणि मला असें वाटतें कीं, देवानें त्या सर्व दूतांस मोकळें ठेविलें. तेव्हां कोणाची खुषी अशी होती कीं, देवाचें ऐकावें व कोणाची खुषी होती कीं, न ऐकावें. त्यांत देवाचा कांहीं अन्याय नाहीं. पण सैतान लोकांस पापांत पाडतो ह्मणून देवानें त्याला नरकांत बांधून टाकावें, यावरून देवाचें गौरव होईल असें वाटतें, यामुळें देव पापाचा द्वेष करितो असें दिसतें, पण सैतान हिंडून लोकांस खराब करितो. यांत काय उपयोग ?

बा०— जर सैतान लोकांच्या उपयोगी पडला तर ?

स०— वाहवा बापा, असें कोठें झालें. असें व्हावयाचें नाहीं.

बा०— काल जेव्हां तुझ्या बहिणीनें तुला मारिलें तेव्हां त्वां काय केलें ?

स०— आधीं माझ्या मनांत आलें कीं, तिला मारावें. मग मी ह्मटलें कीं, येशूनें असें सांगितलें कीं, जेव्हां कोणी तुझें वाईट करितो तेव्हां तूं त्याचें बरें कर, यास्तव राग मनांतून काढून मी आपली बाहुली आणून तिला दिल्ही.

बा०— मग तिनें आणखी मारिलें असेल ?

स०— नाहीं बापा, पहा रात्रीं आली तेव्हां मी तिचा हात धरून

बोललें, चल चिमा, आतां निजायाला जाऊं. तेव्हां तिनें काय केलें बापा, तिनें आपला हात हळूच माझ्यागळ्यांत घालून चुंबन घेतलें; मग ती बोलली, सगुणा, मी तुला मारीत नाहीं बरें काय?

**बा०**— तूं बरेंच केलेंस, बाई, आणि चिमीनें तुला मारिलें यांत तुझें वाईट झालें कीं काय?

**स०**— माझें फारच बरें झालें असें वाटतें. आणि आतां चिमी मजवर कशी प्रीति करिती बरें?

**बा०**— पण तुझें कसें बरें झालें मला सांग.

**स०**— मी राग मनांतून वळेंच काढला, आतां जर ती फिरून मारील तर माझ्या मनांत अगदीं राग येणार नाहीं असें मला वाटतें.

**बा०**— राग येणार नाहीं असें कशावरून ह्मणतोस?

**स०**— पाहा बापा, सकाळीं जेव्हां आह्मी जेवीत होतों तेव्हां भाऊ ह्मणाला, अणखी भात घाल, तेव्हां मी बोललें "आई नाहीं ह्मणती." मग त्यानें रागें भरून चमच्यानें मारिलें, तें माझ्या नाकाला असें लागलें कीं बस.

**बा०**— मग तूं रागें भरलीस कीं नाहीं?

**स०**— नाहीं. माझ्या मनांत कांहींच राग आला नाहीं. मी नाक चोळून हंसून बोललें, कायरे रामा, तूंहि माझा राग काढायाला हात लाविलास काय? आतां पाहा बापा, मी कधींहि रागें भरेन असें वाटत नाहीं.

**बा०**— बरें सगुणी, चिमीला आणि रामाला हे दुष्ट स्वभाव कोठून आले, हे सैतानापासून आले कीं नाहींत?

**स०**— तूं मला बरेंच जिंकिलें बापा, सैतान दोन वेळां तरी माझ्या उपयोगी पडला.

**बा०**— बरें माझे लाडके, तूं आतां बरोबर समजून घे कीं, जेव्हां सैतान जातीनें किंवा दुष्ट माणसाकडून तुझें अंत:करणांतील कुवासना जागृत करील, जर त्या दाबून खालीं पाडशील तर तुझी सद्बुद्धि दृढ होत जाईल, आणि कुबुद्धि अशक्त होत जाईल. परंतु जर तूं

दुष्ट वासना मनांत बाळगितीस तर कुबुद्धीला बळ येईल आणि सद्‌बुद्धि अशक्त होईल.

**स०**— बरें बापा, सैतान आतां चांगल्या लोकांस उपयोगी पडतो यास मी कबूल आहें. परंतु जर यानेंच आदामाला पापांत पाडलें नसतें तर ! याची छळणूक नको.

**बा०**— याविषयीं माझ्यानें सांगवत नाहीं. जर सैतानानें आमच्या मूळपुरुषांस पापांत पाडलें नसतें तर कदाचित्‌ ते आपले आपण पापांत पडले असते. पाहा सैतानाला कोणी पापांत पाडलें असें नाहीं, पण तो आपले आपण भ्रष्ट झाला.

**स०**— माझा अणखी एक प्रश्न आहे. बापा, सैतान आणि दुष्ट लोक हे फार आमच्या उपयोगी पडतात ह्मणून त्यांजवर प्रीति करावी कीं काय?

**बा०**— सैतानावर प्रीति करावयाची नाहीं. तो तुझें बरें करण्यासाठीं मेहनत करितो असें नाहीं, परंतु तुझा नाश करावा ह्मणून पाहतो. देव तुझ्या मनांत आणितो कीं सैतानाचें ऐकूं नये. तूं देवाची ही गोष्ट ऐकतीस आणि यावरून तुझें बरें होतें. तर देवावरच तुझी प्रीति असावी.

**स०**— बरें दुष्ट लोकांवर प्रीति करावी कीं काय ?

**बा०**— दुष्ट लोकांवर दया करावी, जर त्यांजपाशीं कांहीं तरी चांगला गुण आहे तर त्या चांगल्या गुणावर प्रीति करावी आणि त्यांच्या दुष्ट गुणांचा द्वेष करावा. जर तूं दुष्ट लोकांवर दया करितेस तर जशी देव त्या लोकांस सुचना करितो कीं सैतानाचें ऐकूं नये त्याप्रमाणें तूंहि लोकांस सांगशील, मग तूं देवाची चाकरी करशील. परंतु जर तूं दुसऱ्यास कांहीं वाईट शिकवितीस तर तूं सैतानाची चाकरीण झालीस.

**स०**— बापा मी देवाची चाकरी करीन, मला सैतानाची चाकरी नको.

## १७ नारायण शेषाद्री यांचा बाप्तिस्मा.

मुंबईचे टैमस पत्रावरून असें आह्मास समजून येतें कीं, (१८४३ सप्तेंबर) १३ व्या तारिखेस एक ब्राह्मण ज्याचें नांव नारायण शेषाद्री याला स्काटिश मिशनाच्या उपदेशकांनी बाप्तिस्मा दिल्हा, त्यावेळेस बहुत इंग्लिश आणि हिंदु लोक होते. हा नारायण स्काटिश मिशनाच्या शाळेंत पांच वर्षे शिकला आहे आणि त्यानें चांगला विद्याभ्यास केला आहे. दोन वर्षांपासून हिंदुधर्मावरून त्याचा विश्वास उडाला आहे, परंतु आपला धर्म सोडावयाला आणि ख्रिस्ती धर्म अंगीकारावयास त्याला धैर्य नव्हतें. परंतु शेवटीं त्यानें असा निश्चय केला कीं, येशू ख्रिस्तासाठीं मी सर्व प्रकारची हानि सोसीन आणि त्याच्या आज्ञांप्रमाणें चालेन. त्याचा लहान भाऊ सुमारें १२ वर्षांचा आहे तोहि ख्रिस्ती धर्म अंगीकारील असें त्याच्या लोकांला भय वाटलें ह्मणून त्यांनीं त्याला कोंडून टाकिलें, परंतु तो सुटून आपल्या भावापाशीं गेला आणि आतां त्याच्या बरोबर आहे. परंतु त्याचा बाप्तिस्मा झाला नाहीं. यावरून असें समजेल कीं प्रभाकर आणि ज्ञानसिंधु यांतून याविषयींचें जें वर्त्तमान आह्मी छापिलें आहे त्यांत चूक आहे.

[ हा मजकूर आमचे प्रिय व बहु सन्मान्य रेवरेंड नारायण शेषाद्री यांजविषयीं आहे.

ज्या यांच्या बंधुविषयीं वर लिहिलें आहे त्यास त्यावेळचे सुप्रिम कोर्टानें त्याच्या आईबापांच्या स्वाधीन केलें. ]

## १८ हिंदु लोकांचे नवे नवे देव.

हिंदुशास्त्रांत जे देव सांगितले आहेत ते असंख्य आहेत, परंतु लोकांनीं त्याविषयींही अतृप्त होऊन उत्तरोत्तर जानाई, जोखाई, नवलोबा, विरोबा, ह्मसोबा, इत्यादिक नवीन देव स्थापिले आहेत,

आणि त्यांचीं स्तोत्रें वाढविलीं आहेत. तीं अशीं कीं कांहीं विशेष दिवस नेमून त्या त्या देवांची जत्रा करितात आणि त्यांत कोणी कोणी अंगास आणितात. मग त्या अंगास आलेल्या माणसाच्या लोक पायां पडतात, इत्यादिक नानाप्रकारचीं कृत्यें लोक अंधपरंपरेनें एकाचें पाहून एक अशीं करितात. त्यांस कोणी कोणी नवस करितात, ते असे कीं, जय कानोबा पुढल्या जत्रेपर्यंत माझें कर्ज फिटो व माझा चरितार्थ चांगला चालो, ह्मणजे मी तुझी एक काठी व डफडें पाळीन, आणि कोणी बायका तेथें असतात त्याहि नवस करितात, तो असा, जर मोहरल्या जत्रेपावेतों मला लेंक होईल तर मी नेहमी तुझ्या जत्रेला यत जाईन.

यावरून त्यांत कोण कोणाचें ईश्वरी भवितव्यानुसार कर्ज फिटतें व चरितार्थ चांगला चालतो व बायकांस पुत्र होतात. ह्मणून ती देणगी त्या कानोबा देवाकडून आहे कीं काय? असें जर आहे तर देशांत कर्जदार व वाईट चरितार्थ चालणारे कां असते? व स्त्रिया वंध्या कां असत्या? तसेंच जर मनुष्याचा डागिना वगैरे हरवतो तर तो ह्मसोबाला शेण लिंपितो असें घरांतील लोकांस जाहीर करितो, इतक्यांत तो नेणारा माणूस शेण लिंपण्याच्या अगोदर किंवा लिंपल्यावर आपण मनांत भितो कीं, हा ह्मसोबा मला पोटदुखी लावील कीं काय? जर लावील तर सर्व लोक मला ह्मणतील कीं, कोणाचें पोट दुखत नाहीं, आणि याचें कां दुखतें तर हा चोर आहे. असल्या भयान तो डागिना टाकितो आणि लोक मग ह्मसोबाची फार स्तुति करूं लागतात आणि जर कोणाचा डागिना हरवतो तर त्यास सांगतात ह्मसोबाल्या नवस कर ह्मणजे सांपडेल; याप्रमाणें आह्मास प्रत्यय आला आहे, पाहा आमचा ह्मसोबा तात्काळ नवसास पावतो. असे लोक नानाप्रकारचे नवीन देव कल्पितात आणि आपण अज्ञानांधकारांत चालत असतां त्यांत दुसऱ्यास घ्यावयाचा मनसोबा करितात. यावरून आह्मांस फार वाईट वाटतें. बरें जर ह्मसोबा देव आहे तर तो शेणासारख्या निंद्य पदार्थाच्या लेपणानें प्रसन्न होईल कीं काय? नाहींच नाहीं. तर पुरातन देव सोडून उत्तरोत्तर नवीन देव करावे यावरून

त्या देवांची थट्टा होत नाहीं कीं काय ? तर आतां हें सर्व सोडून द्यावें आणि चांगला विचार करावा ह्मणजे असा कीं, जेणेंकरून आपला तरणोपाय होईल. आतां माणसांनीं असें कल्पावें कीं आह्मी रोगी आहों आणि सदरहू लिहिलेल्या औषधांनीं ( ह्मणजे कल्पित देवांकडून ) आह्मास आरोग्य मिळत नाहीं. तरी जो अनादी भगवान ज्याचें स्वरूप आमच्यानें करवत नाहीं आणि ज्याच्या पुढें आह्मी अगदीं पामर आहों असा जो देव, त्यानें जें तारणरूप औषध तयार केलें आहे तें सेवन केलें असतां तरणोपाय आहे. हा पक्का विचार करावा, कारण आयुष्याचे दिवस निघून गेल्यावर मग कांहीं आपल्या स्वाधीन नाहीं. सबब आतांच तें तारण स्वीकारावें. प्रभु येशू ख्रीस्त हाच आमचें तारण आहे.

---

## १९ सुरत एथील "मानवधर्मसभा" आणि जादू व मंत्र.

ज्यानुआरी ( १८४९ ) महिन्याच्या ९ व्या तारखेच्या प्रभाकरांत सुरत एथील एक राहणारा याचें पत्र छापिलें, त्यांत तेथें एक धर्मसभा स्थापित होण्याचा मजकूर आहे, तो वाचून आह्माला फार हर्ष वाटला. त्या मजकुराचें आमच्या वाचणाऱ्यांस अगत्य वाटेल असें समजून आह्मी त्या पत्रांतून बहुत काढून घेऊन खालीं छापिलें आहे. यावरून असें समजेल कीं, सुरत एथें हिंदुलोकांमध्यें धर्मसंबंधी विचार चांगले चालत आहेत. अशा सभा बहुत ठिकाणीं व्हाव्या अशी आमची इच्छा आहे.

तो पत्र लिहिणारा असें ह्मणतो कीं, " आज सुमारें सहा महिने झाले, एथें कित्येक विद्वान लोकांनीं "मानव धर्मसभा" या नांवें एक सभा काढिली आहे, ती प्रत्येक रविवारीं भरत असती. त्यांत बहुत क्रोधी, तंटेखोर खेरीज करून वरकड सर्व लोकांस येण्याची

परवानगी आहे. या सभेंत जे मुख्य सभासद आहेत त्यांतील जो दुरगाराम मनछाराम नामें करून एक नागर आहे, तो चांगले सत्य-वाद प्रमाणानुरूप व्याख्यान करीत असतो, व दुसरे सर्व ऐकत असतात. ही सभा मिळण्याचा हेतु हाच कीं, हिंदु, मुसलमान व ख्रिस्तीयन इत्यादि प्रकारचे जे धर्म या पृथ्वीवर प्रवृत्त आहेत त्यांतून जें सत्य असेल त्याचें ग्रहण करून वरकड भट्टजीबावा व सय्यद मुजावर व पाद्री इत्यादिकांनीं आपलीं पोटें आयासावांचून भरण्या-करितां व आपल्या अंगीं शिष्टपणा आणण्याकरितां जे खोटे पाल्हा-ळ व ढोंगे ग्रंथांत लिहून लोकांस ठकविण्याचा उद्योग मांडला आहे तीं सर्व उघडकीस यावीं, आणि ज्या अज्ञानेंकरून सर्व मनुष्यांच्या मनांत असल्या गोष्टी ईश्वरोक्त मानून दृढ झाल्या आहेत त्यांचा लोप व्हावा.

ही सभा आरंभिल्यानंतर सभासदांच्या मनांत असें आलें कीं, ढोंगी लोकांनीं द्रव्य हरण करण्याकरितां सर्व लोकांच्या मनांत नाना-प्रकारच्या युक्ती करून ज्या खोट्या गोष्टी ठसविल्या आहेत त्यांतील जादू व मंत्रशास्त्र हीं दोन प्रकरणें मुख्य होत, ह्मणून त्यांविषयीं लोकांच्या मनांतून सर्व विकल्प निघावे. हा बेत सिद्धीस नेण्याकरि-तां मंडळीच्या लोकांनीं एक जाहीर खबर लिहून प्रसिद्ध केली होती, त्यांतील संक्षिप्त अन्वय हा कीं, या सभेंतील लोक ह्मणतात कीं, जादू व मंत्रशास्त्र खोटीं आहेत ह्मणून कोणी जादूगीर किंवा मंत्रशास्त्री ह्या गोष्टी खऱ्या आहेत असें प्रतिपादन करून देत अ-सला तर त्यानें सभेंत येऊन सभेंतील बसणाऱ्यांतून हरकोणास मंत्र-सामर्थ्यैंकरून प्रतीति दाखवावी ह्मणजे त्यांस २७ रुपये इनाम देऊन सत्कारपूर्वक मानपत्र दिल्हें जाईल. ही जाहीर खबर शहरां-त प्रकट झाल्या दिवसापासून तर आज चार रविवारपर्यंत सभा मिळाली होती व कोणी जादुगीर किंवा मंत्रशास्त्री येऊन चमत्कार दाखवील अशी मनांत मोठी आशा बाळगून लोकहि सुमारें २००० जमले होते, परंतु कोणी जादूगीर किंवा मंत्रशास्त्री चमत्कार दाख-वावयास सभेंत आला नाहीं. एक वज्याराम बुवा जादूगीर आला

होता व तो या शहरांत मोठा विख्यात ह्मणवितो, परंतु आपली सर्व ढोंगें उघडकीस येऊन प्रतिष्ठा जाईल ह्मणून त्यानें नाना प्रकारचीं निमित्तें काढून पंधरा वीस रोज काढिले. नंतर अशी प्रतिज्ञा केली कीं, "पुढल्या रविवारीं खचीत तुम्हां सर्वांस जादू खरी दाखवीन." ह्या आपल्या वचनाप्रमाणें तो गेल्या रविवारीं सभेंत आला होता व लोकहि सुमारें ४००० मोठ्या आनंदानें आले होते व त्या सर्वांच्या मनांत असा विचार होता कीं जादू व मंत्रशास्त्र आतां खरीं ठरलीं ह्मणजे सभासदांची अत्यंत फजिती करूं. परंतु तो जादुगीर कांहींच चमत्कार दाखवूं शकला नाहीं, हें पाहून लोकांनीं विचार केला कीं आतां जादू व मंत्रशास्त्र हीं खोटीं पडतात ह्मणून "खोटीं" हा शब्द सभासदांच्या मुखांतून निघण्याचा समय टाळावा हा हेतु मनांत धरून त्यांनीं प्रथमतः असा गलबला केला कीं व्याख्यान करणाराची गोष्ट कोणाच्या ऐकण्यांत येईना. मग ते लोक आपआपल्यांत मारामारी करावयास लागले, त्यावरून मंडळीच्या लोकांस असें वाटलें कीं दंगा होईल, ह्मणून ते सर्व उठून आपआपल्या घरीं गेले. ह्यावरून माझी पूर्ण खात्री झाली कीं, जादू व मंत्रशास्त्र हीं खोटीं आहेत. पाहा जर खरीं असतीं तर आज एक महिना झाला त्याच्या दरमियानांत कोणी तरी येऊन ह्या गोष्टी प्रत्ययास आणून दाखविता."

पुढें तो लिहिणारा असें ह्मणतो कीं, आपण बहुतेकांशीं जादू व मंत्र यांविषयीं संभाषण केलें आणि मग एक मित्र जो जादू व मंत्रशास्त्राच्या खटल्यांत वीस वर्षें खराब झाला होता त्याशीं जें संभाषण झालें तें तो विस्तारानें लिहून सांगतो. त्या मित्रानें आपण कोणते प्रयोग केले आणि कोणते मंत्र ह्मटले हे सर्व त्याला सांगितले, (ते प्रभाकरांत विस्तारानें छापिले आहेत.) आणि शेवटीं त्याला असें ह्मटलें कीं, "म्यां बहुत प्रकाराचे प्रयोग केले परंतु कांहीं एक माझ्या इच्छेप्रमाणें झालें नाहीं, ह्मणून जादू व मंत्रशास्त्र खोटीं आहेत, यांत तुह्मी यत्किंचित् भ्रांत ठेवूं नये."

तो लिहिणारा शेवटीं हिंदु लोकांच्या मनांत जादू व मंत्रशास्त्र

ठसल्यापासून काय अनर्थ होतात हें सांगतो. तो असें ह्मणतो कीं, " ह्या हिंदुलोकांच्या स्त्रिया आपल्या पतीस आ..ंकित करण्याकरितां अंगांत भूताचा संचार झाला आहे असें ढोंग दाखवून वाढतात, आणि ह्मणतात कीं, मी अमुक स्थळींचा खवीस पूर्वजन्मीं मी तुझा अमुक होतों आणि अमुक कारणास्तव मी येथें आलों आहे. असे बोलून त्या बिचाऱ्या भोळ्या नवऱ्यांस भिवबून द्रव्याचा व्यर्थ व्यय करवितात. कित्येक स्त्रिया माहेरीं जाण्याकरितां अशीं ढोंगें करितात व तीं भूतें खरीं आहेत असे नवऱ्यांस जाणवून त्यांच्या मनांत अशी मोठी भीति घालितात कीं, त्यांचे लाभदायक उद्योग करावयाचे देखील त्यांस सूचत नाहींत. दुसरें, असल्या ढोंगापासून कित्येक मनुष्यांस चिंता लागून व्याधित होत्साते मरणहि पावतात. कितीएक घराणीं असल्या भूतांच्या व जादूच्या विकल्पानें धुळीस मिळालीं आहेत. "

जें या लिहिणाऱ्यानें ह्मटलें कीं, या जादूवरून बहुत अनर्थ होतात, त्याविषयीं किंचित् संशय नाहीं असें आह्मास वाटतें. आणि हिंदुलोकांतील कित्येक उठून या सर्व गोष्टी खोट्या असें प्रतिपादन करूं लागले आणि आपल्या लोकांला दुष्ट ढोंग्यांच्या जुलूमापासून सोडविण्यास उद्योग करूं लागले हें पाहून आह्मांला फार सुख वाटतें, ह्मणून आह्मांला अशी इच्छा आहे कीं, ही नवी धर्मसभा वाढावी आणि आपला इच्छित उद्योग चांगला चालवावा. त्या सभासदांला आह्मी एक सूचना करितों अशी कीं, तुह्मी सर्व धर्मांतील जें सत्य त्याचा शोध करीत असतां सत्याचा उगम जो ईश्वर त्याजवळ अगत्येंकरून शरण जाऊन त्यानें तुमच्या मनांत प्रकाश पाडावा आणि खरेपणा दाखवावा अशी विनंती करा. तह्मी अशीहि आठवण करावी कीं, मनुष्याचा आत्मा मरणानंतर कशी अवस्था पावेल या-विषयीं कोणी मनुष्यानें आपल्या बुद्धीच्या बळानेच ईश्वराच्या साह्या-वांचून निर्भ्रांति पावबत नाहीं. ह्मणून तुमचा पहिला विचार असा असावा कीं, ईश्वरानें एक शास्त्र मनुष्यांच्या प्रकाशासाठीं दिल्हें आहे कीं काय? आणि जर दिल्हें असेल तर जीं सर्व देवाचीं

शास्त्रें ह्मणून लोकांमध्यें ह्मटलीं आहेत त्यांतील तें कोणतें आहे? ईश्वराचें शास्त्र कोणतें हें ठरविल्यावर, खरें काय आणि खोटें काय, हें लवकर समजून येईल, कारण कीं जें कांहीं ईश्वर आपल्या शास्त्रांत कळवितो तें आपल्या मताविरुद्ध किंवा समजण्याला कठीण असो किंवा नसो, तेंच खरें याविषयीं संशय नाहीं.

---

## २० जरीमरीविषयीं संवाद.

**सगुणी**— बाबा, माझें मन फार उदास झालें आहे, गांवामध्यें लोक फार मरत चालले आहेत, आणि मला असें भय वाटतें कीं कदाचित् मीहि मरेन.

**बाप**— तूं मरशील असें तूं आतांच समजूं लागलीस काय?

**स०**— मला बहुत दिवसांपासून ठाऊक आहे कीं, सर्व लोक मरतील, आणि आपणहि मरणारच आहोंत, पण आपल्या आयुष्याचे दिवस अजून फार आहेत असें मनांत आणून, मी मरेन किंवा नाहीं याचा विचार फारकरून मनांत येतच नाहीं, पण आतां असें वाटतें कीं आजचाहि भरंवसा नाहीं.

**बा०**— असें तुझ्या मनांत रोजरोज असावें, आणि हें सर्व लोकांच्या मनांत ठसण्यासाठीं ईश्वर कदाचित् मरीचा वाखा होऊं देतो.

**सा०**— बाबा, हिंदु लोक असें समजतात कीं, मरी ही एक देवी आहे आणि तिचें वारें कोणाच्या अंगांत आलें असतां त्याचा वाखा होतो. मला वाटतें कीं तो एक रोग आहे, पण असा रोग ईश्वर पाठवितो किंवा तो सहज उत्पन्न होतो किंवा सैतान पाठवितो हें कांहींच कळत नाहीं. याविषयीं जर मला उलगडून सांगशील तर मी तुझे फार उपकार मानीन बापा.

**बा०**— ही तर अवघड गोष्ट आहे आणि तुला समजण्याजोगें असें याचें उत्तर माझ्यानें देववेल असें वाटत नाहीं, तरी पाहूं बरें. काल चिमीची गोष्ट कशी काय झाली, हें तुला ठाऊक आहेना?

स०—होय बापा, पण तिला मरीचा रोग नव्हता, तिनें उगींच चार पांच आंबे खाल्ले ह्मणून तिला ओकारी आली. आज ती बरी आहे तरी ती जरा पिंगट दिसती.

बा०—तिनें इतकें खाऊं नये, एकच आंबा खाल्ला असता तर ती ओकली नसती.

स०—खरेंच, जेवणाच्या वेळेस आईनें एक आंबा मला दिल्हा आणि एक तिला दिल्हा. ते फार चांगले होते, मला असें वाटलें कीं, दहा खावे पण आईनें सांगितलें कीं रोज एक एक खावा.

बा०—जर चिमीनें आईचें ऐकिलें असतें तर बरें झालें असतें.

स०—होय बापा, तिनें फार वाईट केलें. जेव्हां आई हाततोंड धुवायाला गेली तेव्हां तिनें तीन किंवा चार आंबे, ती ह्मणती तीन परंतु मला वाटतें चार, घेतले. चार तर आंबे घेतले खरे मग चाकरानें एक घेतला कीं कोण जाणें. ते घेऊन ती ओसरीवर गेली आणि सर्व आंबे खाऊन टाकिले, आणि मी तिकडे गेलें तेव्हां एका आंब्याची कोय तिच्या तोंडांत होती, आणि मला पाहून तिनें ती लवकर लपवून ठेविली, आणि यावरून मला कळलें कीं तिनें चोरी केली.

बा०— चोरी करावी असें तिच्या मनांत कसें आलेंगे ?

स०— मला वाटतें सैतानानें तिच्या मनांत अशी कल्पना आणिली असेल.

बा०— असें मलाहि वाटतें, आणि पाहा बरें, ईश्वरानें आंबे उत्पन्न केले आणि ते फार गोडहि केले, आणि सैतानानें तिच्या मनांत आणिलें कीं चोरी करावी, आणि तिला असें वाटलें कीं ह्या कल्पनेप्रमाणें करावें, तर तिचा रोग ईश्वरापासून किंवा सैतानापासून किंवा तिच्या दुष्ट स्वभावापासून अथवा आंब्यांपासून किंवा कशापासून झाला ह्मणून समजावें ?

स०— ईश्वरानें आंबे चांगले उत्पन्न केले आणि ते थोडे खाल्ले असतां कांहीं बाधत नाहींत, तर तो रोग ईश्वरापासून नाहीं असें वाटतें. बरें सैतान हा दुष्ट आहे त्यानें चिमीच्या मनांत अशी गोष्ट

आणूं नये, पण चिमीनेंहि त्याचें ऐकूं नये, आईचें ऐकावें, ह्मणून तो रोग सैतानापासून नसावा. आतां तुझ्या चिमीला काय निमित्त सांगूं वरें? तिनें आपल्या सुखासाठीं खाल्ले, तिला ठाऊक नव्हतें कीं ते खाऊन मी रोगी पडेन आणि नसत्या खाण्यानेंच ती रोगी पडली नव्हती कारण दुसरें कांहीं खाणें खाल्लें असतां ती रोगी पडत नसे. ह्मणून असें दिसतें कीं हा रोग तिजपासून नाहीं आणि आंबे जर ह्मटले तर ते आपले आपण कोणाच्या बापाला दुःख देणार नाहींत, ते तिच्या पोटांत घातले ह्मणून रोग झाला; तर आंब्यांपासून रोग झाला असें वाटत नाहीं. आतां कशापासून झाला आणि कशापासून नाहीं हें सांगवत नाहीं.

---

**बा०**— तूं वरीच वकीली करतीस. तर आतां उलटून तो मुकदमा शाबूद करावयाला वकील हो, मग पाहा काय रंग होईल तो.

**स०**— वरें बाबा, मी वकील होईन आणि तुह्मी न्यायाधीश व्हा, वरें कां.

**बा०**— मी न्यायाधीश असलों तर जे सव्वाल मी तुला केले त्यांचें उत्तर मलाच द्यावें लागेल. वाहवा! तूं शहाणी वकील आहेस.

**स०**— पण बापा, जो वकील तोच न्यायाधीश असें कोठें झालें आणि तुह्मी मला वकील केलें तर तुह्मी न्यायाधीशच ठरलां.

**बा०**— वरें मी न्यायाधीश आहे तर माझ्या वकीलांनो, चिमीचा रोग कशापासून झाला याविषयीं कांहीं बोलावयाचें आहे तें बोला.

**स०**— महाराज, पक्के आंब्याचे गुण तसेच आहेत आणि ते पुष्कळ पोटांत गेले ह्मणजे ते आंबट होऊन त्यांपासून रोग अलबत होईल. यावरून तो रोग आंब्यांपासून आहे असें महाराजांच्या लक्ष्यांत यावें. परंतु आंब्याच्याच बुद्धीनें हें झालें नाहीं ह्मणून सजा सांगतेवेळेस महाराजांच्या मनांत दया असावी.

**बा०**— शाबास!

**स०**— चिमीनें दुष्ट बुद्धि धरून ते आंबे खाल्ले आणि यावरून ती रोगी पडली तर तिच्या दुष्ट स्वभावापासून हा रोग असें समजावें.

बा०— आणि सजा देणें असलें तर तिला द्यावी किंवा तिचे दुष्ट स्वभावाला द्यावी हें तर्क करून सांग.

स०—चिमीचा जो स्वभाव तोच चिमी असें एका दिवशीं त्वां मला सांगितलें कीं नाहीं. परंतु सैतानानें तिच्या दुष्ट स्वभावाला सूचना केली आणि यावरून त्या सर्व गोष्टी झाल्या तर सैतानापासून हा रोग झाला असें दिसतें आणि त्यानें दुष्ट बुद्धीनें हें केलें ह्मणून त्याला मोठी सजा पाहिजे. आणि बापा ईश्वरानें आंबे चांगले केले खरे परंतु त्यानें जर ते केले नसते तर चिमीला असा रोग झाला नसता, आणि ईश्वराला शक्ति होती आणि त्याची खुशी नसती तर त्यानें तिला रोगी होऊं दिल्हें नसतें. ह्मणून हा रोग ईश्वरापासून आहे असें बोलण्याचा आदर आहे असें वाटतें. आतां माझें वकीलीचें काम झालें, तर न्यायाधीश काय बोलेल तें खरें.

बा०—मी असें ठरवितों कीं सैतान आणि चिमी यांकडून आंब्यांच्या योगानें तो रोग उत्पन्न झाला, आणि हें कर्म ईश्वरानें होऊं दिल्हें.

स०—परंतु जरीमरी कोणापासून आहे हें सांगावयाचें होतें, नाहीं बरें?

बा०—जें चिमीच्या रोगाविषयीं ठरलें तें सर्व रोगांविषयीं ठरतें. ह्मणजे सैतान आणि मनुष्य हे हरएक उपायानें रोग उत्पन्न करितात आणि ईश्वर त्यांनां तसें करूं देतो.

स०—बाबा, सैतान आणि माणसें हा रोग कसा उत्पन्न करितात हें सर्व मला सांगा, ह्मणजे मी फार जपून सैतानाचें कांहीं ऐकणार नाहीं, आणि जेणेंकरून हा रोग उत्पन्न होईल असें कांहीं करणार नाहीं.

बा०—सैतानें आणि मनुष्यें हा रोग उत्पन्न करण्यास बहुत उपाय करितात, ते सर्व मला सांगतां येत नाहींत, परंतु कांहीं सांगेन.

स०—जशी चिमी आंब्यांकडून रोगी झाली तशी जरीमरी कशाकडून होती हें आधीं सांग.

बा०— माणसाचें शरीर निरोगी व्हावें ह्मणून मुख्य उपाय हेच

कीं १, त्याचें खाणें पिणें चांगलें असावें २, त्यानें नेमानें खावें ३, झोप योग्य वेळीं लागावी, ४, हवा निर्मळ असावी ५, आणि मन शांत असावें.

स—तुह्मी पांचच नेम सांगितले ते मी ध्यानांत पक्के ठेवीन. पण अणखी असतील काय?

बा०—मुख्य हे पांचच नेम; आणि लोकांनीं हे नेम अगत्य मोडावे असें सैतानास फार आवडतें ह्मणून तो लोकांच्या मनांत कुकल्पना घालतो.

स०—पण बापा, जरीमरीचा रोग लोकांला फार वाईट वाटतो, तर ते सैतानाचें कां ऐकतात?

बा०— चिमीला असें बरें वाटलें नाहीं कीं मी रोगी पडावें, परंतु सैतानाला बरें वाटलें. ह्मणून जें कांहीं तिला गोड वाटतें त्याकडूनच तिचें वाईट करावें, नाहीं तर ती माझें ऐकणार नाहीं असें सैतानाला वाटलें असेल.

स०— किती हो तो धूर्त आहे!

बा०— खरें, पाहा, तो लोकांला कसें फसवितो. देवाचें भजन करण्याचें निमित्त दाखवून तो लोकांला सूचना देतो कीं अमुक ठिकाणीं यात्रेस जाऊन अमुक देवाची पूजा करावी. आणि हें त्याला गोड लागावें ह्मणून बहुत नाच तमाशे करितात, आणि तेणेंकरून बहुत पापें घडतात आणि ते हे पांच नेम मोडितात.

स०—ते कसे मोडितात बापा?

बा०—पहिला नेम ह्मणजे चांगलें खाणें पिणें असावें, याचा नेम ते असा मोडितात कीं, लोक बहुत फळें व मिठाई तेथें आणितात आणि ते लोक फार खातात.—दुसरा नेम म्हणजे नेमानें खाणें, हें यात्रेंत कांहीं चालत नाहीं. लोक फार वेळ भुकेलेले राहतात आणि मग अतिशय खातात.—तिसरा नेम म्हणजे झोप योग्य वेळीं लागावा, परंतु यात्रेमध्यें म्हटलें तर सारी रात्र धामधूम नाच लावण्या तमाशे होत असतात, तर झोप कोठून बरोबर होणार?—चवथा नेम

म्हणजे हवा निर्मळ असावी, तर जेथें यात्रेची दाटी आहे तेथें हवा अगदीं खराब होती.

स०— खरें बापा, जेथें पुष्कळ लोक जमले आहेत तेथें धूळ फार उडते आणि धूर फार होतो, तुह्मी खरें ह्मणतां.

बा०— मी धूर, धूळ यांविषयीं बोललों नाहीं, परंतु हवा जरी निर्मळ दिसती तरी एकादे वेळेस ती खराब असती. कधीं कधीं फार दुर्गंध सुटतो आणि तेणेंकरून प्रकृति बिघडती. आणि पाहा यात्रेस गेलेले लोक चहूंकडे शौचास बसतात आणि सर्वप्रकारें अमंगळपणें चालतात.

स०— बापा, मी यात्रेस कधीं जाणार नाहीं, किती वाईट जागा ती.

बा०— पांचवा नेम ह्मणजे शांत मन, तें तर यात्रेंत अगदीं होतच नाहीं. तर यात्रेंत ते पांच नेम अगदीं चालत नाहींत.

स०— खरें बापा, आपण गतवर्षी गांवाला जात होतों तेव्हां पंढरपुराहून येतानां असे किती लोक भेटले आणि गाडीमध्यें कोणी ओकत चालले आणि कोणी मरत चालले. आणि बापा, ती बाई रडत होती, तिनें तुह्माला काय सांगितलें. "माझे तीन चार मुलगे मेले." किती होते बापा?

बा०—तीन लेंकरें आणि तिचा नवरा आणि शेजाऱ्याचा एक गडी जो त्यांच्या संगतीं गेला, तोहि मेला.

स०—अहाहा, काय तिची दशा! लोकांनीं पंढरपुरास कशाला जावें?

बा०—एका माणसाला मी विचारिलें कीं, "तूं पंढरपुरास गेलास तेव्हां तुला काय फल प्राप्त झालें?" "माझा मुलगा हरवला एवढें फल प्राप्त झालें," असें तो बोलला.

स०—होय, मला सई आहे; त्यावेळेस त्याच्या डोळ्यांत पाणी आलें. त्याच्या मुलग्याचें नांव काय होतें?

बा०—मला ठाऊक नाहीं, त्याला एकच मुलगा होता आणि यावरून त्याला फार दुःख वाटलें.

स०—बापा मला वाटतें कीं, सरकारानें यात्रेस जाण्याचें बंद करावें, कारण जे जातात त्यांचे किती हाल होतात.

बा०—जे यात्रेस जातात त्यांचेच हाल होतात.असें केवळ नाहीं, परंतु तेथें जरीमरीचा उपद्रव झाला म्हणजे ते घाबरे होऊन आपआपल्या गांवास पळून जातात आणि जेथें ते मुकाम करितात तेथच्या गांवांत हा रोग सुटत जातो, असे असे ते सर्व मुलुखभर जाऊन या रोगाचें बीं पेरणाऱ्यांसारिखे करितात, आणि तेणेंकरून हजारों गरीबांचीं लेंकरें मरतात आणि हजारों लेंकरें बापुडीं होतात.

स०—काय दुष्ट लोक ते यात्रेकरी, बापा, सरकार त्यांला कां फांसीं देत नाहीं? ते अशी जरीमरी गांवांत आणून लोकांला मारितात. जर कोणी एकच खून करितो तर सरकार त्याला फांसीं देतें. आणि हे यात्रेकरी हजारांला मारितात आणि सरकार त्याला कांहीं शिक्षा देत नाहीं, हें कसें बरें?

बा०—अगे सगुणी, तूं त्याजवर रागें भरूं नको, यात्रेकऱ्यांच्या मनांत असें नाहीं कीं लोकांला मारावें, ह्मणून त्यांला फांसीं देणें हें योग्य नाहीं. यापेक्षां लोकांला उपदेश करावा, त्यांला समजवावें कीं असें यात्रेस जाणें फार वाईट आहे, तेणेंकरून ईश्वराचा राग होतो आणि लोकांची फार खराबी होती आणि ह्या दोषाहि बहुतांस लागतो.

स०—बरें बापा, ईश्वर हा रोग कशाला होऊं देतो? यात्रेकरी मरोत, पण गांवांमध्यें जे लोक यात्रेस जात नाहींत त्यांला ईश्वर कां मरूं देतो? त्या गरिबांनीं काय केलें?

बा०—सगुणी, सर्व लोक पापी आहेत आणि मरण दंडास योग्य आहेत, ह्मणून ईश्वर त्यांला मरूं देतो. त्यांत त्याचा कांहीं अन्याय नाहीं. आणि कोणी त्या रोगानें मरतात ह्मणून त्यांजवर ईश्वराचा कोप आहे असें कांहीं प्रमाण नाहीं. मरण हें चांगल्या लोकांस सुखाचें द्वार आणि दुष्ट लोकांस दुःखाचें द्वार आहे.

स०—मी तुमचें बोलणें समजत नाहीं, कारण तुह्मी ह्मणतां कीं सर्व लोक पापी आहेत आणि मरण दंडास योग्य आहेत.

बा०—सर्व मरण दंडास योग्य आहेत खरे, परंतु येशू ख्रीस्ताच्या-प्रायश्चित्तामुळें जे पश्चात्ताप करून त्याला शरण जातात त्यांच्या सर्व पापांची ईश्वर क्षमा करितो.

स०— पण बापा, जर ईश्वर त्यांच्या सर्व पापांची क्षमा करितो. तर मग तो दंड कसा लावील? मला असें वाटतें कीं, जर ईश्वर कोणाची क्षमा करील तर तो कांहीं दंड करणार नाहीं.

बा०— तुमचा विचार चांगला आहे, परंतु असें समजावें कीं, जें दुःख देवाच्या लोकांस लागतें तेणेंकरून त्यांचें कल्याण होतें. आणि मरण हें केवळ सुखाचें द्वार आहे. ते मरणाकडून इकडील सर्व दुःख टाकून परम सुखांत जातात.

स०— तर त्याला मरण दंड ह्मणूं नये.

बा०— होय, देवाच्या लोकांस मरण दंड ह्मणूं नये, कारण तो दंड नाहीं.

स०— आणि कोणी लोकांस मरण दंड आहे असें कसें म्हणतां येईल? कारण पापाचा दंड परलोकीं मिळेल, ऐथें नाहीं.

बा०— परलोकीं दंड मिळेल खरा, परंतु मरण लागतें तेव्हां-पासून पाप्यांस दंड चालेल, ह्मणून त्यांला मरण दंड ह्मणणें हें योग्य.

स०— बापा, आपण बोलतां बोलतां जरीमरीची गोष्ट राहिली, आपण यात्रेची गोष्ट सांगितली, पण जेथें यात्रेकरी मुकाम करीत नाहींत तेथें हा वाखा कधीं होत नाहीं काय?

बा०— होतो बाई, आणि फार करून याच कारणावरून हा रोग उद्भवतो. लोक खाणें पिणें याविषयीं कांहीं काळजी करीत नसतात. आणि गांवांमध्यें कांहीं तमाशा किंवा लग्न आहे तर लोक निजावयास फार रात्र करितात, आणि ते फार दाटीनें राहातात. आपले वाडे आणि गल्ह्या साफ ठेवीत नाहींत. आणि हिंदु लोकांचें मन कांहीं स्वस्थ नसतें, यावरून जेव्हां एखादे गांवामध्यें हा वाखा चालूं लागतो तेव्हां फार अनर्थ होतात.

स०— पण बापा, लोकांनीं काय करावें? आपलें घर त्यांनीं सोडावें काय?

**बा०**— त्यांनीं आपलें घर निर्मळ ठेवावें, आपल्या वाड्यामध्यें सांचलेलें पाणी राहूं देऊं नये, त्यांनीं आपली गल्ली स्वच्छ ठेवावी. असें केलें असतें तर त्यांला इतका उपद्रव झाला नसता.

**स०**— पण इतकें करून त्यांचें मन स्वस्थ होईल कीं काय?

**बा०**— नाहीं बाई, त्यांचें मन स्वस्थ होण्यास दुसरा उपाय आहे आणि तो एकच एक उपाय. ज्यांचें मन पापांकडे आहे त्यांचें मन स्वस्थ होऊं नये असा नेम ईश्वरानें केला आहे ह्मणून जर कोणी पश्चात्ताप करून ईश्वराला शरण जाईल तर ख्रीस्ताकडून त्याच्या पापांची क्षमा होऊन त्याचें मन स्वस्थ होईल, याशिवाय दुसरा उपाय नाहीं.

**स०**—बापा, मांग लोक या वाख्यानें मरत नाहींत असें ह्मणतात हें खरें आहे कीं काय?

**बा०**—ते कधीं कधीं या वाख्यानें मरतात परंतु दुसऱ्या हिंदु लोकांसारिखे फार मरत नाहींत, याचें कारण हेंच दिसतें कीं त्यांस गांवांत राहण्याचा हुकूम नाहीं. आणि ते लोक थोडे आहेत ह्मणून त्यांचीं घरें फारकरून निखालस असतात आणि त्यावरून त्यांला चांगला वारा मिळतो. परंतु गांवांमध्यें जेव्हां लोक रोगी होत चालले आहेत, तेव्हां त्यांच्या रोगानें गांवांतील वारा फार खराब होत जातो आणि मनस्वी लोक मरतात.

**स०**— तर मला वाटतें कीं जेव्हां गांवामध्यें हा उपद्रव फार होऊं लागतो तेव्हां लोकांनीं बाहेर राहावें, ह्मणजे त्यांला चांगला वारा मिळेल.

**बा०**— खरी गोष्ट, परंतु पाऊसकाळीं बाहेर राहाण्याची सोई नाहीं आणि जर गांव मोठा आहे तर बाहेर जाण्याची फार अडचण होईल.

# २१ मेलेल्याचें पुनः उठणें.

आफ्रिका खंडाच्या दक्षिणभागीं एक मिशनेरी उपदेश करीत होता, त्याचा उपदेश ऐकण्यासाठीं राजा आणि दुसरे लोक बहुत मिळाले होते, त्यावेळेस मेलेले फिरून जिवंत होतील याविषयींचा उपदेश चालला होता तेव्हां राजा फार आश्चर्य करून बोलला कीं, "ही काय गोष्ट? मेलेले उठतील काय?" मिशनेरी बोलला कीं, "सर्व उठतील." "काय ह्मणतां, माझा बाप उठेल काय? आणि लढाईमध्यें जे पडले तेहि उठतील काय? आणि ज्यांस सिंह, वाघ आणि मगर यांनीं मारून खाल्लें ते उठतील काय?" साहेबानें सांगितलें कीं, "ते सर्व उठतील आणि ईश्वर त्यांचा न्याय ठरवील." राजानें उत्तर दिल्हें कीं, तूं माझा बाप आहेस, मी तुजवर फार प्रीति करितों, तुझ्याजवळ येण्यानें माझें मन शांत झालें, तुझ्या तोंडचे शब्द मला मधासारिखे गोड लागतात. परंतु ही पुनरुत्थितीची गोष्ट कठीण आहे, त्याविषयीं ऐकावें अशी माझी खुशी नाहीं. मेलेले ते फिरून न उठावे." साहेबानें विचारिलें कीं, "कां न उठावे?" तो कांपत कांपत बोलला, "म्या हजारो लोक जिवें मारिले आणि ते उठतील काय?" वाचकहो, तुह्मी याविषयीं कधीं विचार केला काय? तुह्मी कदाचित् गरीब लोकांवर जुलूम करून त्यांचे अन्याय केले असतील आणि त्यांचा न्याय एथें न होऊन ते मरतात खरे, परंतु ते जिवंत होऊन न्यायाधीश जो त्याच्या समोर तुम्ही व ते उभे केले जाल असा कधीं विचार केला काय? तुम्ही कदाचित् लोभानें कोणाचे हाल केले किंवा कोणाचे जीव घेतले असतील, ते फिरून उठून तुह्माविरुद्ध साक्ष देतील, याविषयीं तुम्ही कधीं विचार केला काय? तुम्ही एखाद्या स्त्रीला फितवून कुमार्गांत लाविलें असेल आणि तिच्या जीवात्म्याचा नाश करून तिच्या सर्व लेकरांची खराबी केली असेल, तर तुह्मी विचार करा कीं, ज्या सर्वांस आपण कुमार्गीं लाविले ते मेलेल्यांतून उठून ईश्वराच्या न्यायासनासमोर उभे राहतानां आपल्या डोळ्यांनीं निश्चयें पाहूं. तुह्मी ह्मणा कीं, मेलेले ते फिरून

न उठावे. परंतु त्याविषयीं तुमचा उपाय नाहीं. ते उठतीलच उठतील, त्यादिवसापर्यंत किती अन्याय व किती दुष्ट कर्मे गुप्त राहतील, परंतु अहाहा ! त्यादिवशीं सर्व प्रगट होतील.

---

## २२ हिंदु लोकांच्या जातींची उत्पत्ति.

हिंदुंत मुख्य जाती ह्मटल्या ह्मणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र, अशा चार जाती आहेत; यांच्या शद्बांवरून व त्या लोकांच्या वर्तणुकेवरून असें साफ सिद्ध करितां येतें कीं ह्या असल्या जाती सर्व लोकांत आहेत. ब्राह्मण ह्मणजे ते होत कीं जे धर्माचें पालन करून लोकांस त्याविषयीं बोध करीत असतात. तर इंग्रजांत जे पाद्री लोक असतात त्यांस इंग्रजांचें ब्राह्मण अशी संज्ञा देण्यास काय चिंता आहे? व जे पलटणींत कामदार असतात हीच त्यांची क्षत्रिय प्रजा होय. व्यापार उदीम जे करितात ते त्यांचे वैश्य होत, व मजूरदार व हलकें कामकाज करणारे हे इंग्रज लोकांतले शूद्र असें समजावें. यावरून असें दिसतें कीं ज्या ह्या चार मूळ जाती या देशांत प्रथमतः उत्पन्न झाल्या यांचें मूळ कारण याच प्रकारचें आहे. कोणी ह्मणेल कीं परमेश्वराच्या मुखापासून ब्राह्मण झाले अशा अर्थाचीं अनेक वाक्यें वेदांत आहेत हीं सर्व खोटीं कीं काय? तर आमचें यास जें उत्तर आहे त्याकडे त्यांहीं क्षणभर लक्ष द्यावें. प्राचीन काळांत ब्राह्मणाचें माहात्म्य सध्यां आहे इतकें नव्हतें, परंतु त्यांच्या हातीं सर्व शास्त्रांची व विद्येची किल्ली असल्यामुळें त्यांहीं ती पुढें आपलीसी करून घेतली व इतर लोकांस विद्येत अथवा शास्त्रांत विभाग देईनात असें झालें. मग अर्थातच लोक दिवसानुदिवस अज्ञानी व मूर्ख होत चालले. हें पाहून ब्राह्मणांस आपलें महत्व स्थापन करण्यास फारसी अडचण पडली नाहीं, मग या अर्थाचीं अनेक वाक्यें करून पुस्तकांत लोटून दिलीं व अनेक लेख करून ठेविले हे लेख पुढें लोक शास्त्रांप्रमाणें मानूं लागले व करितां करितां आतां तर ते केवळ वेदांचाच अंश

होऊन गेले आहेत या प्रकारचें या जातिभेदाचें मूळ होतें. क्षत्रियांच्या मुलीशीं ब्राह्मणानें विवाह करूं नये किंवा त्यांच्या घरीं जेवूं नये किंवा कोणताहि संबंध करूं नये हें केवळ पाखंड मत आहे असें आह्मास साफ दिसतें. पाहा बरें, आपल्या पुराणांतरीं कोणत्या प्रकारचे लेख आहेत, हीं पुराणें ज्यापेक्षां आपले सर्व लोक खरींशीं मानितात तर मागें जे ब्राह्मण व क्षत्रीय यांमध्यें विवाह इत्यादि संबंध होत असत यांकडे कां बरें ते लक्ष देत नाहींत? मागें ऋषी क्षत्रियांच्या मुलीशीं विवाह करीत व ह्या दोहों जातींत अन्न संस्कार होत असे, हें तर आपलींच पुराणें सांगतात. पांडवांच्या घरीं मोठ मोठल्या ब्राह्मणांच्या व ऋषींच्या समाराधना होत व द्रौपदी व कृष्ण वाढायास निघत या गोष्टी तर आपल्याच पुराणांत आहेत. असें असतां सांप्रतचे लोक डोळे न उघडतां उगीच जाती खूळ मानितात. या गोष्टीवरून लोक अगदीं विचारशून्य होऊन गेले आहेत असें साफ दिसतें. जातिभेद ईश्वरानें केलेला आहे हें स्थापन करण्यास या सृष्टींत एकही कारण दिसत नाहीं. आमचा इतकें लिहिण्याचा अभिप्राय हाच आहे कीं, जाती ह्या ईश्वरानें उत्पन्न केलेल्या नव्हत अथवा त्या मनुष्यांत असाव्या असा त्याचा हेतुहि नाहीं. ह्या जाती ज्या न्यायकर्त्यानें उत्पन्न केल्या त्याचा इतकाच उद्देश होता कीं तेणेंकरून लोकांहीं नीट बंदानें आपआपलें कामकाज चालवावें व तेणेंकरून लोकांनीं सुखी असावें. परंतु ब्राह्मणानें शूद्राच्या हातचें पाणी प्यालें किंवा त्याच्या हातचें खाल्लें ह्मणजे पदभ्रष्ट होतो व त्यास मग त्याचे लोक बहिष्कृत करितात हें सर्व लोकांच्या गैर समजुतीमुळें होत आहे.

[ हा निबंध एका सुशिक्षित हिंदूनें लिहिला आहे. ]

## २३ खंडोबाची जत्रा आणि गाडेबगाड.

घोडनदीपासून चार कोशांवर निमुणें ह्मणून एक गांव आहे तेथें फेब्रुआरीच्या महिन्यांत पोर्णिमेस खंडोबाची यात्रा होती ह्मणून एथील मिशनेरी साहेबांनीं तेथें जाऊन मुक्काम केला, आणि जे लोक तेथें आले होते त्यांस खंडोबा वगैरे सर्वच ह्मणविलेले देव खोटे आहेत याविषयीं प्रमाणें देऊन उपदेश केला. नंतर तेथें एका मनुष्याच्या अंगांत खंडोबाचें वारें येऊन तो बारा तेरा गाडे ओढितो अशी चाल पडली आहे ह्मणून जो मनुष्य गाडे ओढणार त्यानें पांच दिवस अंगास तेल लावून स्नान करावें व अंगास हळद लावून घरांतच राहावें आणि अन्न खाऊं नये, परंतु रताळीं व दूध इत्यादिक फराळ मात्र करावा अशी त्याची रीत होती. नंतर दोन प्रहरीं लोकांनीं खंडोबापुढें बकरीं मारिलीं आणि पांच वाजतांना जो गाडे ओढणार तो वाजतगाजत रस्त्यानें पशुसारिख्या उडया मारीत व नाचत चालला, अंगास हळद सारवून केवळ सैतानच बनला होता. त्यानें जाऊन गांवकुसाभोंवतीं पांच प्रदक्षिणा टोणग्यासारिख्या उड्या मारून व पळून केल्यावर जेथें गाडे उभे केले होते तेथें येऊन निंबू व डाळिंबें चाऱ्ही दिशांस झोंकून मग गाड्याभोंवतीं पांच प्रदक्षिणा करून, "खंड्या खंड्या धांव." असें बोलून, जेथें खंडोबाच्या पादुका होत्या तेथें जाऊन पाठीस गळ टोंचून घेतले आणि मग त्यांनीं त्याला गाड्याजवळ आणून जसें पशूस जोडतात त्याप्रमाणें गाड्यांच्यापुढें नेऊन गाड्याच्या मध्यभागीं जें चऱ्हाट बांधिलें होतें त्या चऱ्हाटाशीं त्याच्या गळाचे दोर बांधिले, आणि पुढलें जूं दोन मनुष्यांनीं उचलून हातांवर धरिलें आणि जो गाडे ओढणार त्यानें दोन्ही हात मागें करून ज्या चऱ्हाटाशीं त्याला बांधिलें, होतें तें चऱ्हाट बळकट धरिलें आणि गळयास ओढ न बसावी ह्मणून हातांनींच ओढूं लागला. ते गाडे ज्या जाग्यावर होते ती जागा उतरती पाणढाळ होती आणि पुढल्या गाड्यावर मागल्या गाड्याचें जूं ठेवून बांधिलें होतें ह्याप्रमाणें सर्व गाडे अनुक्रमानें बो-

डून बांधिले होते, आणि एका गाड्याचा भार दुसऱ्या गाड्यावर प-डून अल्प शक्तीनें गाडे चालतील अशी युक्ति केली होती. मग लोकांची फारच दाटी झाल्यावर पुढें चार पांच मनुष्याहीं आपलें बळ लावून सर्वांनीं, " एळकोट ! " असा शब्द बोलून त्या भक्ताच्या भावानें फार बोंबा मारून, " खंड्या धांव खंड्या धांव, " असें ह्मणून, एकच गर्दी करून कोणी कोणी त्या देवाचें साह्य करून ते गाडे लोटले आणि वरंगळीला चालूं लागल्यावर सर्वांनीं हात सोडिले परंतु पुढें तीन चार मनुष्यें ओढीतच होतीं, तथापि थोडेंसें गेल्यावर गाडे चालेनासे झाले. त्यावेळीं त्या भक्ताची आई गाड्यावर चढून मोठ्यानें बोंबा मारून ह्मणाली, " अरे खंड्या, तुझें निसंतान झालें, धांवरें धांव ! " असें ओरडून खंडोबाला फार गाळीप्रदान केलें आणि फिरून लोकांनीं गाड्याभोंवतीं गर्दी करून, " एळकोट, " अशी हाक मारून कोणी कोणी देवाची अब्रू न जावी म्हणून गाड्यास हात लावून चालते केले आणि पुढें वरंगळीला चालूं झाल्यावर सर्वांनीं हात सोडून सांगितलें कीं, " साहेब पाहा, आमच्या देवाचें सामर्थ्य कसें आहे. " नंतर साहेबांनीं सांगितलें कीं, " यांत देवाचें सामर्थ्य कांहींच नाहीं, परंतु हें सर्व तुमच्या साह्यानीं व वरंगळीच्या उतरत्या जमिनीच्या योगानें गाडे चालतात. बरें, जर तुमच्या देवाचें सामर्थ्य मोठें आहे तर खालून गाडे वरतीं एकल्या देवाकडूनच आणवावे. " नंतर एका मनुष्यानें सांगितलें कीं, " देवाचा बाप आला तरी तसें होणार नाहीं. " आणि कोणी बोलले कीं, " अशी रीत नाहीं. " तरी वर्षास गाडे जातात तेथपर्यंतहि गेले नाहींत. पुढें थोडीशी चढती भूमि लागल्यावर गाडे उभे राहिले ह्मणून गाडे सोडिले, कारण कीं अणखी पुढें न्यावे तर देवाची फारच अब्रू जाईल हें समजलें. आणि सोडल्यावर जे लोक तेथें जमले होते त्यांस हें सर्वच कृत्य खोटें आहे असें सांगून साहेबांनीं व आह्मी उपदेश केला. बहुतांच्या मनांत वाटलें कीं, हे सर्वच मूर्त्तिदेव खोटे, परंतु एक ईश्वर तोच खरा देव आहे.

[ गाडेबगाडाची क्रूर चाल सरकारानें आतां बंद केली आहे. ]

# २४ मुंबईतील खंडोबाचें गाडेबगाड.

या मुंबईत ( १८४४ जा० ) एक चमत्कारिक गोष्ट अशी पाहिली कीं, त्यावरून सूज्ञ पुरुष खचीत समजतील कीं, या लोकांसारिखे मूर्ख कोणी नाहींत. हिंदु लोकांतहि जे विद्वान् आहेत, ते केवळ साहस करण्यास सिद्ध होत नाहींत, परंतु अक्षरशत्रु लोकांच्या चाली व कल्पना फारच विलक्षण आहेत. त्यांची वहिवाट पाहून मला फारच चिंता प्राप्त झाली आणि असें मनांत येतें कीं, हे लोक केव्हां सुमार्गाकडे मन लावितील. एथें कामाठीपुऱ्यांत महालक्ष्मी व खंडोबा ( ह्मणजे त्यालाच कान्होबा ह्मणतात, ) यांचीं दोन देवळें जवळ जवळ आहेत. तेथें कान्होबाचा भक्त एक वंजारी वाघ्या आहे तो आजपर्यंत दुसऱ्याच्या नवसाबद्दल आपण द्रव्य घेऊन पाठीस गळ टोंचून घेत असे. हालीं त्यास कांहीं वृद्धदशा झाली, आणि नऊ वेळां गळ घेतल्यामुळें खुणानीं पाठहि भरली आहे; त्यानें खुद्द अशी बढाई सांगितली कीं, म्यां एक वेळ गळ टोंचून घेतला असतां त्या संधींत एक साहेब रस्त्यानें जात होता; त्यास आश्चर्य वाटून मजकडून देवळासभोंवतें पंचवीस फेऱ्या करविल्या. मग खालीं उतरल्यावर एक मोहर इनाम दिल्ही. असो; तो माणूस ह्मातारा झाला सबब आपली पायरी चालविण्यासाठीं एक जिवट तरुण शिष्य तयार करून गळ टोंचून घेण्याचा अधिकार त्यास दिल्हा. त्या वाघ्याची समजूत अशी आहे कीं, गाडेबगाड खेळण्यानें देव प्रसन्न होतो, याकरितां पूर्व दिवशीं रात्रीं देवाचें लग्न झाल्यावर दुसऱ्या दिवशीं गाडेबगाड खेळतात. तें असें कीं, गळ टोंचून घेण्यापूर्वीं गाडा ( ह्मणजे रथ ) फिरवितेवेळीं भूतप्रेतादिकांची बाधा न व्हावी ह्मणून पोतराज नामें एक भक्त ( तो जातीचा महार ) आहे, त्यास भूतांचा अधिकारी शांत होण्यासाठीं एका जिवाचा भक्ष ह्मणजे आहुति द्यावी लागती. त्या दिवशीं चर्मवाद्यांचा गजर व तमाशगीर लोकांची खूब गर्दी होऊन जाती.

१ प्रथम आहुतीचा प्रकार सांगतों. त्या महारानें आपण देवता-

स्थानीं होऊन ती आहुति घेतली, तो समारंभापूर्वीं दारू पिऊन तृप्त झालाच होता. त्या आनंदलहरींत आंगास हळद चर्चून कपाळीं कुंकवाचा मळवट भरून केंस मोकळे सोडून हातीं मोठा आडसर घेऊन नाचूं लागला. तेव्हां लोकांस वाटलें कीं, याच्या आंगीं देवाचा संचार झाला; नंतर मुख्यानें त्याची पूजा करून त्याच्या हातांत एक लाहान बकरूं दिल्हें. तें घेऊन त्या सद्भक्तानें नाचत नाचत बकऱ्याची मुंडी पिळपिळून तीन प्रदक्षिणा देवळास केल्या; आणि चवथ्या प्रदक्षिणेस त्याच्या मानेस बळकट चावा घेऊन, तसेंच तोंडांत धरून तें रक्त पीत पीत अणखी तीन प्रदक्षिणा घातल्या. त्यावेळेस मुख्य यजमानास वाटलें कीं, देवानें आहुति घेतली. पूर्वीं दैत्यांचेंहि वध असेच केलें असतील. मी कानानें ऐकत असतां कोणी कामाठी शिव्या देऊन असेंहि बोलले कीं, काय हा अनर्थ. आमच्या देवानें असें करण्यास सांगितलें नाहीं, लोक फारच ढोंगी होऊं लागले, त्या सद्भक्ताच्या अंगावर रक्त पडण्यानें तो किती वाईट दिसला हें पाहाणाऱ्यांसच ठाऊक आहे. नंतर गाडेबगाड खेळण्याचा प्रसंग झाला. तो असा कीं, मुख्य वाघ्यानें शिष्याकडून तें गळ टोंचून घेण्याचें साहस करविलें. ह्मणजे पाठीच्या कातड्यास गळाचे दोन कांटे टोंचून प्रथम तसेंच मागें धरून देवळास तीन प्रदक्षिणा करविल्या. नंतर गाडीवरील खांबाच्या आडव्या लांकडास माणसासुद्धां गळ टांगून देवळासभोंवते पांच प्रदक्षिणा करविल्या. प्रदक्षिणा करतेवेळीं टांगून घेतलेल्या माणसानें एका हातानें वरतीं दोरी धरून दुसऱ्या हातानें भंडार उधळिला. याप्रमाणें केल्यावर तो खालीं उतरला आणि पाठीस गळ असतां अणखी पायांनीं तीन प्रदक्षिणा केल्या. नंतर समारंभास आलेले लोक आपल्या घरोघर चालते झाले, असो तो वाघ्या कृतार्थ झाला. त्या दिवशीं पुत्रासाठीं नवस केलेले तिघे जण गळ घेणार होते परंतु कांहीं विघ्न आल्यावरून या वर्षीं देवभक्तास हक्क देऊन माफी घेतली.

पाहा ह्या वरच्या गोष्टीवरून खचीत मनांत येतें कीं, ते किती मूर्ख आहेत. जे नवस करीत नाहींत त्यांस संतति होत नाहीं कीं काय?

काय हा ढोंगी व्यवहार. उलटें पाप करीत आहेत. जरा डोळे उघडा! आणि पुढें आपली काय गति होईल सुख कसें मिळेल याविषयीं विचार करा.

---

## २५ खोंडदेश व त्यांतील लोक यांचा वृत्तांत.

खोंड लोक कोण आहेत व कोठें राहतात हें समजून घेण्याविषयीं हा ग्रंथ वाचणाऱ्यांस पहिल्यानें अगत्य वाटेल. त्यांच्या देशाची हद्द कलकत्यापासून दक्षिण पश्चिमेस सुमारें दीडशें कोस दूर आहे. त्या देशाचा कांहीं भाग बंगाल इलाख्यांत, व कांहीं मद्रास इलाख्यांत, आणि कांहींसा नागपूरच्या राज्यांत आहे. या देशाची लांबी दीडशें कोसांवर व रुंदी तर २५ पासून ५० कोसांपर्यंत आहे. बहुधा हा देश महानदी व गोदावरी ह्या दोन नद्यांच्या प्रवाहांमध्यें आहे. केवळ याचा थोडासा भाग महानदीच्या पलिकडे गेला आहे.

हा देश उरीया ज्याला पुराणामध्यें उटकाल-असें ह्मटलें आहे, त्याचा एक भाग आहे. हा देश विशेषेंकरून डोंगरवट, खडकाळ, आणि बरड आहे, ह्मणून त्यावर केवळ थोडक्याच लोकांस आपला निर्वाह करतां येतो. तथापि त्या डोंगरामधील मोठमोठाले खोरे सुपीक आहेत. त्या देशाचा सर्व प्रदेश तर वेळूच्या बेटांनीं भरला आहे तो देश सपाटीवरील राहाणाऱ्यांस फारकरून मानवत नाहीं. जर ते तेथें बहुत महिने राहिले, तर त्यांस फारकरून बहुत दिवस ताप लागून दुखणाईत होतील.

उरीयांतील सपाटीवरील रहिवास्यांपासून खोंड लोक फार वेगळे आहेत. त्यांचा वेष, रीतभात, बोली फार निराळी आहे. पण त्यांची भाषा वाचून समजतां यावी अशाप्रकारें ती उरीया लिपीनें लिहितां येती, तथापि ती भाषा वाचून समजणारे लोक फार थोडके आहेत. कितीएक डोंगरवटींत खोंड लोकांखेरीज, कोळी, सोरा आणि गोंड, असले लोक पाहण्यांत येतात व या प्रांतांत याशिवाय दुसरेहि लोक

असतील परंतु अजून त्याविषयीं ग्रंथकर्त्याला माहिती नाहीं. हिंदुस्थानाच्या दुसऱ्या ठिकाणीं कृष्णा नदीच्या दक्षिणेस चेवसीवार आणि नीलगिरीवरील करंवार आणि तद्धार आणि दक्षिण देशांतील भिल्ल उत्तर कोकणांतील वारली वगैरे इत्यादिक लोक आहेत, आणि ते बहुधा खोंड लोकांप्रमाणें आहेत.

हे अर्धवट रानटी लोक आपली उपजीविका कांहींशी पारधीवर, व कांहींशी शेतपोत करून व गुरें ढोरें पाळून त्यांवर करितात. सर्व हिंदुस्थानाच्या डोंगरवट प्रदेशांत असे वेगवेगळे लोक राहतात हे सर्व कोठून आले असतील ह्मणून जाणावे, अशी कोणी एकास उत्कंठा लागली असेल, तर त्यास, हे लोक ह्याच देशाचे मूळ रहिवासी असतील, असा सुमार दिसतो. एका विद्वान गृहस्थानें ब्राह्मणांविषयीं असें लिहिलें आहे कीं, “ मनूनें संहिता केली त्यावेळेस दुआब आणि गंगेच्या उत्तरेस इतर क्वचित प्रदेश तितकेच वेदधर्मानुसारी आणि त्यांचे दास यांचें निवासस्थान होतें. ” त्यानंतर हे ब्राह्मण सर्व देशभर पांगले गेले, आणि जे कोणी त्यांचे अंकीत झाले, त्यांस शूद्र असी संज्ञा मिळाली; परंतु ज्यांनीं आपली मूळ स्वतंत्रता राखिली असेहि बहुत लोक होते. ते ब्राह्मणी धर्मानुसाऱ्यांपासून निखालस दूर जाऊन राहिले. ते ह्या डोंगरवटींत पळून येऊन पूर्ववत स्वतंत्रतेनें राहाते झाले. आणि अगोदरचे आपले वाडिलोपार्जित संप्रदाय व चाल त्यांनीं धरिली. आह्मी आतां ज्या लोकांविषयीं सांगितलें, ते आपल्या आसपासच्या हिंदु लोकांपासून आपल्या चाली, बोली, जाती अभिमान, आणि धर्म, या गोष्टींविषयीं, फार वेगळे आहेत. सांप्रतकाळींहि, भिल्ल, रामोशी, कोळी वगैरे लोकांचा, विशेषेंकरून धर्मसंबंधी गोष्टीविषयीं, ब्राह्मणांसी कांहींच संबंध नाहीं. हे बहुधा लोकांच्या पाहाण्यांत येत नाहींत आणि याचप्रमाणें खोंड लोकहि आहेत. यांच्या देशांत डोंगर, जंगल आणि दुसऱ्यांस बाधक हवा असल्यावरून फारकरून लोकांस त्या देशांत जाऊन राहवत नाहीं; ह्मणून त्या लोकांनीं अनायासें आपली स्वतंत्रता प्राप्त करून घेतली, आणि आप-

ल्या आसपासच्या लोकांच्या हल्ला हरकतींपासून ते निवांत आहेत. परंतु उलटें तेच मात्र कधीं कधीं सपाटीवरील दुसऱ्या खेड्यापाड्यांवर जाऊन दरोडे घालितात.

यांच्या देशाविषयीं इंग्लिश लोकांस सन १८३६ सांपूर्वी कांहीं माहिती नव्हती, परंतु त्यासमयीं कोणी जमीनदार लोक इंग्लिश सरकाराला कांहीं हक्क न देतां, उलटे हत्यारबंद होऊन, सरकाराविरुद्ध उभे राहिले होते. तेव्हां सरकारानें त्यांस जर्जर केल्यावरून त्या लोकांनीं ह्या डोंगरवट प्रदेशाचा आसरा धरिला. अखेरीस सरकारची व खोंड लोकांची लढाई जुंपली. तींत खोंड लोक कांहीं प्रकारें पराभव पावून इंग्लिश सरकारच्या आधीन झाले ही गोष्ट सन १८३७ सांत सुमारें मे महिन्याच्या पूर्वीं घडली. त्या वेळेपासून ह्मणजे सुमारें बारा वर्षांपासून त्यांच्या ह्या विचित्र चालीविषयीं फार बारीक शोध काढण्यांत आला; आणि आतां तर त्याची चांगली माहिती झाली आहे.

### अपण करण्यासाठीं बली मिळविण्याचे प्रकार.

त्यांतील एक प्रकार असा आहे कीं, खोंड लोकांच्या अनेक कुळांमध्यें भूमिका देवीला मनुष्य बली अर्पण करण्याची चाल आहे. त्या बलीला त्या लोकांमध्यें मेरिया अशी संज्ञा आहे. ते बली त्यांच्या खासगत लोकांपैकीं नसतात पण या कामासाठीं ते परक्या लोकांपासून विकत घेतलेले असतात. कोणी कोणी हिंदु त्यांस हे बली आणून पुरवितात. ते असें कीं, सपाटीवरील राहाणाऱ्यांस माया ममता दाखवून, फुसलावून, त्या डोंगरवटींत आणितात. आणि त्या खोंड लोकांस विकून टाकितात. या अघोर व्यापारांत ते लोक लहान, थोर, किंवा पुरुष, स्त्री, असें कांहीं एक पाहात नाहींत. कित्येक ठिकाणीं केवळ पुरुषाचेंच अर्पण करितात परंतु दुसऱ्या ठिकाणीं सरसकट स्त्री पुरुषाला अर्पितात, असें दिसतें. ते लेंकरांस थोडक्या रुपयांवर विकत घेऊन तीं मोठीं होईपर्यंत त्यांचा प्रतिपाळ करितात. ते त्यांस मोकळे ठेवितात, परंतु लांब जाऊं देत नाहींत. कधीं कधीं

त्यांचें लग्न करून संततीहि वाढूं देतात. त्यांस आपली कन्या देऊन त्यांस सर्व शेतकीच्या साहित्यासुद्धां जमीन आंदण देणें आणि वरकडांप्रमाणें त्यांस नांदूं देऊन, कुटुंब वाढवूं देणें, हा मोठा नांव लौकिक आहे असें त्या लोकांस वाटतें. परंतु त्यांची सर्व संतती मेरियाच आहेत. त्यांच्या बापाप्रमाणें त्यांचीहि दशा तीच होण्यासाठीं नेमिली जातात. एकाद्या विशेष प्रसंगीं त्या सर्व कुटुंबाचे एकदम बली अर्पण करितात. तथापि ज्या प्रांतांत एका मेरीयाची बळ दिल्ही तर त्याच्या पोराची तेथेंच बळ देऊं नये, अथवा तो बली पूर्वीं दिल्हेल्यासारखा दिसत असेल, तर त्यालाहि देऊं नये, असा त्यामध्यें नियम आहे. तर अशाला ते दुसऱ्या कुलांतील लोकांस विकत देतात. मग त्या लोकांनीं त्यांस निराळ्या ठिकाणीं अर्पिलें असतां कांहीं चिंता नाहीं.

प्रौढ वयाच्या बलीला विशेष किम्मत पडती. एका व्यापाऱ्यानें एके वेळीं दर बलीस शंभर रुपयांप्रमाणें असे तीस बली विकत दिल्हे असें कळण्यांत आलें आहे. देवानें बलीचा स्वीकार करावा व बली अर्पिणाराच्या आंगीं मनुष्य हत्येचा दोष लागूं नये ह्मणून तो बली विकत घेतला ह्मणजे त्याचें जीवार्पण केल्यावरून दोष घडतो असें त्यांस कांहीं वाटत नाहीं.

## बली अर्पण्याचा प्रकार.

यासंबंधी जी यथाविधि क्रिया ती आबाया (ग्रामाधिकारी) व उपाध्याय या उभयतांच्या हातून झाली पाहिजे. त्याप्रसंगीं स्त्री पुरुषांचा मोठा मेळा मिळतो, तेथें येण्यास कोणासहि मनाई नाहीं, व त्यांमध्यें कज्जा खोखल्याचें तर नांव देखील निघत नाहीं. बली अर्पण्याचा विधीमध्यें कांहीं भेद आहेत खरे परंतु त्या सर्वांचा मुख्य अभिप्राय पाहिला असतां एकच आहे. ज्या गृहस्थाला या समारंभाची प्रत्यक्ष प्रमाणांवरून ऐकून एक गोष्टीची माहिती झाली त्यानें त्याविषयीं जें वर्णन केलें तें येणेंप्रमाणें:—

"हा समारंभ तीन दिवसपर्यंत होत असतो. सर्व प्रकारचे समु-

दाय या तीन दिवसांत ख्याली खुशालींत इतके निमग्न असतात कीं, सांगतां पुरवत नाहीं. पहिला दिवस रात्र तर ते सर्व बेसुमार खाण्यापिण्यांत व गलबल्यांत घालवितात. दुसरे दिवशीं तर जो बली पूर्वरात्रीपासून उपोषित ठेविला असतो, त्याला षोडशोपचारें न्हावूं धुवूं घालून नवीन पोशाक घालितात. मग गांवापासून तर मेरियाच्या झाडीपर्यंत, मोठ्या समारंभानें वाजत गाजत त्याची मिरवणूक काढितात. ती झाडी त्या गांवापासून थोडक्या अंतरावर एका ओढ्याच्या कडेनें असती. त्या ओढ्यालाहि मेरियाचा ओढा असें ह्मणतात. ती झाडी इतकी दाट व गर्द राखिली असती कीं, सूर्यकिरणहि आंत येत नाहींत. त्या झाडीला कधींहि कुऱ्हाड लावीत नाहींत आणि तेथें भलत्या वेळेस जाण्याविषयीं फार भय धरितात. त्या झाडीच्या मध्यस्थानीं एक नीट खांब उभा रोविला असतो. त्याच्या पायांसीं तो उपाध्या त्या बलीला नेऊन त्याच्या मागून त्या खांबासीं मुस्क्या बांधितो. मग त्या बलीच्या अंगाला तेल, तूप, व हळद कुंकू लावून, व फुलांचे हार, गजरे घालून सजवितात, आणि एक प्रकारें ते त्याचें भजन केल्यासारिखा त्याला दिवसभर मान देतात. त्याच्या अंगावरील प्रसाद प्राप्त करून घेण्यासाठीं आपसांत अत्यंत कलह करितात. त्याच्या अंगावरील चर्चिलेल्या हळदीचो मळी, किंवा थुंकयाचा थेंब, हे मोठे गुणकारी आहेत, असें विशेषेंकरून स्त्रियांस वाटतें. कित्येक प्रांतीं तर पशुपक्ष्यांच्या आकृती मातीच्या करून काठ्यांवर ठेवितात. याचें मूळ कारण किंवा अभिप्राय काय असेल याविषयीं पक्की समजूत होण्याजोगी कांहीं हकीगत आढळण्यांत येत नाहीं. तिसरे दिवसीं त्या बलीला थोडीसी सागूची खीर खावूं घालून, त्याच्या जीवाला उत्तेजन आणितात. परंतु इकडे तर लोक बेसुमार जेवीत रात्रीं जरा कोठें विश्रांती होती न होती, तर पुन्हां वाद्यें वाजवून त्या जेवणावळ्या सुरू होतात. पूर्व रात्रीं तर माणसें पाठवून तो बली अर्पण्यासाठीं योग्य स्थान पाहून ठेविलेलें असतें, तें स्थान शोधून काढण्याचा प्रकार असा आहे कीं, लोकांनीं आपल्या हातीं लांब काठ्या घेऊन जमीनीवर उभ्या टोंचित टोंचित चालावें. जेथें फार

खोल काठी जमिनींत जाईल, तें भूमिका देवीनें निवडलेलें स्थान असें समजावें. त्या बलीनें मरतेवेळीं कांहीं चळवळ करूं नये ह्मणून त्याच्या हातांचीं आणि अगत्य असल्यास, पायांचींहि हाडें ते जागोजागीं मोडितात. मग तो उपाध्याय त्या गावांतील जो आत्राया व अणखी एक शिष्ट आपल्या बरोबर घेऊन एका ओल्या झाडाची फांदी मधोमध उभी कित्येक हात लांब चिरीत नेतात. मग त्या भेगीमध्यें त्या मेरीयाला घालून अडकवितात. कित्येक प्रांतांत त्याची छाती त्या भेगीमध्यें बसविण्याची चाल आहे. परंतु दुसऱ्या प्रांतीं त्यामध्यें नुसता त्याचा गळाच गुंतवितात. मग त्या फांदीचीं फांकलेलीं दोन शेवटें एकत्र मिटून दोरीनें बांधितात. तो उपाध्या तर आपल्या मदतगाराकडून, तें फार करकचून आवळवितो. सर्व तयारी झाल्यावर दुपार टळली ह्मणजे तो उपाध्या, आपल्या हातीं एक कुऱ्हाड घेऊन, त्या बलीवर हलकासा घाव मारितो. त्यानें ती निशाणी केली पुरे ह्मणजे एकाएकीं सर्व लोकांची एकच गर्दी होऊन जाती. आणि ओरडत ओरडत वाजत गाजत निघून, बेधडक त्या बलीवर ते मोठ्या आवेशानें एकदम तुटून पडतात. आणि ओरडत बोलतात कीं, "अरे तुला आह्मी मोल देऊन विकत घेतलें, ह्मणून आमच्या माथीं हा दोष नाहीं," असें ह्मणत ह्मणत त्या बलीचें मांस विदारून तुकडे तुकडे करितात. असा त्या अघोर कर्माचा शेवट होतो. त्यानंतर एक एकजण त्या मांसाचा लहान तुकडा आपल्या शेतांत नेऊन पुरतो, आणि तसा नीटच घरीं जातो. त्या बली अर्पणापासून तीन दिवसपर्यंत त्या गांवांतील लोकांनीं मुकें राहावें. एकमेकाशीं बोलायाचें झाल्यास, खुणेनें बोलावें; आणि परक्याची तर भेट देखील घेऊं नये. त्या तीन दिवसांच्या अंतीं एक टोणगा घेऊन त्या बली अर्पणाच्या स्थानीं मारितात, ह्मणजे मग सर्वांस बोलावयास मोकळीक होती."

हीं बली अर्पणें पौषी व माघी पौर्णिमेस करितात. पुढें सण येणार आहेत, तोंच अगोदर ते त्यांचा खणीत नाहींत. आणि कोणत्याहि प्रकारें जमीनीला धक्का लावीत नाहींत. केवळ ते बली अर्पण

करतेवेळेस मात्र काय जें उकरीत असतील, तितकेंच खरें. अणखी कापणीच्या वेळेस व इतर विशेषप्रसंगीं, हीं बालिअर्पणें केलीं जातात.

## या चालीचा फैलाव.

या चालीच्या फैलावाविषयीं विचार केला असतां, या गोष्टीचें अघोरपण किती माजलें आहे, तें नजरेस येईल. ज्या ग्रंथकर्त्यानें या विषयावर कलकत्यास छापविलें तो असें ह्मणतो कीं, दरसाल तीन चारशें बली आर्पिले जातात. तर मग ही रीत चालू झाल्यापासून हा काळपावेतों किती बली अर्पिले गेले असतील, याची कांहीं संख्या आहे? याच देशांत सांप्रत काळीं दरसाल अकरा, बाराशें तान्ह्या कन्यांचा संहार त्यांच्याच आईबापांच्या हातून होतो. या परिमाणानें मागें एक हजार वर्षांचें पाहूं गेलें असतां, ३,५०,००० बलीचे फाडून तुकडे झाले व ज्या आईबापांचा धर्म आपल्या लेंकरांवर प्रीति करून त्यांचा प्रतिपाळ करण्याचा आहे, त्यांनीं आपल्या हातें ११,००,००० अज्ञान बालकांचा नाश केला आणि हें सर्व केवळ एका लहान प्रदेशांत घडलें आहे. त्या देशाकडे तर कोणी कधीं लक्ष देखील दिल्हें नसतें; परंतु हीं अघोर कर्मे घडण्यावरून मात्र काय तें त्यांचें नांव निघालें.

## या मनुष्यबली अर्पणाविषयींचीं कारणें.

तुह्मी कदाचित ह्मणाल कीं, "इतका बेकुव कोण मनुष्य असेल कीं, आपल्या देवाला असलें अघोर अर्पण पसंत होण्याविषयीं विनाकारण त्याच्या मनांत वागेल. हें तर असंभव्य दिसतें." परंतु असलें अर्पण करण्याविषयीं खोंड लोक कारणें सांगतात.

त्यांचें मुख्य दैवत भूमिका देवी आहे. ती सृष्टीच्या तत्वांवर अधिकार करिते. जमिनीचें सुपीक, देशाची अन्नादानी, लोकांची आरोग्यता, आणि कळपाचें संरक्षण, हीं सर्व तिच्या स्वाधीन आहेत. तिची सत्ता सर्व ऋतूंवर चालती. पर्जन्य पाडणें देखील तिच्या हातीं

आहे. ती शुद्ध कुवासनायुक्त आहे, आणि मनुष्याची बळ मिळाल्यावांचून माझी वासना तृप्त कधींहि व्हावयाची नाहीं असें तिनें स्पष्ट बोलून दाखविलें आहे. ते लोक अणखी सूर्यचंद्रांचीहि भक्ति करितात, परंतु ते त्यांस कांहीं बलीचें अर्पण देत नाहींत. तथापि ते सीमा देवतेला पशूची व माणसाची बळ देतात. परंतु आपल्या अनेक आवांतर देवांला असलें अर्पण मिळूं देत नाहींत. असल्या भक्षाची गोडी दुसऱ्या देवांस लागूं नये, ह्मणून खोंड लोक फार जपतात. नाहीं तर ते देव तसेच संवकतील आणि तसलेच नवस मागूं लागतील, असें त्यांस भय आहे. आपल्या देवाला असल्या भक्षाची फारच आवड आहे, ह्मणून त्यांस तर खरोखरें वाटतें.

ही चाल न मोडण्याचीं जीं कारणें ते लोक सांगत असत तीं अशीं कीं, "ही चाल मुळारंभापासून चालत आली; या चालीला राजे रजवाडे मदत करीत आले. मनुष्य मात्रांच्या सुखरूप नांदण्यास व त्यांची संतती अखंड चालण्यास ही चाल तर मूळ कारणच आहे. ज्या सृष्टीच्या उत्पन्न शक्तीकडून मनुष्याचें जीवन होत असतें, ती या चालीवरून राखली जाती. देवाच्या आहाराकरितां या चालीचें मोठें अगत्य आहे. अणखी जसें पुरीच्या जगन्नाथाची भक्ति मोडणें हें सरकारास अयोग्य आहे; तसेंच ही चाल बंद केली असतां अन्याय होईल. आमच्या धर्माविषयीं जसी तुह्मी मनाई करितां तसी हिंदु व मुसलमान यांच्या धर्माविषयींहि मनाई करा, ह्मणजे आह्मी कबूल आहों. जो कोणी जमिनीची लागवड करून, आपल्या श्रमानें जे कांहीं बली विकत घेतो, तो त्यांचें अर्पण करण्यास मुखत्यार आहे, कारण कीं, ते बली त्याची मालमत्ताच आहे. जे लोक आह्माला हे बली आणून देतात, त्यांनीं त्यांच्या आईबापांपासून खुशीनें आणिले आहेत. याशिवाय देवांनीं हा विधि करण्याविषयीं निक्षून आज्ञा दिल्ही आहे, ह्मणून ही चाल अवश्य चालविलीच पाहिजे."

पीकपाणी चांगलें व्हावें; आणि भयंकर रोग उद्भवला किंवा दुष्ट श्वापदें फार माजलीं तर असले उपद्रव निवारले जावे, ह्मणून देवीला प्रसन्न करण्याकरितां हीं मुख्य बाले अर्पणें ते लोक लौकि-

कांत करीत असत. एखादा अवचित् अनर्थ घडला असतांहि, घरगुती जीवार्पण करण्याचें कारण पडे; ह्मणजे जर एखादें मूल कळप चारीत असतां वाघ येऊन त्या कळपाचा विध्वंस करितो, तर देवीचा क्षोभ झाला आणि तो शांत केला पाहिजे, असे ते मानीत असत.

ते लोक जो एकच खरा देव आहे, त्याला जाणत नाहींत. तो दयाळू भगवान असतां, आपल्या भक्तांपासीं माणसांचें रक्त मागत नाहीं. परंतु त्यानीं आपणाला त्याच्या सेवेंत लावावें, एवढेंच तो इच्छितो. त्याला केवळ बाह्यात्कारची भक्ती आवडत नाहीं, आणि असल्या अघोर चालीची तर सर्वथा त्याला नकोच. परंतु तो अनन्य भावाचा भुकेला आहे. त्याला आत्मिक भक्ति आवडती. तो आमच्या अंतरीच्या सर्व गोष्टी जाणतो, आणि जर आह्मी स्वसंतोषानें त्याचे खरे भक्त आहोंत, तर तो आमचा सांभाळ करील. आणि जें कांहीं तो आह्मासाठीं करील, तें आमचा उत्तम परिणाम होण्यासाठीं त्यानें केलें, असें दिसून येईल.

### ही चाल बंद करण्याविषयीं जे उपाय चालविले, आणि त्यावरून जो थोडा बहुत उपयोग झाला त्याविषयीं.

खोंड लोकांत मनुष्यबळि अर्पणें होतात हें इंग्लिश लोकांस समजतांच, त्यांनीं ती चाल मोडून टाकण्याविषयीं लागलेच प्रयत्न चालविले. ही चाल कशानें बंद करतां येईल, याविषयीं विचार करून तजविजी योजण्यासाठीं मद्रास व बंगाल सरकारांनीं कित्येक कामदारांस तिकडे पाठविलें होतें. परंतु तेथें बाधक हवा असल्यामुळें कोणती तरी तजवीज योजण्यास फार अडचण आहे, असें आढळण्यांत आलें. सपाटींतल्या रहिवासी लोकांस, मोठी पराकाष्टा करून वर्षांतून एक वेळ थोडके महिने मात्र तेथें राहातां येतें. जे कोणी तिकडे गेले, त्यांतून बहुतेकांस मोठा ताप लागून फार दिवस राहिला. त्या कामदारांच्या दीर्घ प्रयत्नानें त्या खोंड लोकांच्या हातून बहुत मेरियांची सुटका झाली. तथापि ज्यांची सुटका झाली त्यापेक्षां जे वधिले

गेले ते अधिक होते. जे सोडविले गेले, त्यांच्या ठिकाणीं त्यांनीं दुसरे मिळविले, यावरून फार खेद वाटतो. कित्येक विशेष खेदाच्या गोष्टी ज्या घडल्या त्या अशा कीं, एका बलीची सुटका झाल्यावरून ज्यानें तो बली आणून दिल्हा होता, त्याला आपली कन्या द्यावी लागली आणि शेवटीं तर आपली दुसरीहि कन्या त्या खोंड लोकांस त्यानें दिल्ही. असें असतांहि इंग्लिश लोकांनीं त्यांच्या हातून त्या दोन कन्या सोडविल्या. दुसरें असें कीं, कित्येक प्रसंगीं ज्या माणसांनीं ते बली आणून दिल्हे होते, त्यांस आपल्या आईबापांस द्यावें लागले. इंग्लिश लोकांचे प्रयत्न चालत असतांहि सन १८४२ च्या सालापर्यंत त्या चालीचा विशेष मोड झाला, असें दिसून येत नाहीं. त्या देशांत नव्या वाटा पाडाव्या, व्यापार स्थापावा आणि गांवोगांवीं कित्येक रखवालदार ठेवावे, आणि तसा लोकांवर अधिक दाब बसवून ह्या मनुष्य बलि अर्पणाचा अगदीं लोप करावा, ह्मणून सन १८४० या सालीं सरकारानें एक मुख्य कारभारी नेमिला होता. त्या कारभाऱ्यानें त्या खोंड लोकांचा हट्ट आपल्या आहारीं आणिला, आणि त्या सर्व प्रांतांतले लोक आपण होऊन, ती चाल बंद करण्यास राजी होईतोंपर्यंत हळूहळू त्यांस तो वश्य करीत गेला. त्या लोकांनीं त्या कारभाऱ्याच्या स्वाधीन आपले बहुत बली केले होते. त्यांतून कित्येक बली ज्यांच्या त्यांच्या आईबापांस परत दिल्हे गेले, आणि कित्येकांस सरकारानें आपल्या पदरच्या खर्चानें शिकविलें होतें. सरकारानें अणखी एक तजवीज अशी केली कीं, त्या खोंड लोकांतून जे कोणी आपले करार मोडतील, किंवा कायद्याविरुद्ध चालतील, त्यांस दंड केला जाईल. याविषयीं सरकारानें असा एक जाहिरनामा लाविला कीं, “ ब्रिटिश रयतेमध्यें जो कोणी मनुष्य जीवार्पण करण्याकरितां माणसास चोरून विकतो, त्यास कठोर दंड आणि शासन केलें जाईल. ” असें करणें यथायोग्यच आहे. कारण कीं जे बिचारे असले जीवार्पण करितात ते खोट्या कांक्षेनें भ्रांत झाल्यावरून ते अर्पण करण्याचें अगत्य समजून करितात. परंतु त्यांच्यापेक्षां जे थोडक्या रुपयांच्या प्राप्तीसाठीं माणसाचा वध होण्याकरितां त्यांस

चोरून दुसऱ्यांस विकितात, ते आमच्या मतें अधिक दुष्ट आहेत. त्या लोकांविषयीं जें सरशेवटील वर्त्तमान आलें, त्यावरून असें समजण्यांत येतें कीं, दोन प्रांतांतील लोक अझून ती चाल सोडून देण्याविषयीं अनमान करितात. आणि आजतागाईत करीत आहेत. परंतु हे दोन प्रांत खेरीजकरून वरकड सर्व लोक आपल्या करारांत स्थीर टिकून राहिले आहेत, आणि आपलें इमान न सोडितां, आपल्याजवळ जे सर्व बळी होते, त्यांस त्यांनीं सोडून दिल्हे. आणि त्या अघोर चालीविषयीं इतर लोकांप्रमाणें त्यांच्या अंगीं रोमांच उभे राहातात, असें दिसतें. आमचा भरवंसा आहे कीं, ही चाल अगदीं नाहींशी होऊन जायाला फार दिवस नकोत. आणि आमची पक्की खात्री आहे कीं, त्या सर्व देशांत ह्या मेरिया बळी अर्पणाचा अगदीं लोप होईपर्यंत असें केवळ नव्हे, परंतु त्याविषयीं गोष्ट निघाली असतां, त्या लोकांचे शरीरीं थरारून कांटा उभा राहीपर्यंत इंग्लिश सरकार या आपल्या प्रयत्नांत सहसा अंतर करणार नाहीं.

[ हीं मेरियाचीं अर्पणें आतां अगदीं बंद झालीं आहेत यांत संशय नाहीं. इंग्लिश सरकारचे ह्या देशावर जे अनेक महत् उपकार झाले आहेत त्यांपैकीं हा एक होय. ]

## २६ भविष्य कसोटी.

ईश्वरानें मनुष्यास जी बुद्धि दिल्ही आहे तिणेंकरून त्यास झालेल्या गोष्टींचें केवळ स्मरण राहतें इतकेंच नाहीं; परंतु त्यास कित्येक कित्येक बंधारणांत पुढील भविष्यही बांधतां येतें. सृष्टींतील पदार्थांच्या नियमांचा सदोदित क्रम आणि पूर्वीं जीं कृत्यें घडलीं असतात त्यांची प्रचित व आठवण यांच्या साह्यानें व स्वबुद्धि आणि चातुर्य यांहींकरून त्यास पुढील गोष्टींचें धोरण बांधितां येतें. मानवी भविष्याचें दुसरें कारण असें आहे कीं, या सृष्टि रचनेंत कित्येक गोष्टी नेम-

लेल्या काळीं घडून येत असतात. जसें सूर्य, चंद्र इत्यादिकांचीं ग्रहणें, प्रतिवर्षी ऋतूंचा फेरफार होणें, व याच प्रकारच्या दुसऱ्या बहुत गोष्टी, इत्यादिकांविषयीं मनुष्याच्यानें अचूकपणें भाकित सांगवेल.

परंतु भविष्य ह्या शद्बाचा विस्तीर्ण अर्थ केला असतां मनुष्याची बुद्धि, तर्क व अनुभव, यांच्या धोरणाबाहेर ज्या गोष्टी आहेत त्यांचें पूर्वी यथार्थ भाकित करून ठेवणें असा होतो; तर अशा प्रकारचें भाकित करणें केवळ सर्वज्ञ व सर्वव्यापक जो ईश्वर त्याजकडेसच आहे. ज्यानें सर्व प्राणिमात्र निर्माण केले, व ज्याच्या आज्ञेनें सर्व गोष्टी घडून येतात, त्यास भूत व भविष्य हीं सारखींच आहेत; त्याच्यानें मात्र पुढील गोष्टी उघड करवतील; आणि जर एखाद्या पुस्तकांत या प्रकारचीं भविष्यें उघड केलेलीं असतील तर तें पुस्तक मनुष्यांनीं ईश्वराच्या प्रेरणेनें लिहिलेलें असावें.

ख्रिस्ती लोकांचें बैबल ह्मणजे धर्मपुस्तक यांत याप्रकारच्या गोष्टी आहेत असें ते लोक ह्मणतात; तर त्यांची ही प्रतिज्ञा खरी किंवा खोटी हें तपासून पाहानें, हा आपला धर्म होय.

आतां प्रथम आपण तपासणी करतांना तीन प्रश्न योजावे. त्यांतून पहिला प्रश्न असा करावा कीं, त्या पुस्तकांत ज्या गोष्टींविषयीं भविष्यें सांगितलीं आहेत तीं त्या गोष्टी पूर्ण होण्यापूर्वी लिहून प्रसिद्ध केलीं होतीं कीं काय? दुसरा प्रश्न असा विचारावा कीं, ज्या कृत्यांविषयीं भविष्यें लिहिलीं आहेत त्या भविष्यांमध्यें व त्यांच्या पूर्णतेमध्यें साम्यता आहे कीं काय? तिसरा प्रश्न असा कीं, ज्या कृत्यांविषयीं भविष्यें सांगितलीं आहेत तीं कोणत्याहि मनुष्याच्या विचारांत बुद्धीच्या बळानें येणार नाहींत कीं काय?

आतां या तीन प्रश्नांस तपासणीवरून होय, असें जर उत्तर मिळेल, तर ख्रिस्ती शास्त्र ईश्वरप्रेरित आहे असें ह्मणण्यास मोठें सबळ प्रमाण होईल. ख्रिस्ती शास्त्रांत या तीन प्रश्नांस जीं उत्तरें मिळतात तीं अशीं आहेत. प्रथम ख्रिस्ती शास्त्रांतल्या जुन्या करारांत पुष्कळ भविष्यें सांगितलीं आहेत, त्यांची पूर्णता नव्या करारांत लिहिली आहे. अशा प्रकारचीं भविष्यें येशू ख्रीस्ताविषयीं आहेत. तीं

दावीद, यशाया इत्यादिकांच्या पुस्तकांत अगदीं उघड रीतीनें लिहि-लीं आहेत. तीं अशीं कीं, येशू ख्रीस्त दावीदाच्या वंशांतला असावा; तो कुवारीचा पुत्र होईल; तो बेथलेहेम गांवीं जन्मेल; तो गालील दे-शींचा रहिवासी होईल; त्यास पृथ्वींतील वैभवानें लोकांत मान मिळ-णार नाहीं; त्यास पुष्कळ दु:ख सोसावें लागेल; तो आपल्या एका मित्रा-कडून शत्रूच्या स्वाधीन केला जाईल; तो अपराधी ठरविला जाईल; तो केवळ नम्रता व सहनशीलता दाखवील, व त्याचा न्याय होऊन तो जुलमानें मारला जाईल; त्याचीं वस्त्रें त्याच्या मारेकऱ्यांमध्यें विभागलीं जातील; जरी तो गुन्हेगारांमध्यें मोजला जाईल तरीं त्यास द्रव्यवान मनुष्याच्या कबरेंत पुरतील, व त्याचें शरीर कुजून न जातां तो जिवंत होऊन मेलेल्यांमधून उठेल; आणि तो या पृथ्वीवरून आकाशांत जाईल.

आतां ह्या भविष्य वाक्यांस आपले तीनही प्रश्न घालून पाहूं. यांतून पहिला प्रश्न असा आहे कीं हीं सर्व भविष्यें त्यावरील गोष्टी पूर्ण होण्यापूर्वीं लिहिलीं होतीं कीं काय? याविषयीं ख्रिस्ती धर्माचे प्रतिपक्षी जे यहुदी लोक तेच उत्तर देतील. ह्या सर्व गोष्टी जशा ख्रिस्ती लोकांच्या शास्त्रांत आहेत तशा त्यांच्याहि धर्मपुस्तकांत आ-हेत, आणि याशिवाय दुसरी एक प्रमाण पटवून देण्याजोगी अशी गोष्ट आहे कीं, येशू ख्रीस्त येण्यापूर्वीं २८४ वर्षें जेव्हां मिसर दे-शींच्या टालमी फिलेडेलफस नामक राजानें यहूदी लोकांच्या भाषेंतून ग्रीक भाषेत जुन्या कराराचा तर्जुमा केला त्यावेळीं हीं भविष्यें त्या भाषांतरांत होतीं. या प्रमाणांवरून आपल्या प्रश्नास असें उत्तर मिळतें कीं, ज्या गोष्टींविषयीं जुन्या करारांत भविष्यें आहेत तीं त्या गोष्टी घडून येण्यापूर्वीं लिहून प्रसिद्ध केललीं होतीं.

आतां दुसरा प्रश्न असा आहे कीं, ज्या कृत्यांविषयीं भविष्यें लिहिलीं आहेत, त्या भविष्यांमध्यें व त्यांच्या पूर्णतेमध्यें साम्यता आहे कीं काय? तर या गोष्टीची खातरी करून घेण्याकारितां दावीदाचीं स्तोत्रें व यशायाचा भविष्यवाद यांतील गोष्टी, आणि मात्थी, मार्कस इत्यादिकांनीं लिहिलेला नव्या कराराचा इतिहास त्यांतील गोष्टी ह्या

मिळवून पाहाव्या ह्मणजे त्या प्रत्येकांमध्यें जो अतिशय सूक्ष्म व आश्चर्यकारक मिलाफ आहे तो समजल्यानें चांगलें ध्यानांत येईल.

वरें आतां जर आपणास दोन प्रश्नांचीं उत्तरें सप्रमाण मिळालीं तर तिसऱ्याचेंहि मिळणार नाहीं कीं काय? आतां पाहा, कीं पूर्वीं कधीं झाल्या नाहींत, किंवा ज्यांविषयीं कोणत्याहि सृष्टिनियमावरून अथवा गणितावरून तर्क बांधण्यास अशक्य व ज्या अतिशय गूढ अशा गोष्टी मनुष्यमात्रांमध्यें कसाहि बुद्धिवान किंवा चतुर असला तरी त्यास पूर्वीं कळूं येतील कीं काय? किंवा ज्या पुस्तकांत त्या गोष्टी लिहल्या आहेत, तें ईश्वराशिवाय कोणाकडून आलें असावें? हें सर्व विचार करून पाहिलें असतां सहज ध्यानांत येईल.

वर सांगितलेल्या भविष्यांखेरीज जुन्या व नव्या करारांत आणखी पुष्कळ भविष्यें आहेत; तीं ख्रिस्ती धर्माचे द्वेषी असे जे ग्रंथकर्त्ते झाले त्यांनीं लिहिलेल्या देशोदेशींच्या वृत्तांतावरून पूर्ण झालीं, असें समजून येतें; उदाहरणार्थ उदाहरण; दानीयलाचा भविष्यवाद पाहावा. त्यांत आसिरीया किंवा बाबेलोनिया, मासिडोनिया किंवा पर्शीया व ग्रीक व रोमी ह्या लोकांच्या महान महान राज्यांविषयीं भविष्यें लिहिलीं आहेत, तीं अति आश्चर्यकारक आहेत. त्याचप्रमाणें मिसर देश, सोर, निनवे, बाबेलोन् इत्यादि ठिकाणीं जीं मोठालीं राज्यें झालीं त्यांविषयींच्या गोष्टी, व यरूशालेम शहराचा विध्वंस व यहूदी लोकांचें सर्व पृथ्वीवर पसरणे ह्या सर्व कृत्यांविषयीं भविष्यवाक्यें आहेत, तीं खरोखर पूर्ण झालीं. आणि ह्या सर्व गोष्टींवरून आपल्या तिन्ही प्रश्नांस प्रमाणपूर्वक उत्तरें मिळतात.

ख्रिस्ती शास्त्रांत तिसऱ्या एक प्रकारचीं भविष्यें आहेत, तीं सांप्रत काळीं पूर्ण होत आहेत. तीं मुख्यत्वेंकरून अन्य धर्मांचा नाश होऊन ख्रिस्ती धर्माची वृद्धि होण्याविषयीं आहेत, आणि तीं या शास्त्राच्या कोणत्याहि भागांत पाहिलीं असतां अढळतात. ख्रिस्ती धर्मांचा इतका विस्तार होईल, असें ईश्वराशिवाय दुसऱ्या लोकांस कळलें नसेल; कारण ज्या वेळेस आब्राहाम, दावीद, यशाया इत्यादिकांनीं हीं भविष्यें लिहिलीं तेव्हां पृथ्वींतील लोकांची स्थिति कोणत्या

प्रकारची होती तिचा विचार केला असतां, किंवा येशू ख्रीस्त पृथ्वीवर आला त्यावेळीं त्यानें हीं भविष्यें पुनः सांगितलीं तो समय कसा व प्रेषितांच्या दिवसांत कोणते प्रकार घडून येत असत, ह्या सर्व गोष्टींचें मनन करून पाहिलें असतां ख्रिस्ती मताची इतकी वृद्धि होईल, असें त्या काळांत कोणाच्याहि कल्पनेंत येण्याजोगें नव्हतें. तसेंच यहूदी लोकांच्या धर्माचें इतर धर्मांपासून अगदीं भिन्नत्व व इतर लोकांचा व त्यांचा परस्पर तिरस्कार व वैरभाव, व ज्या लोकांनीं ख्रिस्ती धर्माचा प्रारंभ केला त्यांच्या योग्यतेचा, व त्यांस जीं विघ्नें व ज्या अडचणी प्राप्त झाल्या त्यांचा, जर एकाग्र चित्तानें सूक्ष्म विचार केला तर अशाप्रकारच्या छळणुकी व दुस्तर अडचणी यांतून ख्रिस्ती धर्म निभावून इतका विजयी होईल, असें कोणास वाटलें असतें कीं काय? किंवा ख्रिस्ती मंडळीच्या बखरींत ज्या झालेल्या गोष्टी लिहिल्या आहेत, त्याविषयींचीं जीं पूर्वींचीं भाकितें आहेत तीं त्या कृत्यांशीं लावून पाहिलीं असतां इतकीं पुष्कळ, उघड, एकमेकांशीं मिळण्याजोगीं आहेत कीं तीं मनुष्यबुद्धीकृत आहेत, असें कोणाच्यानेंहि ह्मणवणार नाहीं.

ख्रिस्ती शास्त्रांत भविष्यांचा चौथा एक प्रकार आहे, त्यांतील गोष्टी अद्याप पूर्ण झाल्या नाहींत, आणि त्यावरून तें शास्त्र ईश्वरप्रेरित आहे असें आतांच दाखवितां येत नाहीं; तरी काळेंकरून तीं भविष्यें ख्रिस्ती शास्त्राच्या दैवी उत्पत्तीविषयीं उदाहरणें देण्यास उपयोगी पडतील. आणि ज्या शास्त्रांतील भविष्यांच्या पूर्णतेवरून तें ईश्वरोक्त आहे, असें दाखवितां येतें, त्याच शास्त्रांत तीं लिहिलेलीं आहेत ह्मणून तीं पुढें पूर्ण होतील याविषयीं संशय बाळगायास नको, व त्यांजवरून ख्रिस्ती शास्त्र ईश्वरोक्त आहे असें ठरवायास कांहीं प्रतिबंध नाहीं.

[ हा निबंध फ्रीचर्च मिशन विद्यालयांतील एका हिंदु विद्यार्थ्यानें ३९ वर्षां मागें इंग्लिश पुस्तकावरून भाषांतर करून ज्ञानोदयांत छापिला होता. पुढें त्यानें ह्याच विषयाचा अणखी अभ्यास केल्यावर त्याची ख्रिस्ती धर्माविषयीं पूर्ण खातरी होऊन त्यानें तो धर्म स्वीकारिला. आतां

तोच हें पुस्तक छापण्याचें काम पाहत आहे. ईश्वराच्या दयेची अपूर्व करणी ! ]

## २७ सांप्रत काळचे हिंदु.

( एका सुधारलेल्या हिंदूचे विचार. )

आतां तर हिंदु ह्मटला ह्मणजे जो बळानें विद्येनें द्रव्यानें केवळ गरीब, दुसऱ्या देशीं ज्याला कोणी खिसगणतींतहि आणीत नाहींत, जो दुसऱ्या देशींच्या लोकांच्या हातचा मार खाऊन खाऊन ज्याच्या अंगाला मोठ्या वाहत्या जखमा पडल्या आहेत. दुसऱ्यांच्या हुकमाचीं ओझीं वाहून वाहून ज्याच्या डोकीचे केंस झडून टकलीं पडलीं, जो घरच्या घरीं खूळ माजवावयास मात्र हुशार, पांडवांच्या गोष्टी सांगून मिशांवर ताव द्यावयास बाहादुर, पण बापुडा अगदीं अज्ञान. पृथ्वी काय किती, देश कोण कसे, हें ज्यास न कळे; त्यांचीं युद्ध सामर्थ्यें कशीं काय, आपलीं काय, त्यांचे व्यापार उदीम, यंत्र तंत्रें, शिक्षा, शिल्पविद्या, राजनीति इत्यादिक कशीं, हें त्या हिंदूस न कळे; न्याय व्याकरण इत्यादिक शब्द व्युत्पत्ति झाली ह्मणजेच तो पृथ्वी जिंकावयास शूर होतो; काव्यरस प्राप्त झाला ह्मणजे त्यास कळतें कीं, उत्तम सुखकारक षड्रस मला प्राप्त झाले; भस्माचा पट्टा कपाळीं चढला ह्मणजे समजतो कीं सर्व शुचिर्भूतता माझ्या अंगीं आली; असा बापुडा हा हिंदू केव्हां आपल्या वास्तविक तेजानें ह्या आपल्या जंबूद्वीपांत सिंहासारिखा प्रतापवान् होऊन इतर सर्व जे उंच पदास पावलेले देश त्यांत मान्य होईल, अथवा त्यांच्या योग्यतेस केव्हां चढेल ! याविषयीं मी फार उत्कंठित आहें. त्यानें हें आपलें अज्ञानाचें झोंपडें मोडून टाकून ब्राह्मणानें माजविलेलें बंड व त्याजबरोबर कोरडा ज्ञाति अभिमान हीं सोडून दिल्ह्यावांचून हा योग्यतेस चढणार नाहीं. जे इतर देशींचे उत्तम पराक्रमी लोक त्यांस हा आपल्या मनांत

चांडाळ समजतो, त्यांशीं समागम करून त्या देशीं जाऊन त्यांचीं कलाकौशल्यें शिकल्यावांचून त्यांसारिखे व्यवहार आचरण धरल्यावांचून हा थोर योग्यतेस चढणार नाहीं, याला आपला हा स्वदेश दैववशात संभाळवणार नाहीं, किंबहुना स्वतंत्रपणें वागणें याचें होणार नाहीं.

## २८ हिंदु धर्माविषयीं एका सुज्ञ हिंदूचे विचार.

हल्लींचें हिंदु लोकांचें आचरण सच्छास्त्रबाह्य आहे. यांतच वास्तविक धर्म बुडाला. अहो जगताचा व्यवहार चालावयास चार वर्ण सांगितले, कोणत्याहि देशीं ह्मटलें ह्मणजे हे चारी वर्ण आहेत, अथवा लोकांचा या चारी वर्णांत समावेश होतो, कारण ईश्वरसंबंधी ज्ञान, नीति, व्यवहार सांगणारे; कोणी शत्रू आला असतां त्यासीं भांडणारे व प्रजा वर्तविणारे; शिल्पादि व्यवहार, उदीम व्यापार करणारे; आणि घरांतील नीच काम, हेल मजूरी करणारे; असे मनुष्य प्रपंचास सर्व देशीं अवश्य पाहिजेत. असे जे चारी वर्ण त्यांचे चार हजार किंबहुना चार लाख भाग ह्मणजे जाती करून त्यांत उत्तम अधम मानणें, त्यांजबरोबर अन्नव्यवहार न करणें; हा महार, हा कोळी, हा कुळंबी, याला वेदाधिकार नाहीं, शास्त्राधिकार नाहीं, त्यांस विद्या न शिकविणें इत्यादि मानणें, यांत धर्म बुडाला कीं राहिला ? स्त्रीपुरुषें समान असतां पुरुषानें हव्या तितक्या बायका करणें आणि स्त्रीला पुनः लग्न न करूं देतां तिचे केश काढून तिला कुरूप करून सोडणें यांत धर्म बुडाला किंवा राहिला ? नवरा मेला असतां स्त्रीला जसें करावयास सांगतात तसें बायको मेली असतां पुरुषाच्या मिशा शेंडी काढून त्याला पुन्हां लग्न करण्याची कां मनाई नाहीं ? त्याला स्त्री बरोबर सती जाण्याची कां आज्ञा नाहीं ? हा काय धर्म ? आपल्याच सारिखे मनुष्य कामक्रोधासक्त मरणशील असे महार असतां त्यांस शिवूं नये यांत कोणता धर्म ? अन्नास पाणी अग्नि लागून दुसऱ्याकडून सिद्ध झालें असतां तें घेऊं नये, त्यास विटाळ मानणें यांत

काय धर्म ? ब्राह्मण कसेंहि कुकर्म करीत असला तथापि त्यानें रांधलेलें अन्न पवित्र, आणि शूद्र मोठ्या नियमानें वागला तरी त्यानें रांधलेलें अन्न अपवित्र यांत काय शास्त्रविचार ? हें तत्वज्ञान कसें सहन करील ? जर हाल्लींचे ग्रंथ सर्व वेदशास्त्रांत सांगितले असें कोणी ह्मणेल तर ऐका. सर्व जगाला उत्पन्न करणारा जो ईश्वर ज्याला सर्व जग समान आहे, भक्तीनें काय तो ईश्वर प्रिय होतो, असा जो ईश्वर हा लोकांस असल्या मूर्खपणाच्या पक्षपाताच्या गोष्टी सांगणार नाहीं. हें सर्व लोकांनीं स्वकल्पित करून ईश्वराच्या नांवानें जगांत चालूं केलें आहे. अहो थोरल्या राजाचा जो हुकूम येणें तो त्याच्या थोरपणाप्रमाणें येईल, त्यांत सहजगत्या घडणाऱ्या गोष्टींचा मजकूर असणार नाहीं. तसा ईश्वराचा हुकूम ह्मणजे वेद शास्त्र यांत ईश्वर कोण कसा, मनुष्याचा स्वभाव कसा कामक्रोधाधीन झालेले जे त्यांनीं ईश्वराची सेवा भक्ति कशी करावी, तेणें करून मन कसें स्वच्छ होतें, सर्व भूतमात्रावर कशी दया करावी, परपीडा दुःख न व्हावें ह्मणून कशीं इंद्रियें नियमावीं, मरणानंतर जीवांस कसें सुख प्राप्त होतें, पातक्यांस कसें दुःख प्राप्त होतें, हें वेदशास्त्रांत असावें. परसाकडेस कसें जावें, घर कसें बांधावें, धोतर कसें कोणी नेसावें, बायकोच्या डोईचे केंस भादरावें कीं ठेवावे, मिशा भादराव्या कीं ठेवाव्या. शूद्राचें अन्न उदक घ्यावें कीं न घ्यावें. अमुक देशीं जावें कीं न जावें, सारांश रांधावें कसें, तोंडांत घांस कसा घालावा तो चावावा कसा, गिळावा कसा, असल्या पोरकट्या तुच्छ गोष्टी मनुष्यास सहज कळायाजोग्या ईश्वर कसा सांगेल ? ह्या असल्या गोष्टी आपण समजून वागावयाकरितां मनुष्यांच्या ठायीं ईश्वरानें बुद्धि ठेविलीच आहे. सामान्य मानुष बुद्धीस अतर्क्य जें तें ईश्वरानें आपल्या भक्तजनांच्या तोंडीं वदविलें आहे. वरकड व्यवहार ज्या देशीं ज्या समयीं जसाजसा करावयाचा तसा तसा मनुष्यास बरा वाईट कळतच असतो. अशा गोष्टी ज्या व्यवहाराच्या त्या देशोदेशीं आहेत. त्यांस कानून कायदे, देशीय रीति असें ह्मणतात, त्यांजपेक्षां चांगल्या दृष्टीस पडल्या असतां त्या सोडून दिल्ह्या तर धर्म सुटला असें नाहीं. हिंदु धर्माचे तात्पर्य

पाहतां एक निर्गुण ईश्वर सांगितला आहे, तोच सर्व जगाला उत्पन्न-कर्ता, सर्व भूतांच्या ठायीं समभाव असावा, चांडलादिपर्यंत पशु पक्ष्यांस देखील निष्कारण उपद्रव देऊं नये, विषयाची आसक्ति असूं नये, सर्व मनुष्यें ईश्वरपदास पावण्यास योग्य, तें भक्तीनें साध्य, त्याजविषयीं कर्माची टांकी चालत नाहीं, असें ज्यांत सांगितलें आहे तें हिंदु शास्त्र व हिंदु धर्म. हा धर्म विलायतेस गेल्यानें बुडतो असें नाहीं, हा धर्म मनानें घडतो. याला मन शुद्ध पाहिजे हा धर्म इतर मनुष्यानें पाक केल्या अन्नाचें भक्षण केल्यानें विघडतो असें नाहीं. हा धर्म पाट लावल्यानें विघडतो अथवा पाट न लावल्यानें प्राप्त होतो असें नाहीं. लग्नप्रयोजन, देशांतरीं जाणें, ज्ञातिभेद मानणें इत्यादि हीं सर्व व्यवहार खटलीं ईश्वरानें कांहीं सांगितलीं नाहींत. ईश्वरास जो जाणतो जो जितेंद्रिय, सर्वांठायीं ज्याला दया इत्यादि गुणसंपन्न; तो महारांत मुसलमानांत असला तरी तो ब्राह्मण. जो ईश्वर आहे असें उगीच मानितो, ज्याला भक्ति नाहीं, ज्यानें इंद्रियें मोकळीं सोडिलीं आहेत, परघात पात पीडा असत्य इत्यादिकांच्या ठायीं रत, तो हाल्लींचा कर्मपर ब्राह्मण असला तथापि तो चांडाळाहून नीच, तो ब्राह्मण ह्मणूं नये- असें हिंदुशास्त्रांत सांगितलें आहे. उगीच ब्राह्मणजातींत मात्र जन्मला त्याला ब्राह्मण कसें ह्मणाल. असे जे ब्राह्मणजातींत जन्मलेले मोठे अभिमानी पुरुष, ज्यांची पायांजवळ नजर, सर्व जगताचें हित ज्यांस न कळे, त्यांनीं आपल्यास थोर ह्मणविण्याकरितां हीं जातीचीं खटलीं काढिलीं. आपल्या लोकांची उपजीविका चालावी ह्मणून कर्ममार्गाची प्रवृति केली, देशांतरीं लोक जाऊन शाहाणे होतील ह्मणून उत्तम देशांतरांशीं संबंध तोडिला, वेदशास्त्र पाहून लोक विचार करितील ह्मणून शूद्रांस वेदशास्त्र मना केलें, क्षत्रिय वैश्य राहिलेच नाहींत ह्मणून गप्प उठविली, कां तर त्यांस पढण्याचा अधिकार सांगितला आहे. वेद ह्मणजे ईश्वरप्रतिपादक वाक्य तें शूद्रांनीं पाहूं नये अशी गोष्ट तरी संभवेल काय? कां त्यांस मन बुद्धि कान डोळे तोंड ब्राह्मणांसारिखीं नाहींत काय? ब्राह्मण शूद्रस्त्रीशीं गेला तर त्याला कांहीं अल्प दंड आणि ब्राह्मणस्त्रीशीं शूद्र गेला असतां त्याला ठार

मारावें; ब्राह्मणाचें द्रव्य शूद्रानें घेऊं नये. शूद्राचें जें कांहीं आहे तें अवघें ब्राह्मणाचें आहे, असें ईश्वर सांगेल काय? काय हें अज्ञान! हीं मनुष्यवाक्यें जरी मनूचीं असलीं तरी आतां हीं मानितां कामास नये. दिराजवळ त्याच्या विधवा भावजयीनें एका संतानार्थ जावें, व पुनर्विवाह करूं नये हें ईश्वर वाक्य काय?

[ हें पत्र लिहिणारासारिखें ज्याचें मत असेल त्यानें ख्रिस्ती-शास्त्र वाचून त्याचें चांगलें मनन करावें, ह्मणजे त्याला समजेल कीं, तो धर्म देवापासून असून त्यांत हिंदु धर्मासारिखी सुधारणूक करण्याचें अगत्य नाहीं. त्याकडून मनुष्याची सुधारणूक होत आहे. ज्ञान, नीति सुख व बाहेरील अवस्था या सर्व गोष्टींविषयीं ख्रिस्तीधर्माचें फळ केवळ चांगलें आहे असें अनुभवास आलें आहे. जव्हां हिंदु लोक व इतर मूर्तिपूजक लोक हा धर्म स्वीकारतील तेव्हां त्यांची उन्नति होईल यांत संशय नाहीं. ]

---

## २९ अम्मलकारक पदार्थ वर्ज करण्याविषयीं एतद्देशीय ख्रिस्ती लोकांस बोध.

अहो हिंदुस्थानांतील नेटीव ख्रिस्ती लोकांनों तुह्मी आतां थोडके आहां, पण ईश्वराच्या आशीर्वादानें तुह्मी मोठा समुदाय व्हाल, असा दिवस येणार आहे. ह्या देशांतील मूर्ति लयास जाव्या असा ईश्वराचा नेम आहे. शुभवर्तमानाची उत्तरोत्तर वृद्धि होत असतां दुतरे धर्म क्षय पावून नाहींसे होताल.

ज्या चाली आणि रीती तुह्मी हल्लीं चालवितां त्या चाली पुढें परंपरागत आशीर्वादरूप किंवा शापरूप होतील. तुमचीं लेकरें आणि लेकरांचीं लेकरें त्या चालीचीं फळें उपभोगितील. तुह्मी व तुमचीं लेकरें मरून गेल्यावर ह्या देशांतील ख्रिस्ती मंडळीला ह्या चाली व रीती साधक किंवा बाधक होतील.

एक चाल मोठ्या अनर्थाचें कारण आहे, ती प्राचीन काळापासून चालत आली आणि आलीकडे तर तिचें मोठें प्राबल्य झालें आहे. त्या चालीनें सर्व ख्रिस्ती देशाला बहुत अनर्थ लागले आहेत. या चालीच्या योगानें किती जण संभावितपणा, आणि सुख सोई यांतून अतिशय हालहलाखींत पडले, हें कोणाच्यानें सांगवत नाहीं. ह्या चालीवरून लक्षावधि लोकांची मालमत्ता उधळली गेली, त्यांची नीति बिघडली, आणि त्यांच्या आशेची निराशा झाली राष्ट्रांच्या आणि मंडळ्यांच्या सुखाचा उद्गम इनें आटविला. इनें कुटुंबाची शांति नाहींसी करून जो ममताळू व प्रीति करणारा बाप व नवरा त्याच्या स्वभावाचा पालट करून त्याला विश्वासघातक, निर्दय व पशुतुल्य व जुलुमी असा केला आहे, आणि इच्या योगानें धर्मप्रकरणावरहि वारंवार बट्टा लागला आहे. दुसऱ्या कोणत्याहि चालीपेक्षां ही चाल जगांत दरिद्र, हालहलाखी आणि अन्याय होण्याचें कारण असी होत आली आहे. ती चाल कोणती, तर अम्मलकारक पदार्थ पिण्याची आहे.

कदाचित् कोणी ह्मणेल कीं, हे अनर्थ हे अम्मलकारक पदार्थ अतिशय पिण्याकडून झाले असतील. परंतु जर ते थोडे देखील नेहमी घेतले तर द्रव्याचा मोठा आणि व्यर्थ खर्च होतो, शरीर प्रकृति उत्तरोत्तर बिघडत जाती, आणि अनुभवावरून असें प्रमाण आहे कीं, बहुत लोक उत्तरोत्तर त्याच्या दासपणांत घातले जातात व नाश पावतात. परिमित पिण्यानें अतिशय पिण्याचा सराव होतो. जर परिमित पिण्याची चाल नसती तर अतिशय पिणें व त्याचे अनर्थ लवकरच नाहींसे होते.

याकरितां आह्मी ह्या देशांतील ख्रिस्ती लोकांस मोठ्यानें बोध देऊन विनवितों कीं, ज्या रीतीविषयीं आह्मीं आतां सांगितलें आहे त्याविषयीं तुह्मी सावध व्हा. स्वार्थ आणि परमार्थ, तुमचें व तुमच्या कुटुंबाचें हित, सर्वत्रांचें उत्तम कल्याण आणि ईश्वराचें गौरव, या सर्वांवरून अम्मलकारक पदार्थ पिण्यापासून अगदीं दूर राहा; अशी बोधयुक्त वाणी तुह्माकडे मोठ्यानें येती.

तुह्माला त्यांची कांहीं गरज नाहीं, ते नेहमी पिण्यानें तुमच्या आयुष्याची वृद्धि व्हावयाची नाहीं आणि अधिक सुखसोयहि होणार नाहीं. तुमचा आरोग्यपणा किंवा सुख आणि तुमचा संभावितपणा किंवा उपयोगीपणा यांतून एकहि त्याकडून व्हावयाचें नाहीं. हे अम्मलकारक पदार्थ अगदीं वर्जण्यानें ब्राह्मण लोकांस किंवा वाणी लोकांस कांहीं हानि प्राप्त होती कीं काय? ज्या मुसलमानांनीं हे अम्मलकारक पदार्थ वर्जिले त्यांला त्यांच्या द्राक्षरस व दारू पिणाऱ्या भाऊबंदांसीं लावून पाहिलें असतां, ते वर्जणाऱ्यांचें कांहीं नुकसान झालें असें दिसतें कीं काय? तुह्मी आपल्या अनुभवावरून तर्क करा. जे ख्रिस्ती सर्व अम्मलकारक पदार्थांपासून अगदीं दूर राहिले त्यांची हे वर्जण्यावरून कांहीं हानि होती कीं काय? यामुळें कोणाची प्रकृति बिघडली किंवा सुख कमी झालें कीं काय? त्याकडून त्यांना पैक्याची तणचाई पडती कीं काय? अथवा ते सद्गुणाच्या व शांतीच्या मार्गापासून दुसऱ्यांपेक्षां लवकर बहकतात काय? ह्या अम्मलकारक पदार्थांपासन अगदीं दूर राहण्यानें त्यांना कांहीं प्रपंचसंबंधी किंवा लौकिक संबंधी दुःख लागतें काय? नाहीं. दिगंतरापासून कोऱ्यावधी ख्रिस्ती लोक जे आपल्या अनुभवास आलेल्या गोष्टी सांगतात त्यांची साक्ष आह्माकडे अशी येती कीं, असे पदार्थ अगदीं वर्जण्यानें कांहीं अनर्थ व्हावयाचे नाहींत, येणेंकरून शरीर विकार होत नाहीं, येणेंकडून ख्रिस्ती धर्माला कांहीं बट्टा लागत नाहीं, येणेंकडून कांहीं रडणें अथवा दरिद्र, दुःख किंवा लाज प्राप्त होत नाहीं.

याकरितां अम्मलकारक पदार्थ अगदीं वर्जणें हा चांगला आणि निर्भय मार्ग आहे. आणि त्यांत चालण्याविषयीं तुह्मास कांहीं अडथळा नाहीं. तुह्मी अम्मलकारक पदार्थ घ्यावे असें ख्रिस्ती धर्मांत सांगितलें नाहीं, पण निराळ्या प्रकारें शास्त्र त्याविषयीं आपली वाणी उंचावून बोध करितें; "कोणाला हाय! कोणाला अहा! कोणाला विवाद? कोणाला विप्रलाप? कोणाला निष्कारण क्षतें आहेत! कोणाला डोळ्यांची काळोखी आहे? जे द्राक्षरस पीत पीत अति-

काळ राहतात आणि मिश्रित मद्य शोधावयाला जातात त्यांला आहे. द्राक्षरस तांबडा असतां आणि प्याल्यांत चमकतां व यथायोग्य उतरतां तूं पाहूं नको. शेवटीं तो सर्पावाणी डसतो आणि फुरशाप्रमाणें विखारी दांत मारितो." (नीति २३:२९–३१.) "द्राक्षरस निंदक, मद्य क्षोभक आहे. जो कोणी त्यानें डगमगतो तो सुज्ञ नाहीं." (–२०:१.) "आपला शेजारी मद्यपी व्हावा ह्मणून जो तूं त्याला पाजितोस आणि त्याला उन्मत्त करायासाठीं आपलें मद्य त्याच्या मुखांत घालितोस त्या तुला हाय." (हब्बाकूक २:१५.) "तुह्मी मद्यानें माजूं नका, यांत अनर्थ आहे. परंतु तुह्मी आत्म्याकडून पूर्ण व्हा. गुंगी व मद्यपान व संसाराच्या चिंता यांकडून तुमचीं हृदयें कधीं जड न व्हावीं आणि तो दिवस तुह्मावर अकस्मात न यावा ह्मणून आपणास संभाळा." (एफेसस. ५:१८. लुका. २१:३४).

शास्त्रांत ठिकाणोठिकाणीं सांगितलें आहे कीं, दारुबाज देवाच्या राज्यांत जाणार नाहींच. जे अम्मलकारक पदार्थांच्या सेवनाच्या संवईचे दास होतात त्यांचा मूर्खपणा आणि नाश याविषयीं शास्त्रांत मोठ्या आग्रहानें सांगितलें आहे. त्याविषयीं असें ह्मटलें आहे कीं, "जो तूं दारू पितोस त्या तुझे डोळे परस्त्रियांस पाहतील, आणि तुझें हृदय द्वाड गोष्टी बोलेल. होय जो समुद्रामध्यें आडवा पडला त्यासारिखा, अथवा डोलकाठीच्या माथ्यावर जो निजला त्यासारिखा होशील. त्यांनीं मला तडाका मारला असतां मी दुःखित झालों नाहीं, त्यांनीं मला पिटिलें असतां म्यां जाणिलें नाहीं, मी केव्हां जागृत होईन? मी त्याला अणखी शोधीन, असें ह्मणशील. (नीति २३–३३–३५).

होय, एकदां त्याला वाटलें कीं, जेव्हां आपली खुशी आहे तेव्हां ही संवय सोडितां येईल. एकदां त्याला असें वाटलें कीं, परिमित पिण्यानें कांहीं वाईट होणार नाहीं. परंतु आतां जरी त्याला दुःखाचा अनुभव आला कीं, तें सर्पावाणी डसतें आणि फुरशाप्रमाणें विखारी दांत मारितें तरी त्या संवईचा दास असतां आपल्या अगाध नीचपणापासून सहज ह्मणतो कीं, त्याचा शोध मी पुनः करीन. तर

ज्ञानाच्या वाणीला आतां कान दे. "हे माझ्या लेंकरा, माझें ऐक आणि शाहाणा हो." "दारूबाजांमध्यें असूं नको; द्राक्षरस तांबडा असतां तूं त्याकडे पाहूं नको."

कोणत्याहि प्रसंगीं अम्मलकारक पदार्थ घेऊंच नये असें शास्त्रांत सांगितलें नाहीं. आणि असें आमचेंही मत नाहीं. तथापि जसें सोमल किंवा अफूविषयीं शास्त्रांत कांहीं सांगितलें नसतां ते भलत्याच प्रसंगीं घेण्याची मोकळीक आहे असें समजूं नये, तसें यांविषयीं कांहीं सांगितलें नसतां ते घ्यावे अशी मोकळीक आहे ह्मणून समजूं नये. अणखी आह्मीं असें सांगतों कीं, हें औषध ह्मणून घेण्याविषयीं देखील संभाळा, कारण कीं, हें मोठें ठकविणारें आहे, आणि रोगाच्या अवस्थेंत घेतलें असतां मोठ्या अनर्थांचें कारण होईल. आणि दाहा रोग्यांस दिल्हें असतां तिघांस गुणकारी होईल खरें, परंतु पुष्कळांला अपकार करील.

कधीं कधीं शास्त्रांत द्राक्षरस हा ईश्वरी देणें ह्मणून ह्मटला आहे आणि हा जे अगदीं वार्जितात ते ईश्वरी वचनाविरुद्ध वागतात, असें कदाचित कोणी तुह्माला ह्मणतील. परंतु जो द्राक्षरस शास्त्रांत ईश्वरी देणें ह्मटला आहे तो केवळ द्राक्षांचा अमिश्रित रस आहे आणि तो हिंदुस्थानांत फार करून आणिला जात नाहीं असें समजा. या देशांत तुह्माला पाहिजे असला तरी मिळणार नाहीं. तोच जर असता आणि दुसऱ्या प्रकारचे अम्मलकारक पदार्थ नसते, तर टेंपरान्स सोसैटीची गरज नसती आणि अम्मलकारक पदार्थ घेऊं नये, असें सांगायाला फारकरून आह्मास कारण पडलें नसतें. जे कोणी अम्मलकारक पदार्थ अगदीं वर्जण्याच्या कामाला आडवे येतात आणि शास्त्रांत शुद्ध अमिश्रित द्राक्षरस ईश्वरी देणें आहे असें ह्मटलें ह्मणून अम्मलकारक पदार्थ घेण्यास चिंता नाहीं असें जे सांगतात, त्यांस आमचें ह्मणणें असें आहे कीं, ज्या दारूच्या भट्टींतून नाशकारक व बाधक अर्कांचे प्रवाह चहुंकडे जात आहेत त्यांतिल अग्नि पहिल्यानें विझवा, तुमची ब्रांडी आणि ब्रांडी मिसळलेला द्राक्षरस आणि त्यासारिखे दुसरे पदार्थ समुद्रामध्यें टाका, ज्या

असंख्य दारूच्या दुकानांतून इतका अपराध आणि दरिद्र आणि मरण येतात तीं बंद करा, दारूचे नीच दास ह्या दासपणापासून मुक्त होऊन आपल्या कुटुंबास आश्रय व्हावेतसें करा, जो पैका त्यांनीं उधळिला तो त्यांस परत द्या, जी त्यांनीं आपली अब्रू गमाविली तीहि त्यांस परत द्या, जीं सुखें आणि ज्या आशा सर्वकाळपर्यंत त्यांला नाहींशा झाल्या त्या त्यांस परत द्या, तेव्हां बरीक आह्मीं हर्षानें भरले असतां अम्मलकारक पदार्थ न घेण्याविषयीं बोध देण्यापासून राहूं खरे. पण ह्या गोष्टी होत तोंपर्यंत इतके अनर्थकारक पदार्थ अगदीं वर्ज करावे हें योग्य नाहीं काय? हा निर्भय आणि हितकारक मार्ग आहे कीं नाहीं? जेव्हां कोणी ख्रिस्ती आपल्या प्याल्याविषयीं निमित्त सांगतो, आणि मला याची गरज आहे असें ह्मणतो, ते ऐकून आह्माला रडूं येतें. आह्मीं त्याकडे मोठ्या काळजीनें अवलोकन करितों, कारण जरी तो दारू पिण्याकडून मरत नाहीं तथापि दुसरे कित्येक तो पितो असें पाहून दारूच्या अम्मलांत येतील, ह्मणून तो त्यांस अडखळण्याचें कारण होईल असें आह्मास भय आहे. ज्यांला आपणाविषयीं कांहीं भय नाहीं असे कित्येक ख्रिस्ती भाऊ या देशांत असतील, परंतु जो कल्पितो कीं आपण उभा राहतों त्यानें न पडावें ह्मणून तो संभाळो. या ठकाच्या योगानें ख्रिस्ती मंडळींतील कित्येक शिक्षित व बुद्धिमान मनुष्यें मोठ्या दुर्दशेंत पडलीं आहेत आणि कदाचित तुह्मालाहि तसेंच होईल. परंतु तुह्माला आपल्याविषयीं जरी कदाचित कांहीं भय नाहीं तरी तुमचें उदाहरण पाहून दुसऱ्या लोकांचें कसें होईल याविषयीं विचार करा, असी आह्मीं फार आग्रहानें व प्रीतीनें विनंती करितों. ज्यानें तुमच्यासाठीं आपणाला अर्पून दिल्हें त्याच्या नांवानें आह्मीं विनंती करितो कीं, जेणेंकरून आपला भाऊ पापांत पडेल असें कांहीं एक त्याच्या पुढें ठेवूं नका. ज्याच्यासाठीं ख्रीस्त मरण पावला त्याचा तुझ्या अन्नानें नाश करूं नको. सर्व पदार्थ तर शुद्धच आहेत पण जो संशय युक्त होऊन खातो त्याला तें बाधक आहे. मास न खाणें द्राक्षरस न पिणें

किंवा ज्यापासून तुझा भाऊ पापांत पडेल किंवा हीनता पावेल तें न करणें हें उत्तम आहे.

एथें आम्हीं केवळ दारूविषयीं बोललों आहों, पण ज्या गोष्टी आम्हीं एथें सांगितल्या त्या सर्व दुसरे अम्मलकारक पदार्थ ह्मणजे अफू भांग इत्यादि त्यांसहि लागतात, हे सर्व पदार्थ तुह्मी अगदीं वर्जावे.

---

## ३० हरएक प्रकारची दारू पिऊं नये ह्मणून मोठमोठ्या चिकित्सक वैद्यांचें मत.

" दारूनें प्रकृति चांगली होती, व जे नेहमी मेहनत करणारे त्यांस दारू अगत्य पाहिजे असी समजूत पूर्वीं लोक अडाणी व मूर्ख होते त्या वेळापासून पडून गेली आहे, व बाळपणापासून ऐकत गेल्यावरून इंग्लिश लोकांची व बहुतेक लोकांची असीच समजूत झाली आहे.

" शारीरशास्त्र, व प्रकृतिविषयक शास्त्र, व अनेकसमयीं, अनेकदेशीं जें पाहण्यांत आलें आहे त्या अवघ्यांचा चांगला शोध केला असतां वैद्यशास्त्रांत जे निपुण त्यांची असी खातरी होती कीं दारूनें प्रकृति चांगली होती वगैरे वर लिहिल्याप्रमाणें जी समजूत पडली आहे ती अगदीं चुकून पडली आहे. जसें इतर जनावरांस दारू वगैरे नको तसें मनुष्याची प्रकृति चांगली नीट असतां त्यास दारू वगैरे उत्तेजक पदार्थ कांहीं एक नको. आणि त्या तसल्या पदार्थांतून एखादा पदार्थ थोडका अथवा बहुत नेहमी खाल्ला किंवा प्याला असतां त्यापासून कांहीं गुण होणार नाहीं अथवा मनुष्याच्या अवघ्या आयुष्यांत जो उद्योग व्हावयाचा तो अधिक होणार नाहीं. दारू इत्यादि उत्तेजक पदार्थ कितीहि अल्पमानानें सेविले तथापि त्यांच्या योगानें बहुधा उद्योग कमी होईल.

"दुखण्यामुळें अथवा दुसऱ्या कारणामुळें मनुष्याच्या शरीरीं कांहीं एक काळ अशक्तपणा आला असला, तर इतर उत्तेजक औषधांसारिखें कित्येक मद्यांचें सेवन कांहीं काळपर्यंत उचित आहे. परंतु मनुष्यास बरें होऊन त्यांची प्रकाति पूर्ववत् चांगली नीट झाली ह्मणजे मग त्या मद्यादिकांच्या नित्य सेवनापासून कांहीं एक हित होत नाहीं. तीं फार परिमित मानानें सेविलीं तरी त्यांपासून कांहीं गुण होत नाहीं. बहुतेक लोक फार मद्य सेवीत असतां असें समजतात कीं, आह्मीं परमित मानानें सेवितों, परंतु असें विशेषमानानें सेविलें असतां शरीराची नासाडी होती. दोन दिवस पुढें किंवा दोन दिवस मागें, परंतु शरीरास विकार झाल्यावांचून कदापि राहत नाहीं."

सदरीं लिहिलेल्या ठराव पत्रावर सुमारें शंभर विद्वांन वैद्यांनीं आपापल्या सम्मति सह्या दिल्या. आणि याचप्रमाणें दुसऱ्या कित्येक देशांच्या वैद्यांनींहि ठराव ठरवून सह्या केल्या आहेत. यांतीलहि हा पुढील एक ठराव आह्मीं उतरून घेतला आहे. यावर सुमारें एकशें वीस इंग्लंड देशांतल्या वैद्यांच्या सह्या आहेत.

"आमच्या असें नजरेस येतें कीं, ताडामाडाची दारू धान्याची दारू, मोवडा, बेवडा, ब्रांडी, हरएक तऱ्हेची वैन, बीर असीं जीं अनेक प्रकारचीं मद्यें त्यांपासून मनुष्याच्या शरीरास सामर्थ्य येत नाहीं अथवा शरीराचें पोषण होत नाहीं. कोणी ह्मणेल कीं, यांतून कित्येक मद्यांनीं किंचित तरी पोषण होईल, तर कित्येक मद्यें करण्याविषयीं जीं धान्यें लागतात त्या धान्याची पेज व आंबील केली असतां तेणेंकरून जितकें विशेष पोषण होईल तितकें त्या मद्यांनीं होणार नाहीं. मद्यें प्यालीं असतां त्यांचा असा गुण आहे कीं, त्यांनीं मागाहून शरीर कमजोर करीत असावें, ह्मणून मद्यापासून अंगीं शक्ति न येतां शेवटीं उलटा अशक्तपणा येतो. दारू प्याली असतां ती कदापि आपल्या शरीर प्रकृतीसारिखी पुरतेपणीं होत नाहीं अथवा कदापि शरीर प्रकृतींत पुरतेपणीं मिळून जात नाहीं. वर सांगितलेले उन्मादक पदार्थ चांगल्या नीट प्रकृतीच्या मनुष्यांस पाहिजेत असें नाहीं, अथवा कांहीं एक्या प्रकृतीच्या मनुष्यांस त्यांची जरूर आहे असेंहि

नाहीं. थोडकीहि दारू दररोज अथवा नित्य घेत गेलें असतां आपासून चांगल्या प्रकृतीस विकार होईल, परंतु बहुतेक जण विशेष मानानें मद्य सेवितों असें जे चुकून मानितात त्यांच्या प्रकृतीस तर विशेष विकार होईल. मद्य-सेवनापासून हुशारी किंवा खुशमर्जी झाल्यासारिखें वाटतें तें उगेच उद्दीपन झाल्यामुळें वाटतें, परंतु तें थोडक्या वेळांतच नाहींसें होतें, त्यापासून वास्तविक बळाचा लेशहि प्राप्त होत नाहीं. सर्व साधारण लोकांची समजूत पडली आहे कीं, दारूच्या योगानें प्रकृति नीट राहती, व सुख होतें; परंतु ही उलटी समजूत. दारू पिणें अगदीं सोडून दिल्हें असतां लोकांच्या प्रकृति फार चांगल्या राहतील, व लोक बहुतकरून सुखी होतील. ''

---

## ३१ कलकत्ता एथें उमाचरण भोस व त्याची बायको यांचा बाप्तिस्मा.

एप्रिल महिन्याच्या २६ व्या तारिखेस (१८४९) कलकत्ता एथें फ्रीचर्च मिशनाच्या शाळेंतील एक विद्यार्थी याचा आणि त्याच्या बायकोचा बाप्तिस्मा झाला. त्या तरुणाचें नांव उमाचरण भोस. तो बहुत दिवसांपासून त्या शाळेंत विद्याभ्यास करीत आला आहे. ख्रिस्ती धर्म खरा असें त्याला कांहीं वेळापूर्वी समजूं लागलें, आणि ही गोष्ट त्याच्या घरच्या माणसांस कळल्यावर त्यांनीं त्याला वेळोवेळेस शाळेंत जाण्याविषयीं अटकाव करून घरीं ठेवून घेतलें. तो हिंदु धर्म टाकून ख्रिस्ती धर्म इतकें लवकर अंगीकारील असी मिशनेरी लोकांनीं आशा धरिली नव्हती, परंतु ईश्वर आपलें काम आपल्या इच्छेप्रमाणें चालवितो. ख्रिस्ती धर्म खरा आहे असें जेव्हां या तरुणाच्या मनांत ठसूं लागलें तेव्हां आपल्या बायकोला वाचणें शिकवावें असी त्याला फार इच्छा झाली. त्याच्या साह्यानें ती लवकर शिकली, आणि ख्रिस्ती शास्त्रांतील नवा करार व यात्रिक क्रमण

हीं दोन पुस्तकें वाचून त्यांतील बहुत गोष्टी चांगल्या समजली. त्या गोष्टी तिच्या मनांत ठसून तिलाहि असें वाटूं लागलें कीं, हिंदु धर्मापासून आपण मोकळें व्हावें. दोघांची इच्छा असीच असतां तीं आपल्या बापाचें घर सोडून मिशनेरी साहेबाच्या घरीं जाऊन राहिलीं. त्या तरूणाची बायको केवळ तेरा वर्षांची आहे, परंतु ज्या सर्वांनीं तिला पाहिलें आहे, त्यांस तिची हुशारी आणि दृढ निश्चय पाहून मोठा आनंद वाटला. त्याच्या सोयऱ्यांमध्यें कलकत्ता शहरांतील किंयेक फार द्रव्यवान लोक आहेत.

या दोघांनीं ख्रिस्ती धर्म अंगीकारिल्यावरून तेथील मोठमोठाले हिंदू यांमध्यें फार गवगवा होऊं लागला. बहुतेकांनी उमाचरण याला मनावण्यानें किंवा जुलूमानें हिंदु धर्मांत माघारें आणावयास फार प्रयत्न केला, परंतु त्यांचे सर्व उपाय व्यर्थ गेले. त्याच्या बापानें सुप्रीम कोडतांत अर्जी टाकिली, परंतु न्यायाधीशानें असें ह्मटलें कीं, हा मुलगा आपले वयांत आलेला असून तिकडे आपल्या राजी खुशीनें गेला होता, ह्मणून त्याजवर जुलूम करून त्याला आपल्या बापाच्या स्वाधीन करावें हें कायदेशीर नाहीं.

त्या मुलग्याच्या बापानें आणि त्याच्या मित्रांनीं कोडतांत बहुत खोट्या साक्षी दिल्या, एक असी कीं, तो मुलगा केवळ चवदा वर्षांचा आहे असें त्यांनीं सांगितलें. परंतु तो एकुणीस वर्षांचा आहे असें चांगल्या प्रमाणावरून ठरलें. त्यांनीं अणखी असें सांगितलें कीं, त्या मुलाजवळ येण्यास त्याच्या सर्व घरच्या माणसांस मिशनरी साहेबांनीं मना केलें होतें. परंतु उलट्या प्रकारें सर्वांला येण्याची मोकळीक होती आणि बहुत हिंदू त्याजकडे येऊन दांडगाईनें बोलले आणि वर्त्तले, याविषयीं पुरतें प्रमाण आहे. त्यांनीं अणखी असें सांगितलें कीं, या शाळेंतील कोणी हिंदु मुलगे ख्रिस्ती करणार नाहीं, असें मिशनेरी लोकांनीं वचन दिल्हें होतें; परंतु हें त्यांचें बोलणें खोटें हें सर्वांस ठाऊक आहे.

कलकत्ता येथें हिंदु लोकांच्या बायका ख्रिस्ती धर्म समजूं लागल्या आहेत असें पाहून आह्मीं ईश्वराची स्तुति करावी, आणि त्यांमध्यें

तो धर्म अगखी चालेल असी आशा धरून आपलें काम धैर्यानें चालवावें.

## ३२ तामस पेण याचें वर्णन.

तामस पेण हा " एज आफ रिझन " ( विवेक युग ) या नांवाच्या एका नास्तिकमताच्या ग्रंथाचा कर्त्ता होता. त्यामध्यें तो ख्रिस्ती शास्त्र खरें नाहीं असें प्रतिपादन करण्यास प्रयत्न करितो. तो कसा मनुष्य होता असें जर विचाराल तर तो बहुत दुर्व्यसनी होता. हीं व्यसनें बहुतेकांला माहितच होतीं आणि याविषयीं बहुत प्रमाणें पटलीं होतीं. तो आपल्या बायकोशीं बेइमानानें वागत असे. पारीस शहरांत ज्याच्या घरीं बिऱ्हाड घेतलें होतें तो त्याचा मित्र असतांहि त्यासीं दगा करून त्याची बायको व लेंकरें घेऊन अमेरिका देशांत गेला आणि तिला आपल्या घरांत घालून तिची आणि तिच्या लेंकरांची बहुत प्रकारें दुर्दशा केली. इंग्लंड देशांत तो सरकारच्या चाकरीस जकातीच्या कामावर होता आणि युनैतेद स्तेत्समध्येंहि कांहीं सरकारी चाकरीस होता. पण दोन्हीं ठिकाणीं त्यानें दगलबाजी केल्यावरून त्याचा धिंडवडा करून त्याला बरतर्फ केलें होतें. त्यानें ज्यांचें कर्ज काढिलें होतें त्यांला आपल्याजवळ बहुत मालमत्ता असतांहि देण्याविषयीं फार खळ खळ केली. जे कोणी त्याजवर उपकार करीत असत, त्यांचा त्यानें आभार मानिला असें कधींहि दिसलें नाहीं. जेव्हां लबाडी बोलण्यानें आपला स्वार्थ व्हावयाचा होता तेव्हां ती बोलण्याविषयीं त्यानें कांहीं दिक्कत घेतली नाहीं. मरणाच्या अगोदर बहुत वर्षांपासून तो पतित आणि घाणेरडा दारूबाज झालेला होता. आणि जे सर्वांहून पामर लुच्चे लोक त्यांची संगत त्याला आवडत असे. सर्व धर्मांचें खंडण करण्यांत त्यानें आपलें आयुष्य बहुतकरून वेचिलें आणि दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथांपेक्षां याचा ग्रंथ वाचून बहुत नास्तिक झाले असें वाटतें.

त्याच्या अंतःकाळीं त्याची वर्त्तणूक व अवस्था कशी होती याविषयीं जे प्रत्यक्ष पाहणारे होते त्यांतून मोठ्या प्रतीच्या गृहस्थांनीं त्याविषयीं तपसीलवार साक्ष दिल्ही. त्यांच्या वर्णनावरून असे दिसून येतें कीं, त्याच्या इतका भयंकर कोणाचाहि अंतकाळ फारकरून झाला नाहीं. त्याच्या अशुद्धपणानें आणि त्याच्या रोगानें त्याची शरीरावस्था इतकी ओंगळवाणी होती कीं, त्याविषयीं त्याच्या जवळील वैद्यानें जें वर्णन केलें तें आमच्यानें एथें लिहवत नाहीं. तो वैद्य न्युयार्क शहराचा डाक्तर म्यानली साहेब ह्मणून होता, त्यानें तामस पेण याच्या मनाच्या अवस्थेविषयीं जें लिहिलें त्यांतून आह्मीं कांहीं उतरून घेतों. तो असें ह्मणतो कीं, "मी एका रात्रीं त्याच्या बरोबर जागरण करीत होतों, त्यावेळेस त्याला मरण लवकर येईल असें फार भय होतें; तेव्हां त्याच्या मनांत व शरीरांत तिडका लागल्या असें दिसलें. त्यावेळेस तो असें ह्मणाला कीं, येशू ख्रीस्त वधस्तंभीं असतां जे शब्द बोलला ह्मणून शास्त्रांत सांगतलें ते मलाहि बोलावे लागले. "हे माझ्या देवा माझ्या देवा, मला कां टाकिलें?" बहुत दिवसांपासून दिवसां किंवा रात्रीं एकटाच राहण्यास तो खुशी नव्हता. एक मनुष्य अखंड त्याच्याजवळ नुसता असावा असें केवळ नव्हे पण त्याच्या दृष्टीस पडला पाहिजे, आणि त्याच्या पलंगावरील पडदे कधींहि पडूं देऊं नये अशी तो वारंवार ताकीद करीत असे. आणि एखाद्या वेळेस मोठ्या अगत्यामुळें त्याला एकटें राहणें पडलें असतां कोणी त्याजवळ येईपर्यंत तो मोठ्या आरोळ्या फोडून हाका मारीत असे. तामस पेण हा विवेकयुग ग्रंथाचा कर्त्ता होता असा जेव्हां आह्मीं मनांत विचार करितों तेव्हां त्याच्या त्या वेळेच्या वर्त्तणूकीवरून केवळ आश्चर्य वाटण्याजोगें आहे. त्याच्या मरणापूर्वीं सुमारें दोन आठवड्यांपासून तो दुःखाच्या वेदना लागतेवेळेस निरंतर अशा हाका मारून ह्मणत असे कीं, 'हे देवा धांव, हे प्रभू धांव, हे येशू ख्रीस्ता धांव.' आणि घरांतील सर्वांला त्रास व भय वाटावें अशा प्रकारें कर्कश वाणीनें हाका मारीत असे. तो

रोगी पडल्यापासून त्याची किरकीर व मगरूरी व उनाडपणा हीं सर्वकाळ अतिशय होतीं.

मरणाअगोदर दोन तीन दिवसांपूर्वीं डाक्तर ग्यानली साहेबानें त्याला स्पष्ट विचारिलें कीं, "येशू ख्रीस्त हा देवाचा पुत्र आहे असें तूं विश्वासतोस किंवा विश्वास धरण्यास इच्छितोस कीं काय?" त्यानें थोडावेळ उगीच राहून ह्मटलें कीं, "त्याविषयीं विश्वास धरावा अशी माझी इच्छा नाहीं."

---

## २३ ख्रिस्ती शास्त्राविषयीं व येशू ख्रीस्ताविषयीं कित्येक नास्तिकांचीं मतें.

तामस पेण नामक एक नास्तिक येशू ख्रीस्ताविषयीं आपल्या ग्रंथांत एका ठिकाणीं असें ह्मणतो कीं, "तो सद्गुणी आणि प्रियकर मनुष्य होता. जी नीति त्यानें शिकविली आणि स्वतां आचरली ती उत्तम प्रकारची होती." तामस पेण याला ख्रिस्ती शास्त्राची फार माहिती नव्हती, तरी वर लिहिल्याप्रमाणें त्यानें त्याविषयीं आपलें मत दिलें. जेव्हां त्यानें आपल्या 'विवेक युग' नामक पुस्तकाचा पहिला भाग छापिला तेव्हां जरी तो ख्रिस्ती धर्माचें खंडण करण्यासाठीं लिहिला होता तरी त्यावेळेस त्यानें ख्रिस्ती शास्त्र कांहीं वाचलें नव्हतें, असें तो कबूल करितो. त्या ग्रंथाचा दुसरा भाग छापतेवेळेस तो असें ह्मणतो कीं, "मला नुकताच एक बैबल व नवा करार मिळाला आहे." तो ग्रंथ लिहिण्याअगोदर जर त्यानें ख्रिस्ती शास्त्र चांगलें लक्ष लावून वाचिलें असतें तर बरें झालें असतें.

बालिंगब्रोक हा एक नास्तिक मताचा मोठा ग्रंथकर्त्ता होता. त्याच्या पुस्तकांत यासारखीं बहुत वाक्यें आढळतात. तो असें ह्मणतो कीं, "जर ख्रिस्ती धर्म ही केवळ मनुष्याची योजना आहे असें मानिलें तरी लोककल्याणार्थ ज्या योजना आजपर्यंत निघाल्या त्यांमध्यें ही उत्कृष्ट

योजना आहे. ख्रिस्ती शुभवर्त्तमान हें सर्व प्रकारें उत्तम नीति, न्याय, परोपकारिकपण आणि सर्व मानवी विद्या, यांचा पहिल्यापासून शेवट-पर्यंत एकसारिखा बोध देतें."

रूसो हा शुभवर्त्तमानाचा मोठा विरोधी होता. त्याच्या शिक्षणाच्या ग्रंथांतून पुढील गोष्ट घेतली आहे:—

तो असें ह्मणतो कीं, "माझ्या अंतःकरणांत शुभवर्त्तमानाची शुद्धता भिनती असें केवळ नाहीं, पण ख्रिस्ती शास्त्राच्या महिम्या-वरून मला मोठा अचंबाहि वाटतो, असें मी कबूल आहे. आमच्या ज्ञान्यांचे पाल्हाळयुक्त ग्रंथ वाचा. ते सर्व ह्या शास्त्रासीं लावून पाहिले असतां किती हलके व तुच्छ दिसतात! कोणी एखादा ग्रंथ इतका बाळबोध व एवढा उत्तम असतां मनुष्यकृत असावा हें संभवेल तरी कसें? ज्या पवित्र पुरुषाची गोष्ट त्या पुस्तकांत सांगितली तो केवळ मनुष्य होईल तरी कसा! एकतंत्री मनुष्य किंवा आवेशी पाखंडी यांच्या सारिखा बोलता असा तो आपणांस कधीं आढळतो कीं काय? त्याच्या चर्येंत केवढी गोडी व किती शुद्धता होती! त्याच्या बोलण्यांत केवढी सभ्यता होती? त्याचा बोध किती उत्कृष्ट प्रकारचा होता! त्याच्या भाषणांत केवढें अगाध ज्ञान होतें! त्याच्या उत्तरांत किती सावधपणा, किती चतुराई, किती सत्यता होती? तो केवढा इंद्रियनिग्रही होता! जो याप्रमाणें कांहीं खोड नसतां व डामडौल न मिरवितां आयुष्यभर राहून मरणहि पावला असा मनुष्य अथवा ज्ञानी देखील कोठें तरी आढळेल कीं काय?"

"जेव्हां प्लेटो हा आपल्या कल्पित उत्तम मनुष्याविषयीं वर्णन करितो तेव्हां तो सद्गुणी असून आणि सद्गुणाच्या उत्तम फळास योग्य असतां लोकांनीं त्याला दोषी ठरविलें आणि तुच्छ मानिलें, असा असावा, ह्मणून वर्णन करितो. हें वर्णन येशू ख्रिस्ताच्या स्वभावाला बरोबरच मिळतें. ही साम्यता इतकी सरळ होती कीं, पहिल्या ख्रिस्ती ग्रंथकर्त्यांला मोठा आचंबा वाटला.

"मारयेच्या पुत्रासीं सोफ्रानिस्कसाचा पुत्र लावून पाहावें यांत केवढा दुरभिमान व किती अज्ञान दिसतें! त्यामध्यें किती जमीन

अस्मानाचा फरक आहे? साक्रतेस हा दुःख आणि धिःकार झाल्यावांचून मरण पावून शेवटपर्यंत त्यानें आपणाजोगा स्वभाव दाखविला. जर त्यानें आपलें मरण शांतीनें अंगीकारिलें नसतें तर तो कोणी एका शतमूर्ख शास्त्र्यापेक्षां कांहीं गोष्टीनें सरस होता कीं काय असा संशय झाला असता. त्यानें नीतीविषयीं सिद्धांत योजिले असें ह्मटलें आहे, पण दुसऱ्यांनीं तर अगोदरच ते सिद्धांत प्रचारांत आणिले होते. याकरितां जें दुसऱ्यांनीं करून ठेविलें होतें तें केवळ त्याला सांगावयाचें होतें. आणि त्यांचीं उदाहरणें हीं नुस्तीं सिद्धांतरूपें लिहावयाचीं होतीं. साक्रतेसानें नीति ह्मणजे काय हें सांगितल्यापूर्वीं आरिस्तैदीस नीतिमान् होता. देशाभिमान धरणें हा सर्वांचा मोठा धर्म आहे असें साक्रतेसानें सांगितल्यापूर्वीं लियानिदास यानें तर आपल्या देशाकरितां आपला प्राण दिल्हा होता. साक्रतेसानें इंद्रियनिग्रह करण्याविषयीं बोध दिल्ह्यापूर्वीं स्पार्टन लोक इंद्रियनिग्रही होतेच. त्यानें सद्गुण काय आहे ह्मणून सांगितल्यापूर्वींहि ग्रीस देशांत सद्गुणी मनुष्य वहुत होते.

"पण ज्या परम शुद्ध व उत्तम नीतीविषयीं येशू ख्रीस्तीनें मात्र नेम आह्मांस देऊन कित्ताहि दाखविला ती त्यावेळींच्या ज्ञान्यांपासून कोठून त्याला शिकावयाची होती? हें सर्वोत्कृष्ट ज्ञान सर्वांपेक्षां धर्माविषयीं दुरभिमान्यांमध्यें कळविलें गेलें. त्यानें अति पामर लोकांमध्यें सर्वोत्कृष्ट सद्गुणांचा उपदेश केला. साक्रतेसाचें मरण आपल्या मित्रांसीं शांतीनें ज्ञान कथितां झालें, आणि तें जसें असावें तसें फार उत्तम होतें. पण येशू ख्रीस्त हा आपल्या सर्व लोकांकडून धिःकारलेला, उपहासित आणि आरोपित असतां त्याचा प्राणत्याग मोठ्या यातनेनें झाला. हें मोठें अघोर व भयंकर मरण होतें. साक्रतेसानें विष खाऊन त्या विष देणाऱ्या हस्तकाला आशीर्वाद दिल्हा खरा, पण येशूनें तर दुःसह यातना भोगीत असतां आपल्या निर्दय पीडकांसाठीं प्रार्थना केली. जर साक्रतेसाचें जिणें व मरणें तत्वज्ञान्याप्रमाणें होतें तर निश्चयें येशू ख्रीस्ताचें जिणें व मरणें देवाप्रमाणें होतें. शुभवर्त्तमानांतील वर्णन आह्मीं काय नुस्तें कविभारूढा-

प्रमाणें लेखावें? माझ्या मित्रा, त्यामध्यें निश्चयें कवित्वाचें लक्षण कांहीं नाहीं. उलट्या प्रकारें जरी साक्रतेसाच्या चरित्राविषयीं कोणी संशय धरीत नाहीं तरी ख्रीस्ताच्या चरित्राप्रमाणें तीं बहुत प्रमाणांवरून पटत नाहीं. असी कल्पना केल्यानें अडचण कांहीं दूर होत नाहीं, दुसऱ्या प्रकारची मात्र अडचण लागती. असें चरित्र लिहिण्याविषयीं अनेक मनुष्यांनीं कट करावा असें मानणें हें विशेष असंभाव्य आहे, त्यापेक्षां तें एका मनुष्यानें लिहिलें असें मानणें संभव्य दिसतें. असी शब्दरचना करण्यास यहूदी ग्रंथकार असमर्थ होते आणि शुभवर्त्तमानांतील नीतीविषयीं तर ते अगदीं अज्ञानी होते. त्या शुभवर्त्तमानाच्या सत्यतेचीं लक्षणें इतकीं ठसण्याजोगीं आणि दुर्घट होतीं कीं येशू ख्रीस्त आल्यावांचून ग्रंथकर्त्यांच्यानें तीं लिहवतींना. या वर्णनाप्रमाणें येशू ख्रीस्तानें आपणच व्हावें यापेक्षां तो आला नसतां कोणी असें कल्पून लिहावें हें असंभाव्य आहे." याप्रमाणें रूसो नामक नास्तिकाचें मत आहे.

वर लिहिल्याप्रमाणें नास्तिक मताच्या ग्रंथकर्त्यांनीं ख्रिस्ती धर्म चांगला आहे असें अनुमोदन दिल्हें हें कसें झालें असेल? ख्रिस्ती ग्रंथकर्त्ते तर नास्तिक मताच्या ग्रंथांस असें कधींहि अनुमोदन देत नाहींत. दुष्ट मनुष्यें सद्गुणाची वारंवार वाखाणणूक करीत असतात, आणि मरणाच्या समयीं तर विशेषेंकरून करितात. पण नीतिमान मनुष्य पापांची कधींहि वाखाणूक करीत नाहींत. वर जें लिहिलें तें याप्रमाणेंच दिसतें. तमासपेण यानें येशू ख्रीस्ताविषयीं असें ह्मटलें आहे कीं, त्यानें जी नीति शिकविली आणि स्वतां आचरली ती उत्कृष्ट आणि परोपकारिक आहे. पण तामसपेण यानें जी नीति सांगितली आणि स्वतां आचरली ती चांगली आणि परोपकारिक आहे असें कोणी तरी ह्मणेल काय? त्याची चाल व अंतकाळींची दशा पाहून त्यांत कांहीं तरी सद्गुण होते ह्मणून कोणाला दिसेल कीं काय?

## ३४ रेवाळेश्वर.

कितीएक दिवसांमागें हिंदु लोकांतील जे चमत्कार सांगतात त्यांविषयीं आह्मीं एक मजकूर प्रभाकर पत्रांतून घेऊन ज्ञानोदयांत छापिला. तो वाचून आमचा बंधु ज्ञानसिंधु कागदाचा कर्त्ता यास खेद वाटला. त्या मजकुरांतील एक कलम रेवाळेश्वराविषयीं होतें. त्यानंतर कांहीं दिवसांनीं ज्ञानसिंधु कर्त्ता यास एक कागद मिळाला, त्याजमध्यें एका हिंदु गृहस्थानें जातीनें जाऊन पाहिलें त्यानें रेवाळेश्वराचें वर्णन आपल्या पत्रामध्यें छापून आह्मांस ( ज्ञानोदयकर्त्यास ) एक पत्र लिहिलें तें असें.—

" ज्ञानोदय कर्त्ते यांस. खालीं मजकूर लिहून जाणविला आहे, हा आमच्या श्रीक्षेत्रांत ( काशींत ) एक वर्त्तमान पत्र बनारस अखबर ह्मणतात त्यांतून उतरून घेतला आहे. यांत रेवाळेश्वर ह्मणून ज्वालामुखीजवळ एक हिंदु लोकांचें महास्थान आहे, तेथें जे यात्रेकरू जातात त्यांनीं तळ्याजवळून रेवाळेश्वराची प्रार्थना पूजेविषयीं केली ह्मणजे मोठमोठीं मातीचीं ढेपळें पाण्यावरून चालत पूजकांपुढें येतात. त्यास तुह्मी आपल्या एका पत्रांत हिंदु लोकांच्या मूर्खपणाविषयीं पांच सात कलमें लिहिलीं होतीं त्यांत एक रेवाळेश्वराविषयींहि होतें व तें हिंदु लोकांचें शुद्ध वेडेपण असें जाणविलें होतें. त्यास २६ व्या जुलईच्या बनारस अखबार पत्रांत याविषयींचें लिहिलें आहे. त्यास आपल्या ज्ञानोदय पत्राचे प्रताप बनारस अखबारवाल्याकडे झुकतील तर फार संतोष मला होईल, कारण कीं तो सांप्रत वेडेपणांत आला आहे. मग इनसाफाअंती हिंदु लोकांचें वेडेपण अगर तुमचें मूर्खपण होईल तें खरें."

हें वाचून आणि ज्ञानसिंधूचें धैर्य पाहून त्याच्या बनारस अखबार पत्रांतील मजकुरामध्यें मोठी असंभाव्य गोष्ट निघेल असें आह्मीं पाहत होतों, परंतु वाचतां वाचतां तो लिहिणारा तिकडील एखादा पुजारी जो लोकांस ठकवून आपलें पोट भरतो असा कांहीं नाहीं, परंतु विवेकी आणि खरेपणाची आवड धरणारा असा आहे ह्मणून लक्षांत

येतें. तर त्याच्या पत्रावरून तीं मोठमोठीं मातीचीं ढेपळें यांची गोष्ट कशी काय झाली तें पाहूं. पत्र लिहिणारा तेथें पोंचल्यावर आणि ती रमणीय जागा पाहून तिचें वर्णन केल्यावर, तो त्या ढेपळांविषयीं लिहितो. "त्या प्रसिद्ध तळ्यांत सात मोठमोठाले खाळेश्वर आहेत व ते सवकाळ त्या तळ्याच्या पाण्यावर तरंगत असतात. त्यांस येथील लोक ढेपूळ असें ह्मणत नाहींत, त्यास बेडा (जमाव) असें ह्मणतात. तो सुमारें ९ हात लांब व ६ हात रुंद अशा प्रकारचा आहे, व बाकीचे कोणी ८ व कोणी ९ व कोणी ६ अशा रीतीचे आहेत. परंतु ते त्या तळ्यांत लहान लहान टापूसारिखे दिसतात, आणि त्यांवर शेरनाच्या लव्हाळ व पानेऱ्या व हरळी इत्यादि पाण्याच्या कांठावर उत्पन्न होणारे पदार्थ त्यांवर उगवलेले आहेत. ज्या वेळेस स्नान करण्याकरितां पाण्यांत गेलों त्यावेळेस एक बेडा घांटापासून सुमारें दोन चार हातांवर येऊन थडकला होता व लोकांच्या मुखतः असें ऐकण्यांत आलें कीं तो बेडा ह्मणजे तें बेट सुमारें ३ दिवसांपासून त्याच जागेवर स्थिर आहे, व त्या समयीं ते सर्वांहि बेडे त्या तळ्याच्या चहुंकडील किनाऱ्यास थडकून राहिले होते. अस्तु. जेव्हां मी स्नानासाठीं पाण्यांत उतरलों तेव्हां त्या बेड्याजवळ गेलों तेथें कमरेबराबर पाणी होतें. मला त्या बेटाच्या खालीं दगड अथवा माती दृष्टीस पडली नाहीं, नुसते ते वृक्ष व हरळी यांचा एक जमाव तळापासून सुमारें ४ हातांवर उगवलेला आहे इतकें मात्र नजरेस आलें. त्या तळ्याचें पाणी अति स्वच्छ होतें ह्मणून मुळ्यांचा जमाव गुंतागुत झालेला नजरेस आला. मग मी त्यास खालून जाऊन एका अंगून लोटला तंव तो नौकेसारिखा हालूं लागला. अस्तु. जेव्हां मी स्नान केलें त्यावेळेस मी तेथील पंड्याजीस पुसलें कीं, "मी इतकें दूर आलों त्यास मला यांतील एकाहि बेडा चालतां दिसला नाहीं ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे." त्यावेळेस त्यांनीं मला उत्तर दिल्हें कीं, "कां! देवाची कृपा असली तर ही गोष्ट घडून येईल." असें बोलून एक ब्राह्मण त्या बेड्याजवळ जाऊन परत येऊन मला त्यानें सांगितलें कीं, "महाराज तो समोर पाहा! बेडा आपणाकडेस येत आहे." मी

जाणिलें कीं तो जो ब्राह्मण गेला त्यानें हा बेडा लोटून दिल्हा असावा, आणि अनुमानांतहि ही गोष्ट आहे कीं पाण्याच्या जोरानें व हवेच्या योगानें हे बेडे फिरत असतात व वायुयोगानेंच स्तब्ध होतात आणि एखादे वेळेस यात्रेकरू यांचे डोळे चुकवून पंडेलोकहि लोटतात."

अरे रे रेवाळेश्वरा ! तुझा प्रताप कोणीकडे गेला ! तो केवळ रेवाळच आहे ! केरकचरा याचा जमाव. झाडांचीं मुळें व पानेऱ्या आणि लव्हाळा हे पाण्यावर तरतात यांत काय आश्चय ! आणि पुजाऱ्यांच्या जोरानें जर लोटले जातात तर यांत काय चमत्कार ! तर वेडेपण कोणाचें आहे हें सर्वांच्या दिसण्यांत येईल. त्या पत्राचा लिहिणारा शेवटीं असें ह्मणतो कीं सुमात्रा टापूमध्यें असे पाण्यावर तरणारे जमाव बहुत होतात. हें इंग्लिश कितावांमध्यें वाचिलें. ज्ञानसिंधुकर्त्ता आपणच काय बोलतो तें पाहा. तो असें लिहितो, "वर जी युक्ति त्यानें काढिली ती आह्मांस यथायोग्य वाटली व हीच युक्ति खरी आहे असें या वर्त्तमानपत्रावरून समजतें. आतां हिंदु लोकांत हेंच एक वेडेपण आहे असा अर्थ नाहीं. आह्मीं या वर्त्तमानपत्रावरून पाद्रीं लोकांस सुचित केलें होतें परंतु त्याचा आदि अंत आमच्या ध्यानांत आला नव्हता. आतां याचा परिणाम चांगला दिसून आल्यामुळें आतां आमची पूर्ण खातरी झाली." ज्ञान सिंधु कर्त्यानें हें पत्र छापिलें आणि सर्वांस जाहीर केलें हें त्यानें बरें केलें आणि जें सिद्धीस आलें तें त्याच्या पूर्वील मतास विरुद्ध असतांना तो अभिमान सोडून कबूल करितो. हें पाहून आह्मास संतोष वाटतो. हें थोर बुद्धीचें लक्षण होय. आणि त्यास आतां आमची ही विनंती आहे कीं, त्यानें अणखी खरेपणाचा शोध करीत जावा आणि आपल्या पत्रद्वारें लोकांस जाहीर करावें. त्यानें जें सांगितलें तें खरें कीं, हेंच वेडेपण हिंदुलोकांमध्यें आहे असा अर्थ नाहीं. रेवाळेश्वरासारिखीं या देशामध्यें अणखी बहुत कात्रिमें आहेत जेणेंकरून लक्षावधि माणसें फसविलीं जातात. एक माहाबळेश्वरास भागिरथीच्या उगमाविषयीं व राजापूरचा उगम इत्यादि बहुत गोष्टींविषयीं चौकशी करून तिकडील पुजाऱ्यांचें कृत्रिम उघडकीस आणून जर कागदांत छापील तर ज्ञानसिंधु हें नाम

त्याच्या कागदास साजेल आणि लाखों माणसांनीं त्याचे उपकार मानावे असें करण्याजोगें त्यांचें काम होईल.

[ सदरहू मजकूर १८४९ सालच्या ज्ञानोदयांत छापिला त्यांत कांहीं फेरफार न करितां तो एथें उतरून घेतला आहे. वेळीं ज्ञानसिंधु नामक जें पत्र होतें त्याच्या कर्त्याप्रमाणें सांप्रतकाळचे हिंदु वर्त्तमानपत्रकर्त्ते आपल्या लोकांतील धर्मसंबंधी अज्ञानाविषयीं जर योग्य विचार प्रगट करतील तर फार बरें होईल.

---

## ३५ फ्रांकलिनचा गरीब रिचार्ड याचीं वाक्यें—काळाचा सद्व्यय.

आपल्या काळांतून एकदशांश सरकारच्या चाकरींत लावावा असा कर सरकारानें जर लोकांवर बसविला तर तें कठीण सरकार असें वाटूं लागेल; परंतु त्यापेक्षां आपल्यांतून बहुतेकांवर आळसाचा कर फार मोठा आहे. आळसापासून शरीरास विकृति होती, तेणेंकरून आयुष्य खास घटतें. कष्टाच्या झिजविण्यापेक्षां आळसाचा जग लवकर खाऊन टाकितो. जी किल्ली वापरत असती ती नेहमी स्वच्छ राहती. तुला जर आयुष्य प्रिय आहे तर तूं आपला काळ व्यर्थ घालवूं नको. कां तर काळ ह्मणून जी कांहीं वस्तु तिचें आयुष्य केलें आहे. आवश्यक काळापेक्षां आपला किती अधिक काळ निजण्याखालीं जातो बरें, निद्राळू कोल्हा कोंबडी धरीत नाहीं, आणि शवगर्तेत (प्रेताच्या खांचेंत) ह्मणजे तितकी झोंप सांपडेल याचें आपण स्मरण ठेवीत नाहीं.

जर सर्व वस्तूंपेक्षां काळ बहुमूल्य आहे, तर मग काळाचा व्यर्थ व्यय करणें हा अत्यंत उधळेपणा होय, कां तर जी वेळ गेली ती पुनः कदापि मिळणार नाहीं. आपण ह्मणतों कीं काळ पुष्कळ आहे परंतु बहुधा असें घडून येतें कीं तो फार अल्पकाल होतो. याकरितां उठ-

न उद्योगास लागावें, आणि जो उद्योग करणें तो कार्योद्देशानें करावा, उद्योगशीलतेनें काम अधिक होतें आणि धांदल कमी होती. आळसास सर्व कांहीं कठीण आहे, पण उद्योगास सर्व सोपें आहे, आणि जो उशिरानें उठतो त्यास अवघा दिवस कुदावें लागतें, रात्र पडली असतांहि त्याचें तें काम आटपेल न आटपेल असें होतें; आळसाची चाल इतकी हळू असते कीं त्यास दारिद्र्य लौकर आटोपितें. तूं आपल्या कामास हांक, काम तुझा हांकी असें करून घेऊं नको; जो लवकर निजतो आणि लवकर उठतो तो निरोगी, संपत्तिवान् व ज्ञानी होतो.

चांगले दिवस येतील अशी इच्छा व आशा धरून फळ काय? आपण धांवाधांव करूं लागलों तर हेच आपले दिवस चांगले होतील. उद्योगास इच्छा करणें नलगे, जो कोणी आशेवर दिवस काढूं लागेल, त्यास उपोषणासीं गांठ पडेल. व्यासंगांवांचून प्राप्ति नाहीं; तर हातांनीं मदत द्या, कां तर माझ्याजवळ शेत नाहीं, अथवा जर असलें तर त्यावर सरकारचा कर जबर बसला आहे. ज्यास व्यापार त्यास वतन आणि ज्यास धंदा आहे त्यास प्राप्तीचा आणि प्रतिष्ठेचा अधिकार आहे असें समजावें; परंतु त्या व्यापाराविषयीं उद्योग झाला पाहिजे आणि धंद्याचे पाठीस एकसारिखेंच असलें पाहिजे, असें जर न घडलें तर त्या वतनानें अथवा अधिकारानें आह्मास सरकारचे कर देववणार नाहींत, जर आपण उद्योगी आहों तर आपण भुकें मरणार नाहींत, कां तर उद्योगी मनुष्याच्या घराकडे क्षुधा डोकावून पाहती, परतु आंत शिरावयास तिचा हिय्या होत नाहीं कारण उद्योग कर्ज फेडून टाकितो, परंतु निराशा तें कर्ज वाढविती. तुला द्रव्य मिळालें नसलें अथवा तुझ्या कोणी मातबर सोयऱ्यानें संपत्तीचा वांटाहि काढून ठेवला नसला, तर काय झालें, मेहनत नशीबाची माता आहे, उद्योगास सर्व कांहीं ईश्वर देतो. याकरितां आळशी निजले असतां तूं जमीन चांगली ओंड नांगर, ह्मणजे तुला विकायास व बाळगायास पुरे इतकें धान्य मिळेल. जें करायाचें तें आजच कर, उद्यां तूं किती अडशील हें तुला नकळे. जें आज तुझ्यानें व्हायासारिखें आहे तें उद्यांवर

सोडूं नको. मांजर हातमोजे घालून कांहीं उंदीर धरीत नाहीं; हें स्मरून तूं आपल्या काम करायाचे हातेरांस हातमोज्यावांचून हात घाल, काम तर पुष्कळ आहे खरें, आणि तूं कदाचित हाताचा अशक्त असशील; परंतु त्या कामाच्या पाठीस एकसारिखा लागून राहा, ह्मणजे पाहा किती मोठीं कार्यें होतील; कां तर पाण्याचा थेंब नित्य पडल्यानें दगड झिजून जातो. परिश्रम व धीर यांहींकरून उंदरानें मोठा दोर खाऊन त्याचे दोन तुकडे केले. लहान लहान घायांनें मोठमोठे वृक्ष पडतात. तुह्मांतील कोणी ह्मणतां तें मी ऐकतों असें मला भासतें कीं, मनुष्यानें आपल्यास कांहीं फुरसत देऊं नये काय? तर चात्रा, गरीब रिचार्ड काय बोलतो तें मी तुह्मांस सांगतों. फुरसत मिळावी असा तुमच्या मनांतला भाव आहे तर तुह्मी आपल्या काळाची चांगली योजना करा. तुह्मास एका क्षणाचा भरंवसा नाहीं, त्यापेक्षां एक घटका जाऊं देऊं नका.

---

## ३६ बाळगंगाधर शास्त्री.

मयत बाळगंगाधर शास्त्री जांभेकर ज्याविषयीं लोक प्रस्तुत शोकाविष्ट आहेत तो दक्षिण कोकणप्रांतांत राजापुराजवळ पोंभुर्लें ह्मणून एक गांव आहे तेथें सन १८१० मध्यें जन्मला.

हा सन १८२९ सांमध्यें सोसाईटीच्या शाळेंत ज्याला आतां एलफिन्स्तन इन्स्तित्यूशन ह्मणतात त्यामध्यें शिक्षक झाला. आणि तो तेव्हांपासून त्या शाळेचें काम चालविण्यास चांगला वजनदार होता. त्यानें मुलांच्या विद्याभ्यासाकरितां कित्येक पुस्तकें तयार केलीं. त्यांपैकीं बालव्याकरण नामक अद्याप प्रसिद्ध आहे व कांहीं दिवसपर्यंत योग्य रीतीनें दिग्दर्शन व दर्पण नामें दोन पत्रें काढलीं होतीं. परंतु त्या पत्रांची योग्यता त्याच्या लोकांस न समजून त्यांनीं त्यांस आश्रय दिल्हा नाहीं. परंतु त्या पत्रांच्या द्वारें स्पष्ट समजण्यांत आलें कीं, तो इतर लोकांसारिखा अंधारांत नव्हता. अलीकडे तो मानसविद्येचें

पुस्तक आबरक्रांबीच्या पुस्तकाप्रमाणें कांहींसें करीत होता. आणि अलफिन्स्तन साहेबाच्या पुस्तकाधारें हिंदुस्थानची बखर करीत होता. आणि मुंबई जीयोग्राफिकल सोसैटी व एशियाटिक सोसैटी यामध्यें कांहीं रचना करून देऊन साह्य करित असे. तो मे महिन्याच्या १७ वे तारखेस ( १८४६ ) तापाच्या दुखण्यानें मरण पावला.

बाळगंगाधर शास्त्री मोठा विद्वान होता आणि त्यास साहेब लोक व नेटिवलोकहि मानीत होते. महाराष्ट्रांतील सर्व नेटिव लोकांपेक्षां तो शिकलेला होता व आपल्या लोकांमध्यें विद्या वाढवावी अशी त्याची इच्छा होती. त्यानें आपल्या चांगल्या वर्त्तणूकीच्या योगानें व प्रोफेसरचें काम चांगलें चालविल्यानें कित्येक विद्यार्थी बरे सुधारले. त्यांतील कित्येकांनीं विद्येची मोठी आवड धरून त्यासारिखेंच विद्या वाढविण्याविषयीं उत्कंठित व्हावें अशी आमची इच्छा आहे.

बाळगंगाधर शास्त्री ऐन उमेदीमध्यें आणि पुढें कसें काय करायाचें ह्या मसलती मनामध्यें करीत असतां मरण पावला. आणि याचप्रमाणें बहुत मनुष्यांची गत आहे. लोक विद्या, द्रव्य, मान इत्यादि संपादन करायास फार उत्सुक असतात. परंतु ज्या परलोकीं आपले विशेष गुण व ऐहिक संपादलेलें एथच्यासारिखें दिसणार नाहीं तेथें आह्मी लवकर जाणार हें मनांतहि आणीत नसतात. तर आपण लवकर जाणार असें समजून जे नेहमी ईश्वराची प्रार्थना करितात कीं, मी आपले दिवस मोजीत राहावें व आपला जीव खऱ्या ज्ञानमार्गाकडे लावावा, त्यालाच ज्ञानी ह्मणावें. जे द्रव्यवान्, विद्वान आणि सर्व मान्य ते मरणाला भीत नाहींत असें नाहीं, आणि ते परलोकीं जाऊन सुख भोगतील असेंहि नाहीं. परंतु जे पापविषयीं मनःपूर्वक पश्चात्ताप करून ईश्वराच्या प्रीतीनें ज्यांचें मन पूर्ण झालें तेच परलोकसंबंधींचें सुख भोगतील.

# ३७ वजीर बेग.

वजीर बेग नामें सुमारें २३ वर्षांचा एक मुसलमान पुण्यांतील फ्री चर्च इन्स्तित्युशनामध्यें नेटिव शिक्षकांतील मुख्य शिक्षक आहे. तो कांहीं वर्षांपासून समजूं लागला कीं ख्रिस्ती धर्मच खरा आहे, इतर सर्व खोटे आहेत; आणि हल्लीं तर तो आपला उद्धार व्हावा ह्मणून फार काळजी धरूं लागला. या मनुष्याचा बाप्तिस्मा सपटंबर महिन्याच्या २० व्या तारखेस ( १८४६ ) आदितवारीं व्हावा असें होतें, परंतु त्याचा बाप व कांहीं एक त्या धर्मांतील लोक मुंबईहून पुण्यास जाऊन त्या दिवशीं बाप्तिस्मा होऊं दिल्हा नाहीं, ह्मणजे त्यांनीं त्याला प्रीति दाखविली व कित्येक अनहितें दाखविलीं. व विनवणी केली आणि शापहि दिल्हा, असे पुष्कळ उपाय केले. ते सर्व व्यर्थ झाले, तेव्हां शेवटीं जबरदस्ती केली. हें माजिस्त्रेटाला कळलें तेव्हां वजीर बेगाला बोलाविलें, व कांहींएक मुसलमानांसुद्धां त्याचा बापहि आला. तेव्हां माजिस्त्रेटानें वजीर बेगाला विचारिलें कीं, तुला यांनीं मिचल साहेबास भेटूं नये ह्मणून बंदी केली काय? त्यानें उत्तर दिल्हें कीं, होय त्यांनीं तसें केलें. मग माजिस्त्रेटानें विचारिलें तुह्मी ख्रिस्ती व्हावयास इच्छितां कीं काय? तो ह्मणाला, होय ख्रिस्ती व्हावें अशी माझी इच्छा आहे. हें त्याचें उत्तर ऐकून ते सर्व मुसलमान चकीत झाले आणि कित्येक रडूं लागले व कित्येकांनीं त्याची निर्भत्सना केली आणि त्याला शाप देऊन सर्व निघून गेले; आणि तो आपल्या ख्रिस्ती मित्रांमध्येंच राहिला. नंतर त्या सर्वांनीं ईश्वराची प्रार्थना करून त्याची उपकार स्तुति केली आणि त्यानें बृहस्पतवारीं सपटंबरच्या २४ व्या तारखेस ख्रिस्ती धर्म स्वीकारून बाप्तिस्मा घेतला.

तर ईश्वरानें कृपा करून त्याला सर्व वाईटापासून रक्षून व आशीर्वाद देऊन त्याकडूनाहि दुसरे आशीर्वादित होत असें करावें, ही त्यापाशीं आमची प्रार्थना आहे.

[ ह्या गृहस्थांनीं आपल्या खर्चानें विलायतेस जाऊन उत्तम प्र·

कारची विद्या संपादन केली. ते हल्लीं आस्त्रेलिया एथील सिदनी नामक शहरांत चामर्स् चर्च नामक मंडळीचे पाळक आहेत. त्यांस त्यांच्या विद्येच्या संबंधानें एम. डी. व एल. एल. डी. अशा दोन बहुमानाच्या पदव्या मिळाल्या आहेत. ]

## ३८ राग शमविण्याचा उपाय.

कोणे एके गांवांत एक बायको होती, ती सर्व गांवांतील बायकांपेक्षां दुःखी होती, कां तर तिचा नवरा असा निर्दय होता कीं ती आजारी पडे तोंपर्यंत तिला मारीत असे. तिच्या शेजारीं एक फार शहाणी ह्मातारी बाई राहत होती, ती बाई अशी होती कीं जें काम हातांत घेई तें काम शेवटास नेई, तिची मोठी खोल बुद्धि होती, लोकांचा स्वभाव ती जाणत असे. सर्व कामाविषयीं मागें पुढें पाहून वागत असे.

एके दिवशीं नवऱ्यानें फार मारल्यावर ती गरीब बायको ह्या शाहाण्या बाईच्या घरीं गेली, त्या शेजारिणीस ह्या बायकोच्या नवऱ्याचा स्वभाव ठाऊक होता ह्मणून मला नवरा मारितो, पाहा कधीं मला घरांत सुख नाहीं, सर्वकाळ मारण्याच्या योगानें मी दुखणाईत आहे त्याला मी काय करूं, अहो बाई, तुह्मी तरी काहीं उपाय सांगा, अशी तिची प्रार्थना ऐकून शेजारीण ह्मणाली, होय, मी विचार करून पाहतें, मला जर विचार सुचला तर मी सांगेन. नंतर चाकराला हांक मारून सांगितलें कीं पाणी भरून एक भांडें आण. मग चाकरानें जाऊन एक भांडें पाण्यानें भरून आणून चवरंगावर ठेविलें. मग शाहाण्या शेजारिणीनें काय घातलें हें तिला नसमजूं देतां त्या पाण्यांत एक ओंजळभर मीठ घातलें आणि तें कुपींत घालून तिला आणून दिल्हें आणि ह्मणाली, हें औषध आहे जेव्हां तुझा नवरा रागें भरेल तेव्हां तूं ह्या औषधाचा गुळणा धरून बैस ह्मणजे तो तुला मारणार नाहीं आणि त्याचा रागहि जाईल, असें सांगितलें. मग तिनें शेजा-

रिणीचा मोठा आभार मानिला आणि ती ह्मणाली, तुझ्या सांगण्याप्रमाणें मी करीन, कधीं चुकणार नाहीं. नंतर आठ दिवसांपर्यंत नवऱ्यानें तिला मारिलें नाहीं नवऱ्याला नित्य राग येत असे पण तो स्त्रीच्या दृष्टीस पडला ह्मणजे तिनें औषध जाणून त्या पाण्याचा गुळणा घेऊन बसावें. असे आठ दिवस गेले. मग औषध संपलें असें पाहून पुन्हा शेजारिणीकडे जाऊन ह्मणाली, बाई, मी काय करूं? औषध संपलें, जोंपर्यंत घरांत औषध होतें तोंपर्यंत नवऱ्यानें मला मारिलें नाहीं. अणखी तूं मला औषध जर देशील तर बरें होईल.

**शेजारीण**— आतां तुला औषध नको, राग जाण्याकरितां त्यां तुला औषध ह्मणून जें दिल्हें तें मात्र नदीचें पाणी होतें. त्याच्या गुणापासून नवऱ्याचा राग गेला नाहीं.

**स्त्री०**— अगे, पण जोंपर्यंत पाणी माझ्या घरांत होतें तोंपर्यंत नवऱ्यानें मला मारिलें नाहीं.

**शे०**— तें कां तुला कळलें, जोंपर्यंत तुझ्या तोंडांत पाणी असे तोंपर्यंत तुझ्यानें बोलवूं नये ह्मणून तुझें तोंड मोकळें असे तेव्हां नवरा बोलला असतां त्वांहि मोठ्यानें बोलावें, तेणेंकरून अधिक राग येऊन नवरा तुला मारीत होता; आजपासून तूं असें करीत जा, नवऱ्याला राग आला ह्मणजे उगीच ऐस, मौन्य धर, उलटून बोलूं नको; असें केलें असतां त्याचा राग शांत होईल तुला मार बसणार नाहीं; गरिबीनें वाग मग नवरा तुजवर प्रीति करील.

---

## ३९ रानटी लोक ग्रहणाविषयीं कसे फसतात याविषयीं गोष्ट.

सन १४९२ यांत कोलंबस नामें एक साहेब नवीन देशांचा शोध करीत करीत निघाला. तो अमेरिका देशांतील सांनसाल्विडार बेटांत प्रथम आला. तेव्हां तेथील लोक सर्व रानटी होते, आणि

त्यांस वाटलें कीं हीं याचीं जाहाजें आकाशावरून उतरलीं असावीं व यांत बसलेले हे देव आहेत. असें जाणून त्यांला हर्ष झाला आणि खाण्याच्या जिनसा मोठ्या भक्तीनें पुष्कळ देऊन त्यांला देवासारिखें मानिलें. परंतु कोलंबसाच्या जवळचे लोक फार दुष्ट होते, त्यांनीं तेथें फार वाईट केलें, त्यामुळें त्या दुष्टांपासून ते दूर राहून त्यांला खाणेंपिणें आणिलें नाहीं. यास्तव कोलंबसास व त्याचे लोकांस तेथें फार हाल सोसावे लागले आणि आपण उपासांनीं मरूं असें त्यांस भय वाटलें.

तेव्हां कोलंबसाला खगोलविद्या चांगली माहीत होती, आणि तीन दिवसांनीं चंद्रग्रहण होणार आहे, हें ठाऊक होतें, ह्मणून त्या रानटी लोकांच्या सरदारांला बोलावून आणून त्यानें सांगितलें कीं, आह्मास तुमच्याशीं मोठें बोलणें आहे ह्मणून तुह्मी एथें तीन दिवसांनीं यावें. मग तिसरे दिवशीं ते आले. तेव्हां तो बोलला कीं आह्मी आकाशांतल्या मोठ्या देवाचे भक्त आहों, असें असतां तुह्मी आह्मांला खायाला देत नाहीं ह्मणून त्याचा तुम्हावर फार राग झाला आहे, व तो खरा कशावरून याविषयीं प्रमाण असें आहे कीं आज रात्रीं चंद्राचा रंग बदलेल, आणि अगदीं अंधार पडेल. तर तुह्मावर त्याची केवढी अवकृपा आहे, आणि तुह्मास केवढी शिक्षा मिळेल हें त्यावरून तुह्मी जाणावें, ह्मणजे तुह्मामध्यें दुष्काळ पडून पराकाष्टेची मरी शिरेल.

हें कोलंबसाचें बोलणें ऐकून त्यांतील कित्येकांस भय वाटलें, व कित्येकांस लबाडी वाटून थट्टा केली. परंतु कसें होतें तें पाहावें ह्मणून जपत बसले होते. इतक्यांत सांगितल्या वेळेस ग्रहण लागूं लागलें, तेव्हां त्यांस भय फार वाटलें. आणि जसजसें ग्रहण वृद्धिंगत होऊं लागलें तसतसें यांच्या मनांत अधिक भय वाढत चाललें. तेव्हां खाण्याचे जिन्नस घेऊन मोठ्यानें रडत ओरडत हाय हाय करून त्या गलबताकडे चालले आणि कोलंबसाच्या पायां पडून विनंती केली कीं आमचा नाश न व्हावा ह्मणून आह्माविषयीं देवाजवळ प्रार्थना करावी आणि तुह्मी सांगितल्याप्रमाणें आह्मी वागूं. तेव्हां कोलंबस बोल-

ला, असें आहे, तर मी देवापाशीं विनंती करितों. इतकें बोलून तो आपल्या खोलींत ग्रहण खग्रास होई तोंपर्यंत राहिला, आणि ते लोक समुद्रकांठीं हाय हाय करीत होते. मग ग्रहण सुटायाचा आरंभ होतांच तो बाहेर येऊन बोलला कीं देवापाशीं तुमची प्रार्थना केली. त्यानें तुमच्या बोलण्याप्रमाणें मान्य करून क्षमा केली, आणि त्याच्या प्रत्ययासाठीं पूर्वींप्रमाणें चंद्राचा प्रकाश करीतों, ह्मणून सांगितलें आहे. नंतर तसें होऊं लागलें, तेव्हां ते लोक त्याचा उपकार मानून बोलल्याप्रमाणें त्यास नानाप्रकारचे सुंदर पदार्थ देऊं लागले. आणि आकाशांत काय होणार तें त्यास समजतें ह्मणून त्यावर ईश्वराची मोठी कृपा आहे, असें समजून जोंपर्यंत तो तेथें राहत होता तोंपर्यंत त्यांस तेथें कांहीं कमी नव्हतें. ते लोक त्यांस पुष्कळ भेट देत असत.

ग्रहणाचें भय धरून पुष्कळ फसले गेले. परंतु जे खगोलविद्या शिकून ग्रहणाचें कारण समजतात, त्यांस ग्रहणांविषयीं अगदीं भय नाहीं. केवळ चंद्रसूर्य मावळण्याप्रमाणें त्यांस वाटतें. परंतु वर्षांतून एक दोन वेळ मात्र ग्रहण येतें ह्मणून कांहींसें लक्ष लागत असेल.

[ हिंदु जोशांस जरी ग्रहण वर्त्तवितां येतें तरी पुराणांत राहुकेतूच्या ज्या गोष्टी आहेत त्या खऱ्या मानून हिंदु लोक ग्रहणाला व्यर्थ भितात व तें लागलें ह्मणजे उपास व दानधर्म करितात, यांत ते वरील गोष्टींतील लोकांप्रमाणें आपलें अज्ञान मात्र प्रगट करितात. ]

## ४० मोर.

कांहीं लोकांत मोराविषयीं अशी ह्मण आहे कीं, मोराचें दिसणें देवदूताचें, बोलणें भूताचें, आणि पोट चोराचें. आणि ही गोष्ट कांहीं अंशीं खरी आहे, कारण मोराच्या पिसाऱ्यासारिखे दुसऱ्या कोणाचे सुंदर पिसारे नाहींत परंतु स्वर फार वाईट, आणि मोर मोठा पोटार्थी आहे. आपल्या पोटाकरितां तो मनुष्याची खराबी करितो. याचें

खाणेंपिणें दाणा गोटा, फ़ळ फुल, कीड मुंगी इत्यादि आहे. जे पशु कुरूप आहेत त्यांइतकाहि याचा उपयोग नाहीं, केवळ पाहायास मात्र सुंदर आहे.

एका विद्वान हिंदूनें मोराविषयीं आह्मांस गोष्ट लिहून पाठविली ती येणेंप्रमाणें:—

मोर सर्व जनावरांमध्यें श्रेष्ठ आहे. हिंदु लोकांत याचा एवढा
मोठेपणा आहे कीं, याचे पिसारे विष्णूच्या मस्तकीं ठेवितात. अ-
थवा दुसऱ्याहि देवांवर ठेवितात. कारण हिंदुशास्त्रांत असें आहे कीं,
मोर हा सरस्वतीचें वाहन आहे, आणि ज्याचें पिच्छ सर्व देवांनीं
मस्तकीं धारण केलें आहे. याच कारणावरून हिंदु राजाचें मुख्य
भूषण हे पिसारेच आहेत, ज्याला मोरचेल असें ह्मणतात. हें केवळ
राजानें मात्र घ्यावें, कां कीं "ना विष्णुः पृथ्वीपतिः" ह्मणजे तो
ईश्वराचा अवतार आहे. मोराचें दर्शन झालें असतां तो दिवस मो-
ठ्या आनंदानें जातो, हा ज्याच्या डाव्या बाजूस जाईल त्या मनुष्या-
स पाहिजे तें मिळेल असा तो शकुन आहे असें हिंदूंत मानितात.
परंतु दुसऱ्या लोकांस कांहीं असें वाटत नाहीं. आमच्या राजे लो-
कांचा हुकूम असा आहे कीं जो क्षत्रिय राजा तोच मोरचेलाचा
धनी, दुसऱ्याला जरी मोठें राज्य असलें तरी तो क्षत्रिय राजा नाहीं.
अशावरून सातारकर महाराज यांचें ह्मणणें कीं मोरचेल आह्मांस
मात्र, गाईकवाड, शिंदे, होळकर यांचें जरी राज्य आह्मांपेक्षां मोठें
आहे तरी त्यांस मोरचेल मिळावयाचें नाहीं. परंतु आतां इंग्रजी रा-
ज्यांत तो नियम नाहीं. ज्याला जसें पाहिजे तसें त्यानें घ्यावें. मोराची
आणि इंद्राची बरोबरी आहे, ती अशी कीं इंद्र सहस्राक्ष ह्मणजे
त्याच्या सर्वांगास डोळे आहेत व मोराच्या आंगासहि तसेच आहेत.
हा फार उड्डाण करीत नाहीं परंतु कांहींसा उडत असतो. याचा श-
ब्द वर्णनीय नाहीं, केवळ रूप मात्र सुंदर आहे, पण उपयोगी आहे
असें नाहीं.

# ४१ राजा कृष्णनाथराव याची आत्महत्या.

बंगाल देशांत एक विद्वान ब्राह्मण ज्याचें नांव राजा कृष्णनाथराव यानें कांहीं दिवसांमागें ( १८४९ सांत ) आपला जीव घेतला. तो केवळ २२ वर्षांचा होता आणि फार दौलतवान् होता. त्यानें एका चाकराला बहुत मारिलें किंवा मारविलें होतें असें कीं तो चाकर कांहीं दिवस रोगी पडून शेवटीं त्या जखमांनीं मरण पावला. तो मरण्याच्या अगोदर सरकारानें कृष्णनाथराव यापासून बहुत रुपयांचा जामीन घेतला होता, आणि चाकर मेल्यावर त्याला आपल्यासमोर आणावयाचा हुकूम केला. असा हुकूम झाला हें ऐकिल्यावर कृष्णनाथराव फार उदास झाला. सरकारानें या गोष्टीची चौकशी केल्यानें आपली अपकीर्ति होईल असें समजून ती न व्हावी या हेतूनें त्यानें आपला जीव घेतला असें लोक बहुतकरून समजतात. मरणाच्या अगोदर त्यानें आपलें मृत्युपत्र दोन साहेबांच्या साहाय्यानें लिहिलें, त्यांत त्यानें आपल्या बायकोला दरमहा १५०० रुपये व्हावे इतका माल दिल्हा. परंतु विशेषेंकरून आपलें सर्व द्रव्य एक मोठी पाठशाळा बांधण्यासाठीं सरकाराच्या हातीं दिल्हें आणि त्या पाठशाळेला आपलें नांव द्यावें अशी त्यानें आपली इच्छा दाखविली. तें मृत्युपत्र लिहून सर्व तयार केल्यावर त्याने आपल्या खोलींत जाऊन दार बंद केलें आणि मग बंदूक घेऊन आपणच गोळी मारून आपलें डोकें फोडिलें आणि तसाच मेला.

या कृष्णनाथरावाचा आजा कलकत्यांतील गवर्नर जनरल साहेबाचा बहुत दिवस मुख्य कारभारी होता, आणि त्या कामांत असतां त्यानें बहुत द्रव्य मिळविलें. त्याचा पुत्र जो राजा कृष्णनाथाचा बाप तो कृष्णनाथाच्या लहानपणीं मेला, तेव्हां त्याचें सर्व द्रव्य सरकारानें आपल्या हातीं घेऊन कृष्णनाथ मोठा होई तोंपर्यंत संभाळिलें. जेव्हां सरकारानें तें द्रव्य आपल्या हातांत घेतलें तेव्हां तें बहुत कोटि रुपयांचा माल होतें आणि पुढें तें वर्षोंवर्षीं त्याच्या उत्पन्नानें वाढत वाढत जाऊन कृष्णनाथ मोठा झाल्यावर केवळ मालाची खा-

णच याच्या हातीं लागली. सरकारानें त्या मालाचा संभाळ केला असें केवळ नाहीं, परंतु कृष्णनाथाला चांगला विद्याभ्यास व्हावा ह्मणून बंदोबस्त केला. कोणीएका साहेबाला त्याच्याजवळ ठेवून इंग्लिश भाषा आणि दुसरी विद्या त्याला शिकविली. तो अभ्यास करून इंग्लिश भाषा चांगला बोलत आणि लिहित असे आणि इंग्लिश लोकांबरोबर तो फार वहिवाट करीत असें, आणि त्यांच्या सोबतीनें वागावें व त्यांच्या चालीनें राहावें यांत त्याची फार आवड असे.

परंतु जरी तो फार द्रव्यवान् आणि विद्वान् होता तरी तो खरा सुखी नव्हता, त्याच्या गुरूनीं त्याला खरें ज्ञान सांगितलें नाहीं आणि आपल्या दुर्वासना आवरण्याचें अगत्य त्याला बरोबर दाखविलें नाहीं. एक चांगला साहेब एका वेळेस त्याच्याजवळ सरकारानें ठेविला. त्या साहेबानें त्याजवळ पहिल्यानें जातेवेळेस असें पाहिलें कीं, हा दुष्ट सोबतीनें इतका बिघडला आहे कीं माझ्यानें त्याला अगदीं सुधारवत नाहीं. असें पाहून त्यानें सुधारण्याचा मार्ग त्याला सांगण्याविषयीं धैर्य लवकर सोडिलें. तो फार तरणा असतांहि बहुत दुर्व्यसनी झाला आणि विशेषेंकरून दारू पिण्याचें व्यसन फार होतें. त्याच्या मरणानंतर ज्युरी भरली त्यावेळेस एक साहेब जो त्याचा मुख्य कारभारी होता त्यानें अशी साक्ष दिल्ही कीं, तो राजा अफू वगैरे अमली पदार्थ खात असे, आणि दारू पीत असे. एका वेळेस तो दारू पिऊन दोन महिन्यांपर्यंत बरोबर शुद्धीवर नव्हता. तो शेवटीं वेड लागल्यासारिखा झाला. तो बोलण्यांत बरळत असे आणि त्याचा चेहरा वेड्यासारिखा दिसे. तो आपलें द्रव्य फार उधळीत असे. एका वेळेस त्यानें आपल्या सख्याला एक लाख रुपयांची हुंडी बक्षीस दिल्ही. बहुतेक सोबत्यांनीं तो भोळा आहे असें समजून त्याला फार ठकविलें. अशा योगानें त्यानें आपली बहुत मालमत्ता उडविली. आणि बहुत कर्ज काढिलें होतें. परंतु जरी तो भोळा आणि स्वभावानें बहुतकरून सौम्य होता तरी तो एखादे वेळेस फार तामसी होता. त्यानें एकदां अनिवार राग धरून आपल्या चाकराला असें मारविलें कीं त्याचा जीवहि गेला, आणि त्यावरून त्यानें आपलाहि जीव घेतला. अहाहा!

किती दुःखाची गोष्ट. इतकें द्रव्य आणि विद्या असतांहि तो सुखी नव्हता, त्याचें मन त्याच्या स्वाधीन नव्हतें. जर ईश्वराचें भय त्याच्या मनांत तरुणपणीं उत्पन्न झालें असतें आणि जर त्यानें आपल्या शेजाऱ्यांवर प्रीति करावी आणि त्यांचें कल्याण पाहावें अशी बुद्धि धरिली असती तर किती बरें झालें असतें? किती लोकांचें कल्याण त्याच्यानें करवलें असतें? परंतु असें न होऊन त्यानें केवळ आपला स्वार्थच पाहिला आणि दुसऱ्याचें हित न पाहतां तो आपल्या दुष्ट बुद्धीच्या स्वाधीन झाला आणि शेवटीं कोणाचेंही बरें न करून आपलाहि नाश करून घेतला. आमच्या सर्व वाचकांनीं असें समजावें कीं केवळ द्रव्य किंवा ज्ञान मिळाल्यावरून सुख होईल असें नाहीं, आपलें मन पालटलें आणि नवी बुद्धि झाली तरच सुख होईल. पहिल्यानें ईश्वराचें राज्य आणि त्याचें नीतिमत्व मिळवायास झटा" ह्मणजे या संसाराचे सर्व अगत्याचे पदार्थ तुह्माला दिल्हे जातील. (मात्थी ६:३३.) पृथ्वीवर आपणासाठीं संपत्ति सांठवूं नका, परंतु आकाश लोकांत सांठवा, कां कीं जेथें तुमची संपत्ति आहे तेथें तुमचें चित्त लागेल. ( –६:२१ )

## ४२ चोर धरण्याची युक्ति.

कोपरगांव आणि कोल्हार यां दोहों गांवांच्यामध्यें एक गांव आहे, तें लहान आहे तरी ती जागा एका गोष्टीवरून फार प्रसिद्ध झाली आहे. त्या ठिकाणीं एक मोठा साक्षात्कार घडत असतो असें बहुत दिवस आमच्या ऐकण्यांत आलें. आणि त्याचें प्रमाण पाहिलें तर त्या साक्षात्कारावरून तेथें यात्रा जमत असती. मी त्या गांवीं पोंहचलों असतां तो चमत्कार पाहण्याची मला फार उत्कंठा झाली. कारण कीं गांवोगांवचे लोक ह्मणत असत कीं ह्या गांवांत मोठा साक्षात्कार घडतो, तो असा कीं जर कोणी कांहीं पाप केलें, तर त्याला तेथें जो पीर आहे त्याजकडे वर चढून जाववत नाहीं. मग

म्यां एका गांवकऱ्याला बोलावून त्याजपासून नीट विचारून घेतलें. त्यानें सांगितलें कीं, एथें एक पीर आहे त्याच्या दर्शनास पायऱ्यांवरून चढून जावें लागतें. आणि जर कोणी चोरी केली असली तर त्याला त्या पायऱ्यांवरून चढतां येत नाहीं तो खालीं पडतो. म्यां त्या माणसाला विचारिलें कीं लोक ह्मणतात, जर कोणी कांहींहि पातक केलें तर त्याला वर चढतां येत नाहीं, परंतु पुण्यवान चढतो, ही गोष्ट खरी आहे कीं काय? तो ह्मणाला, असें पूर्वीं होतें सांप्रत असें नाहीं. परंतु जर कोणी एकानें चोरी केली आहे असा संशय येतो, तर त्याला सांगतात कीं, जर तूं चोर नाहींस तर पायऱ्यांवरून चढून जाऊन पिराचें दर्शन घे. मग जर तो चोर असला तर खालीं पडतो. ही गोष्ट ऐकून आह्मी त्या पिराकडे गेलों, तो पीर चावडीच्या पाठीमागें आहे. मी त्या पायऱ्यांवरून संभाळून चढून चावडींत गेलों आणि तेथून घुमटामध्यें गेलों, आणि जे लोक तेथें जमले होते त्यांस त्या पायऱ्यांविषयीं विचारिलें. ते ह्मणाले, पूर्वीं हा साक्षात्कार होता, परंतु आतां कांहीं होत नाहीं. मग त्या पायऱ्यांमध्यें काय गुण आहे हें समजण्यासाठीं म्यां चांगलें लक्ष्य लावून पाहिलें, तों सर्व पायऱ्या सारख्या नाहींत, कांहीं उंच, कांहीं खोल, असें पाहून माझ्या लक्षांत असें आलें कीं जर कोणी चोर धरला, आणि या रीतीनें त्याची परीक्षा करूं लागले तर तो मोठ्या प्रयत्नानें अगदीं निष्काळजी दाखवून वर चढेल. तो खालीं पाहून चढणार नाहीं, आणि अशा प्रकारानें तो एक पायरी चढून दुसऱ्या पायरीवर चढतो, मग ती उंच असली तर ठेंच लागती आणि पडल्यासारिखा होऊन घाबरतो, आणि पुढें चुकूं नये ह्मणून पाय उंच करून टाकावयास जातो, तों पायरी सखल असतां त्याचा पाय जोरानें खालीं येऊन तो फारकरून पडतो. कोणी मनुष्य एखाद्या रात्रीं पायऱ्यांवरून चढत असतां तो शेवटल्या पायरीवर जाऊनहि पुढें अणखी पायरी आहे असें जर समजून पाय टाकितो तर त्याची काय फजिती होती हें लक्षांत आणलें असतां ही वरील सर्व गोष्ट त्याच्या ध्यानांत सहज येईल.

ही चोर धरण्याची युक्ति चांगली आहे असें कोणी कदाचित ह्मणेल, परंतु या ठकविण्यावरून काय अनर्थ होतात, पाहा. हा चमत्कार ज्या पिराच्या योगानें होतो असें शिकवून हजारों लोक त्या पीर ह्मटलेल्या हडकापाशीं जाऊन तेथें नवस करितात, आणि जो मान ईश्वरासच द्यावा तो त्या मेलेल्या मुसलमानाच्या हडकाला देतात. आमच्या सर्व हिंदु लोकांनीं असें समजावें कीं कांहीं कार्य सिद्धीस आणण्यासाठीं ठकवावें हें कदापि योग्य नाहीं, कारण कीं जरी तें कार्य सिद्ध होतें तरी त्या ठकविण्यानें बहुत अनर्थ घडतात. आणि अणखी असें समजावें कीं, जे मोठाले चमत्कार आह्मी दुरून ऐकतों त्यांजविषयीं शोध करून जर त्यांजवळ येतों तर ते चमत्कार लहान लहान होऊन शेवटीं अगदीं मावळतात, ह्मणजे त्यांजमध्यें कांहीं हांशील नाहीं असें बहुतकरून लक्षांत येतें.

---

## ४३ गरीबांस दानधर्म करण्याची उत्तम रीत.

मुंबई डिस्त्रिक्ट् बिनेहोलेंट् सोसाईटी नामें मंडळी सन १८३१ सांत स्थापित झाली आणि आंधळे, पांगळे, लुळे, गोरगरीब, इत्यादि कोणत्या धर्मांतील असोत अथवा कोणत्याहि जातीचे असोत तरी त्यांचें रक्षणच करावें असा तिचा हेतु. या मंडळीची धर्मशाळा भायखळ्यावरून जो महालक्ष्मीस रस्ता चालला त्याच रस्त्यावर आहे. तर ज्यांस अगदीं ठिकाण नसेल त्यांचा तेथें खाणें पिणें, औषध, वस्त्रप्रावरण इत्यादि बंदोबस्त होईल. या मंडळीचें काम व्यवस्थेनें चालावें ह्मणून कुलाबा, किल्ला, माजगांव, परळ, माहीम, भायखळा महालक्ष्मी, इत्यादि आठ ठिकाणीं पंच नेमले आहेत. ह्मणून जर कोणी आसपासचा भिकारी येऊन पैसे मागतो तर त्या त्या पंचांच्या हातून त्याच्या खर्चाची चौकशी करून जें त्याला योग्य तें देतात अथवा देतहि नाहींत.

जितके गांवांत भीक मागणारे त्या सर्वांस भीक घालावी हें योग्य

नाहीं. कारण त्यांतील कांहीं एकाजवळ उदर निर्वाहापुरतें द्रव्य असतें. कित्येक भांग, अफू, गांजा, इत्यादि खावें अथवा दुसरें कोणतें पापकर्म चालवावें म्हणून भीक मागतात. कित्येकांस मोलमजूरी करून पोट भरायापुरती शक्ति असतां भिकेनें पोट भरून आळस त्यांला गोड वाटतो. तर असल्यांस धर्म करणें अथवा भीक घालणें यांत दया आहे असें नाहीं, उलटें पाप व ढोंग माजविलेंसें होतें. आणि असल्यांस जें दिल्हें तें केवळ व्यर्थ झालें असतें तर विशेष चिंता नव्हती, परंतु यापासून अतिशय अनर्थ आहेत. म्हणून ज्यांची गरीबांवर दया आहे त्यांनीं नीट विचार करून धर्म करावा, नाहीं तर त्यांकडून उलटा लोकांस त्रास होईल. आणि धर्म घेणाऱ्यांचाहि त्या धर्मापासून तोटाच आहे, तो असा कीं तसल्यांस धर्म मिळाल्यानें त्यांचें वाईट काम चालून ते शुद्धीवर येत नाहींत, आणि जर भीक मिळालीच नाहीं तर त्यांचे डोळे उघडून पोट भरावें म्हणून उद्योग सदा करितील, आणि ते योग्य रीतीनें वागतील. म्हणून असले धर्मकर्ते पुरुष स्तुतिपात्र नव्हत, उलटे दोषपात्र आहेत. कारण कीं दुष्टांस पुष्ट करून पाप चालविणारे आहेत. तर ह्या मंडळीचा धर्म असा नाहीं. नीट विचार करून द्यावा असा बंदोबस्त आहे.

या देशांतील लोक गरीबांवर दया करून पुष्कळ धर्म करितात तो इतका कीं, जर तोच चांगल्या बंदोबस्तानें खर्च केला असतां तितक्यानें जे वास्तविक गरीब त्यांचें रक्षण नीट झालें असतें. नेटीव लोकांत अद्यापि अशा बंदोबस्तानें धर्म चालू झाला नाहीं. यामुळें जे धर्मपात्र आहेत त्यांतील कित्येकांस दुप्पट मिळतो, आणि एखाद्यास अगदींच कमी मिळतो. आणि दुष्ट, ढोंगी, दंडास योग्य ते तर त्यांतून फारच खातात.

तर गरीबांस जशी गरज आहे तसेंच त्यांस मिळावें असा एथें कांहींच बंदोबस्त नाहीं, ह्मणून चांगला, वाईट, रोगी, आळशी, खरेखुरे निरुपायी, आणि ढोंगी, सशक्त असे सर्व भिकाऱ्यांचा वेष धरून रस्त्यावर बसतात आणि पोट भरितात. ह्मणून विचार करून

खऱ्या गरीबालाच धर्म करणें कठीण आहे. तर वास्तविक गरीबांचें रक्षण असो अथवा ढोंग्याचें माजणें असो, याविषयीं हिंदू लोकांला काळजी नसावी काय? ह्मणून या रीतीविषयीं त्यांनीं नीट विचार करावा.

या प्रमाणें भीक घालण्याच्या चालीवरून गरीबांचें पोषण यथास्थित न होतां दुष्टांचें उत्तेजन होतें. आणि एवढाच दोष आहे, असें नाहीं, तर ही रीत क्रूरच आहे. ती अशी कीं उदरपोषणार्थ रस्त्यावर आंधळे, पांगळे, अशक्त, रोगी, ह्मातारे, मुलें इत्यादिकांस भिकाऱ्याचा वेष धरून दिवसभर वसलें पाहिजे, नाहीं तर भीक मिळत नाहीं. थंडी, वारा, ऊन, पाऊस अशीं दुःखें रस्त्यावर बसून जन्मभर सोसावीं लागतात, नाहीं तर त्यांचें पोषण लोक करीत नाहींत इतकी त्यांची दुर्दशा आहे. तर लोकांस आमचें विचारणें आहे कीं यांत दया आहे काय? गरीब बिचारे यांसीं आह्मी असें वागावें, हें योग्य आहे काय? ते अपराधी आहेत असें नाहीं, आणि त्यांवर दया करून पोषण करावें हें अगत्य आहे. तर त्यांस रस्त्यावर बसूं देऊन असें दुःख भोगूं द्यावें, नाहीं तर भीक मिळणार नाहीं, हें कसें दिसतें? असली दया कठीण, ह्मणून ही गरीबांवर करूं नये. तर रस्त्यावर बसणें ह्मणजे नीच व दुःखकारक आहे ह्मणून त्यांस या कामापासून सोडवून अन्न, वस्त्र, जागा, इत्यादि बंदोबस्त करून त्यांचें पोषण करावें यांत खरी दया आहे.

तर इतरांपेक्षां हिंदूंतील जे संभावित व सुज्ञ द्रव्यवान पुरुष ते जर ह्या गोष्टीकडे लक्ष देतील तर फार बरें होईल. ते जर योग्य प्रयत्न करितील तर मोठे उपकार होतील आणि कांहीं दिवसांनीं रस्त्यावर भिकारी एकहि दिसणार नाहीं, कारण कीं विचार करून योग्य मनुष्यांचा बंदोबस्त केला जाईल, ह्मणून त्यांस रस्त्यावर भीक मागायाची गरज नाहीं. आणि आळशी, ढोंगी, यांस भीक देणें यांत पुण्य नाहीं उलटें पाप आहे असें समजून लोक त्यांस भीक घालणार नाहींत ह्मणून ते भिक्षा मागणें सोडून कामधंदा करितील. अशी गोष्ट घडली असतां किती बरें होईल.

या कामाविषयीं पारसी लोक किती बरें करितात. त्यांनीं आपल्या जातींतल्या कोणी गोरगरिबानें भीक मागूं नये ह्मणून केवढा बंदोबस्त केला आहे. कोणी पारसी रस्त्यांत भीक मागतां आह्मी कधीं पाहिलें नाहीं. तर तसेंच दुसऱ्यांनींहि आपलें व आपल्या जातीचें महत्व राखावें ह्मणून जर ते प्रवृत्त झाले तर किती चांगलें होईल. पारसी लोक आपल्या जातीच्या गरीबांचे रक्षण व्हावें ह्मणून खर्च करितात, एवढेंच नाहीं. तर आणखी दुसऱ्या जातींतल्या गरीबांच्या रक्षणाकरितांहि पैका देतात. या बिनेवोलेंट सोसाईटीमध्यें सर जमशेटजी जीजीभाईनें १००० व फ्रामजी कावसजीनें १००० रुपये दिल्हे आणि कधीं कधीं आणखीहि देतात. तसेंच दुसरे कित्येक पारसी लोकहि बरेंच देतात; सांप्रत सर जमशेटजी जीजीभाई या दयाळू मंडळीकारितां एक लाख रुपयांपेक्षां अधिक खर्च करून नवी धर्मशाळा बांधीत आहे असें ऐकतों. तर असल्या उदारपणानें व सद्विचारानें परोपकारार्थ केलेलें कृत्य आह्मास सांगायास मोठा आनंद वाटतो. आणि हिंदूंतलि व मुसलमानांतील जे श्रेष्ट व द्रव्यवान् तेहि याप्रमाणें वागतलि अशी आमची आशा आहे. सर्व नेटीव लोकांनीं आपापल्या जातीच्या गरीब लोकांचा बंदोबस्त ठेवावा हें त्यांस योग्य आहे. परंतु ही गोष्ट घडून येई तोंपर्यंत या सोसाईटीला मदत करावी, कारण आजपर्यंत बहुतकरून युरोपियन लोकांनीं पैका भरला तथापि तो नेटिवांच्याच उपयोगी पडला. असें आहे ह्मणून त्यांनींहि साह्य असावें. सारांश नेटिव व युरोपियन यांतील ज्यांस दया आहे त्यांला आमची विनंती आहे कीं हल्लीं एथें जी क्रूर व अनर्थकारी रीत चालू आहे तिला आतांपासून तरी अनुकूळ नसावें आणि विचार करून बंदोबस्तपूर्वक जे वास्तविक गरीब त्यांवर योग्य दया करावी, आणि जे आळशी, ढोंगी, ते उद्योग धंदाच करून पोट भरतील असें करावें. केवळ या मंडळीच्या अथवा यासारख्या दुसऱ्या मंडळीच्या हातून गरीबांचें पोषण व्हावें असें आमचें म्हणणें नाहीं, तर ज्यांस दया आहे त्यांनीं नीट विचार करून स्वतांच शक्तीप्रमाणें गुप्त रीतीनें त्यांचें पोषण केलें तर त्यापेक्षाहि हें फार बरें, आणि

गरीबांस त्यापेक्षांहि हा अधिक उपकार वाटेल. आणि असें केल्यानें त्यांला वाटेल कीं आपण दुसऱ्याला उपद्रव कमी द्यावा ह्मणून कांहीं तरी उद्योग चालविला पाहिजे.

कदाचित् कोणाला वाटेल कीं असें केल्यानें आपण केलेले उपकार प्रसिद्ध होणार नाहींत, तर त्याविषयीं चिंता नाहीं, आपलेंच मन आपल्याला साक्ष देईल, आणि आपल्या हातून दुसऱ्याचें कल्याण झालें हें पाहून संतोष होईल व ज्यावर उपकार केला त्यालाहि ते विशेष असे वाटतील. ज्यांस खरीखुरी दीनदया आहे ते ती लौकीकांत यावी असें इच्छीत नाहींत अशी जी दीनदया तीच चांगली व तिच्याचयोगानें गरीबांचें विशेष कल्याण होतें.

[ वर सांगितलेल्या धर्म शाळेची इमारत तयार होऊन तींत गरीबांस राहण्याची सोई बहुत वर्षांपासून झाली आहे. ]

---

## ४४ राममोहनराव.

हा विद्वान व देश सुधारणारा गृहस्थ सन १७७४ या वर्षांत राधानगर ह्मणून एक गांव कलकत्यापासून ३५ कोशांवर आहे तेथें ब्राह्मणवंशांत जन्मला. याचे वाडवडील बहुत वर्षांपासून केवळ धर्मपरायण होते. परंतु राममोहनरावाच्या पूर्वींचा जो पांचवा पुरुष त्यानें कांहीं संसारकृत्यांत मन घालून द्रव्य आणि कांहीं अधिकार मिळविण्याचा उद्योग आरंभिला. त्या दिवसापासून त्याच्या पूर्वजांस कधीं चांगलीं कधीं वाईट अशी दशा दिल्लीबादशाहाच्या दरबारांत व मोर्शिदाबादच्या दरबारांत प्राप्त होत चालली. राममोहनरावाचा बाप रामकंठराव याचा मोर्शिदाबाद दरबारांत बेबनाव झाल्यामुळें तें काम सोडून तो राधानगर गांवीं येऊन राहिला, तो तेथचा कांहीं तालूक्यांचा सुभेदार होता. राममोहनरावाच्या आईची स्वधर्मावर मोठी निष्ठा असे, ह्मणून तिला सर्व हिंदुकृत्य बरें वाटत असे.

राममोहनराव बंगाली भाषा आणि बंगाली लिपि घरींच शिकला आणि आरबी व पार्शियन शिकावयास पाटणा शहरास गेला. कारण जशी सांप्रत इंग्लिशभाषा उपयोगी आहे तशी त्यावेळेस आरबी व पार्सियन भाषा उपयोगी होती. द्रव्य आणि अन्न त्या भाषा शिकल्यानें प्राप्त होत असत. तो पाटणा मुक्कामीं आरबी व पार्सियन पुस्तकें वाचतां वाचतां आपल्या हिंदुधर्माचें असंगतपण पाहूं लागला.

देव एकच आहे असें समजून मूर्त्तिपूजा ही निरर्थक आहे असें त्याला वाटूं लागलें, आणि त्याला तिचा अगदीं कंटाळाहि आला.

पाटणा मुक्कामीं या विद्या शिकल्यावर संस्कृतादि शिकायास काशीस गेला आणि तेथें आस्थापूर्वक वेदशास्त्र पुराणें इत्यादिकांचा अभ्यास आरंभिला. पूर्वींपासून त्यानें चांगला विद्याभ्यास चालविला होता तेणेंकरून त्याचें मन सुशिक्षित झालें होतें, ह्मणून जरी तो तरुण होता तरी पुराणांमध्यें कित्येक गोष्टी विपरीत व अयुक्तिक आहेत असें पाहून त्यांस तो अगदीं कंटाळला. जेव्हां राममोहनराव सोळा वर्षांचा होता त्यावेळेस त्यानें हिंदु लोकांच्या मूर्त्तिपूजेच्या प्रकाराविषयीं एक गोष्ट लिहून शेवटीं मूर्त्तिपूजा करण्याला दोष दिल्हे होते. त्याला स्पष्ट ठाऊक होतें कीं, जर आपण मूर्त्तिपूजा सोडली तर आईबाप व इतर लोक आपला द्वेष करून निंदा करितील. परंतु त्यानें असा निश्चय केला होता कीं, जें माझ्या बुद्धीस विपरीत दिसतें व अंतःकरणास वाईट वाटतें तें मी कधीं करणार नाहीं. हा त्याचा निश्चय फार योग्य होता. आणि सर्वांनीं जर असेंच केलें असतें तर किती बरें झालें असतें? परंतु जे विद्या शिकून सुधारले आहेत त्यांनीं तर अवश्य असा निश्चय केला पाहिजे. तथापि जें त्यांच्या बुद्धीस व अंतःकरणास योग्य दिसतें त्याप्रमाणेंच वागणारे असे एथें किती तरुण असतिल!

मूर्त्तिपूजा सोडिल्यामुळें राममोहनराव आपल्या लोकांपासून कांहीं दुःख पावला ह्मणून देशाटण करावें अशी त्यानें मसलत योजिली. जसे अज्ञानी यात्रेकरू काशी, जगन्नाथ, द्वारका, मथुरा, वृंदावन इत्यादि ठिकाणीं जाऊन निर्जीव मूर्त्तींच्या पायां पडतात तसा तो

गेला नव्हता, परंतु आपलें ज्ञान वाढवावें व इतरांचे कसे कसे धर्म व चाली तें पाहावें ह्मणून फिरत असे. तो वीस वर्षांचा होईतोंपर्यंत हिंदुस्थानच्या उत्तरेस तिबेत ह्मणून देश आहे तेथें राहून दोन तीन वर्षें बौद्धधर्माविषयीं शोध केला, आणि इतर देशांतहि फिरला. जेव्हां तो वीस वर्षांचा झाला तेव्हां त्याच्या बापानें त्यास अनुकूल होऊन घरीं बोलाविलें आणि घरीं गेल्यानंतर वेद, पुराणें, वेदभाष्य, मनुस्मृति, वेदांतग्रंथ, शंकराचार्यकृत ग्रंथ अशीं पुष्कळ पुस्तकें वाचिलीं.

बावीस वर्षांचा झाल्यानंतर त्यानें इंग्रजी विद्या शिकायास आरंभ केला. पहिल्यानें अभ्यास चांगला चालला नाहीं, परंतु कांहीं वेळानें चांगला अभ्यास करून ती भाषा तो बरोबर शिकला.

जेव्हां त्याचा बाप मेला, तेव्हां त्याच्या सर्व कुटुंबाचा बंदोबस्त व पालन पोषण त्याला करणें प्राप्त झालें ह्मणून त्यानें सरकारी चाकरी रंगापुरच्या कलेक्टराच्या कचेरींत धरिली; आणि तेथें मोठ्या मेहनतीनें चांगलें कारकुनीचें काम केलें. त्यावरून त्याला लवकरच शिरस्तेदारी प्राप्त झाली. त्यावेळेस त्या अधिकारास दिवाण असें ह्मणत असत, आणि त्यापेक्षां मोठा अधिकार त्या वेळेस कोणी नेटीव मनुष्याला मिळत नसे.

सन १८१४ मध्यें राममोहनराव यानें कलकत्ता एथें वस्ती केली, त्या दिवसापासून तेथील कित्येक सुज्ञ, विद्वान् लोक त्याशीं स्नेह ठेवायास लागले, आणि तोहि त्या वेळेपासून लोकांच्या सुधारणुकेविषयीं फारच मन घालूं लागला. ईश्वरसंबंधी ज्ञानाला मूर्त्तिपूजा विपरीत आहे, ह्मणून मूर्त्तिपूजा अगदीं क्षयास जावी अशी त्याची इच्छा होती. स्वयंभू गौरवयुक्त जो देव त्याला मूर्त्तिपूजा व निरर्थक मंत्र यांची अगदीं आवड नाहीं आणि लोकांनीं मनःपूर्वक सत्यतेनें त्याची सुभक्ति करावी ह्मणून तो इच्छितो, असें जाणून राममोहनराव स्वदेशीय लोकांची भक्ति व त्यांचा धर्म सुधारायास इच्छीत होता. आणि या कामास प्रवृत्त झाल्यामुळें त्यानें लोकांपासून निंदा व मिथ्या दोषारोप सोसिले. त्याला विघ्नें फार होतीं, परंतु धैर्य सोडिलें नाहीं. लोकांचें अज्ञान व हटवाद पाहून तो त्यामुळें रडत उगीच

आळंशासारिखा बसला असें नाहीं, तर त्यानें आपल्या बुद्धीची पराकाष्ठा करून काळ घालविला. त्यानें आपल्या लोकांस उपयोगी पडण्याजोगीं धर्मसंबंधीं व नीतिसंबंधी पुस्तकें केलीं आणि दुसरे लोक नाच, तमाशे, डामडौल अशा कामांत जो पैका खर्चितात तसा आपण खर्च न करितां त्या पैक्यानें तीं स्वकृत पुस्तकें हजारों छापून देशोदेशीं वांटून दिल्हीं.

त्या पुस्तकांतील जें पहिलें पुस्तक त्यानें केलें तें वेदांतसार ह्मणून वेदाचें तात्पर्य असें सटीक व्यासकृत पुस्तक आहे, तें लोकांस दुर्बोध ह्मणून त्यानें त्याचें बंगाली भाषेंत भाषांतर केलें. त्याचा हेतु इतकाच कीं, हल्लीं जो हिंदु धर्म चालत आहे तो अगदीं वेदविरुद्ध असें लोकांस सप्रमाण दाखवावें. आणखी मूर्तिपूजन वेदविरुद्ध व ईश्वरास तुच्छ, तसेंच मन बिघडविणारें आहे असें सर्वांनीं समजून तें सोडावें. आणि दुसऱ्या लोकांनींहि समजावें, ह्मणून हिंदुस्थानी व इंग्रजी भाषेंत तेंच त्यानें छापिलें.

त्यानें त्या इंग्रजी पुस्तकाच्या भाषांतराची प्रस्तावना, "एक्या खऱ्या देवावर विश्वास ठेवणारे यांसाठीं" लिहिली आहे. तींत तो असें सांगतो कीं, "बहुतकरून ब्राह्मण वगैरे मूर्तिपूजन करणारे हिंदु यांच्यानें मूर्तिपूजन करण्याचें कांहींच योग्य कारण सांगवत नाहीं, जर कोणी त्यांस त्याविषयीं विचारील तर ते सयुक्तिक प्रमाण न दाखवितां सांगतील कीं आमच्या वाडवडिलांनीं केलें तें आह्मी करितों; आणि हेंच प्रमाण आहे असें त्यांस वाटतें. इतकी त्यांची आश्चर्यकारक बुद्धि आहे. आणि मी मूर्तिपूजन सोडून अनाद्यनंत देवाला भजतों ह्मणून त्यांतील कित्येक माझा द्वेष करितात." नंतर सामवेदांतील केन नामक उपनिषद्भाग याचें बंगाली व इंग्रजी भाषेंत भाषांतर शंकराचार्यांच्या टीकेवरून केलें, त्यांत जो देव सर्व सृष्टीकर्त्ता सर्वसमर्थ तो एकच आहे, त्याची भक्ति अवश्य केली पाहिजे, आणि त्याशिवाय दुसऱ्याची करूं नये असें मत निश्चित केलें आहे.

पुढें यजुर्वेदांतील कथोपनिषत अध्यायाचें आणि अथर्वण वेदांतल्या मुंडकोपनिषदाचें भाषांतर बंगालींत व इंग्रजींत करून सर्व लो-

कांस प्रगट केलें. त्यावरून सर्वांस आपोआप वाचायाजोगें झालें कीं महादेव, कृष्ण, काली, आदिकरून ज्या देवांवर हिंदू हल्लीं विश्वास धरून फार भजतात, ती त्यांची भक्ति वेदोपनिषदाला अगदीं विरुद्ध आहे. असें राममोहनरावानें केल्यामुळें मोठी गडबड झाली. वेदहि गुप्त राहत नाहीं, वेद केवळ ब्राह्मणांनींच वाचावा असा जो अधिकार तो गेला. आणि इतरांसहि वाचून आपोआप वेदार्थ समजूं लागला. आतां पुढें होईल तरी काय! असें लोकांच्या मनांत येऊं लागलें. तेव्हां हल्लींच्या हिंदु धर्मपक्षांत जे होते ते राममोहनराव याशीं भांडावयाला उभे राहिले, परंतु त्यानें जीं प्रमाणें दाखविलीं त्यांचें निवारण न करितां केवळ दांडगाईनें त्याची निंदा करून हा नास्तिक आहे असें बोलूं लागले. तथापि कित्येक श्रीमंत व अब्रुदार गृहस्थांनीं राममोहनरावाचा पक्ष धरून हें मूर्त्तिपूजन क्षयास जावें या हेतूनें सन १८२८ मध्यें ब्रह्मसभा केली, त्या सभेला ब्रह्मसमाज असें तेथें नांव पडलें होतें. ती सभा दर आठवड्यास भरे आणि तींत वेद वाचून अर्थ सांगत व धर्मसंबंधी आणि नीतिसंबंधीं बंगाली भाषेंत उपदेश करीत असत. त्या ठिकाणीं सर्व जातीच्या लोकांस येण्याची मोकळीक होती. आणि सभा उठायाच्यापूर्वीं राममोहनराव व तत्पक्षांतील त्याचे मित्र यांनीं केलेल्या गीतांचें गायन करीत. हें मत सर्वांस नीट माहीत व्हावें ह्मणून त्या सभेनें कित्येक पुस्तकें बंगाली भाषेंत करून तीं छापून सर्वत्र प्रसिद्ध केलीं, व कित्येक संस्कृत ग्रंथहि छापून सर्वांस मिळत असें केलें. नंतर कित्येक मूर्त्तिपूजकांनींहि त्या ब्रह्मसभेची प्रतिस्पर्धि अशी धर्मसभा नामें दुसरी सभा काढली, तिचा उद्देश असा होता कीं, त्या सभेच्या हातून आपला प्रस्तुत चाललेला धर्म रक्षावा. ही धर्मसभा प्रारंभीं मोठी वजनदार होती, परंतु उत्तरोत्तर अगदीं बलहीन झाली.

राममोहनरावानें सती जाण्याचा पाठ मोडावा ह्मणून मोठा प्रयत्न मांडिला, तो असा कीं, बंगाली व इंग्रजी भाषेंत त्यानें दोन पुस्तकें करून छापिलीं. त्यांत असें मत स्थापन केलें होतें कीं, या सती जाण्याच्या कामास कित्येक शास्त्रवाक्यें अनुकूल आहेत खरें, परंतु

हें कर्म केवळ वेदविरुद्ध आहे. याप्रमाणें राममोहनरावानें पुढारी होऊन हें सती जाणें बंद करण्याविषयीं मार्ग सिद्ध केला आणि सन १८२९ यामध्यें लार्ड विलियम् बेंटिक गवरनर जनरल साहेब यानें सती जाणें अगदीं बंद केलें.

युरोप खंडामध्यें जाऊन युरोपियन लोकांची रीतभात कलाकौशल्य आणि धर्मसंबंधी व सरकारसंबंधी वर्तणूक पाहावी ह्मणून तो कांहीं दिवसांपासून इच्छित होता. सन १८३० मध्यें राममोहनरावास दिल्लीच्या बादशहानें विलायतेस काम चालवायाकरितां आपला वकील केला म्हणून तो त्याच वर्षी आपला दत्तपुत्र राजा रामराय व दोन हिंदु चाकर यांसहित युरोपास गलबतांतून गेला. जेव्हां तो विलायतेस पोंचला तेव्हां तेथील लोकांनीं त्याचा मोठा सत्कार केला आणि जे सर्वांहून मोठे गृहस्थ होते ते त्याच्या भेटीस आले. ईस्ट इंडिया कंपनीचे बोर्ड आव कंत्रोलचा प्रेसिडेंट ह्मणजे मुख्य यानें राजाची भेट करून दरबारांत त्याची ओळख करून दिली, व राजानेंहि त्याला मेजवानी केली. जेव्हां राजाचा मुगुटसंस्कार झाला तेव्हां त्यास बोलावून मोठमोठ्या देशाच्या वकील मंडळींत त्याला बसविलें आणि पार्लमेंट सभेतील कमीटीनें आपल्यासमोर बोलावून इंडियांतील सर्व सरकारी कामकारभाराविषयीं विचारून त्याचें सम्मत घेतलें. ह्याप्रमाणें त्याची मोठ्या लोकांत गणना होऊन तेथें तो फार सत्कार पावला. नंतर तो सन १८३२ सांत फ्रान्स देशांत गेला. तेव्हां तेथच्या लोइ फिलिपराजानें मेजवानी करून त्याचा मोठा सत्कार केला. तसेंच मोठमोठ्या सरदारांनीं व विद्वान् लोकांनींहि त्याचा आदर केला. मग तो १८३३ मध्यें पुन्हा इंग्लंडास आला, परंतु त्याची प्रकृति बिघडली होती आणि जरी तेथील उत्कृष्ट वैद्यांनीं त्यास औषध उपाय केले तरी ते व्यर्थ होऊन राममोहनराव त्याच वर्षाच्या सपटंबरच्या २७ व्या तारिखेस मरण पावला.

राममोहनराव ख्रिस्ती धर्मांत आला नव्हता, परंतु तो हा धर्म चांगला समजला आणि त्यानें प्रसिद्ध केलें कीं या धर्माप्रमाणें नीति व रीति दुसऱ्या कोणत्याहि धर्मांत चांगली नाहीं. त्यानें सन १८२०

मध्यें ख्रिस्ती धर्मपुस्तकांतून वाक्यें काढून एक पुस्तक केलें आणि तें छापून सर्वांस वांटलें. त्या पुस्तकाचें नांव " शांतिकल्याण प्राप्तिमार्गप्रकाशक येशूकृत उपदेश " असे ठेविलें. त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत त्यानें असें लिहिलें आहे कीं, " जो खरा एकच देव जातपात, द्रव्य इहलौकीक महत्व नीचत्व न पाहून दुःख मरण सर्वांस भोगूं देतो आणि निःपक्षपातानें व उदारपणानें सर्वांवर दया करून उपकार करितो, त्याचें योग्य ज्ञान व्हावें ह्मणून हा धर्म सुलभ व उत्कृष्ट उपाय आहे. आणि लोकांनीं आपणाशीं, इतराशीं आणि ईश्वराशीं, कसें वागावें व कोणतें नित्यकर्म, कोणतें कृताकृत हें समजावें ह्मणून हा धर्म फार चांगला आहे. यामुळे तो या रीतीनें आह्मी प्रसिद्ध करितों आणि या योगानें चांगलेंच फळ होईल अशी माझी खात्री आहे."

राममोहनरावानें मूर्त्तिपूजन लोकांनीं न करावें ह्मणून प्रयत्न केला खरा. परंतु केवळ मूर्तिपूजन बंद करण्यासाठींच असें नाहीं, तर लोकांनीं नास्तिक न व्हावें यासाठींहि प्रयत्न केला होता; कारण कीं धर्माशिवाय कोणाचें कल्याण होत नाहीं. ह्मणून कोणत्याहि धर्माला जे न मानणारे ह्मणजे नास्तिक ते मूर्तिपूजकांतील अतिभ्रष्टापेक्षांहि भ्रष्ट आहेत, आणि असें नास्तिक मत पसरल्यानें सर्व नीति बुडून अनर्थ होईल, असें त्याचे दिसण्यांत आलें होतें. आणि हें त्याचें मत खरें आहे. जर लोक आपल्या वडिलांचें मूर्खपण सोडून कल्याणकारक जो खरा धर्म तो स्वीकारीत नाहींत तर त्यांचा काय नफा होईल? जे निरीश्वरवादी ह्मणजे नास्तिक त्यांस आशा ठेवायास देखील ठिकाण नाहीं. तर तेहतीस कोटी देवांस मानणाऱ्यांपेक्षां त्यांचें काय बरें! ते पूर्वीपेक्षां अधिक पाप करितील.

ज्यांस ईश्वराविषयीं व त्याच्या राज्यसंबंधी यथार्थ ज्ञान आहे त्यांचें कल्याण होईल, परंतु ज्यांस तें नाहीं त्यांचें कल्याण कसें होईल?

राममोहनरावाच्या गोष्टीवरून स्पष्ट दिसतें कीं, या देशांतील जो गुणी मनुष्य आहे त्याला युरोपियन लोक व इतर देशांतील लोकहि योग्य रीतीनें मान देतील. कित्येक नेटिवांस वाटतें कीं, आमच्या योग्यतेप्रमाणें आमचा सन्मान होत नाहीं. परंतु जे नेटिव लोक आ-

पल्या देशाचें कल्याण व्हावें ह्मणून उद्योग करणारे असे अद्यापि किती थोडे आहेत? आणि स्वदेश सुधारून लोकांचें मूर्खपण घालवावें ह्मणून आपला काळ, बुद्धि, आणि द्रव्य खर्चणारे असे लोक किती आहेत? तर राममोहनरावासारिखा ज्याला स्वदेश सुधारणारा ह्मणावें अशा योग्यतेचा आतां हिंदू आमच्या नजरेस एकहि पडत नाहीं. हिंदूंमध्यें जे विद्वान् व श्रीमंत लोक आहेत ते अद्यापि शिमग्यासारिखे खराब सण पाळायास आणि ज्या निर्जीव मूर्त्ति आपणच स्थापिलेल्या त्यांच्या पायां पडायास लाजत नाहींत. बहुतकरून त्यांच्या चालींत आणि हलक्या व अज्ञानी लोकांच्या चालींत कांहीं अंतर दिसत नाहीं. त्यांस सुधारलेल्या देशांतील लोकांच्या सन्मानापेक्षां कसबिणींनीं केलेली खुशामत व आळशी भिक्षुकांनीं केलेली स्तुति फार प्रिय वाटती. असें आहे ह्मणून जे सुज्ञ व प्रकाशित त्यांनीं त्या लोकांस तुच्छ व हलकें मानिलें असतां त्यांत काय आश्चर्य आहे.

जे हल्लीं तरुण हिंदु विद्वान झालेले त्यांपासून कांहीं चांगल्या फळाच्या आशेचा संभव होता, परंतु तेहि जें आपल्या बुद्धीस विपरीत वाटतें त्याप्रमाणें वागायास चुकत नाहींत. जरी त्यांना वाईट असें ठाऊक आहे, तरी ते वाईट चाल मोडायास प्रयत्न करीत नाहींत. उलटें आपल्या मानेवर रीतीस्तव जोकड घेतात, आणि बुद्धीचा निरुपयोग करून ईश्वराला तुच्छ मानितात. तर असल्या भित्र्या ढोंगी व नीच काम करणाऱ्यांमध्यें आणि राममोहनरावामध्यें केवढें अंतर आहे? तो स्वदेश सुधारणारा, आणि ते गुलामासारिखे आहेत. गव्हरनर, गव्हरनरजनरल आणि मोठमोठे राजे व युरोपांतील जे मोठे विद्वान्, त्यांनीं याचा मनःपूर्वक सत्कार केला. आणि याप्रमाणें जर दुसरा कोणी झाला असता तर त्यालाहि असेंच प्राप्त झालें असतें.

राममोहनरावाची गोष्ट अशी आहे, परंतु आह्मांस असें वाटतें कीं, तो जसा व्हावा तितका झाला नव्हता. ईश्वरापाशीं मनुष्यें कोणत्या उपायानें न्यायी ठरतील, ही मुख्य गोष्ट त्यानें लोकांस प्रगट केली नाहीं. आणि ज्या कित्येक अनर्थांनीं हें जग व्यापिलें आहे ते

अनर्थ दूर करण्याचा उपाय त्याला समजत नव्हता. तथापि आह्मी त्याला सन्मान देतों आणि ज्यांनीं ज्यांनीं स्वदेशाच्या कल्याणाविषयीं प्रयत्न केले होते त्यांमध्यें त्याची गणना करितों.

'या गृहस्थाच्या संबंधानें शेवटची गोष्ट आह्मांस अशी सांगणें आहे कीं, आतां जो चांगला काळ येणार आहे, त्या दिवसाचा हा चालता काळ अरुणोदय आहे. ज्यांचें मन, वासना, आणि मत, हीं विद्येकरून सुधारलेलीं आहेत, असे लोक अझून थोडेच आहेत. आणि असले तरी त्यांच्या मनांत अंधार व उजेड, ज्ञान व अज्ञान अशीं मिश्रित आहेत. परंतु बहुतकरून लोक केवळ अंधारांतच आहेत, तथापि जो प्रकाश दशदिशा व्यापणारा त्याचा आतां या देशांत प्रादुर्भाव झाला आहे. ह्मणून हिंदु धर्म अल्पायुषी आहे. हल्लीं हिंदुस्थानांतील हजारों लोकांची मोठी दुर्दशा आहे, परंतु ते लोक अज्ञान व हटवादापासून मोकळे होऊन एकाच निराकार देवाची प्रीति करून त्याची भक्ति, स्तुति करितील, असा दिवस येणार आहे. तर तो दिवस विजेसारखा लवकर यावा, ही आमची ईश्वरापाशीं प्रार्थना आहे.

[राममोहनराव हा ब्रह्मसमाजाचा स्थापक होता हें आमच्या वाचकांस ठाऊकच आहे. त्याच्या मागून त्या समाजाचा बराच प्रसार झाला. हिंदुस्थानांतील कित्येक मोठमोठ्या शहरांत त्याच्या शाखा व स्वतंत्र सभा स्थापिल्या गेल्या. तथापि राममोहनरावानें जें मत स्थापिलें होतें त्यांत अनेक उलटापालटी झाल्या; इतकेंच नाहीं, तर तट व फुटीहि पडल्या. त्यांपैकीं "न्युडिस्पेनशेसन" नामक तटाचा पुढारी जो बाबुकेशव चंद्र याच्या मरणावरून तर मोठ्याच भानगडी उत्पन्न झाल्या आहेत. याचा पुढें काय परिणाम होईल हें सांगवत नाहीं. केशव चंद्रसेन ह्याने ख्रीस्ताविषयीं अनेक वेळां अनेक मतें प्रगट करून शेवटीं मरणकाळीं आपण ईश्वरी मानेच्या मांडीवर बसून खेळत आहों असें मत दर्शविलें! त्याचे अनुयायी तर त्याला ईश्वरी मान देऊं इच्छितात. तो आतां स्वर्गाच्या दरबारांतून आपल्या मंडळीवर सत्ता चालवितो व मंडळीस पवित्र आत्मा देतो, आणि त्याच्या आसनावर बसून उपदेश करण्याचा कोणासही अधिकार नाहीं, असें ते समजतात.]

## ४५ वेदव्यासाचा विस्मय.

सांप्रतचे ब्राह्मण लोक आपल्या प्राचीन पूर्वजांच्या धर्मापासून भ्रष्ट झाले आहेत. त्यांनीं ऋषींचा धर्म ह्मणजे वेदप्रतिपाद्य धर्म अगदीं बेमालूम करून टाकिला आहे. या गोष्टीचें विशेष स्पष्टिकरण करण्यास्तव क्षणभर अशी कल्पना करूं कीं, कोणी एक वेदधर्मानुयायी मुनि, ह्मणा वेदव्यास, याच्या राखेवर संजीवनीचें सिंचन करून त्यास जिवंत केलें.

[illegible] उठल्यावर व्यास मुनि अष्टादशांस न्याहाळून आपण कोणत्या सृष्टींत प्रवेश केला हें पाहूं लागला. तो त्याच्या पूर्वींच्या ओळखीच्या नद्या व पर्वत दृष्टीस पडले. तेव्हां आपण पूर्वकाळांत ज्या अरण्याच्या ठायीं यज्ञयागादिक करीत होतों त्यांतच पुन्हां आलों असें वाटून त्यास परमानंद झाला. भोजनाचा समय जवळ आला तेव्हां त्यानें निश्चय केला कीं, स्नान, संध्या, यज्ञ आदिकरून कर्मे उरकून एखाद्या ऋषीच्या आश्रमाप्रत जाऊन भोजन करावें. ह्मणून समिधा वगैरे होमद्रव्यें मिळविण्यासाठीं गेला, पण पूर्वींच्या वनस्पति थोड्याच सांपडल्या. तेव्हां त्याला वाटलें, एकाद्या ऋषीकडे जावें ह्मणजे सर्व साहित्य मिळेल. ह्मणून अरण्यांत शोध करूं लागला, पण एकहि पर्णकुटिका सांपडली नाहीं. त्याला वाटले, ते दुसऱ्या अरण्यांत जाऊन राहिले असतील. दुसऱ्या अरण्याकडे जाऊं लागला तेव्हां योजन दोन योजनें चालून गेल्यावर त्याला एक सडक लागली. ती पाहून त्याला फार नवल वाटलें. असे सुंदर मार्ग त्यानें जन्मांत पाहिले नव्हते. तीवर मनुष्यांची पावलें उमटलेलीं पाहून त्याला वाटलें, या मार्गानें गेलें असतां मनुष्यांची वस्ती लागेल, ह्मणून तिकडून चालला. जातां जातां एक सुंदर नगर लागलें. त्याची रचना त्याला विलक्षण वाटली. तीन तीन चार चार मजली हवेल्या; त्यांतून कोठें गच्च्या व कोठें कौलें घातलेले उतरते पाखे; कोठें कोठें उंच गगनचुंबित देवळांचीं शिखरें व दिपमाळी; कोठें भगव्या पताका, असे प्रकार पाहून तो विचारांत पडला. मनांत ह्म-

णतो, या अरण्यांत म्या बहुतकाळपर्यंत वास केला होता असें वाटतें. यांतील नद्या व पर्वत म्यां ओळखिले आहेत. पण येथें आसमंतात जीं तीन चार पट्टणें होतीं तीं दिसत नाहींत, व विलक्षण चिन्हांनीं युक्त असें हें अपरिचित नगर कोठून आलें ! बरें पुढें गेल्यावर समजेल, ह्मणून पुढें चालला. जवळ जवळ गेल्यावर लोक भेटले. त्यांस पाहून तर त्याला फारच आश्चर्य वाटलें. त्यांचे पोषाख विलक्षण, व सोंगांसारिखे दिसले. त्यांस त्यानें, हें नगर कोणतें ह्मणून गीर्वाण भाषेंत विचारिलें, पण त्यांस तें समजलें नाहीं. त्यांनीं जें भाषण केलें तेंहि याला समजलें नाहीं. तेव्हां त्यांस वाटलें कीं, हा कोणी दूर देशचा मनुष्य आला आहे; आणि याला वाटलें कीं, हे लोक परदेशाहून आलेले प्रवासी असावे. हा आपल्या मनांत ह्मणाला, नगरांत गेल्यावर कोणी स्वदेशस्थ जन भेटतील त्यांशीं चांगलें भाषण होईल. वेशीजवळ गेला तेव्हां मारुतीचें देऊळ लागलें. त्यांतील शेंदरानें रंगविलेली अगडबंब मूर्ति पाहून पुन्हां विचारांत पडला. हें काय असेल ? लोकांस विचारूं लागला, पण याची भाषा त्यांस व त्यांची यास समजेना. इतक्यांत एक भटजी मुकटा नेसून, कपाळीं भस्माचे पट्टे रेखून, एका हातांत तांब्या पंचपात्री व दुसऱ्यांत पूजेचें तबक घेऊन, चिंधीवर पाय पडून विटाळ होऊं नये ह्मणून वर टांचा करून लांब लांब पावलें टाकीत, व कोठें कोठें उड्या मारीत, व तोंडानें कांहीं बुडबुड करीत आला. त्याच्या गळ्यांत यज्ञोपवीत आहे असे पाहून याला वाटलें, हा याज्ञिक असावा. ह्मणून मोठ्या उत्साहानें जाऊन त्याला कांहीं विचारूं लागला, पण परस्परांच्या भाषा परस्परांस समजेनात ह्मणून त्याची निराशा झाली. नंतर तो कोठें जातो व काय करतो हें पाहत उभा राहिला. त्या भटानें आंत जाऊन मारुतीवरलें निर्माल्य काढून त्यावर पाणी ओतलें, नंतर गंध लावलें, फुलें वाहिलीं, नैवेद्य दाखविला, दीप लावून ओवाळला, आणि मग परत गेला. त्यानें असें काय केलें हें व्यासाला कांहीं समजलें नाहीं. मग तो गांवांत गेला. त्याला त्याची भाषा समजणारा कोणी भेटेना. मग तो जें बोलतो तें संस्कृत भाषेंत बोलतो असा

तर्क करून लोकांनीं त्याकडे एक संस्कृतांत निपुण असा पुराणिक आणिला. पण व्यास वेदाची भाषा बोलणारा ह्मणून पुराणिक बावाची कांहीं मात्रा चालेना; तेंव्हां पुराणिकानें त्याला एका पंडिताकडे नेलें. त्या पंडितानें वेदांचा कांहीं अभ्यास केला होता. पण त्यांची जुनाट भाषा त्याला बोलतां येत नव्हती. तथापि व्यासानें जे प्रश्न त्याला केले ते तो धोरणानें समजला, तरी त्याच्यानें व्यासाशीं फार बोलवलें नाहीं, तरी मोठ्या प्रयासानें त्यानें इतकें सुचविलें कीं, या लोकांत कांहीं दिवस राहून यांची भाषा शिकाल तर त्यांशीं बोलण्याची व सर्व गोष्टी समजण्याची चांगली सोय होईल. ही सूचना मान्य करून व्यास त्या पंडिताच्या येथेंच भाषेचा अभ्यास करण्याकरितां राहिला.

हा असा चमत्कारिक मनुष्य कोण आहे व कोठून आला हें समजावें व त्याचें आपलें संभाषण व्हावें, अशी त्या नगरांतील लोकांची फार उत्कंठा होती. ह्मणून त्यांस असें वाटूं लागलें कीं, त्याला आपली भाषा केव्हां चांगली येईल, आणि आपण त्याशीं केव्हां बोलूं. व्यासालाहि तसेंच वाटूं लागलें. त्याचा अभ्यास चालला असतां त्याला फार अडचणी पडत. त्याचीं वस्त्रें वगैरे फाटलीं, तेंव्हां यजमानानें त्याला दुसरीं देऊन हल्लींच्याप्रमाणे पोषाक करायास सांगितलें, पण याला तें साधेना. त्यावरून लहान थोर हंसत आणि हा जटाळ्या बुवा फार अडाणी आहे असें ह्मणत. घरांतील मनुष्यें मूर्तिची पूजा करीत, तेंव्हां हा मनांत ह्मणे हे नियश: असें काय करतात? तो कुणब्याच्या हातचें पाणी निशंकपणे पिई तेंव्हां त्याला पंचगव्य देत, त्याला महाराचा पदर लागे तेंव्हां स्नान घालीत; त्या वेळेस हे लोक मला विनाकारण प्रायश्चित कां देतात अशा विचारांत तो पडे. याला मांसाहार करण्याची सवय होती. कारण बाळपणापासून त्याचा मांस खाण्याचा पाठ असे, व यज्ञयागादि विधि मांसाखेरीज होत नसत ह्मणून त्या प्रसंगींहि खात असे. सारांश त्याचा पिंड मांसाचाच होता. त्या पंडिताच्या घरांत तर औषधाला देखील तो पदार्थ आणीत नसत. यास्तव त्याचा जीव त्यासाठीं फार ओढत असे. त्यानें आपली मांस खाण्याची इच्छा दर्शविली असतां त्या

पंडितानें व दुसऱ्यांनीं, " शिव शिव, " ह्मणून पचपचां थुंकावें, व नाक तोंड मुरडून ह्मणावें, हा बुवा आपलें नांव व्यास मुनि असें सांगतो खरा, पण बेटा जातीचा कोण आहे कोण जाणे! ज्यास व्यास ब्रह्मकर्म समजत असे तें तर ह्या पंडिताच्या घरीं कधीं होत नसे. त्यावरून व्यासाला वाटे कीं, मी म्लेच्छाच्या एथें तर आलों नाहीं? या सर्व गोष्टींवरून बापडा व्यास फार कष्टी होत असे, आणि त्याला वाटे कीं, मला या लोकांची भाषा केव्हां बोलतां येईल, आणि हे कर्मभ्रष्ट लोक आर्य असल्यास यांस ब्राह्मकर्म आचरायास केव्हां शिकवीन.

त्याला त्या शहरच्या भाषेचा अभ्यास फारच कठीण गेला. कारण त्या भाषेतील शब्दांचे कोश व व्याकरण हे गिर्वाण भाषेंत लिहिलेले नव्हते, आणि त्याला गिर्वाण भाषेत अर्थ समजावून सांगेल असा शिक्षकहि मिळेना. तथापि त्यानें पराकाष्ठेचा व्यासंग करून, व रिकामपणाचा वेळ लोकांच्या सहवासांत घालून, व ते कोणत्या वेळेस काय बोलतात, कोणत्या पदार्थास काय ह्मणतात, हें ऐकून आपल्या स्मरणवहींत लिहून व पाठ करून, व जसें बोलतां येई तसें लोकांशीं त्यांच्या भाषेंत बोले. तेव्हां त्याच्या चुकया व अशुद्धें यांवरून जरी सर्वजण हंसत तरी आपल्या चुकया व अशुद्धें कोणतीं व त्या ठिकाणीं शुद्ध कसे बोलावें, हें पुसून ध्यानांत ठेवून व अशींच दुसरीं साधनें करून तो ती भाषा कांहीं काळानें चांगली शिकला, व लोकांशीं चांगलें संभाषण करूं लागला.

ही गोष्ट जेव्हां प्रसिद्ध झाली तेव्हां बहुत लोक त्याकडे येऊं लागले. त्यांचे व व्यासाचे मोठमोठ्या धर्म सिद्धांतांविषयीं वादविवाद होत असत. ब्राह्मणांनीं त्याला प्राचीन काळच्या कांहीं गोष्टी विचारल्यावर ह्मटलें, "महाराज, आपण मोठे मुनींद्र असतां देवतार्चन करीत नाहीं, व शूद्र अतिशूद्र यांचा विटाळ मानीत नाहीं, मांस खाण्याची इच्छा धरितां, याचें कारण काय? " तेव्हां व्यासानें उत्तर केलें कीं, " म्यां अरण्यांत शोध केला, पण मला कांहीं यज्ञसाहित्य प्राप्त झालें नाहीं. ऋषींचा शोध केला, पण त्या प्रिय व पवित्र म-

हापुरुषांतून एकाचाहि आश्रम सांपडला नाहीं. एथें कोठें याज्ञिक्य नाहीं, यज्ञशाला नाहींत; तेव्हां हवनें करावीं कशीं ? इंद्रवरुणादि दैवतांची अर्चा करण्याची मला फार आवड आहे, पण उपाय नाहीं." ब्राह्मण ह्मणाले, "महाराज, आह्मी आपणास हवनांविषयीं विचारीत नाहीं. त्यांचें माहात्म्य बहुतकरून बुडालें. या मन्वंतराच्या ठायीं मूर्तिपूजेचा फार प्रचार आहे. तर आपण मूर्तीचें पूजन कां करीत नाहीं ?" याचा अर्थ व्यासाला बरोबर समजला नाहीं, ह्मणून तो ह्मणाला, "तुह्मी सांगतां त्या नांवाचा भक्तिमार्ग शास्त्रांत कोठेहि आज्ञापिला नाहीं, असें वाटतें." हें ऐकून ब्राह्मण मंडळी संतप्त होऊन ह्मणाली, "आपण मुनि असून असें दुर्भाषण करतां हें मोठें आश्चर्य आहे." मग एक ग्रंथ उघडून त्यांतून त्यांनीं मूर्तिपूजा करावी अशी आज्ञा वाचून दाखविली आणि ह्मटलें, "अशी स्पष्ट आज्ञा असतां आपण ह्मणतां, शास्त्राज्ञा नाहीं, हें कसें?" व्यासानें विचारलें, "हा कोणता ग्रंथ आहे ? हा कोणी व केव्हां केला ?" या प्रश्नांचें त्यांनीं उत्तर दिल्यावर व्यास ह्मणाला, "मुलांनो, या ग्रंथास शास्त्र मानूं नका. वेद हें महावाक्य आहे, तेंच ब्राह्मणांस प्राधान्य आहे." मग त्यानें ऋग्वेद काढून त्यावरून ब्राह्मणांचा आचार कसा असावा हें दाखविलें. तेव्हां ब्राह्मण अमळ स्तब्ध झाले, तरी त्यांस मनापासून व्यासाचा बोध आवडला नाहीं. बहुत पिढ्यांपासून आजवर जी रूढि चालत आली आहे ती मोडणें बरें नाहीं, असें त्यांस वाटलें. मग ते ह्मणाले, "बरें असो; पण, महाराज, आपण विटाळ कां पाळीत नाहीं ?" व्यास ह्मणाला, "मुलांनो, मी सर्वांपेक्षां विटाळास फार भितों, व त्यापासून राहवेल तितका दूर राहतों. मी चोरी, लबाडी, द्वेष इत्यादि करीत नाहीं. असें असतां मी जपत नाहीं, असें कसें ह्मणतां ?" तेव्हां ब्राह्मण ह्मणाले, "महाराज, ज्या दोषांस आपण भितां ते करूं नयेत हे खरें. पण एखाद्या वेळेस ते घडले तरी चिंता नाहीं, व कधीं कधीं तर ते अवश्य केलेच पाहिजेत, अशी शास्त्राज्ञा आहे. पण कुणब्याचें पाणी पिणें, व महारास शिवणें व विटाळ कालविणें हें फार वाईट आहे." व्यास उत्तर क-

रिता झाला कीं, "जे घोर पातक करून पतित झाले आहेत त्यांशि- वाय दुसऱ्याचा विटाळ मानण्यास वेदाज्ञा नाहीं." ब्राह्मण ह्मणाले, "शूद्रांच्या हातचें खाऊं पिऊं नये, व अतिशूद्राचा तर स्पर्श देखील होउं देऊं नये, अशी धर्मशास्त्राची आज्ञा आहे. वेदांतही सांगितलें आहे ह्मणून ऐकतों कीं, ब्रह्मदेवाच्या मुखापासून ब्राह्मण, बाहूंपासून क्षत्रीय, कटीपासून वैश्य, आणि चरणांपासून शूद्र जन्मले. तर जे मुखापासून जन्मले त्यांनीं चरणांपासून जन्मलेल्यांशीं अन्नोद- कादि व्यवहार कसे करावे?" व्यास—"छी! मुलांनो, या गोष्टीचा तुह्मी विपरीत अर्थ करितां. याप्रकारें चार वर्णांची उत्पत्ति झाली असें वेदांत कोठें आहे? आणि तुमच्या मतावरून शूद्र हे नीच व अस्पर्श ठरत नाहींत. ब्रह्मदेव हा स्वतां देव असतां शूद्र त्याच्या चरणांपासून झाले तरी ते शुद्धच होत. जेव्हां को- णी नीच कर्म करतो तेव्हां तो पतित होतो व त्यासीं कांहीं व्यवहार करूं नये, मग तो वर्णेंकरून ब्राह्मण असो किंवा शूद्र असो. आणि ज्यांच्या हातचें म्यां खाल्लें त्यांनीं जर असें कांहीं नीच कर्म केलें असेल तर मला सोमरस व पशु आणून द्या, मी त्याबद्दल यज्ञ कर- ण्यास सिद्ध आहें." हें ऐकून ब्राह्मणांस अमळ वाईट वाटलें. मग ते त्याला ह्मणाले, "त्यांनीं नीच कर्म केलें नाहीं खरें, पण ते नीच यातींत जन्मले आहेत कीं नाहीं!" तेव्हां व्यास बोलला, "नीच याति ह्मणजे काय? माझी तुमची त्यांची व सर्व वर्णांची याति एकच." एथेंहि ब्राह्मण स्तब्ध झाले. मग त्यांनीं त्याला वि- चारिलें, "आपण वेदव्यास असतां सर्व आपल्याप्रमाणेंच आचरण करूं लागतील. जर आपण मांस सेवन कराल तर सर्व करूं लाग- तील, यास्तव आपण कृपा करून त्याचे नांव सोडून द्यावें." व्यास— "जें माझें आचरण निर्दोष असेल तें सर्वांनीं ग्रहण केलें तर मला वाईट वाटणार नाहीं. मांस खाणें हें निर्दोष आहे एवढेंच नव्हे, तर ब्राह्मणांनीं तें अवश्य खाल्लें पाहिजे हें मी या वेदांवरून दाखवून देतो. आणि तुह्मी मांस खात नसतां काय? व तें खाऊं नये असे तुमचें मत आहे काय?" ब्राह्मण—"आह्मी खात नसतों व खावे

असें आमचें मत नाहीं. कारण जगद्गुरु शंकराचार्य यांनीं मनाई केली आहे. " व्यास— असा जो शंकराचार्य त्याला त्रिवार धिक्कार असो! ज्यांनीं वर्णव्यवस्था बुडवून जातिभेद चालू केले, मूर्तिपूजा स्थापिली, इंद्रादि दैवतांप्रत तोषविणारे जे यज्ञयाग ते करण्याची बंदी केली, यज्ञांतील पवित्र मांसप्रसाद दुर्लभ केला, त्यांनीं आमच्या वंशांत जन्मून कांहीं सार्थक केलें नाहीं, आमच्या नांवास बट्टा मात्र लाविला. अशांस ब्राम्हण म्हणूं नये, आणि अशा धर्मभ्रष्ट लोकांच्या घरीं राहू नये. पूर्वीं समजलें असतें तर तुमच्यामध्यें राहिलोंच नसतों. " असें ह्मणून त्यांच्यांतून निघून गेला; आणि घरधनी पंडित व ब्राम्हण ह्मणाले, बरें झालें, पीडा गेली, चांगला व्यास असून द्वाड नेहमीं पाद्रीप्रमाणेंच बोलत असे!

या प्रकारें कलह होऊन व्यास पंडित मजकूर याच्या एथून निघून गेला, हें वर्तमान त्या शहरांतील सुधारलेल्या तरुणांस समजलें. तेव्हां त्यांनीं आपसांत विचार केला कीं, व्यासाला आपल्याजवळ ठेवावें. हे तरुण सरकारी शाळांत व पाठशाळांत शिकलेले होते, तेणेंकरून त्यांचा विश्वास त्यांच्या वाडिलांच्या धर्मावरून उडून गेला होता. त्यांस कोणताहि धर्म खरा वाटत नव्हता. ईश्वरापासून मनुष्यास शास्त्र मिळण्याची जरूर नाहीं व मिळणें असंभव्य आहे, व जे मिळालें ह्मणतात ते मूर्ख आहेत, असें त्यांचें मत होतें. पण हें मत प्रसिद्ध केलें असतां हिंदु मुसलमान ख्रिस्ती आदिकरून सर्व शास्त्रवादी लोक आपला द्वेष करितील, यास्तव कांहीं हिकमत करून निदान आपल्या लोकांची तरी अनुकूलता राखावी, या हेतूनें ते म्हणत कीं, आह्मांस सांप्रतचा पुराणप्रतिपाद्य धर्म नको, तो बिघडलेला आहे, मुळीं वेदांचा जो धर्म आमचे प्राचीन पूर्वज मानीत होते तो शुद्ध होता, ह्मणून आतांहि तोच चालवावा. परंतु वास्तविक वेदाचा धर्म कसा हें त्यांतून एकासहि ठाऊक नव्हतें. व्यासाला जवळ ठेवलें तर वेदोक्त धर्माची विशेष माहिती होऊन भट्टांशीं टक्कर घेण्यास नेट येईल, हा त्यांचा उद्देश होता. वेदाप्रमाणें चालण्याचें त्यांस अगत्य वाटत होतें असें नाहीं, कारण वेदहि मनुष्यकृत असे

त्यांचें मत होतें. असो,– त्यांनीं व्यासाला नेऊन आपल्या मंडळींत ठेवलें. प्रथम कांहीं दिवस परस्परांस बरें वाटलें. ब्राह्मणांप्रमाणें मूर्तिपूजा, जातिभेद, मांस खाण्याचा प्रतिबंध वगैरे त्रास नव्हता, ह्मणून व्यासाच्या समागमानें त्या तरूणांस व त्यांच्या समागमानें व्यासास आनंद वाटला. कांहीं दिवस लोटल्यावर जेव्हां व्यासानें सांगितले कीं, वेद ईश्वरदत्त आहेत; इंद्र, वरूण, सूर्य, अग्नि, मरुत, इत्यादि दैवतांची आराधना केली पाहिजे, व त्यांस तोषविण्यासाठीं यज्ञ केले पाहिजेत; व हें मत बरोबर नाहीं असें ते तरूण बोलत तेव्हां त्याला राग येई. त्यावरून ते तरूण म्हणत कीं, हा म्हातारा-हि कांहींसा भट्टांप्रमाणेंच " सुपर्स्टिशयस " आहे, आणि त्याचा त्यांस कंटाळा आला. आणि जरी त्या तरूणांपैकीं कोणी कोणी, एक ईश्वर आहे, व मनुष्यांनीं त्याची भक्ति करावी, नीतीनें चालावें, असें ह्मणतात, तरी त्यांतून थोडे जण त्याप्रमाणें चालतात; वेद मनुष्यकल्पित आहेत, व्यासाच्या सांगण्यावरून दिसतें कीं त्यांत बहुत चुक्या आहेत, त्यांत सृष्टींतील तत्वें व चमत्कार यांस दैवतें मानिलें आहे हें मूर्खपण होय, यज्ञ करण्याची जरूर नाहीं, असें बोलतात, व त्यांतून बहुतेक जण तर ईश्वर नाहीं असें मत धरतात, हें पाहून व्यासास फार वाईट वाटलें; मी नास्तिकांच्या चांडाळ चौकडींत आलों, असें म्हणून तो त्यांसहि सोडून गेला. आणि ते तरूण ह्मणाले, बरी सुपर्स्टिशनाची व्याद गेली.

मग तो रस्त्यानें चालला असतां त्याला कोणी ख्रिस्ती लोक भेटले. त्यास कांहीं तऱ्हेवाईक पुरुष दिसला ह्मणून तो कोण व कोठला हें त्यांनीं त्याला पुसलें. परंतु त्याला त्यांचें बोलणें समजलें नाहीं. मग त्यांनीं त्याला आपल्या मिशनेरी साहेबाकडे व एक एतद्देशीय ख्रिस्ती पंडित होता त्यांकडे नेलें. दोघे विद्वान् होते. त्यांनीं अभ्यास व शोध करून वेदांची माहिती करून घेतली होती व वेदांची भाषाहि त्यांस बरीच बोलतां येत होती. त्यांचें व व्यासाचें संभाषण झालें. त्यांनीं त्याला सांगितलें कीं, ईश्वरी शास्त्राची गरज आहे व ईश्वरानें शास्त्रहि दिल्हें आहे, आणि आह्मी ह्मणतों ख्रिस्ती शास्त्र हें ईश्व-

री शास्त्र आहे. परंतु तुम्ही ह्मणतां, वेद ईश्वरी शास्त्र आहे, आणि आह्मी ह्मणतों ख्रिस्ती शास्त्र हें ईश्वरी शास्त्र आहे. तर यांतून खरें शास्त्र कोणतें याविषयीं विचार करूं. मग ईश्वरी शास्त्राचीं लक्षणें काय असावीं हें ठरविलें, आणि तीं ज्या ग्रंथाच्या ठायीं असतील ते ईश्वरी शास्त्र खरें असें समजावें, यास व्यासहि कबूल झाला. नंतर असें दिसून आलें कीं, हीं लक्षणें ख्रिस्ती शास्त्राच्या ठायीं आहेत, वेदाच्या ठायीं अगदीं नाहींत. तेव्हां व्यासाचा विश्वास डगमगला. नंतर मनुष्यें कशीं पापी आहेत, ईश्वराच्या न्यायावरून त्यांस क्षमा मिळणे कसें अशक्य आहे, ईश्वरानें दयेनें आपल्या एकुलत्या पुत्राला पाठवून कसा तारणोपाय सिद्ध केला, त्यावरून पाप्यांचें तारण कसें होतें, हा ख्रीस्तानें केलेला तारणोपाय सर्वोत्कृष्ट व त्यापुढें माणसांनीं कल्पिलेले सर्व उपाय तुच्छ आहेत, हें दाखविलें. तेव्हां व्यास स्तब्ध बसला. त्याला वेदाचा सर्व खटला निरुपयोगी असा दिसून आला. आणि येशू ख्रीस्ताविषयीं आपल्याला काय वाटतें हें तो सांगणार होता इतक्यांत स्मशानरक्षक दूतांनीं येऊन त्याला धरलें, आणि ह्मटलें, "चाल, तुझी वेळ सरली, हे विचार करण्यास जी परीक्षेची वेळ तुला दिल्ही होती ती त्वां गमावलीस. आतां तुला स्मशानांतून उठविलें तें यासाठींच कीं, तुझ्या वंशांतील लोक त्वां स्थापलेला धर्म सोडून किती बहकले आहेत, व त्या धर्मांत व त्यांच्या हल्लींच्या धर्मांत कसें जमीन अस्मानचें अंतर आहे, हें त्वां पाहावेंस ह्मणून अल्प काळपर्यंत उठविलें. तो काळ भरला, आतां तुला स्मशानाच्या दरवाज्यानें परलोकीं पूर्वस्थळाप्रत परत गेलें पाहिजे." असें बोलून त्या दूतांनीं त्याला ओढून नेलें, आणि काय केलें तें कोणास समजलें नाहीं.

हा मजकूर वाचून कोणी ह्मणतील कीं, एथें लिहिलें तें लिहिणारानें आपल्या मताचें स्थापन करण्यासाठीं उग्याच कल्पना करून लिहिलें आहे. पण असें नाहीं. व्यास उठला एवढी मात्र कल्पना क्षणभर केली आहे. पण तो स्मशानमुक्त होणें हें जसें असंभव्य आहे, तसें ब्राह्मणांशीं, व सुधारलेल्या लोकांशीं, व ख्रिस्ती लोकांशीं

जें त्याचें बोलणें झालें, व त्यांच्या धर्माविषयीं व आचारांविषयीं जें त्याला वाटलें ह्मणून एथें दाखविलें आहे तें असंभव्य नाहीं.

---

## ४६ जलशुद्धि करण्याची विचित्र रीत.

बहुत काळापासून हिंदु लोकांमध्यें मनुष्य किंवा निर्जीव पदार्थहि शुद्ध करण्याच्या फार विचित्र रीति पडल्या आहेत, त्यांतील एक माझ्या पाहाण्यांत आली ती सांगतों.

एका दिवशीं एका साहेबाबरोबर जाऊन नगरापासून उत्तरेकडे सुमारें २० कोशांवर गोंधवणी गांवीं उतरलों. त्या गांवच्या बाहेर एक विहीर आहे तींतल्या पाण्याला कांहींसा वास मारीत होता तरी सर्व लोक तेंच पाणी पीत असत. दुसऱ्या दिवशीं ते सर्व मिळून साहेबाकडे येऊन ह्मणाले कीं, "तुह्मी माहाराकडून आमची विहीर बाटविली हें बरें नव्हे." तेव्हां साहेबानें ह्मटलें, "म्यां महाराला हुकूम दिला नाहीं. ज्या महारानें तिकडे जाऊन तें पाणी भरलें त्याला मजकडे आणा." तेव्हां त्यांनीं पुस्तापास्त केली पण कोणी सापडला नाहीं याकरितां ही उगीच गुल उठली असें समजून पुन्हां त्या विहिरींतलें पाणी भरूं लागले. पुढें आह्मी गेल्यावर असें ऐकण्यांत आलें कीं त्यांनीं एका चांगल्या उपायानें त्या विहिरीचें पाणी शुद्ध केलें. एथें तुह्माला असें वाटेल कीं कदाचित त्या पाण्याला घाण येत होती ह्मणून त्यांतला गाळ इत्यादि घाणेरडे पदार्थ काढून विहिरीची गाळणी केली असेल. पण असें नव्हे बरें, त्यांनीं कांहीं गोमूत्र आणून त्यांत घातलें. तें थोडेसें टाकलें असेल असें वाटेल, तर तसें नव्हे बरें. पण तें पाणी फार पडलें ह्मणून जितकें त्यांच्यानें मिळवितां आलें तितकें घागरभर त्यांत ओतिलें. अहाहा! त्या विहिरींतलें पाणी किती शुद्ध झालें बरें. थू थू थू!! पहिल्यानें जो थोडासा वास मारीत होता त्यांत असलें घाणेरडें मूत टाकण्यानें अधिक घाणेरडें आणि मचूळ झालें नसेल काय? ईश्वरानें मनुष्य व प्राणीमात्र

इत्यादिकांकरितां पाणी उत्पन्न केलें त्याला जरी हजारों महार मांग शिवले असते तरी त्या पाण्याचा रंग किंवा गुण पालटला नसता आणि बाट लागला नसता, जसेंनातसेंच राहतें. पण गोमूत्रादि अमंगळ पदार्थ त्यांत घालण्याने मात्र तें पाणी अमंगळ होतें. त्यापेक्षां जर गांवकऱ्यांनीं दहा पांच महार, ते गांवाचे चाकर आहेत ह्मणून त्यांस लावून त्या पाण्याची गाळणी केली असती तर वरीक तें पाणी शुद्ध झालें असतें.

---

## ४७ कशाविषयीं धैर्य करावें.

कर्जाची फेड, प्रपंच निर्वाहास जरूर जिन्नस, बोलण्याविषयीं नियम इत्यादि प्रकरणीं लोकांची विपरीत वर्तणूक दिसून येती, आणि या प्रकरणीं नियमानें चालावें असा कोणास बोध केला असतां असें उत्तर येतें कीं आपण सांगतां तें खरें, पण काय करावें, लोकप्रवृत्ति जी पडली ती कशी मोडती, ती मोडायास कोणास धैर्य आहे? परंतु मला वाटतें कीं जाति, सोवळें इत्यादि खटलीं पाळण्याविषयीं जें धैर्य व जे श्रम करावे लागतात त्यांच्या अर्धे धैर्य व श्रम असल्यास लोकांस वस्तुतः सुधारणार जे नियम त्याप्रमाणें आचरण घडेल, आणि ज्ञाति इत्यादिकांचे नियम पाळण्याच्या फळापेक्षां इहलोकीं व परलोकीं सुखकारक असें फार मोठें फळ प्राप्त होईल. उत्तम आचरणाच्या नियमाविषयीं मोठे श्रम व अडचणी आहेत असें नाहीं, इतकेंच कीं ते नियम पाळण्याविषयीं अवसान होत नाहीं. मला लोक हांसतील तुच्छ मानितील अशी उगीच शंका येती, परंतु किंचित् धैर्य केलें असतां ते नियम आपल्या हातून घडतात आणि पुढें त्यांचा सराव पडतो. ते नियम कोणते तर त्यांतून कांहींसे पुढें लिहिले आहेत ते पाहिले असतां त्यांत श्रम नाहींत, धैर्य मात्र केलें पाहिजे, असें वाचणाऱ्यांच्या सहज लक्ष्यांत येईल.

१ हातीं पैका आहे तंव कर्जाची फेड करायास धैर्य कर.

२ एखादी वस्तु तुला कितीही आवडत असली, परंतु तुला जर तिची जरूर नाहीं, तर तिजवांचून तूं आपला निर्वाह करून घ्यावयास धैर्य कर.

३ जर जरूर आहे तर तूं आपल्या मनांतील अभिप्राय बोलून दाखवावयास, आणि त्वां उगें राहावें हें बरें असें समजून आपल्या जिभेस आवरायास धैर्य कर.

४ तुझा गरीब मित्र फाटक्या वस्त्रांनीं तुला मार्गांत भेटला आणि तुझ्याजवळ मातबर मनुष्य असला तथापि तूं त्या गरिबासीं बोलायास धैर्य कर, बहुतेकांस वाटतें त्याजपेक्षां अल्पश्रम असें करण्यांत आहे, परंतु हें असें करणें राजासहि उचित आहे.

५ एक दमडी खर्चली असतां ती खर्चांत लिहावयास व दरएक आठवड्यास त्या खर्चाची बेरीज घ्यावयास धैर्य कर.

६ मजकडून चुकी झाली असें कबूल करायास धैर्य कर. असें केल्यानें तुझ्याविषयीं ज्यांच्या मनांत वाईट वागलें असल तें जाऊन चांगलें वागूं लागेल.

७ पहिल्यानें जो निर्धार केला असशील, आणि त्याहून तुला चांगला अढळत नसेल, तर तुझा पहिलाच निर्धार दृढ धरायास आणि तो सोडून द्यावा अशी खात्री झाली तर केवळ शेवटच्याहि वेळीं सोडायास धैर्य कर.

८ माझ्या द्रव्यादिकांची अमुक रीतीनें व्यवस्था व्हावी अशी जी तुझी इच्छा असेल त्याप्रमाणें वास्तविक प्रकारचा लेख करावयास धैर्य धर.

९ अडचण प्राप्त झाली असतां हिय्याकरून पुढें व्हावयास धैर्य कर, नाहीं तर त्या अडचणीपासून जो धक्का बसावयाचा त्याजपेक्षां तुला अधिक धक्का बसेल. अडचणींकडेस नजरेची झळूक जातांच त्या बहुधा चोराप्रमाणें नाहींशा होऊन जातात.

१० मेजवानकीविषयीं मंडळी मिळाली असेल तेथून तुझें निघून येण्यानें तुझी कितीहि मौज नाहींशी होत असली, तथापि उचित काळीं निघून येण्याविषयीं धैर्य कर; तेथें जाण्याविषयीं तुला व्हावा

तितका मोह झाला आणि जर कांहीं किंचत् प्रत्यवाय असला तर तूं जाऊंच नको.

११ मोठे प्राप्तीचे आशेकडेस तुझी दृष्टि जात असली तर तिचें आवरण करायास आणि अल्पप्राप्तींत समाधान पावावयास धैर्य कर.

१२ दुसऱ्यास तूं कोणत्या कारणामुळें पैका कर्जीं देत नाहींस तें कारण त्यास कळवायास धैर्य कर. माझ्यानें कर्जीं ऐवज देववत नाहीं असें सांगण्यापेक्षां न देण्याचें कारण सांगितल्यानें तुझी मान्यता चांगली राहील.

१३ तुझा अत्यंत आवडता स्नेही असला आणि त्याच्या ठायीं नीति नाहीं, अशी तुझी खात्री झाली, तर त्याचा स्नेह तोडून टाकायास धैर्य कर. आपल्या कोण्या मित्राचें चुकून पाऊल पडल्यास सहन करावें, त्याचीं दुराचरणें सहन करूं नये.

१४ नवीन वस्त्रें घेण्याचें तुझ्या आंगीं सामर्थ्य येई तोंपर्यंत तूं तुझीं जुनींच वस्त्रें पांघरायाचें धैर्य कर.

१५ आपली वर्त्तणूक कशी होत आहे याजविषयीं विचार करायास, आपले कांहीं अपराध अढळल्यास त्याचा निषेध करायास, पुढें चांगलें आचरण आपल्या सर्व सामर्थ्यानें करायास आणि पुढील वर्त्तनाविषयीं नियम करून त्याप्रमाणें चालायास धैर्य कर.

१६ लोकांच्या डौलदार रीतीनें न चालतां योग्यरीतीनें चालायास धैर्य कर. कां तर योग्य रीत मोडून डौल फार वाढला आहे.

१७ ज्याचा थोरपणा सर्वोत्कृष्ट असें जें नित्य मानिलेलें बोधवचन तें असें कीं तुला ज्या प्रकरणाचें ज्ञान नाहीं किंवा तुला जी गोष्ट वस्तुतः ठाऊक नाहीं, तर तूं तें मला ठाऊक नाहीं असें तोंडानें कबूल करायास धैर्य कर.

## ४८ हिंदुस्थानामध्यें प्रभुदीन नामक एक ब्राह्मण ख्रिस्ती झाला त्याची गोष्ट.

हिंदुस्थानामध्यें एक ब्राह्मण जो सुमारें २५वर्षांमागें (आतांपासून ७०वर्षांमागें) ख्रिस्ती झाला त्याची गोष्ट लंडन ख्रिस्तीयन अब्जर्वर या वर्त्तमान पत्रामध्यें छापून आली आहे, ती जरी फार लांब आहे तरी फार अगत्याची आहे ह्मणून आह्मी आपल्या वाचणाऱ्यांसाठीं छापितों. या गोष्टीवरून असें समजण्यांत येईल कीं, पूर्वीं हिंदुलोकांनीं ख्रिस्ती धर्म न अंगिकारावा ह्मणून या देशांतील अधिकाऱ्यांनीं फार अडथळे केले; जे आपणास ख्रिस्ती ह्मणवीत होते व ज्यांनीं अडथळा न करितां उलटें जे मूर्त्तिपूजेच्या अंधारानें व्याप्त आहेत त्यांस ख्रिस्ती धर्म अंगीकारण्यासाठीं आश्वासन द्यावें अशांनीं देखील किती अडथळा केला हें समजण्यांत येईल. आणि ख्रिस्ती धर्म इतके दिवस फार कां चालला नाहीं याचें एक कारण या गोष्टीवरून समजेल. ख्रिस्ती लोकांनीं ही गोष्ट वाचून असें मनांत आणावें कीं, हिंदुधर्मांतून ख्रिस्ती धर्मांत येण्यास ज्या अडचणी होत्या त्या आतां बहुतकरून नाहींशा झाल्या, असा विचार करून यांनीं आनंद करावा आणि ईश्वराची स्तुति करावी.

प्रभुदीन हा हिंदुस्थानांत पंचविसाव्या पलटणींतला एक नायक होता तो ब्राह्मण जातीचा होता. आणि त्या पलटणींत बहुतकरून सर्व शिपाई ब्राह्मणच होते. सन १८१९ सांत ती पलटण मिरत एथें आली आणि तेथें छावणी केली. त्या ठिकाणीं फिशर साहेब इंग्लिश चापलेन ह्मणजे सरकारानें नेमलेला गोऱ्यालोकां करितां पाद्री होता त्यानें प्रभुदीन याला ख्रिस्ती धर्माविषयीं उपदेश करून शेवटीं ते ख्रिस्ती मंडळींत मिळण्याजोगा आहे असें समजून त्याला बाप्तिस्मा दिला. त्याचें ख्रिस्ती होण्याचें वर्णन फिशर साहेबानें इंग्लिश भाषेंत लिहिलें तें आह्मीं मराठी भाषेंत उतरतों.

तो असें ह्मणतो कीं, " मी मिरत एथें येऊन राहिल्यापा-

सून एतद्देशीय लोक ख्रिस्ती धर्माविषयीं बहुत विचार करित आहेत असें वेळोवेळ माझ्या लक्षांत आलें. मला माझें नेमलेलें काम बहुत होतें, तरी बहुत हिंदु व मुसलमान लोक मजजवळ ख्रिस्ती शास्त्राचीं पुस्तकें मागण्यासाठीं व त्यांतील अर्थहि समजून घेण्यासाठीं आपेआप आले. असें असतां त्यांची आमच्या घरीं येण्या जाण्याची वहिवाट फार पडली आणि त्यांतील कित्येकांनीं ख्रिस्ती होऊन बाप्तिस्मा घेतला आणि आतां चांगले वर्त्तत आहेत. त्यांतील एक जो फार नीतिमान आणि उपदेश करण्याजोगा मनुष्य आहे त्याला ह्या ख्रिस्ती झालेल्या मंडळीवर म्यां ठेविलें आहे आणि तो नेहमी त्यांस उपदेश आणि त्यांची देखरेख करीत असतो. त्याचें नांव आनंदमशीहा, आणि कधीं कधीं तो नसतां माझा मुनशी हा त्याच्या ठिकाणीं उपदेश करीत असतो. हे ख्रिस्ती झालेले लोक रोज एका खोलींत जमून ख्रिस्ती शास्त्र वाचीत असतात. आणि तेथें जो दुसरा कोणी येतो तोहि त्यांत मिळून ऐकत बसतो. बाहेरील मनुष्य तरणे आणि म्हातारे मिळून कधीं पांच सात कधीं दाहा बारा असे मिळत असतात. कांहीं दिवसांमागें जे लोक ऐकावयास येत असत त्यांत हा शिपाई प्रभुदीन येत असे, आणि शेवटीं त्यानें अशी विनंती केली कीं माझी आणि साहेबाची भेट करा. पुढें तो माझ्या घरीं येत असे आणि त्याच्या मताचा आणि बुद्धीचाही मोठा पालट झाला अशी त्याच्या बोलण्यावरून माझी खातरी झाली. तो असें म्हणाला कीं, सुमारें आतां नऊ वर्षें झालीं तेव्हां मूर्त्तिपूजा करणें हें मोठें मूर्खपण आणि पाप आहे असा माझ्या मनांत विचार ठसला. त्यानें हा विचार दुसऱ्या कोणास सांगितला नाहीं, परंतु आपल्या मनांत ठेवून तो प्रसिद्ध करण्याची संधि पाहत होता, तरी विचार अणखी वाढत वाढत चालला. शेवटीं तो आपल्या पलटणीबरोबर मोरिशस बेटाला गेला. तेथें असतां संधि पाहून ख्रिस्ती देवळांत तो चोरून जात असे आणि तेथला उपदेश आणि प्रार्थना अगदीं समजली नाहींत, कारण कीं त्याला ती भाषा येत नव्हती, तरी ख्रिस्ती लोकां-

ऱ्या देवाचें भजन मी मनानें करितों आणि तो माझें अंतःकरण जाणतो असा विचार करून तो समाधान पावला. त्याची फार इच्छा होती कीं आपणाला तारणाचा उपाय सांगणारा कोणी तरी मनुष्य भेटावा, तरी ख्रिस्ती धर्म अंगिकारल्यामुळें माझी इहलोकीं आणि परलोकीं काय दशा होईल असें त्याच्या मनांत वेळोवेळ भय वाटलें. शेवटीं त्यानें असा निश्चय केला कीं, संधि सांपडली असतां कोणी तरी ख्रिस्ती उपदेशकाला मी आपल्या मनाची गोष्ट सांगेन, पुढें जें होईल तें होवो. कांहीं दिवसांनंतर ती पलटन मोरिशस बेटाहून माघारी फिरून कलकत्ता शहरास पोंचली, तेव्हां त्या पलटणींतील ज्या शिपायांनीं आपलें काम चांगलें बजावलें होतें त्यांस आपल्या घरीं जाण्यासाठीं रजा मिळाली. त्यावेळेस प्रभुदीन हाहि रजा घेऊन आपल्या गांवीं गेला आणि तेथें आपल्या लोकांत कांहीं दिवस राहून आपल्याला पदक मिळालें तें दाखविलें असें केवळ नाहीं, परंतु ख्रिस्ती धर्म अंगीकारण्याचा निश्चय जो त्याच्या मनांत झाला होता तोहि त्यानें त्यांस दाखविला. पहिल्यानें त्याच्या लोकांनीं त्याचें मन वळवावयास बहुत प्रयत्न केले. परंतु शेवटी त्याचा निश्चय आहे असें पाहून त्यांनीं प्रयत्न करणें सोडिलें, आणि बहुत रडून त्यांनीं त्याला जाऊं दिलें. तो जातेवेळेस त्याची आई बोलली, "आतां तूं आपला धर्म सोडिलास, आपली जातही सोडलीस; आणि खरा देव मिळाला असें ह्मणतोस; पुढें फिरून कधीं बदलूं नको." प्रभुदीन जेव्हां माघारा येऊन आपल्या पलटणींत मिळाला तेव्हां ती पलटण कानपूर एथें छावणींत होती, परंतु पुढें लवकरच कानपूर सोडून मिरत एथें आली. एथें पोंचल्यावर तो मोठ्या आग्रहानें लवकर पुसूं लागला कीं, "एथें कोण ख्रिस्ती उपदेशक आहे आणि तो आमच्या लोकांस उपदेश करित असतो कीं काय?" तेव्हां त्याला कोणी सांगितलें कीं "एथें उपदेशक आहे आणि ख्रिस्ती लोक रोजरोज एका खोलींत जमून शास्त्र वाचीत असतात." हें ऐकल्यावर तो त्यांची भेट घेण्यासाठीं लवकर तेथें गेला. तो असें ह्मणतो कीं, "ते काय उद्योग करीत आहेत हें जेव्हां म्यां पाहिलें आणि त्यांचे शब्द

ऐकिले, तेव्हां म्यां मनांत ह्मटलें कीं, माझ्या प्रार्थना येशू ख्रिस्तानें
ऐकिल्या आहेत खरें,देवाच्या दयेनेंच इकडे मला आणिलें आहे." तो
मजकडे फार येऊं लागला हें त्याच्या पलटणींतील ब्राह्मण लोकांनीं
पाहिलें, आणि तो ख्रिस्ती होणार आहे हें समजून त्यांनीं त्याला आ-
पल्या मनांतील दुःख दाखविलें आणि किती तुझें मूर्खपण असें त्याला
बोलून त्यानें ख्रिस्ती धर्म अंगीकारण्याचा निश्चय सोडावा असें त्याचें मन व
ळविण्यासाठीं त्यांनीं फार प्रयत्न केले. "ख्रिस्ती धर्म अंगीकारल्या-
नें किती तुला दुःख होईल, तुझें मोठें ब्राह्मण्य हें नाहींसें होईल, तुझे
सर्व भाऊ बंद व इष्टमित्र तुला अगदीं टाकतील, तूं ख्रिस्ती झाल्यामुळें
तुजवर सरकारही खचीत रागें भरेल, आणि तुझी अन्न घेईल आणि
तुला बरतर्फ करील,असें झाल्यानें सर्वस्वाला मुकसील आणि असें केवळ
नाहीं, परंतु तूं आपल्या प्राणासही मुकसील, कारण कीं, तुला खा-
वयास व प्यायास अन्नपाणी कोणी देणार नाहींत, " असें त्यांनीं
ह्मटलें. त्यानें त्या सर्वांला एकच उत्तर दिलें कीं, " येशू ख्रीस्त हा-
च माझा पाठवीं आहे जे कोणी त्याजवर विश्वास ठेवतीत त्या स-
र्वांचा तो पाठिंबा आहे. जात जर ह्मणाल तर ख्रिस्ती लोकांच्या
जाती इतकी दुसरी कोणतीहि जात उंच नाहीं, कारण कीं ख्रिस्ती लोक
हे ईश्वराचे लोक आहेत आणि तो त्यांचा बाप आहे. मी ख्रिस्ती
झाल्यानें शिपायाच्या कामाविषयीं कांहीं कमी होणार नाहीं, आणि
सरकार मला बरतर्फ करील असें वाटत नाहीं, कारण कीं पलटणीं-
त आतांहि कितीएक हुद्देदार ख्रिस्ती आहेत आणि म्यां कांहीं अप-
राध केल्यावांचून सरकार कशी मला शिक्षा करील ? " तेव्हां त्या
ब्राह्मण लोकांनीं त्याला कांहीं पैका देऊं करून आणि " आह्मी-
आपल्यांत पट्टी करून तुझ्या आयुष्यभर दरमहा २० रुपये तुला
देत जाऊं, " असें सांगून त्याचा निश्चय ढळवावयास बहुत प्रयत्न
केले. त्यानें हें लागलेंच नाकारून ह्मटलें कीं, " तुमच्यापेक्षां येशू
ख्रीस्त माझ्या सर्व गरजा पुरवील, आणि त्यांतहि हाच लाभ आहे
कीं, तो आयुष्यभर असें केवळ नाहीं परंतु अनंतकाळ पुरवील. "
तो कांहीं वळत नाहीं असें पाहून ते त्याची निंदा करूं लागले आणि तो

दारूबाज व खादाड आहे असेंहि बोलूं लागले, शेवटीं तो वेडा आहे असें बोलले. ह्या गोष्टी त्या पलटणींतील सरदारांस कळल्यावर त्यांनीं त्याची चौकसी केली आणि त्यावेळेस सर्व साक्षींवरून असें स्पष्ट प्रमाण पटलें कीं, हा सर्वांपेक्षां फार चांगला चालतो आणि सर्वांपेक्षां हुशार व आपलें काम बरोबर बजावणारा शिपाई आहे. पुढें त्यानें मागितल्यावर म्यां त्याचा बाप्तिस्मा केला, तेंव्हांपासून दुसऱ्या शिपायांनीं त्याला कांहीं त्रास दिल्हा नाहीं. त्यानीं एवढाच बंदोबस्त केला कीं हा नायक आपला स्वयंपाक वेगळा करितो आणि दुसऱ्या ब्राह्मण लोकांच्या चुलीजवळ ते त्याला येऊं देत नाहींत. दुसऱ्या गोष्टीविषयीं तर तो पहिल्यासारिखा चांगला शिपाई आणि चांगला मनुष्य आहे. त्याला एकच डाग लागला आहे कीं, तो आपलें ख्रिस्ती शास्त्र वाचीत असतो आणि एक जो देव त्याची येशू ख्रीस्त जो एकच तारणारा त्याच्यनांवानें प्रार्थना करीत असतो.''

प्रभुदीनाचा बाप्तिस्मा झाल्यावर त्या पलटणीच्या मुख्य सरदारानें कमांदर इन चीफ याला त्याविषयीं एक पत्र लिहिलें. त्यांत त्यानें असें ह्मटलें कीं, ''माझ्या हाताखालच्या पलटणींत एक अपूर्व गोष्ट झाली आहे, ती अशी कीं या पलटणींतील एक नायक प्रभुदीन यानें आपला हिंदुधर्म सोडून ख्रिस्ती धर्म अंगीकारला आहे. एथील चापलेन फिशर साहेब यानें मला न कळवितां व माझा हुकूम न घेतां त्याला बाप्तिस्मा दिल्हा. या पलटणींतील सर्व शिपाई ब्राह्मण लोक आहेत आणि त्या सर्वांला या गोष्टीवरून मोठी दहशत पडली आहे, आणि त्या गोष्टीवरून या पलटणीचें मोठें अनहित होईल असें मला भय वाटतें, कारण कीं या पलटणींतील कोणी ख्रिस्ती होतात असें ऐकून दुसरे कोणी या पलटणींत कधीं येणार नाहींत, इतके दुरभिमानी हिंदु लोक आहेत. हा नायक प्रभुदीन जोंपर्यंत याचा बाप्तिस्मा झाला नव्हता तोंपर्यंत मोठा ब्राह्मण असून फार अब्रूचा मनुष्य होता.'' हें पत्र कमांडर इन चीफ यानें गवर्नर जनरल याला पाठविलें आणि त्यानें त्याविषयीं उत्तर देऊन असें

ह्मटलें कीं, नामदार गव्हर्नर असें ह्मणतो, जी गोष्ट तुह्मी लिहिली ती मोठ्या हांशिलाची आहे आणि प्रभुदीन याला ख्रिस्तीकरण्यासाठीं कोणते उपाय केले हें समजण्याची तो फार इच्छा धरितो. याच्या चौकशीवर मिरत एथें एक कमिटी नेमावी आणि प्रभुदीन यानें कोणत्या कारणावरून ख्रिस्ती धर्म अंगीकारिला याचा तपास करून रपोट करावा, ह्मणून गव्हर्नर साहेब हुकूम करितो. अणखी त्या कमिटीनें तपास करावा कीं, त्या पलटणींतील हिंदुलोकांस ख्रिस्ती धर्मांत आणण्यासाठीं कोणी साहेब तेथें कोणी माणूस पाठवीत असतो कीं काय? असा गव्हर्नर साहेब याचा हुकूम आहे. अणखी प्रभुदीन याला पलटणींतून काढून त्याच्या जागेवर दुसरा नायक नेमावा आणि जोंपर्यंत या अपूर्व गोष्टीविषयीं सरकारचा दुसरा हुकूम येई तोंपर्यंत त्यानें मिरत एथें राहून आपला पगार घ्यावा असा गव्हर्नर साहेबाचा हुकूम झाला."

त्या हुकुमाप्रमाणें मिरत एथें एक कमिटी मिळाली आणि प्रभुदीन याला तिच्या समोर आणिल्यावर त्यांनीं त्याला पुसलें कीं, "तूं कोण त्या हेतूनें ख्रिस्ती धर्म अंगीकारलास?" त्यानें असें उत्तर दिल्हें कीं, "म्यां ख्रिस्ती लोकांची वर्त्तणूक वेळोवेळ पाहिली. ते आपल्या सर्व वर्त्तणूकींत किती चांगले चालतात आणि खरेपणावर त्यांची केवढी प्रीति आहे, असें पाहून मी त्यांच्या धर्माविषयीं विचार करूं लागलों, आणि तो खरा आहे असें खातरेस पटल्यावर मी तो अंगीकारिला."

**प्रश्न.** तूं पहिल्यानें ख्रिस्ती धर्माविषयीं विचार करूं लागलास त्याला किती दिवस झाले?

**उत्तर.** सुमारें नऊ वर्षें झालीं. मी मोरिशस बेटाला पलटणी बरोबर गेलों तेव्हांपासून मी विचार करूं लागलों. तेथें शाब्बाथ दिवस कसा पाळीत असतात आणि गोरे लोक कसे देवळांत जातात, याजकडे माझें लक्ष लागलें. तेव्हांपासून या गोष्टीचा चांगला विचार करावा असा म्यां निश्चय केला, परंतु कलकत्ता शहरांत किंवा कानपुरास जेव्हां पलटण होती तेव्हां मला फुरसत मिळाली नाहीं, कारण

कीं मजवर कामाचें मोठें ओझें होतें. परंतु मी मिरत एथें आल्यावर मला चांगली संधि मिळाली आहे.

प्र. जेव्हां तूं मिरत एथें पहिल्यानें विचार करूं लागलास तेव्हां तूं आपले आपण विचार करूं लागलास किंवा कोणी छावणींत येऊन तुला सांगितलें ?

उ. मी आपले आपणच विचार करूं लागलों आणि आनंद मशीहा आणि फिशर साहेबाचा मुनशी, हे सदरबाजारांत राहत असतात, त्यांजकडे जाऊन पुसलें.

प्र. तूं आपण होऊन फिशर साहेबाकडे गेलास किंवा त्यानें तुला बोलाविलें ?

उ. मी आपणच फिशर साहेबाकडे गेलों. ज्या कोणापासून कांहीं आपणाला समजेल असें मला वाटलें त्याजकडे मी जात असें.

प्र. शिपाई लोकांला ख्रिस्ती धर्म शिकवावयास छावणींत कधीं कोणी आला हें तूं कधीं ऐकिलेंस कीं काय?

उ. असें मी कधीं ऐकिलें नाहीं.

प्र. तुझा बाप्तिस्मा झाल्यावर तुझ्या पलटणींतील लोक तुजसीं कसे वागले ?

उ. ते त्याविषयीं मला कांहीं बोलले नाहींत. केवळ एक शिपाई जो माझा पहिल्यापासून शत्रु आहे तो वेळोवेळ माझी निंदा करून बोलला कीं, हा चांडाळ झाला आहे.

प्र. तूं ख्रिस्ती धर्म न अंगीकारावा ह्मणून कोणी शिपायानें तुला कांहीं रुपये देऊं केले कीं काय ?

उ. होय, दोन शिपाई बोलले, तुला पैक्याची गरज आहे असें आह्मास वाटतें, आणि असें असून जर तूं ख्रिस्ती धर्म अंगीकारणार नाहींस तर आह्मीं तुला देऊं. मी त्यांला उत्तर दिल्हें, माझा निश्चय झाला तो ढळणार नाहीं, आणि मी ईश्वर जो खरा एकच देव त्याला शोधावयास इच्छितों त्याच्या समोर पैका हा कांहीं नाहीं.

प्र. त्यांनीं किती रुपये देऊं केले ?

उ. आयुष्यभर दरमहा वीस रुपये.

प्र. हें तूं कां स्वीकारलें नाहींस?

उ. रुपये माती आहेत, मला तारणाची इच्छा होती तें रु-पयांनीं होत नाहीं.

प्र. ( तेव्हां त्या कमिटीनें मेजर साहेबाला प्रश्न केला कीं, ) शिपायांला ख्रिस्ती धर्म शिकविण्यासाठीं कोणी मनुष्य कधीं छावणींत आला असें तुह्मी कधीं ऐकिलें कीं काय?

उ. नाहीं. जर कोणी आला असता तर मला कळलें असतें.

प्र. तर तुह्मी कमांदर इन चीफ साहेब यांला पत्र लिहिलें त्यांत ह्मटलें कीं, आमच्या शिपायांला दहशत पडली, ती कशावरून तुह्मास वाटली तें आह्मास आतां कळवा.

उ. तो ख्रिस्ती झाला हें शिपायांच्या मनास आलें नाहीं. तो असा नसावा असी सर्वांची इच्छा होती. कारण कीं तो मोठ्या जातीचा आणि अब्रूदार मनुष्य होता. तो ख्रिस्ती झाल्यापासून त्याची वर्त्तणूक कांहीं प्रकारें वाईट झाली असें माझ्या लक्षांत आलें नाहीं.

पुढें झालेलें वर्त्तमान फिशर साहेब लिहितो. तो असें ह्मणतो कीं, " ही चौकशी झाल्यावर प्रभुदीन याला त्याची पहिली जागा मिळेल ह्मणून मला वाटत होतें. परंतु तसें कांहीं न करितां त्याला मिरत एथेंच राहण्याचा हुकूम केला, आणि त्याचा पगार तेथेंच त्याला पोहंचविला. त्याप्रमाणें तो एथें राहून चांगली वर्त्तणूक करून आपण खरा ख्रिस्ती असें सर्व बोलण्यांत चालण्यांत दाखवितो. पुढें एक नवा कमांडर चीफ झाला आणि तो मिरत एथें देखरेख करण्यासाठीं आला तेव्हां ही गोष्ट म्यां त्याला विस्तारानें सांगितली. त्याला या गोष्टीविषयीं मोठें अगत्य वाटलें आणि त्यानें असा हुकूम केला कीं प्रभुदीन याला गांवखात्याच्या पलटणींत पहिल्यापेक्षां मोठ्या हुद्याच्या जागेवर ठेवावा. प्रभुदीन यानें त्याच्या मेहरबानीमुळें त्याचे मोठे उपकार मानिले.

परंतु त्यानें त्याला ह्मटलें कीं, माझ्यानें हें स्वीकारवत नाहीं, कारण कीं, मी आपल्या पलटणींतून बरतर्फ व्हावें असा मी कांहीं अपराध

केला नव्हता, असें असतां मला तेथून बरतर्फ करून माझी अब्रू घेतली. तर आंता मला माझ्या पलटणींत पुन्हा सरकार मेहरबानी करून पाठवील तर मी खुशीनें तिकडे जाईन आणि मोठे उपकार मानीन. परंतु ही त्याची अर्जी कमांडर इनचीफ यांच्यानें कबूल करवेना, ह्मणून तो तसाच त्यांनीं नेमलेल्या जागेवर मिरत एथें राहिला.

कांहीं वर्षांनंतर प्रभुदीन ह्याची पहिली पलटण ही वाटेनें चालत असतां मिरत एथें आली, तेव्हां त्या पलटणीतील शिपाई आणि हुद्देदार त्याला भेटावयास आले आणि फार प्रीतीनें त्याची भेट घेतली. त्यांतील कित्येक त्याला बोलले, " तूं आह्मांकडे कां येत नाहींस? आह्मीं तुझें काय वाईट केलें? आमच्या पलटणींतलि सरदार जे साहेब लोक ते ख्रिस्ती आहेत आणि त्यांपेक्षां जे लहान हुद्देदार तेहि ख्रिस्ती आहेत. तर तूं पलटणींत कां न राहवें?" त्यानें काय उत्तर द्यावें? " कंपनी सरकारची मर्जी." एवढेंच त्याच्यानें बोलवलें. प्रभुदीनाचें काय झालें हें पाहून बहुत शिपायांस असें वाटलें कीं जर आह्मीं ख्रिस्ती झालों तर सरकार आह्माला पलटणींतून बरतर्फ करील आणि आमची अब्रू घेईल. कित्येकांनीं ह्मटलें कीं, "आह्मांला ख्रिस्ती धर्म अंगीकारण्याची फार इच्छा आहे परंतु इतकें दुःख आमच्यानें सोसवत नाहीं."

वरच्या गोष्टीवरून समजावें कीं, मागल्यावेळेस या देशाच्या अधिकाऱ्यांनीं ख्रिस्ती धर्म चालण्याला किती अडथळे केले. थोडक्या वर्षांपासून मोठा फेरफार पडला आहे, आतां सरकार जसें दुसऱ्यांचे तसें ख्रिस्ती लोकांचेंहि रक्षण करूं लागलें आहे. आणि कोणी ख्रिस्ती झाल्यामुळें त्याचें कांहीं अनहित होऊं देत नाहीं, ही मोठ्या सुखाची गोष्ट. तरी ख्रिस्ती झाल्यामुळें आंतल्या आंत त्याजवर सरकारी कामदार व सरदार यांजकडून कधींकधीं फार जुलूम होत असतो. जो ख्रिस्ती झाला तो चांगला मनुष्य नाहीं आणि आपल्या धर्मांत राहिला असता तर बरें असतें, असें बहुत साहेब लोक अझून मनांत धरीत असतात; या धर्माविषयीं जर कोणी कांहीं काळजी धरिली नसती तर बरें झालें असतें, असें त्यांला वाटतें. सरकारानेंहि मागल्यासारखे

हिंदुलोकांस आणि मुसलमान लोकांस ख्रिस्ती धर्म अंगीकारण्याविषयीं अडथळा लावीत जावा असी बहुतकरून सर्व नेटीव लोकांची इच्छा आहे, हें बहुत प्रमाणांवरून दिसून येतें. सर्वांचें सारिखेंच रक्षण करावें असा नवा कायदा करण्याचा सरकारचा इरादा आहे हें कांहीं दिवसांमागें जाहीर केल्यावरून हिंदुलोकांनीं सरकाराला असा कायदा न करावा ह्मणून किती अर्ज्या केल्या हें सर्वांच्या लक्षांत आहे. परंतु आतांपासून सरकार ख्रिस्तीलोकांवर जुलूम करणार नाहीं आणि दुसऱ्यालाहि करूं देणार नाहीं, ही केवळ आनंदाची गोष्ट आहे.

वरच्या गोष्टीवरून असें समजतें कीं खरे ख्रिस्ती आपल्या धर्मांसाठीं किती सोडण्यास तयार आहेत. अब्रू जावो, सर्व जावो, परंतु ख्रिस्त हा माझा तारणारा असावा असी त्यांची मोठी काळजी आहे. ख्रिस्ती लोकांनीं ही गोष्ट वाचून आपल्या मनांत असें आणावें कीं, जसा मला ख्रिस्ती धर्म अंगीकारण्यामुळे जगीक हानि झाली आहे तसी बहूत दुसऱ्यांसहि झाली, तरी त्यांनीं धैर्य धरिलें आणि येशू ख्रीस्त हा सर्व जगापेक्षां मोलवान् आहे असा विश्वास धरिला आहे. असा विश्वास आह्मींहि धरून सर्व संकटें आणि जुलूम सोसून घ्यावा, आणि जगांतील द्रव्य केवळ माती आहे, परंतु जर येशू ख्रीस्ताचा आश्रय केला तर तो सर्व आमच्या गरजा पुरवील असा भरवसा धरून नेहमी आनंद करावा.

---

## ४९ हिंदु लोकांचे नवे देव कसे उत्पन्न होतात.

मी हिंदु लोकांच्या अज्ञानाविषयीं एक गोष्ट सांगतों ती येणेंप्रमाणें. नागाच्या पाड्याजवळ महालक्ष्मीच्या मार्गावर एक तळें आहे, त्याजवळ वडाच्या झाडाखालीं ह्मसोबाचें एक लहानसें देऊळ आहे. तेथें एक माळी जुन्नर एथील राहणारा जो वयानें सुमारें ३२ वर्षांचा आहे, त्यानें त्या देवापुढें येऊन भुईबगाड चैत्र पौर्णिमेच्या पूर्वीं दोन तीन दिवस लावून घेतलें. तें प्रत्यक्ष म्यां पाहिलें. प्रथम त्यानें अ-

सें केलें, आंघोळ करून तो ह्मसोबाच्या पायां पडला व त्यास चांग- ला नैवेद्य केला, मग त्यानें त्याच्या पुजाऱ्याच्या घरांतील सर्व माण- सांस चांगलें जेवण घातलें आणि त्या देवळापुढें एक चित्रविचित्ररंगीत खांब रोंवला आहे, त्यावर लांकडी रंगीत दोन घोडे लाविलेले आहेत व त्यास एक सुमारें पांच हात काठी आडवी बांधलेली आहे त्या काठीच्या बाजूस, एका पाठीस गळ टोंचून घेतलें. आणि दुसऱ्या बाजूला दोरीनें धरून दुसऱ्या लोकांनीं ते गरगर फिरवून सात प्रदक्षिणा करविल्या; त्यास भुईबगाड असें ह्मणतात. हें पाहाण्यासाठीं बरेच लोक आले होते हें म्यां पाहिलें. आणि दुसऱ्या दिवशीं त्या दे- वळांत जाऊन त्या देवाचें दर्शन घेऊन देवाच्या पुजाऱ्याची नातसून वसली होती तिला विचारिलें, "माझी इच्छा अशी आहे कीं, या ठिकाणीं नवस करावा." तेव्हां ती बोलली, "बरें आहे, माझ्या येसाऊ सासू- च्या अंगांत ह्मसोबाचें वारें येत असतें तर याविषयीं ती तुह्मांस नीट सांगेल." मग मी येसाऊला विचारिलें, तेव्हां तिनें मला असें सांगितलें कीं, "हा ह्मसोबा देव व त्याच्या डाव्या हाताकडे त्याची स्त्री ल- क्ष्मी आहे." म्या विचारिलें, हा कोणाचा अवतार ?" ती बोल- ली, "हा माझा नवरा," म्या विचारिलें, "हें कसें?" येसाऊ–" हा इंग्रजी चाकरींत शिपाई होता तो पलटणीबरोबर दिव एथें गेला होता तो तेथें मरण पावला. कांहीं दिवसानीं हें मला समजलें. तेव्हां पुन्हा मुहूर्ताचा नवरा करावा असा बेत केला परंतु तो अंगांत येऊन बोलला, दुसरा नवरा करूं नको तुझें पोट भरे असें करीन. असें बोलून मला मुंबईंतून दिव मुकामीं एका घटकेंत नेलें. माझ्या अंगांतील वारें गेलें आणि शुद्धीवर आलें तों मुंबईंत नाहीं. मात्कयान अंगांत आलें, आणि त्याबरोबर मुंबईंत एकाएकीं पोहंचलें. असा चमत्कार पाहून मग ह्मसोबा असें त्याचें नांव ठेवून आणि त्याची व माझी मूर्ति करून उभयतांचें देऊळ केलें. त्या दिवसापासून हा ह्मसोबा हजारों लोकांस पावला. मला सर्व लोक देवबाई अशी हाक मारितात. आजपर्यंत सर्व घांटीलोक एथें नवस करीत परंतु आतां विशेष नाहीं कारण लोक नास्तिक झाले. अहो पूर्वीं या देवावर

आमच्या दहा माणसांचा प्रपंच होत असे. परंतु आतां मोलमजूरी करीतों व तुह्मासारिख्या भक्तिमानानें कांहीं या देवापुढें दिल्हें तर त्यावर निर्वाह करितों." इतकें या ह्मातारीचें भाषण ऐकून मला आश्चर्य वाटलें आणि मनांत आलें कीं, " अरे देवा, केवढी या हिंदुलोकांत लबाडी चालत आहे. प्रत्यक्ष जो मनुष्य त्याला पोटासाठीं देव असें नांव देतात. ही येसाऊ ह्मातारी पोटासाठीं बरेंच ढोंग करिती. पण हे लोक कसे विश्वास ठेवितात याचें मला मोठें आश्चर्य वाटतें. तिला म्यां विचारिलें, " या माळ्यास गळ टोंचून घेण्याजोगा प्रत्यय काय दिल्हा ? " येसाऊ—" हा माळी जुन्नर तालुक्यांतील राहणारा. याची प्रकृत विघडली व चाकरी नव्हती तेव्हां तो बोलला, ह्मसोबा, मला बरें कर आणि चाकरी दे, ह्मणजे मी तुजपुढें भुईबगाड घेईन, त्याप्रमाणें तो बरा होऊन चाकरीहि मिळाली. यास्तव त्यानें तो नवस फेडला. " हें तिचें भाषण ऐकून मला वाटलें ही गोष्ट केवढी गैरसमजुतीची आहे. अहो ज्यांची नवस करण्याची रीत नाहीं ते बरे होत नाहींत काय ? व ते रोजगाराशिवाय आहेत काय ? नाहीं नाहीं, ते अधिक रोजगारी आहेत. ह्यावरून ही सर्व पोट भरावयाची कल्पना आहे असें स्पष्ट दिसतें. या येसाऊस म्यां हे पुढील प्रश्न केले त्यांचीं तिनें उत्तरें दिल्हीं तीं येणेंप्रमाणें.—प्र. हा ह्मसोबा कोणाचा अवतार ? उ. माझा नवरा अवतारी होता, तो ह्मसोबासारिखा नवसास पावणारा म्हणून तेंच नांव देऊन स्थापना केली. प्र. हें देऊळ कधीं बांधिलें? उ. सुमारें चाळीस वर्षें झालीं. प्र. कोणी बांधिलें ? उ. म्यां बांधिलें. प्र. यास सरकारी नेमणूक आहे काय ? उ. कांहीं नाहीं. परंतु भुईभाडें सुटलें आहे. प्र. लोक दर्शनास फार येतात काय ? उ. पूर्वीं बरेच येत परंतु आतां फार कमी. प्र. यास कोणते लोक भजतात? उ. घाटी लोक. [ ही गोष्ट सन १८४९ सांलांतील आहे, व ती कोणी हिंदुनें लिहिलेली आहे असें दिसतें. अशाप्रकारचें अज्ञान व मूर्खपण ह्या देशांतून अद्याप नाहींसे झालें आहे असें नाहीं. सरकारच्या हुकमाच्या भयानें गाडबगाड आतां होत नाहीं, परंतु नव्या देवांची उत्पत्ति बंद झाली नाहीं. ]

# ५० सौम्यता.

सौम्य वर्त्तणूकीनें बहुतेक प्रसंगीं बहुतकरून आपल्यास मान मिळण्याचा, आणि आपले अर्थ प्राप्त करून घेण्याचा संभव असतो, तसा कठोर अथवा गर्विष्ट अथवा धमकावणीचे चालीनें होत नाहीं. याचें कारण असें आहे कीं आपल्याच सारिखीं जीं इतर मनुष्यें त्यांसीं बलात्कार करून आपण कांहीं करून घ्यायास पाहूं लागलों ह्मणजे त्यांच्या ठायीं प्रतिकार वृत्तीची उठावणी अवश्य करितो. त्यांस संकटकारक वाटायासारिखें असें करायास सांगितलें असतां आवडत नाहीं. असे आज्ञेमुळें त्यांमध्यें अभिमानाचा उदय होतो, आणि मानण्यापेक्षां नकार करायास ते विशेष प्रवृत्त होतात. जर आज्ञा मानणें प्राप्तच झालें तर ते जुलुमानें मानितात आणि जें करायाचें तें जितकें वाईट करवेल तितकें वाईट करितात, अथवा जो हुकूम करितो त्याजवर आपला सूड उगवायाकरितां त्यास नापसंत वाटे असे तऱ्हेनें करितात. जर असें न करितां आपण सौम्य उपाय करून पाहूं लागलों तर आपल्याकडून दुसऱ्या मनुष्याच्या अभिमानास दुखापत होत नाहीं अथवा त्याच्या ठायीं कांहीं इतर प्रतिकार वृत्तीची उठावणी होत नाहीं; मग आपल्यास जें व्हावें तें तो चांगलें आवडीनें करितो, ह्मणून तें पसंत रीतीनें होतें. याविषयीं एक कल्पित गोष्ट सांगतों.

### वायु, सूर्य आणि वाटसरू. कल्पित गोष्ट.

एका समयीं उत्तर वायु आणि सूर्य यांजमध्यें आप आपल्या पराक्रमच्या थोरपणाविषयीं वाद उत्पन्न झाला, तेव्हां वाटसरूवरून घोंगडी लवकर कोणाच्यानें काढवेल याविषयीं आपळें बळ त्या वाटसरूवर अजमासून पहावें असें त्यांत ठरलें.

उत्तर वायूनें आरंभ केला, व तीक्ष्ण व पिटून लावणारी असी वृष्टि समागमें घेऊन अतिथंड अस्या झपाऱ्यानें वाहूं लागला. परंतु हें व दुसरें जें कांहीं याच्यानें व्हावयाचें तें यानें केलें असतां त्या

मनुष्यानें आपली घोंगडी टाकून द्यावी तर तसें न करितां जितकी घट्ट आपल्या अंगासीं लपेटवेल तितकी लपेटावी असें त्यास प्राप्त झालें. नंतर सूर्य आला. त्यानें जीं दाट पाण्याचीं ढगें होतीं त्यांस फोडलें आणि बाहेर पडून आकाशांतील शीत तुषारांस एकीकडेस घालवून पावसानें झोपडलेला असा तो बापुडा वाटसरू त्याच्या डोकीवर आपले उष्ण किरण फेंकले. मग त्या मनुष्यानें उष्णतेनें म्लान होऊन आणि तीं सोसायास असमर्थ असा होऊन, प्रथम आपली भारी घोंगडी काढून टाकली, नंतर तो जवळचे राईंत छायेच्या •आश्रयास पळून जाता झाला. [ नीति ग्रंथ ]

---

[ जे नम्र ते धन्य; कारण ते पृथ्वीचें वतन भोगतील. – मात्थी ५.५.

तुह्मी आपल्यावर माझें जूं घ्या, व मजपासून शिका, कां कीं मी अंतःकरण्याचा नम्र व लीन आहें; ह्मणजे तुह्मी आपल्या जिवांस विसावा पावाल.–मात्थी. ११. २९.

आत्म्याचें फळ हें आहे. प्रीति, आनंद , शांति, सहनशीलता, उपकारीपण, चांगलेपण, विश्वास. –गल. ५. २२.

प्रभूच्या दासानें भांडूं नये तर त्यानें सर्वांशीं सौम्य, उपदेश करण्यास तयार, सहनशील, अडविणाऱ्यांस नम्रतेनें उपदेश करणारा असे असावें.– २ तिम०२. २४,२५.

तुह्मांमध्यें ज्ञानी व समंजस कोण? त्यानें आपलीं करणीं ज्ञानाच्या लीनतेनें उत्तम वर्त्तणुकीकडून दाखवावीं.–याकोबाचें पत्र ३. १३.

परंतु वरून जें ज्ञान तें पहिल्यानें निर्मल, नंतर शांतिकारक, विनयी, सहज विश्वासणारें दयेनें व चांगल्या फळांनीं भरलेलें, अपक्षपाती व निंढोंग असें आहे.–याकोबाचें पत्र ३. १७.

अणखी जे शांति करितात, त्यांकडून न्यायीपणाचें फळ शांतीनें पेरलेलें आहे.–याकोबाचें पत्र ३. १८. ]